म. ग्रं. सं. ठाणें
विषय मु. प्रचार
सं. क्र. 28

REFBK-0002187
REFBK-0002187

# विलायतचीं बातमीपत्रें

लेखक

**नरसिंह चिंतामण केळकर.**

---

मुद्रक व प्रकाशक

रा. रा. केशव रावजी गोंधळेकर जगद्धितेच्छु प्रेस,

REFBK-0002187

शके १८४४ ] प्रथमावृत्ति [ सन १९२२

किंमत १। रुपया.

क्र. २९८५

सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें राखून ठेविले आहेत.



न० चिं० केळकर,

[ शिष्टमंडळाचे चिटणीस व सभासद ]

# विलायतचीं बातमीपत्रें

श्री० न० चिं० केळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 27640
संदर्भ शाखा

विक्रीस तयार ! विक्रीस तयार !

## सुभाषित आणि विनोद.

[ दुसरी आवृत्ति ]

किंमत १। सव्वा रुपाया.

लेखक---नरसिंह चिंतामण केळकर.

## आयर्लंडचा इतिहास.

किं. १। ] [ ट. ख. नि.

लेखक---नरसिंह चिंतामण केळकर

आयर्लंडला स्वराज्य मिळालें. ज्या राष्ट्रभक्तांनीं आपल्या अपूर्व स्वार्थत्यागानें आयर्लंडला स्वातंत्र्याची जोड करून दिली त्यांची चरित्र-माला दिल्याकारणानें आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा इतिहास फारच मनोवेधक झाला आहे. सर्व मराठी वाङ्मयांत आयर्लंडविषयीं एवढाच प्रमाणग्रंथ उपलब्ध आहे.

पुस्तकें मिळण्याचा पत्ताः—

'केसरी' ऑफिस, पुणें सिटी, किंवा-

रावजी श्रीधर गोंधळेकर यांचा बुक-डेपो,

बुधवार चौक, पुणें.

## ☞ कांहीं वाचनीय व संग्राह्य पुस्तकें.

**श्रीमन्महाभारतावरील उपसंहार.** रु.आ.पै.
श्री. चिंतामणराव विनायक वैद्यकृत. ५–०–०

श्री. नरसिंह चिंतामण केळकरकृत.

**मराठे व इंग्रज.**
[ आवृत्ति तिसरी ] २–४–०

**विलायतचीं बातमीपत्रें.** १–४–०

ट. व्ही. पी. खर्च वेगळा.

पुस्तकें मिळण्याचा पत्ताः—

रावजी श्रीधर गोंधळेकर.
यांचा बुकडेपो बुधवार चौक,
पुणें सिटी.

आमचे मुंबईचे एजंट—

परचुरे पुराणीक आणि मंडळी
बुकसेलर्स व पब्लीशर्स
माधवबाग, मुंबई.

# प्रस्तावना.

केसरीच्या द्वारें प्रथम प्रसिद्ध झालेलीं माझीं विलायतचीं बातमीपत्रें एकत्र करुन या पुस्तकांत छापलीं आहेत. सन१९१९सालीं हिंदी स्वराज्य-संघ व राष्ट्रीय सभा यांनीं विलायतेस शिष्टमंडळें पाठविलीं. त्या दोहोंचाहि मी एक सभासद होतों. शिष्टमंडळें ज्या कामांकरितां गेलीं त्यासंबंधीं विलायतेंत घडलेली हकीगतच मुख्यतः या पत्रांतून दिलेली आहे. त्यांत कांहीं थोडें प्रवासवृत्त व विलायतेंत पाहिल्या ऐकल्या गोष्टींचे तुरळक उल्लेख आले आहेत. पण " ग्रामं गच्छन् तृणं स्पृशति " या न्यायानें ते गौण आहेत हें वाचकांच्या लक्षांत येईलच. मी विलायतेस अवघा पांच महिने होतों. त्यांत लंडनच्या बाहेर वस्तीला असा फार तर दोन दिवस असेन. लंडनशिवाय ऑक्सफर्ड, केंब्रिज, बार्मिंगहॅम, ब्रिस्टल, वेस्टन येवढींच गांवें मीं पाहिलीं. तीहि फक्त कांहीं तासपर्यंत. खुद्द लंडनमध्येंहि शिष्टमंडळाचे व 'इंडिया' पत्राचे कामामुळें तेथील इमारती, संस्था, प्रदर्शनें, वगैरे पाहण्याची संधि फारच थोडी मिळाली. यामुळें विलायतचें असें वर्णन मला फारसें देतां येण्यासारखें नव्हतें, व जें होतें त्यांतीलहि सदर बातमीपत्रांतून फारच थोडा भाग देतां आला. परत आल्यावर उरलेली सर्व माहिती व्यवस्थितपणें एकत्र करून एक पुस्तक लिहावें असें माझ्या मनांत होतें. परंतु त्या कामाला तेव्हांपासून अनेक कारणांनीं वेळच मिळाला नाहीं. हीं पत्रें मी विलायतेहून लिहीत असतां कित्येक वाचकांना तीं बरींच आवडलीं असें त्यांनीं मला पत्रद्वारें तेव्हांच लिहून कळविलें होतें. इकडे आल्यावरहि हीं सर्व पत्रें एकत्र छापून काढावीं अशा आग्रहाच्या सूचना त्यांनीं केल्या. पण विलायतेसंबंधीं स्वतंत्र पुस्तकच शक्य तर लिहावें असें पुष्कळ दिवस मनांत घोळत असल्यानें, तें काम मीं बाजूस टाकलें. पण तशा प्रकारचें पुस्तक आणखी बरेच दिवस लिहून होण्याचा संभव नाहीं असें जाणून अखेर हीं पत्रें छापण्याचें काम हातावेगळें करीत आहे.

परिशिष्ट नंबर १ यांत दिलेली कविता केवळ विनोदबुद्धीनें लिहिलेली आहे, ती शब्दशः घ्यावयाची नाहीं, हें चतुर वाचकांस सांगावयास नकोच. कंटाळा घालविण्याला विनोदासारखें दुसरें साधन नाहीं. बोटीवरील 'स्मोकिंग रूम'मध्यें एका कोपऱ्याला बसून जेव्हां अतिशय कंटाळलों तेव्हां कांहीं तरी लिहावें म्हणून वही घेतली, व थट्टेखोरपणानें कांहीं तरी लिहिलें. इतकाच या कवितेचा अर्थ.

परिशिष्ट नंबर २ यांत मी कोलंबोहून केसरीस पाठविलेलें एक पत्र छापलें आहे त्यावरून आदल्या वर्षीं ( १९१८ सालीं ) शिष्टमंडळाची विलायत कोलंबोसच कशी झाली हें दिसून येईल.

शेवटीं एकच गोष्ट सांगावयाची, ती ही कीं, कोलंबोच्या पत्रांत ज्या लँकेशायर बोटीचा उल्लेख आहे, व जिच्यावरून विलायतेस जाण्याचा आम्ही जीव तोडून प्रयत्न केला, ती कोलंबोहून आम्हांला मागें टाकून पुढें गेल्यावर विलायतेस पोहोंचण्याच्या पूर्वींच पाणसुरुंग लागून फुटून बुडाली. तसेंच ज्या इजिप्त नामक बोटीनें मी विलायतेहून परत आलों तीहि नुकतीच बुडाल्याची हकीगत वर्तमानपत्रांतून आली आहे. या बोटी बुडणें व आम्ही त्यांत असणें या गोष्टींचा मेळ दैवाला पाडावयाचा नव्हता एवढीच गोष्ट खरी. आयुष्यांतील टळलेली संकटें हीहि भोगलेल्या संकटासारखीच एक ध्यानांत राहण्यासारखी गोष्ट असते ! म्हणूनच वरील बोटींचा हा उल्लेख येथें केला आहे.

ता. १–१०–१९२२ } न. चिं. केळकर
पुणें. }

ग्रा. क्र. २९८७

# श्री० न० चिं० केळकर यांचीं विलायतचीं बातमीपत्रें

## प्रवास-वर्णन

### पत्र १ लें

**ता. ३० एप्रिल १९१९**—आशीर्वाद विशेष. मी तारीख मजकुर-पर्यंत सुखरूप आहें. मुंबई बंदर सोडतांना मलाहि तुम्हां सर्वांप्रमाणेंच वाईट वाटलें. पण केव्हांतरी निर्धारानें, निरोप घेण्यास आलेल्या मंडळी-कडे पाठ फिरविणें जरूर होतें. म्हणून बोटींत चढतांच आपल्या खोलींत जाऊन बसलों, व बोट चालू होईपर्यंत डेकवर मुळींच आलों नाहीं. बोट सुमारें १२॥ नंतर सुरू झाली. तेव्हां डेकवर जाऊन पाहतों तों, कांहीं मंडळी धक्यावर गजाच्या दाराआड उभी राहून बोटीकडे पहात होती, व कांहीं हातरुमाल फडकावीत होती. परंतु त्यांचीं तोंडें मात्र दिसत नव्हतीं. तरी पण डेकवर पगडीवाला असा मी एकटाच असल्यानें माझ्या हातरुमालाची खूण आपणांपैकीं कोणीतरी ओळखतील असें समजून मीहि उलट हातरुमाल उडवीत होतों. रुमालांची रुमालांना ही सलामी कांहीं वेळ झाल्यावर मी परत खोलींत येऊन बसलों.

बोटींत सामानसुमान इतकें पडलें होतें कीं, आंत फिरण्यास यत्किं-चितहि वाट नव्हती. खोली बरीच लहान—दुसऱ्या क्लासची असून पहिल्या क्लासचें भाडें उकळण्याकरितां पहिल्या क्लासची म्हटलें गेलें कीं काय असाहि संशय आला. त्यांत चार माणसांचें सामान राहणार ! तरी पण सुदैवानें अगर दुर्दैवानें पटेल यांचें सामान सगळेंच चुकल्यामुळें, व ना. शास्त्री यांचीहि एक पेटी चुकून राहिल्यानें ईश्वराची खैर झाली! नाहींतर सामाना-वर मनुष्य असें होण्याऐवजीं मनुष्यावर सामान असें होण्याचीच पाळी आली असती. खोलींत माणसें चार. मी, पटेल, शास्त्री व कुंझरू. आम्हां दोघांस खालच्या जागा व त्या दोघांस वरच्या जागा होत्या.

एका अर्थानें जहाजांत तरी हे दोन नेमस्त दोन जहालांच्या डोक्यावर चढले असें झालें खरें. मग इंग्लंडांत: उलट सुलट कसें काय होतें तें पहावें ! थॉमस कुक कंपनीला आमचीं राजकीय मतें काय माहीत ? त्यांनीं आम्हीं चौघेहि हिंदी गृहस्थ म्हणून आम्हांला एकाच दालनांत कोंडलें, व दोन्हीं निरनिराळीं मतें विलायतेस सांगावयास जाणारीं माणसें अशा रतीनें एकाच स्थळीं आलीं. आम्हीं सर्व एकाच केबिन मध्यें आहों हें तर खरेंच; पण एका इंग्रजी म्हणीप्रमाणेंहि आम्हीं सर्व एकाच बोटींत आहों. " वुइ आर इन धि सेम बोट " ही गोष्ट लक्षांत ठेऊनच आम्हां सर्वांचें परस्परांशीं वर्तन विलायतेंत होईल अशी मला आशा आहे. असो. पटेल यांचें सामान जवळ नाहीं व शास्त्री कुंझरू यांना घाईनें यावें लागल्यामुळें त्यांजबरोबर फारसें सामान नाहीं. यामुळें मजबरोबर मीं भाराभर आणलेलें सामान इतरांना थोडें बहुत उपयोगीं पडत असें. मीं बरोबर सामान विनाकारण फार घेतलें असें मला निघतांनाच वाटत होतें. आणि अनुभवावरून पाहतां यापेक्षां निमे सामान आणलें असतें तरी बरें झालें असतें, असें या घटकेच्या अनुभवावरून वाटतें. नेमकें सामान नेमक्या ठिकाणीं ठेवलें व तें हवें तेव्हां नेमकें मिळालें तर त्याची मौज. पण मी स्वभावतः थोडासा धांदरट असल्यामुळें माझ्या सामानाचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं.

स्वतःजवळच्या व बोटीवरच्या मिळून, खाण्याचे पदार्थांना कांहीं कमी नाहीं. ६ वाजतां चहा, ९ वाजतां छोटी हजेरी, १ वाजतां फराळ, ७॥ वाजतां जेवण अशा रीतीनें दिवसांतून चार वेळ खाण्यास मिळतें. केवळ वनस्पती—आहाराचे पदार्थच इतके मिळतात कीं, इतर पदार्थांकडे ढुंकून पहाणारा व बोटीच्या प्रवासाची सबब सांगणारा माणूस एकतर लोकोत्तर खादाड किंवा बेताल जिभेचा असला पाहिजे. ज्यांनीं मांसाहाराचें अध्ययन हिंदुस्थानांतच केलें असेल त्यांना प्रवासाची सबब सांगण्याचें काय कारण ? कांहीं असो; खाण्यापिण्याचे बाबतींत माझ्यासंबंधानें मुळींच काळजी करूं नका. बरोबरचे पदार्थ काढून खाल्ले तर अजीर्ण होईल म्हणूनच ते फारसे काढले नाहींत. त्यांना बहुतेक विलायत पहावी लागणार असें दिसतें !

हवा सुंदर आहे. पण खोल्या इंजिनाचे शेजारीं असल्याकारणानें व एका अंगानें बोळ असल्यामुळें तापतात. खोलींतला विजेचा पंखा व हवेकरितां राखलेला भोंकसा यांनींहि दिवसा काम भागत नाहीं. रात्रीं मात्र गारवा असतो. हवेकरितां बहुधा दिवसभर डेकवर राहावें लागतें. पण समुद्राकडे तरी नुसतें कितीवेळ पहात निरुद्योगी बसणार ? म्हणून डेकचे आंतले अंगास स्मोकिंग रूम व दुसरे बाजूस लहानशी लायब्ररी आहे, तिजमध्यें बसून लिहिण्यावाचण्याची करमणूक करून वेळ घालवावा असा बेत केला आहे.

**ता. १ मे**—आज दोन प्रहरीं बारा वाजेपर्यंत दोन दिवसांत आम्हीं एकंदर ५५० मैल प्रवास केला. या दोन दिवसांत समुद्रांत शिडांच्या दोन होड्यांशिवाय दुसरें कांहीं एक दिसलें नाहीं. वर आकाश खालीं पाणी. समुद्र अनंत अपार खरा,पण भोंवतीं ठराविक परिघाचें वर्तुळ म्हणजे २०।२५ चौरस मैलांचें आवार पडत असल्यानें एखाद्या प्रचंड सरोवरांत आहों इतकेंच वाटतें. समुद्र अत्यंत शांत असल्यानें सरोवराची कल्पना दृढच होते. समुद्र हा प्रवाशांना लहरी बापासारखा वागवतो. तो शांत असला म्हणजे मुलांना मांडीवर वाटेल त्या रीतीनें खेळूं देतो, पण तोच रागावला म्हणजे लाटांचे तडाखे देऊन त्यांचे हाल हाल करतो. लिहावयाच्या खोलींत बसलों असतां आपण चल नसून स्थिर आहों कीं काय असा एखादे वेळीं भास होतो. करमणुकीकरितां म्हणून समुद्राकडे पहात बसल्यास या शांततेचा कंटाळाहि येतो. खरोखर शांतताप्रिय मनुष्याच्याहि मनाचा पांग फेडण्यासारखा हा प्रवास आहे. एकच देखावा, एकच सहचरमंडळ, एकच नियमित व्यवसाय ! पण मला या प्रवासांत सर्वांत अधिक आवडणारी गोष्ट ही कीं, वाचावयास वर्तमानपत्रें नाहींत ! वाटते बरी पीडा टळली ! यामुळें चित्ताला व्यग्रता मुळींच नाहीं. मन समुद्राला व समुद्र मनाला काय गोष्टी सांगेल तेवढ्याच !

आमच्या बोटीचें नांव मनोरा. नांवाप्रमाणें हा एक ५।६ मजली मनोरा आहे. जहाजाच्या कडेवर उभे राहिलें म्हणजे तर त्या प्रचंड लांकडी लोखंडी द्रोणाचें कौतुक वाटतें. त्याच्या बाजूला पहात गेलें म्हणजे ओळीनें खालील देखावे दिसतात. प्रथम फेसाळलेला प्रचंड डोह. या डोहावर लाटा

उठून फुटतात तेव्हां, निळ्या मखमलीच्या रुजाम्याचा कोणी राक्षस चोळामोळा करून टाकीत आहे व त्यांतून सागरसुंदरीच्या गळ्यांतील अनेक लहानमोठ्या मोत्यांचे हार तुटून मोतीं घळघळून खालीं येत-आहेत, कीं काय असा अद्भुतरम्य देखावा दृष्टीस पडतो. आगबोटीच्या धारेनें तुटणाऱ्या लाटांचे तुषार क्वचित् अंगावरहि येतात; व त्यांवर तिरपे सूर्य-किरण पडले म्हणजे धावत्या इंद्रधनुष्यांची शर्यत पहावयास सांपडते. या उच्छृंखळ फेसाळलेल्या डोहापलीकडे पाहिलें म्हणजे प्रथम निळ्या स्फटि-कानें बनविलेलें एक विस्तीर्ण आंगण, त्याच्या पलीकडे मंदमंद उठणाऱ्या प्रसन्न पण चंचल तरंगांची परंपरा, त्याच्या पलीकडे जवळ जवळ निश्चल अशी काळी निळी क्षितिजापर्यंत पसरलेली बैठक, त्यापलीकडे आकाश व पाणी यांचा क्षितिजावर झालेला संयोग किंवा मधुर मीलन, व त्याच्या पलीकडे भ्रमात्मक मिथ्या पर्वतांची एक आंखीव रांग. यापलीकडेहि जाऊन पाहावेसें डोळ्यांना वाटतें. पण दिसत नाहीं म्हणून निराशेनें परतावें लागतें. समुद्राच्या पोटांत पृथ्वीसारख्याच डोंगर दऱ्या आहेत. पण सागरपृष्ठाच्या समरसतेंत हा सर्व उच्चनीच भाव नाहींसा होतो. सागराच्या पोटांत पृथ्वीपेक्षांहि अधिक विचित्र प्राणी व वनस्पति आहेत असें म्हण-तात. पण एखाद्या कृपण धनिकाप्रमाणें त्यानें त्या सर्व दडवून ठेविल्या आहेत. हा दिसतांना एकमार्गी एकरूप असा दिसतो. पण वातावर-णाच्या सर्व लहरींचें उगमस्थान याच्या मध्येंच असतें हें वरवर पाहाणारास काय कळणार ? असो; याच्या मुठींत बसून आणखी २२।२३ दिवस काढावयाचे आहेत तेव्हां त्याला इतक्यांतच बरावाईट न म्हटलेलें बरें !

जहाजावर वेळ जाण्याला समुद्राकडे पाहण्याव्यतिरिक्त उपाय म्हटला म्हणजे हिंदी मित्रमंडळीशीं संभाषण व यूरोपियन सहचरांकडे कुतूहल दृष्टीनें पाहणें हा होय. दिवाण बहादूर माधवराव, ह्यांचा नोकरवजा घुतण्या, ना. पटेल, ना. शास्त्री, सत्यमूर्ति, हृदयनाथ कुंझरू, डॉ मेथा व डॉ. पेशीकाका हे आमचे मुख्य हिंदी सहचर आहेत. डॉ. मेथा हे श्रीमंत गृहस्थ आजारी असून अमेरिकेस विद्युदुपचार करून घेण्यास जात आहेत. डॉ. पेशीकाका हे डॉ. मेथा यांच्या खर्चानें त्यांचे सोबती म्हणून त्यांची शुश्रूषा करण्याकरितां जात असून साधल्यास इंग्लंडांत ते नेत्रचिकित्सेच

अभ्यास करणार आहेत. आम्हांपैकीं चौघे तामील. तिघे गुजराथी, तिघे मराठी, व एक हिंदी बोलणारे गृहस्थ असल्यानें भाषाव्यवहार बहुधा इंग्रजींतच चालतो. पण परभाषेंतला हा व्यवहार लवकरच कंटाळवाणा होतो. त्यांतूनहि आम्हांमध्यें दोन प्रकारचीं मतें, व हेतूहि दोन प्रकारचे; यामुळें सार्वजनिक गोष्टींवरील विशेषतःराजकारणावरील संभाषण क्वचितं होते, व झालें तरी लवकरच आवरतें. तथापि आमचा सर्वांचा एक गट असून भोजनगृहांत किंवा उघड्या तक्तपोशीवर आम्ही एकत्र असतों. पहिल्या क्लासांत युरोपियन प्रवासी सुमारें पन्नास आहेत. त्यांचाहि अर्थात एक गट वेगळा आहे. ते आमच्याकडे पाहतात. आम्ही त्यांच्याकडे पाहतों. खांद्याला खांदा लाऊन हिंडतों फिरतोंहि,पण परस्पर भाषणव्यवहार नाहीं. तोंडाचें हें कुलूप प्रवासाच्या अखेरपर्यंत कायम राहणार असें दिसते ! हे युरोपियन लोक मात्र आपापल्यांत खूप खेळतात व करमणूक करितात. करमणुकींत थोर लहानांचे व लहान थोरांचें अनुकरण करितात. वृद्धांनीं लघोऱ्या खेळाव्या, आणि दोन वर्षांच्या मुलींनी आपल्या आकाराएवढ्या बाहुल्या हातगाडींत घालून एखाद्या पोक्त आजीबाईप्रमाणें सहल करण्यास न्याव्या याहून अधिक मनोरंजक करमणूक कोणती ?

हिंदी व युरोपियन या सर्वांच्याच करमणुकींत आज एक लहानशी भर पडली. ‘ संध्याकाळीं पांच वाजतां जीव बचावण्याची कवाईत होणार आहे, तरी आपापलें कापडी भोपळे घेऊन डेकवर यावें ’ अशी इशारत देण्यांत आली होती. पांच वाजतां आगबोटीच्या चिमणीनें तीन कर्कश किंकाळ्या फोडल्या. ही कवाइतीची खूण! खऱ्या धोक्याच्या प्रसंगीं येथूनच धांदलीला सुरवात व्हावयाची ! व ही धांदल टळावी म्हणूनच या कवाईतींत २०।२५ उतारूंना एक एक लहान होडी ठरवून ठेविलेली असते; तिला नंबर दिलेले असतात; व अमूकपासून अमूक नंबरच्या खोल्यांतील उतारूंनी धोक्याची इशारत मिळतांच . आपापल्या होड्यांशीं येऊन उभे रहावें असा संकेत असतो. पांच वाजतां ही इशारत मिळतांच सर्व उतारू आपापले कापडी भोपळे गळ्यांत घालून या होड्यांशीं येऊन उभे ठाकले, व पुढें आणखी काय काय शिकविण्यांत येतें याची वाट पहात राहिले. लगेच खऱ्या संकटाच्या वेळेप्रमाणे खलाशी लोक गळ्यांत

भोपळे बांधून डेकवरून धाऊं लागले. पण दहा मिनिटें गेलीं तरी आम्ही उभे ते उभेच ! शेवटीं कवाईत संपली. आपापले भोपळे उतरून ज़ा असें सांगण्यांत आले. तेव्हां कुतूहलप्रिय लोकांची निराशा झाली. आम्हाला वाटत होतें जहाजावर ठेवलेल्या जीव बचावण्याच्या लहान होडया खालीं सोडून त्यांत प्रवाशांनीं दोऱ्यांच्या शिडयांनीं कसें उतरावयाचे हें तरी शिकवतील. पण सर्व व्यर्थ. नाटकाच्या तालमींत मरणाची जी कवाईत होते तिच्या इतकी देखील ही आमची जीव बचावण्याची कवाईत रंगली नाहीं. असो; कवाईत संपतांच सर्वजण हांसत आपले भोपळे घेऊन आपल्या खोलीकडे परतले. मृत्यू जोंवर दूर असेल तों पर्यंत त्याला कोणीहि हसणारच !

## पत्र नं. २

**ता. २ मे**—सुमारें आठशें मैल चालून आलों तरी तोच देखावा !- जमिनीवर निरनिराळे देखावे पाहण्याची सवय झालेल्या डोळ्यांची पण पुरी खोड मोडली. ताऱ्यांच्या स्थितीचें ज्ञान असणाऱ्यालाहि आकाशाकडे पाहून आपण स्थलांतर केलें असें वाटण्याचा संभव नाहीं. मुंबई सोडल्यावर एक तासानें, म्हणजे जमीन दिसेनाशी झाल्यावर, ज्या ठिकाणीं होतो तेथेंच आतां मीं आहें असें जर कोणी प्रतिपादिलें तर सभोंवार पाहून नाहीं म्हणण्याची सोय नाहीं. फक्त जहाजावरचें घडयाळ, व त्याकडे पाहून आपलीं घडयाळें, रोज सुमारें पंधरा मिनिटें मागें सारावीं लागतात तेव्हांच स्थलांतर खरोखर घडलें असें वाटतें !

आज दोनप्रहरीं बोट दहावीस मिनिटें स्तब्ध उभी करण्यांत आली होती. त्यावेळीं समुद्र इतका शांत होता कीं, साध्या तळयाइतक्याहि लाटा त्यावर उठत नव्हत्या.

आमच्या भोंवतीं पहिल्या क्लासाचें उतारू आहेत ते अर्थात् दुसऱ्या वर्गाच्या उतारूहून अधिक श्रीमंत, उच्च सामाजिक दर्जाचे असा फरक असतांहि या दोन वर्गांतील उतारूमध्यें दळणवळण असण्यास हरकत नसावी. पण तसें क्वचितच दिसतें. दुसऱ्या वर्गाच्या उतारूंत मिशनरी वगैरे लोक आहेत व त्यांना आमच्याशीं बोलण्याची हौस दिसते.

यांतल्या दोघांनीं मला 'तुम्ही केळकरना' असें विचारलें, तेव्हां त्यांच्याशीं बोलण्याचा संकोच सहजच वाटला नाहीं. फर्स्ट क्लासांतील लोक मात्र तटस्थ आहेत व त्यांची ओळख करून घेण्याची आम्हालाहि फारशी इच्छा नाहीं. दुसऱ्या वर्गाच्या उतारूंपैकीं कांहींनीं आम्हीं ज्या कार्याकरितां विलायतेस जात आहों त्या कार्याची माहिती समजून घेण्याची इच्छा दर्शविली व 'स्मोकिंग सलून' मध्यें बसून संभाषण प्रसंग घडवून आणण्याचा घाट घातला. व दहा वीस लोक आंत आलेहि. पण तेथें असणाऱ्या फर्स्ट क्लासच्या उतारूंनीं हरकत घेतली. 'येथें राजकीय स्वरूपाची सभा भरविण्यांत येणार नाहीं. दुसऱ्या क्लासच्या लोकांनी येऊन बसण्याची ही जागा नव्हे.' असा गवगवा करण्यांत आल्यामुळें ते बिचारे उठून गेले. इतर रीतीनें आम्ही त्यांच्याशीं भाषण प्रसंग घडवून आणणार आहों.

**ता. ३-४-५-६** हे चार दिवस हवेच्या दृष्टीनें वाईट गेले. समुद्र शांत हें सुख, पण वारा नाहीं हें मोठें दुःख. चार दिवस असा उष्मा झाला कीं बोलावयाची सोय नाहीं. अंगांतून दहा वीस शेर घामाचें पाणी गेलें असेल. पण सुदैवानें बोटीवर बर्फ हवें तितकें फुकट मिळतें. जितका घाम गेला तितके गार पाणी आंत ओतलें. त्यांतून दोन दिवस मला ज्वर आला. याचें कारण आंत बाहेर असमाधान; दोन दिवस पडून होतों. मग क्किनाईन घेतलें, उपवास केले तेव्हां प्रकृति फिरून ताळ्यावर आली. तूर्त दूधभातच खाण्याचा विचार केला आहे. दूध हवें तितकें वेळां मिळतें. केळीं ब्रेड येवढयावर माझा निर्वाह चांगला होतो. या चार दिवसांत मी डेकवर मुळींच गेलों नाहीं. पण डेकवर जाणारे लोकहि हाकाच मारीत होते. परवांपासून कांहीं लोक रात्रीं डेकवर निजावयास जाऊं लागले. मी अद्यापि आपल्या खोलींतच निजतों.

**ता.५** पासून अरबी समुद्र संपून तांबडा समुद्र सुरु झाला. सुरवातीला एडन लागतें, पण बोट एडनला लागली नाहीं. थेट सुएझला जाणार म्हणून एडनच्या डोंगराचें फक्त दुरूनच दर्शन घडलें. तसेंच, हें पत्र एडनला न टाकतां आल्यामुळें तुह्मांस तें मिळण्यास आणखी दहाबारा दिवस अधिक लागणार. असो. तांबडा समुद्र हा निळाच आहे. पण

दूर किनाऱ्यावर तांबडया दगडाचे—तांबूस रंगाचे—डोंगर दिसतात. ह्मणून त्यास तांबडा समुद्र ह्मणतात. आज तीन दिवस अरबस्तानच्या किनाऱ्यापासून कांहीं अंतरावरून जात आहों. तांबडया समुद्राची रुंदी थोडी असल्यामुळें डाव्या बाजूस फक्त कांहीं मैलावर आफ्रिकेचा किनारा आहे असें माहीत आहे, पण तो दिसत नाहीं. अरबस्तानचा किनारा म्हणजे रुक्षपणाची कमाल आहे. शेंकडो मैलांच्या किनाऱ्यांत एक झाड दिसलें पण तें नुसतें बोडकेंच नव्हे तर अगावर खवले पडलेले व दिसण्यांत भयंकर. अरबस्तातचा किनारा पाहतानां मला आपच्या कोंकणच्या किनाऱ्याचें स्मरण झालें. कोंकणच्या बोटींतून जातांना किनारा किती तरी नयनमनोहर दिसतो ! अरबस्तान ओसाड अरण्यांकरितां प्रसिद्ध कसें आहे त्याची दुरून थोडी चुणूक कळली. तांबडासमुद्र लहान असल्यामुळें मधून मधून जहाजें भेटण्यास सुरवात झाली. पाहिले पांच दिवस आम्ही कायते सागराचे अनन्य सामान्य असे राजे होतो असे वाटलें, पण खरें बोलावयाचे म्हणजे समुद्राची भीतिहि तितकीच वाटत होती. हल्लीं किनारा मधून मधून दिसतो म्हणून त्याचा आह्मालां खरा आधार कसचा, पण आपली जमिनीची सोबत इतकेंच कायतें तांबडया समुद्राची उष्णतेकारितां फार ख्याती आहे, पण कालपासूनच्या अनुभवावरून अरबी समुद्रच अधिक उष्ण वाटला. मुंबईस उकडूं लागलें ह्मणजे आपण ह्मणतों चला समुद्रावर चाऊं; आणि इथें तर खुद्द समुद्रावरच आहों. पण काय उपयोग !

उष्म्यानें अंगावर लाल गांधीहि आल्या, पण त्या आतां हळूं हळूं मावळत आहेत.

**ता. ७-८-९**—हवा थंड होऊं लागली आहे, पण खारट हवेनें शौचास साफ व्हावें तसें होत नाहीं. व तहान फार लागते. तरी पण थोडें खाणें हाच सर्वोस राम बाण उपाय आहे व तो करीत असतों. कालपरवांपासून येणारींजाणारीं जहाजें दिसूं लागलीं आहेत. मेलबोटीपेक्षां आम्ही सावकाश जातों याचें वाईट वाटतें, पण इतर जहाजांच्या मानानें आम्ही जलद जातों हें पाहून लगेच बरें वाटतें. काल आफ्रिकेच्या बाजूच्या एका

बेटावरलि डोंगराचें टोंक दिललें. आफ्रिका पाहिली असें पूर्वी शपथेवर सांगतां आलें नसतें तें आतां मात्र येईल !

काल संध्याकाळीं जहाजाची शीट मोठ्यानें वाजल्यानें फिरून आपलें जीव बचावण्याचे भोपळे बांधून डेकवर गेलों. हीहि कसरत तालीम आहे असें वाटलें व तेंच खरें होतें. पण लगेच अर्ध्या तासानें मृत्यूसंबंधीं रंगीत तालीम करण्यापेक्षां एक प्रत्यक्ष मृत्यूचा देखावा दिसला. जहाजावरील एक मुसलमान खलाशी न्यूमोनियानें गेल्या आठ दिवसांत आजारी होऊन मेला त्यास इतर खलाशांनीं दफन विधी करून जलसमाध दिली अर्थात् हें पहाण्यास जहावजारील सर्व उतारु आपापल्या डेकवर गोळा झाले होते व बोटहि पांच मिनिटें थांबविण्यांत आली होती. मेलेल्याची गंमत जित्यांनीं न पहावयाची तर कोणी ? पण गंमत पहावयास कोणी न मिळतां बोटीवरच्या सर्व उतारूस मरावें लागल्याचे प्रसंग या युद्धांत किती तरी जणांवर आले असतील. दफनविधी चालला असतां एक घंटा वाजली. एक म्हणाला ही पहा मृताकरितां प्रार्थना करण्याची व दुःखप्रदर्शनाची घंटा. दुसरा म्हणाला ' नव्हे ही जेवणाच्या तयारीची घंटा ' आणि तें खरोखरच तसें होतें !

आम्हीं उद्यां सुएझमधून प्रवास करूं असें वाटतें, व उद्यांच पोर्ट सयदला पोचूं; बाकीचा सविस्तर मजकूर पुढील पत्रांत लिहीन. पत्रें आज संध्याकाळीं बंद करून पोष्टांत टाकावयास द्यावयाचीं म्हणून येथेंच थांबतों.

## पत्र नं. ३

पहिल्या आठवड्यांत व दुसऱ्यांत सर्वच गोष्टींत फरक पडला. जमीन दिसूं लागली, थंडी पडूं लागली, प्रकृती सुधारली व तहानभूक बेताची लागूं लागली. लोंकरी कपडे खालच्या मजल्यावर पेटींत सर्व ठेवले होते त्यांपैकीं कांहीं वर आणून ठेवले, कारण यापुढें थंडीस जपलें पाहिजे असें सांगतात. माझें जेवणखाण फिरून नेहमींप्रमाणें सुरू झालें.

अरबस्थानचा किनारा दिसत होता म्हणून लिहिलें तीं निवळ बेटें आहेत असें सांगतात.

ता. ९. आरबस्तान संपून सिनाई पर्वताच्या टेंकड्या दिसूं लागल्या. याला लगत पालेस्टाईन प्रांत आहे, महंमदाची जन्मभूमि सोडून आतां आम्ही ख्रिस्ताच्या जन्मभूमीच्या देशालगत आलों. सायंकाळीं पांच वाजतां एखाद्या बंदरांत आलोंसें वाटलें; इतके दोहों बाजूंचे डोंगर जवळ जवळ आलेले दिसले. आफ्रिकेचा म्हणजे इजिप्तचा किनारा उजव्या किनाऱ्यापेक्षां अधिक जवळ आला, एक दीपगृहहि आढळलें; पण शोध करितां सुएझ अजून १५० मैल लांब !

ता. १०. सकाळीं फिरून बंदरी देखावा सुरू झाला, ८॥ वाजण्याच्या सुमारास खास सुएझ बंदरांत आलों. हें बंदर मुंबई बंदरापेक्षां लहान आहे. बंदर वर्तुळाकार असून एका बाजूस डोंगर बोडके व तांबूस, दुसऱ्या बाजूस तांबड्या रेतीची जमीन व इतर दोन बाजूस बंदरच्या इमारती तेलाच्या वखारी वगैरे दिसतात. बोट नांगरतांच ईजिप्शियन सरकारचा डाक्तर वर आला व त्याच्या पुढून सर्व मंडळी चालून गेल्यानें डाक्तरी तपासणी संपली ! नंतर चित्रें, फळें, विड्या वगैरे विकणारे लोक होड्यांतून आले. बंदरांत सुमारें ४।५ तास मुक्काम पडला होता. बंदराकडे पाहतां कालवा कोठून सुरू होतो याची कल्पनाच येईना. सुमारें १२॥ वाजतां बोट फिरून चालू झाली. सुएझचें गांव सर्व डावें टाकून कालवा सुरू होता. हा सर्व गांव बोट जातांना दिसला. पांच पन्नास इमारती आहेत. झाडी वगैरे नाहीं; पण गांवचे रस्ते रेखीव असून वरून सायकली, घोड्यांच्या गाड्या व मोटारी हिंडत होत्या. किनाऱ्यापासून पंचवीस हातांचे अंतरानें बोट जात होती. सर्व किनाऱ्याभर मधून मधून तरते पूल असून लोकांना यांवरून होड्यांतून, बोटींतून चढतां उतरतां येतें, सर्व रहदारी कालव्यावरून बोटींनीं चालते. पुढें कालवा अरुंद झाला व हीच रुंदी यापुढें कायम राहणार. वरच्या डेकवरून पाहिलें तरच पाण्यांतून चाललों असें वाटतें. खालीं खोलींतून पाहिलें तर पाणी दिसत नाहीं, व जमिनीच्या एखाद्या चरांतून आगबोट चालली आहे असें वाटतें.

कालव्याच्या दोहों अंगांनीं माती खोदल्यामुळें झालेल्या स्वाभाविक भिंतींचीं तोंडें लहान लहान दगडांनीं बांधून काढलीं आहेत. पुण्यास पर्वती अलीकडे हिराबागेजवळ म्युनिसिपॅलिटीचीं पाण्याचीं नवीन तळीं केलीं आहेत

त्यांतलीं दोन तळीं रुंदीच्या बाजूनें एक धरून लांब ७५ मैल [illegible]ठीवेळीं म्हणजे थेट तसा सुएझचा कालवा दिसेल. कालवा कंपनीनें ठराविक अंतरावर घरें बांधून त्यांतून रक्षणाची व रिपेरीची व्यवस्था केली आहे. रेल्वे स्टेशनें तशीं कालव्याला हीं घरें होत. येथें तरत्या पुलाजवळ वाफेच्या लहान लहान बोटी तयार असतात.इतरहि कालव्यांतून फिरत असतात. कालव्यांत सांचणारी वाळू काढून पाण्याची उंची कायम ठेवणें हें मुख्य काम असतें. दोहों अंगांनीं तारायंत्राची डबल लाईन आहे. या कालव्यावर युद्धांत तुर्कांनीं हल्ला करण्याचा विचार केला होता म्हणून उजव्या हाताच्या बाजूनें वाळूच्या उंचवटयांत खंदक ( लढाऊ ) खणलेले आहेत. व पलीकडे काटेरी तारांचीं कंपांउंडें केलीं आहेत. सुएझ संपतांच झाड दिसेनासें झालें; कारण कालवा बहुतेक वाळूच्या ओसाड अरण्यांतून जात आहे.

दोन तास चालून गेल्यावर हळू हळू कालवा रुंद होऊं लागलासा वाटतो. प्रथम वाटलें समोरून येणारीं जाणारीं जहाजें जावीं म्हणून जागजागीं कालवा रुंद केला असेल, पण पुढें ती कल्पना खोटी ठरली. मग वाटलें, मोठें लवण आहे व त्यांत समुद्राचें पाणी भरल्यानें तळें बनलें हीहि कल्पना बसेना. आतां पाहतों तों कालवा गेला, लवण गेलें आणि दोन्ही बाजूंस मैल दोन दोन मैल पाणी पसरलें आहे ! तेव्हां लक्षांत आलें कीं ज्या दोन तीन सरोवरांच्यामुळें इंजिनियर लिसेप यास कालव्याची कल्पना सुचली त्यांतलें हें पहिलें सरोवर. स्मोकिंगरूममधून पाहतों तों फिरून समुद्र आलासा वाटू लागला या सरोवरांतून दोन तास चालून गेल्यावर कालवा सुरू झाला.रात्रीं दुसरें व तिसरें सरोवर लागलें; मधून मधून कालवा दुहेरी असल्यासारखा वाटला. दुसरें जहाज जाण्यास वाट देण्याकरितां आमचें जहाज एक वेळ थांबलें होतें.

ता. ११ रोजीं सकाळीं ६ वाजतां पोर्ट सय्यद येथें येऊन पोंचलों, हें बंदर सुएझपेक्षां अधिक सोईचें आहे व आगबोटी तर मुंबईपेक्षां जास्त एकत्र दिसल्या. पश्चिमोत्तर दिशेस धक्का आहे. धक्क्यापासून सुमारें पन्नास हातांवर आमचें जहाज नांगरलें होतें. धक्क्यावरून रस्ता मोठा जातो, पलीकडे सर्व प्रकारच्या दुकानांच्या इमारती आहेत. म्हणण्यासारख्या भव्य नाहींत. धक्क्याखालीं पंप लागून लांबलचक तरते प्लॅटफॉर्म असून त्यांवर

अनेक लहान जॉलीबोटी वर ओढून ठेवल्या असतात. वाटेल ती उचलली आणि पाण्यांत लोटली कीं झालें ! एका क्षणाचें काम. त्याच्या अलीकडे पाण्यांत सर्व देखावा काशीच्या घाटाखालीं तरते प्लॅटफॉर्म असतात त्यांसारखा भासतो. कालव्याच्या तोंडाजवळ कालवा करणाराचा मोठा पुतळा आहे.

सकाळीं न्याहारी झाल्यावर सरकारी अधिकारी येऊन त्यानें पासपोर्ट तपासन छाप मारून दिल्यावर ज्यांना गांवांत जावयाचें होतें त्यांना परवानगी मिळाली. आम्ही सर्व मिळून होडींतून धक्क्यावर गेलों; थॉमस कुक कंपनीचे ऑफिसांत नोट मोडून पैसे केले व तार ऑफिसांत जाऊन पुण्यास व लंडन येथें तारा केल्या. नंतर कांहीं पायानें व कांहीं गाडीनें हिंडून गांव बघितला, व १ वाजतां बोटीवर परत आलों. गांव बराच मोठा, सुमारें ६०।६५ हजार वस्तीचा आहे. कालवा झाल्यापासून हा विशेष भरभराटला. येथें सर्व अंमल इजिप्शियन सरकारचा आहे; पण तंत्रें सर्व इंग्रजांच्या हातीं. मूळ फ्रेंचांनीं कालवा खोदण्याचें श्रेय घेतलें; पण पुढें कालवा-कंपनीचे शेअर पुष्कळसे इंग्रजांच्या हातीं जाऊन त्यांचें वर्चस्व झालें. येथें अधिराज सत्ता तुर्की सुलतानाची, गादी खेदिवाची, कारभार इंग्रजांचा, बाजार फ्रेंचांचा, भाषा घेडगुजरी, असा प्रकार असून सर्वप्रकारचे युरोपीयन लोक पहावयास सांपडतात. धक्क्याजवळचें गांव कोलंबोइतकेंहि चांगलें नाहीं, रस्ते गचाळ आहेत. जुनें शहर या लगत आरबटाऊन म्हणतात तें तर गलिच्छपणाचें आगर दिसलें. असो. पोर्टसय्यद येथें पायउतार झाल्यानें अरेबियन नाईटच्या मुलखाचा व आफ्रिकाखंडाचा प्रत्यक्ष स्पर्श झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सुमारें दोन प्रहरीं चार वाजेपर्यंत बोटीवर कोळसा भरण्याचें घाणेरडें काम, आरडाओरड आणि बोटीवर जाणारायेणारांची धामधूम सुरू होती. बोटीच्या स्वच्छ डेकवर बोटभर कोळशाच्या पुडीचा थर जमला होता. चार वाजतां किनाऱ्यावर गेलेली सर्व मंडळी परत आली. त्याबरोबर सुमारें ३०।४० लष्करी तरुण अधिकारी पुष्कळसें सामान घेऊन लंदनला जाण्याकरितां बोटीवर आले. यांना खोल्या दुसरीकडे दिल्या आहेत; पण ते सर्व फर्स्टक्लास पॅसेंजर असल्यानें स्मोकिंगरूममध्यें येऊन

बसतात यामुळें जागा बहुतेक अडते. शिवाय त्यांचें हंसणेंखिदळणें सुरू झालें म्हणजे गुजरांचा बाजार भरूं लागला असें वाटतें. येथें पाहावें त्याच्या तोंडांत पांढरी सिगारेट किंवा चिरूट. नाहीं म्हणावयास मिशनरी लोक तेवढे विड्या ओढीत नाहींत. पण याचा वचपा कांहीं स्त्रिया विड्या ओढतात यामुळें भरून निघतो. बेट्यांनीं जसा कांहीं स्मार्ताग्नि घेतला आहे. तोंडाचें होमकुंड सदा पेटतें व धुमतें असतें. यामुळें स्मोकिंगरूममध्यें सगळा धूर ! या सर्व कारणामुळें वर येऊन बसावेंसें वाटत नाहीं. शिवाय पूर्वींचा सर्व उकाडा जाऊन छान थंड हवा सुरू झाल्यानें खोली ऊबदार तीच बरी वाटते. रात्रीं ८ वाजतां भूमध्यसमुद्राच्या प्रवासाला सुरवात झाली. भूमध्यसमुद्र निळा म्हणून वाखाणतात; पण आरबी समुद्रापेक्षां अधिक निळा नाहीं. युरोपीयन लोकांना याच्याइतका प्रिय असा दुसरा समुद्र नाहीं, बाकी इतिहासाच्या दृष्टीनें याच्याइतका कीर्तिवान किंवा प्रसिद्ध असा दुसरा समुद्र नाहीं हें खरें. तीनहि खंडाचीं द्वारें यांत आहेत. सुएझचा कालवा झाल्यापासूनच काय, पण पूर्वीसुद्धां जगाचा घुष्कळसा व्यापार या समुद्रांतून चालत असे.

## पत्र नं. ४

**ता. १२.** आज सर्व दिवसभर अतिशय गार व सोसाट्याचा वारा सुटला होता. तोंड बाहेर काढूं देत नव्हता. गरम कपडे सर्वांच्या अंगावर चढले; परंतु डेकवर जातांच हुडहुडी भरे यामुळें बहुतेक सर्व दिवस खोलीचा आश्रय करून होतों. भूमध्य समुद्राची हवा मोठी जोमदार असते म्हणतात. निदान भूक बरी लागूं लागली खरी. पण घरच्याप्रमाणें येथील ठराविक पदार्थांचाहि कंटाळा लवकरच येतो. एकंदर पदार्थ मिळतात ते खालीलप्रमाणें:-गव्हाची ( ओट ) खीर, चहा, काफी, दूध, साखर, केळीं, नारिंगें, ब्रेड, लोणी, लोणचें, पाकाविलेले मुरंबे, मोहरी, मीठ, पाकविलेलें आलें, लिंबू, भात, डाळ, भाजी, बटाटे, साबूची किंवा तांदळाची आंबोळी, कणीक व फळें घालून बर्फाचे पाण्यांत केलेलें पक्वान्न आईसक्रीम वगैरे. यांपैकीं कांहीं नित्य टेबलावर असतात व कांहीं आल-

टूनपालटून असतात. डाळ भाजी वगैरे पदार्थांना कांहीं रुचि नसते. फोडणी नाहीं. आपण लागेल तेवढें मीठ लावून खावें. यामुळें कोणास आमटी खारट झाल्याचा बोल घरच्याप्रमाणें येथें लावतां येत नाहीं. सर्वां-बरोबर पंक्तीस बसलें म्हणजे ठराविक अनुक्रमानें ताटें ( बशा ) येतात व पदार्थ येतात तेव्हां आपल्या हातानें वाटेल तितकाच पदार्थ घ्यावा; कोणी आग्रह करीत नाहीं. पंक्तीस न बसतां आजारी वगैरे असल्यास पंक्तीचे पदार्थ खोलींत मागवावे म्हणजे मिळतात. तात्पर्य, घरच्या जेवणाची मौज येथें नाहीं, तरी पोट भरण्यास बिलकुल हरकत नाहीं. दुसऱ्या ( अभक्ष ) पदार्थांकडे लक्ष जाण्याचें कारण नाहीं; एवढेंच नाहीं तर शेजारीं मनुष्य तें खात असलेला पाहिला तर कसेंसेंच वाटतें. आम्हीं आठ नेटिव्ह लोक एका कडेला दोन टेबलांवर बसतों. सर्व युरोपीयन पलीकडे बसतात. आम्हां आठांत दुसरे चार मांसाहारी व आम्हीं चार शाकाहारी आहों. म्हणून आमचें एक टेबल व त्यांचें एक अशीं निराळीं मांडलेलीं आहेत. एकदां जागा धरल्या म्हणजे अखेरपर्यंत कायम राहतात. दुसरा कोणी त्यांवर येऊन बसत नाहीं. युरोपीयन लोक जेवतांखातांना हांसत-खिदळत असतात. आमचें जेवण बहुधां मुक्यानेंच चालतें. इंग्रजी कोणास किती चांगलें बोलतां येत असलें तरी देशी भाषेंत गप्पा चालतात, तशा इंग्रजींत रंगू शकत नाहींत. शिवाय साहेबाला आमच्या चुका कळतील म्हणून पोटांत भीति ! ही साहेबाची भीतिच अजून आम्हांस बाधते; पण ती जायला आमचें डोकें आणखी थोडें वर निघालें पाहिजे.

**ता.१३-१४.** काल आजकालचा गार वारा थांबला व साधारण आपल्या हिवाळ्यासारखी थंडी पडली आहे. डेकवर थेट सिंहगड वाटतो.

बोटीवरील युरोपीयन लोक खूप मजा मजा करीत आहेत. वेळ घाल-विण्याकरितां ते खेळ वगैरे खेळतात हें स्वाभाविकच आहे; पण त्यांना मर्यादा म्हणून कशी ती नाहीं, याचें मात्र आश्चर्य वाटतें. कांहीं मिशनरी व म्हातारे यांशिवाय या दंगलींत सर्व सामील असतात. आज दोन दिवस तर त्यांनीं बोट जशी काय डोक्यावर घेतली आहे. लगोऱ्या, शर्यती, बदाबदी, हुतुतु, नाच, सोडती, गाणेंबजावणें, फोनोग्राफ सर्व प्रकार सुरू आहेत.

**ता.१५.** आज सकाळीं ७ वाजतां आम्हीं माल्टा बेटाजवळ येऊन पोंचलों. बेटास बोट लागत नाहीं असें पाहून निराशा झाली. कारण माल्टा बेट प्रेक्षणीय आहे म्हणतात. बेटापासून दोन मैलांवरून बोट गेली. बेटावर सकाळचें ऊन पडल्यामुळें इमारती, किल्ले, तटबंदी व देवळें यांचे आकार अजमावतां आले. बेट रुक्ष दिसलें. झाडी नाहीं. कदाचित पलीकडच्या बाजूस असावी. माल्टा येथें द्राक्षें उत्तम होतात असें म्हणतात. बेटाचा सात आठ मैल लांबीचा भाग दिसत होता. पांढुरका खडक व पांढुरक्या इमारती यांचा देखावा सुंदर होता. सुएझ व जिब्राल्टर यांच्या दरम्यान हें महत्वाचें व्यापारी व लष्करी ठिकाण आहे. याला ऐतिहासिक महत्वहि बरेंच आहे. संध्याकाळीं ६ चे सुमारास 'पाजाला' नांवाचा दोन मैलांचा डोंगर लागला. त्याच्या बरीच जवळून बोट गेली. हें फ्रेंचाचें बेट असून यावर काळे पाण्याचे कैदी ठेवतात असें कोणीं सांगितलें. डोंगरावर इमारती अगदीं थोड्या; पण तंबूसारख्या लहान लहान पांढऱ्या इमारतींच्या रांगाच्या रांगा मात्र दिसल्या. मग ते तंबूच असल्यास नकळे. आज दोहों अंगांनीं जाणारीं येणारीं जहाजें बरींचशीं दिसलीं, त्यांत एक दोन क्रूझरें असावीं.

आम्हीं अमावास्येला मुंबईहून निघालों. आज पौर्णिमा. पंधरा दिवस झाले, पाण्यांत आहों. ! ता. २४ पर्यंत अजून हा प्रवास आहे. असो. बिचारा कंटाळा येतो खरा, पण प्रवास दुःखाचा नाहीं.

**ता. १६.** आज सांगण्यासारखें इतर कांहीं घडलें नाहीं. फक्त दोन प्रहरीं १ वाजल्यापासून वारा पाऊस सुरू होऊन वादळ झालें. काल संध्याकाळीं पाजाला बेटाकडे पाहत असतां एक जहाजावरील अधिकारी मला म्हणाला, समुद्र इतका शांत असलेला मीं साऱ्या जन्मांत पाहिला नाहीं; पण या सुमारास पश्चिमेकडे ढग येण्यास सुरवात झाली होती, व सूर्य मावळतांना काळ्या कुळकुळीत वानराच्या लाल तोंडासारखा दिसत होता. तेच ढग फैलावून आज लहानसें वादळ झालें. डेक भिजून गेलें व सर्व मंडळी आपापल्या खोल्यांतून बसली. जहाज खूप हलूं लागलें. संध्याकाळीं जेवणाच्या वेळीं टेबलावर निम्याहून कमी मंडळी होती. कित्येकांना बोट लागली. आमच्या खोलींत कुंझरू ह्यांपैकीं एक होते.

इतर कोणास बोट लागली नाहीं. रात्रीं बोट फारच हालली व खोलींतलें सामानहि धडाधड पडत होतें. ११ चे पुढें आम्हांस झोंप लागली. मग आमचें समुद्र काय करणार ?

ता. १७. सकाळीं उठून पहातों तो हवा बरीच निवळली होती व बोटीचें डोलणें बरेंच कमी झालें होतें. यामुळें फिरून आम्हीं पूर्व क्रमास लागलों. ९ वाजतां आफ्रिकेच्या किनाऱ्यावरचे डोंगर फिरून दिसूं लागले. यावरून आम्ही जिब्राल्टरच्या जवळ जवळ येत चाललों आहों असें वाटलें; पण हा भ्रम आहे. सर्व दिवसभर आफ्रिकेचे हे डोंगर दिसतच आहेत. पण जिब्राल्टर अजून ३०० मैल दूर आहे ! !

ता.१८. आज सकाळीं ७ वाजल्यापासून आफ्रिकेचा किनारा दिसेनासा होऊन त्याचे जागीं स्पेनचा किनारा दिसूं लागला, व सर्व दिवसभर तोच दिसत होता. किनारा सर्व डोंगराळ असून शेंपन्नास मैल लांबीच्या 'नेव्हाडा' नामक पर्वताची सोबत सर्व दिवस पुरली. पर्वत उंच असून त्याला एकामागें एक अशा अनेक रांगा होत्या. सर्वांत उंच भागावर बर्फ पडलें होतें. डोंगराच्या माथ्यावर बर्फ पडलेलें असें मीं आजच प्रथम पाहिलें. प्रथम लांबून पाहतां पावसाळ्यांत ढग डोंगराच्या शिखरावर टेकतात तसे टेकलेले दिसले; पण तज्ञ होते त्यांनीं तेव्हांच तें बर्फ म्हणून ओळखलें. या बर्फावर समोरून ऊन पडूं लागलें तेव्हां शोभा दिसूं लागली ती सांगतां येत नाहीं. उपमाच द्यावयाची तर अशी देतां येईल कीं, जसें कांहीं वांगीभाताच्या ढिगावर खिसलेलें खोबरें पसरलें आहे ! भाताच्या ढिगाच्या मानानें बायका खोबरें जितकें थोडें घालतात तितकेंच बर्फहि डोंगराच्या मानानें थोडें होतें व याहि दृष्टीनें उपमा शोभण्यासारखी आहे ! मात्र उपमेवरून मला वांगीभात खाण्याची इच्छा झाली आहे असें समजावयाचें नाहीं ! निम्मा दिवस ही शोभा पहात मीं डेकवर उभा होतों. आज हवाहि सुंदर होती. थंडी माफक, ऊन स्वच्छ, समुद्र कमालीचा स्तब्ध, व देखावा उत्कृष्ट; सर्व प्रवासांत आजच्याइतका आल्हाद केव्हांच झाला नाहीं.

ता.१९. पहाटे १॥ वाजतां झोंपेंत जिब्राल्टरला पोंचलों. आगगाडी चालू असतां निजलों म्हणजे ती थांबल्यानें आपण जागे होतों तसाच

बोट थांबल्यानें जागा झालों व पहातों तों बोट बंदरांत उभी असून दोन्ही बाजूंस दिव्यांचा लखलखाट. लगेच डेकवर जाऊन सर्व शोभा पाहून परत येऊन निजलों. आज दिवसा सर्व पहावयास सांपडणारच आहे; पण रात्रीं विशेषतः उत्कृष्ट चांदण्यांत पहावयास सांपडणारी शोभा दिवसा पहावयास मिळणार नाहीं, म्हणून पाहून घेतली. असो. टपालांत पत्र टाकण्याची वेळ झाली म्हणून येथेंच थांबतों.

## पत्र नं. ५

सकाळीं लवकर उठून सर्व कामें करून डेकवर जाऊन आधीं चौफेर बंदराचा देखावा पाहिला. बंदर पाहुन बॅकबेची आठवण होते. बंदर बॅकबेहून मोठें आहे. बदरांत येण्याचें तोंड मात्र बॅकबेहूनहि लहान आहे. पूर्वेकडून आंत शिरल्यावर उजवीकडे जिब्राल्टरचा किल्ला, पश्चिमेचे बाजूस स्पॅनिश जिब्राल्टर शहर, उत्तरेस आल्जिसेरिस हें स्पॅनिश शहर, पूर्वउत्तर कोपऱ्यास अटलांटिक महासागरांत शिरण्याचें द्वार व त्यापलीकडे मोरोक्को देशचा किनारा. बंदरांत जहाजेंच जहाजें; व मोठमोठ्या मोटार-बोटी तर काय माशासारख्या पाण्याच्या पृष्ठभागावर वावरत होत्या. सकाळची न्याहारी झाल्यावर दोन तासांनीं एक मोठी बंदरबोट येऊन बंदरांवर आम्हांस घेऊन गेली. धक्यावर पोंचण्यापूर्वी प्रचंड कोळशाच्या वखारी लागतात. धक्यावर एक गाईड (वाटाड्या) भेटला त्याला घेऊन दोन गाड्या करून शहर पाहण्यास गेलों. शहरास चौफेर तटबंदी भुईकोट किल्ल्याच्या रीतीची असून तिचा प्रकार पाहून तर थेट दिल्लीच्या किल्ल्याची आठवण झाली. वेशीच्या तोंडीं आमचे पासपोर्ट तपासून आम्हांस परवान्याचीं तिकिटें देण्यांत आलीं. सायंकाळीं नाकेबंदीची तोफ होईपर्यंतच शहरांत फिरण्याची परवानगी होती; पण आम्हांस चार वाजतांच यावयाचें होतें. वेशीजवळच फळफळावळीचें मार्केट आहे. येथून शहरचा मुख्य रस्ता लागतो, हा सुमारें २० फुट रुंद असून त्यांतच दोन पदपथ आहेत. दोन गाड्या जाण्यायेण्यास अडचणच वाटते. रस्ते मुंबई सारखे डांबरानें घोटलेले असतात. दोन्ही अंगांस लहान लहान दुकानें;

पण बंदरांत रोज शेकडों प्रवासी उतरत असल्यानें या दुकानांतून हजारों रुपयांची घडामोड होते. जरूरीपेक्षां चैनीच्या पदार्थांचीं दुकानेंच अधिक आहेत. शहरच्या मध्यभागीं एक परेडग्राऊंड ( लहानशीच ) व त्याभोंवतीं एक बाग आहे. शहराच्या पूर्व—दक्षिणचा भाग पाहण्यास परवानगी नाहीं. येथून लष्करी भाग सुरू होतो. शहर सर्व एका मोठ्या तुटक डोंगराच्या लवणावर वसलें आहे. मलबारहिलकडे लांबून पाहिलें म्हणजे जशीं घरावर घरें दिसतात तशीं डोंगराचे लवणावर सपाटी करून घरें बांधलीं आहेत. सुमारें दहा पंधरा मजले घरांवर घरें दिसतात. व लांबून शहर एकाद्या चित्रासारखें दिसतें. जिब्राल्टरचा इतिहास एन्सायक्लोपीडियांत वाचावयास सांपडतो तो वाचला म्हणजे त्याचें महत्त्व कळून येईल. किल्ल्याचा डोंगर तुटक असल्यामुळें भव्य दिसतो. तो पांढुरका असून उन्हांत पाहिलें तर त्याच्या अंगावर खवलेखवले दिसतात. याजकडे पाहून दौलताबादच्या किल्ल्याची आठवण होते. पण तो थोडा लहान आहे. किल्ल्याच्या खालच्या भागावर थोडथोडी तुरळक झाडी आहे. सर्व किल्ल्यावर लष्करीं ठाणीं व तटबंदी असून त्यावर शेंकडों तोफा पसरून पण छपवून ठेवलेल्या आहेत. त्या अशा कीं, भूमध्यसमुद्र व अटलांटिक महासागर यांतून एकमेकांत शिरणारें कोणतेंहि जहाज या तोफांचा मारा चुकवूं शकणार नाहीं. हा किल्ला म्हणजे एक किल्लीच आहे. युरोपांतील सर्व दर्यावर्दी मार्गाच्या पेटीला कुलूप असून त्या कुलपाची ही किल्ली इंग्रजांनीं आपल्या हातांत ठेवली आहे. ती कोण कधीं हिसकावून घेतो पहावें! आज दोनशें वर्षें ती इंग्रजांचे हातीं आहे. त्यापूर्वीं स्पॅनिश व त्यापूर्वीं मुसलमान लोकांच्या हातीं ही किल्ली होती.

शहर पाहून झाल्यावर आम्हीं स्पॅनिश जिब्राल्टर पाहण्यास गेलों. याच्या कस्टम हाउसपलीकडे इकडच्या गाड्या जात नाहींत. आमच्या वाटाड्याच्या कृपेनें आमची तपासणी कसून झाली नाहीं. गांवचे सर्व रस्ते उत्तम फरसबंदी आहेत. ते पाहून काशीच्या रस्त्याची आठवण होते. सर्व स्पेनमध्यें फरसबंदीशिवाय गांवांतील रस्ता नाहीं असें कोणी म्हणालें. फरसबंदीमुळें स्वच्छता दिसते. धूळ मुळींच नाहीं. पण खऱ्या अस्वच्छतेस तोटा नव्हता. घरें व दुकानें सरमिसळ असून बायका दुका-

नावर बसण्याचें प्रमाण इंग्रज दुकानांहून अधिक आहे. येथें कांहीं किरकोळ खरेदी झाल्यावर मंडळी परतली. हें स्पॅनिश शहर, पाहून मात्र कांहीं नवीन गोष्ट पाहिली असें वाटलें. ब्रिटिश जिब्राल्टर हें मुंबईच्या कांहीं भागांची नक्कल आहे. त्यांत अरुंद रस्त्यांपेक्षां कांहीं नवीन नव्हतें.

बंदरावर जाण्यापूर्वी आम्ही एका हिंदी दुकानांत शिरलों. आम्ही हिंदी लोक पाहतांच त्यांना मोठें प्रेम वाटलें. जिब्राल्टर येथें सुमारें पंधरा हिंदी दुकानें असून तीं सर्व सिंधी लोकांचीं आहेत. सिंध हैदराबाद येथील एका विशिष्ट वाणिया जातीच्या लोकांनीं आज ४० वर्षें हा धंदा उचलला असून जगांतील प्रत्येक मोठमोठ्या बंदराच्या शहरीं त्यांचीं दुकानें आहेत. कोलंबोस आम्हांस सिंधी व्यापारी भेटलेच होते. यांच्या दुकानांतून युरोपियन लोकांस आवडणाऱ्या अशा पौर्वात्य पद्धतीच्या चिजाच ठेवलेल्या असतात. व त्या विकून हे दुकानदार युरोपियन लोकांकडून बराच पैसा मिळवितात. जिब्राल्टर येथें या व्यापाऱ्यांच्या पांचसहा पेढ्या असून प्रत्येकीचीं येथें एकाच पेठेंत दोनदोन तीनतीन दुकानें आहेत. येथें सुमारें ८० हिंदी आहेत व ते फक्त सिंधीच आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हिंदुस्थानच्या गप्पागोष्टी झाल्यावर या लोकांनीं आम्हांस फराळास दिलें व थोडासा फलपुष्पोपहार घेऊन ते आम्हांस बंदरावर पोंचवावयास आले. आमच्या बोटींतले पुष्कळ युरोपियन जिब्राल्टर पाहण्यास उतरले होते व त्यांनींही बरोबर फुलें आणलीं होतीं; पण आमचे पुष्पगुच्छ त्यांच्याहूनहि मोठमोठे पाहून त्यांना थोडें आश्चर्य वाटलें व त्यांच्या दृष्टीनें आमची अब्रूहि थोडीशी वाढली असेल !

आम्ही परत आलों तों आमची बोट कोळशाच्या वखारीजवळ येऊन कोळसा भरीत होती. हें काम पुरें होऊन संध्याकाळीं ६॥ वाजतां आम्हीं बंदरांतून बाहेर पडून आणखी एका तासानें खऱ्या आटलांटिक महासागरांत शिरलों.

---

## पत्र नं. ६

**ता. २१.** आज सर्व दिवसभर पोर्तुगालचा किनारा दिसत होता. रात्रीं एकदोन दीपगृहें आढळलीं. जवळपास एखादें मोठें बंदर असावें असें वाटलें; पण अंधारामुळें दिसलें नाहीं. भूमध्यसमुद्र सोडल्यापासून आगबोट हालण्यास सुरवात झाली. वारा वादळ नाहीं, पण हा समुद्र स्वभावतःच उच्छृंखळ आहे. बोटींत सरळ उभें राहतांच येत नाहीं. सामानहि मधून पडतें. जेवणाच्या मेजावरचीं भांडीं वगैरे पडूं नयेत म्हणून लांकडी चौकटी मेजाभोंवतीं आणून लावल्या आहेत. भोजनगृहांतली गर्दी थोडी कमी झाली आहे. बोट इतकी हलते कीं, एका कलाटणींत ४५ अंशावरचे तारे दिसतात न दिसतात तों लागलींच पायाखालच्या पाण्यांतले मासे दिसतात. बिस्केचा उपसागर याहून कठीण म्हणतात. असो. आतां प्रवास चार दिवसांवर आला ! काल सकाळीं एकदम धुकें इतकें लोटलें कीं, २५ हातांवरचा पदार्थ दिसेना. बोटीचा वेग थोडा कमी करण्यांत आला, व वाफेचा कर्णा वरचेवर वाजूं लागला. धुकें पडलें म्हणजे इतर बोटींस इशारा मिळावा, एकमेकींचें अंतर कळावें, म्हणून हा कर्णा मधून मधून वाजवीत असतात.

**ता. २२-२३.** आज म्हणण्यासारखें कांहीं घडलें नाहीं. फक्त एक दोन वेळां मोठे व्हेल मासे आढळले. व्हेलमासा पाण्याच्या पृष्ठभागाकडे येऊं लागला म्हणजे तोंडांत पाणी घेऊन टाळूंतून वर सोडतो, त्या योगानें मोठा कारंजा उडत असतो. तो बराच दुरून दिसतो. या कारंजाचे रोखानें पाहिलें तेव्हां माशाचा निमा भाग पाण्यावर आलेला दिसला.

कालपर्यंत बोट बेसुमार हालत होती. आज हालणें कमी झालें. बे ऑफ बिस्केची बोट हालण्याबद्दल फार ख्याती आहे. पण आम्हांस त्यापेक्षां अटलांटिक महासागरानेंच अधिक त्रास दिला. इतर समुद्रांपेक्षां येथें थोडा निराळा प्रकार आढळतो. तो असा कीं, इतरत्र लाटांची लांबी लहान असून त्या फुटतात व फेस येतो, तो क्षितिजापर्यंत दिसत असतो; व या योगानें दिसण्यांत खळबळ फार दिसते. या महासागरांत लाटांची लांबी

फार असून त्या कोठेंहि फुटलेल्या आढळत नाहींत, फेस मुळींच दिसत नाहीं व खळबळहि ऐकूं येत नाहीं; पण लांबून लाट येतां येतां समुद्राचा पृष्ठभाग इतका उंच होतो कीं, डोंगर वर उठल्यासारखा वाटतो. व त्याबरोबर जहाजाची कड पाण्याला लागते. हें पाहून वाटतें कीं, खरोखरच समुद्राचें ऊर भरून आलें ! इतर समुद्रांच्या खळबळीस स्त्रियांच्या दुःखभराची उपमा साजली तर या महासागराच्या या भरतीस पुरुषांच्या दुःखाची उपमा साजेल !

आज सकाळीं आम्हीं बे ऑफ बिस्के सोडून इंग्लिश चॅनलमध्यें प्रवेश केला असें जहाजाच्या रोखावरून दिसूं लागलें. इंग्लिश चॅनल आल्याबरोबर इंग्रजांना घर आलेसें सहजच वाटूं लागलें. इंग्लंडचा किनारा दिसत नाहीं, पण डाव्या हातास कांहीं मैलांवर तो जवळ आहे असें मनास वाटतें ना ! रात्रीं झोंपेंत आईचा हात मुलाच्या अंगावर नसला तरी ती शेजारीं आहे या कल्पनेनें मुलास आईची सोबत पुरी होते तसेंच हें आहे. आम्हीं मात्र हौसेनें इंग्लंडास जात आहों खरे; तरी पण इंग्लंड जवळ आलें या कल्पनेपेक्षां हिंदुस्थान तितकें दूर गेलें या कल्पनेचा पगडाच मनावर अधिक बसतो ! तूर्त आम्हांला आगबोट हेंच घर वाटत आहे खरें. पोर्ट सय्यद व जिब्राल्टर येथें गांव पाहण्यास आम्ही जाऊन परत येऊन बोटीवर पाय ठेवतांना आम्हीं 'घरीं' परत आल्यासारखें सुख वाटलें. संवयीनें घराची कल्पना बदलते; दुसरें काय ? बोटींत आज २४ दिवसांत आम्हांला खालीं केबिन व वर डेक किंवा जेवणाचा दिवाणखाना यांशिवाय थारेपालटण करण्यास चवथें ठिकाण नाहीं. खालून वर व वरून खालीं खेपा घालणें हीच करमणूक ! तरी पण उद्यां कॅबिन सोडून जातांना घर सोडल्यासारखें वाईट वाटेल. सरकशींतले वाघ–सिंह मैदानांत उतरण्यापेक्षां परत पिंजऱ्यांत जातांना किती हौसेनें उडी मारतात हें आपण पाहतोंच. तूर्त आमची गत पिंजऱ्यांतल्या पांढऱ्या उंदरांसारखी झाली आहे. त्यांच्या पिंजऱ्याला आमच्या जहाजासारखेच दोन मजले असतात व आमच्या खालवरच्या येरझारांप्रमाणें तेहि वाटोळ्या रहाटावर असेच फिरून करमणूक करितात !

इंग्रज लोक मात्र जातील तेथें खरोखरीचें घर करतील. त्यांना कांहीं कमी नाहीं. पण त्यांना हें सुख बोटीविषयीं आपलेपणामुळें व एकजुटमुळें वाटत असलें तरीं त्यांच्या अंगांत हौसेचा जो पारा खेळत असतो तोही यास कारणीभूत आहे ! आमच्या वाटणीचें म्हणजे पहिल्या क्लासचें डेक २०।२२ फूट रुंद व सुमारें सवाशें फूट लांब आहे. तेवढयांत पांचपन्नास ईझिचेअर्स, व वेताच्या खुर्च्या यांची गर्दी आहे. त्यांतच सुमारें पन्नाससाठ स्त्रीपुरुष येरझारा घालीत असतात. त्यांतच मुलांच्या हातगाडया फिरतात. त्यांतच मुलांना झोके घेण्याकरितां दोरीचा झोंपाळा आहे. त्यांतच मुलें दोऱ्यांतून उडया मारण्याचे खेळ खेळतात. त्यांतच मुलांचे लपंडावाचे खेळ चालतात. त्यांतच थोरांचे लगोऱ्याचे खेळ चालतात. त्यांतच बायका शतपावलीचा व्यायाम करीत असतात. त्यांतच कांहीं मोठे पुरुष मुलांप्रमाणें ओणव्यांची रांग लावून कांहीं लांबून धांवत येऊन पाठीवर उडया घालून स्वारांचा खेळ खेळतात. त्यांतच दोर लावून टग ऑफ वारचा खेळ चालतो. त्यांतच एका बाजूस सोडतीच्या तिकिटांचें दुकान मांडलेलें असतें. आणि त्यांतच आमच्या सारखे परके हिंदीलोक ओंठ मिटून खिशांत हात घालून, दुसऱ्यास लागेल म्हणून आंग चोरून, दिसण्यांत गंभीर तत्ववेत्याप्रमाणें, पण खरोखर अस्पृश्य सुतक्याप्रमाणें—बावळयासारखे क्वचित् हिंडत असतात !

परवां रात्रीं या लोकांनीं डेकवर छोटीशी रंगभूमि सजवून विजेची रोषनाई करून खेळ व गाण्याचा जलसा केला. त्यांत सातआठ पुरुष व दोन बायका होत्या. सर्वजणांनीं चिनी लोकांचे पेहराव घेतले होते. गाणें यथायथाच होतें; पण एका गोऱ्या खलाशाचें सोंग व मागाहून गलबतावरील कॅप्टनानें केलेले जादूचे चमत्कार प्रेक्षणीय होते. तसेंच आज रात्रीं ‘ किंग्स आफ्रिकन रायफल ’ नामक पलटणाच्या लोकांनीं खेळ केले.

आज दोनप्रहरीं धुकें बरेंच पडलें होतें व सावधगिरीचे कर्णे वाजत होते. संध्याकाळचे सुमारास खूप थंडी पडली; ती इतकी कीं, डेकवर आवरवत नव्हतें. साडेसात वाजण्याचे सुमारास ‘ आईल ऑफ वाईट’ नामक

बेट व त्यावरील दीपगृह दिसूं लागलें. हेंच इंग्लंडचें प्रथमदर्शन म्हणायचें! लंडन येथें उद्यां सकाळीं दहा वाजतां पोंचूं असें म्हणतात !

**ता. २४.** सकाळीं उठून पाहतों तों बोट स्वस्थ उभी आहे. धुकें दाट पसरलें आहे व कर्णे वाजतच आहेत. मध्यरात्रीं उठलों, तेव्हां बोट थांबल्याचा भास झालाच होता; पण अंधारामुळें डेकवर जाऊन पाहतां आलें नाहीं. सकाळीं झालें तरी नक्की कारण कळेना. ४ वाजण्याचे सुमारास फिरून बोट चालूं लागली, पण मुंगीच्या पायानें. धुक्यामुळें दूरवर दिसत नाहीं. व अद्यापि या भागांत पूर्वी जर्मनीनें पसरलेल्या पाणसुरुंगाचा अंदेशा असल्यामुळें अत्यंत सावधागिरीनें जावें लागतें. हें धुकें अत्यंत चंचल स्वभावाचें आहे. क्षणांत तें अदृश्य होतें व क्षणांत फिरून भरतें. कोठून येतें तें कळत नाहीं; पण पाहतां पाहतां पाण्याच्या समुद्रावर धुक्याचा समुद्र जमतो ! ११ वाजतां बोट फिरून बिलकुल थांबविण्यांत आली. कारण आमच्या प्रत्यक्ष डोक्यावर धुकें नव्हतें. तरी पुढें आम्हांस ज्या भागांतून जावयाचें तो धुक्यानें भरलेला आहे व आजूबाजूनें जाणाऱ्या आगबोटी दिसत नाहींत. तरी लांबून त्यांचें कर्कश कर्णे ऐकूं येत आहेतच. या वेळीं आम्ही इंग्लंडच्या पूर्व-दक्षिण टोकाअलीकडे कांहीं मैल आहों. मधून ऊन पडतें तेव्हां डाव्या हातांत सुमारें २ मैलांवर हाईथ्व व फोकसटाऊन हीं शहरें व त्यांचे डोंगर व इमारती दिसत आहेत. फ्रेंच किनारा सुमारें २५ मैल लांब आहे अर्थात् तो अदृश्य आहे. फोकसटाऊन व बोलोन यांच्या दरम्यान इंग्लंडांतून फ्रान्सला जाणाऱ्या दर्यामार्गाजवळ आतां आम्हीं आहों. थोडें पुढें गेल्यावर कॅले-डोव्हर हा राजमार्ग लागेल. आम्ही मेल बोटीनें मार्सेलसवरून आलों असतों तर आम्हीं डोव्हर येथेंच उतरावयाचे; पण आमची बोट थेट लंडनला जावयाची असल्यानें आम्हांला या नजीकच्या बंदरांत उतरतां येत नाहीं.

**ता. २५.** काल सकाळीं आमच्याआमच्यांत एक पौंडाची पैज लागली कीं, लंडनच्या भूमीवर आम्ही आज म्हणजे शनिवारीं उतरतों कीं रविवारीं ? स्वाभाविकपणें आम्हीं आज तिसरे प्रहरीं तरी खास उतरावयाचे असें जाणून पटेल, शास्त्री व कुंझरू यांनीं शनिवार सांगितला,

पण मीं मुद्दाम रविवार सांगितला. ते म्हणाले ' तुम्ही एक पौंड हरणार, उगाच नशीबाची परीक्षा कां पाहतां?' मी म्हणालों, 'मला नशीबानें आजवर सहसा दगा दिला नाहीं, आजच दिल्यास पाहतां येईल !' काल रात्रीं निजेपर्यंत पैज त्यांनीं जिंकली असें उघड होतें. कारण बोटीचा खुद्द कॅप्टन म्हणाला कीं, शनिवारीं सकाळीं दहा वाजतां लंडनला पोचूं. मग आणखी काय पाहिजे ? पण सकाळीं १० वाजतां लंडनपासून ५० मैलांवर बोट नांगर टाकून विश्रांति घेत बसलेली पाहून मात्र त्या तिघांच्या तोंडचें पाणी पळालें.

दुपारीं २ वाजतां धुकें निवळलें व बोट चालू झाली. ३ वाजतां वाटाड्या जहाजावर आला, बोट फिरून जोरानें सुरूं झाली, डोव्हर रॅमसगेट वगैरे बंदरी भाग झपाट्यानें येऊन गेले; ५ वाजतां तेम्स नदीच्या आखातांत शिरलों. ७ वाजतां नदीच्या मुखांत शिरलों. व ८॥ वाजतां उतरण्याच्या बंदराजवळ म्हणजे टिलबरी व ग्रेव्हस ऐंड यांच्या दरम्यान बोट येऊन उभी राहिली. संध्याकाळचीं जेवणें आधींच झालीं होतीं. तेव्हां आतां काय होडींत बसून किनाऱ्यास जावयाचें उरलें. पटेल म्हणूं लागले, पैज जिंकली एक पौंड टाका. इतक्यांत बोर्डवर नोटीस लागली कीं, दुसरे दिवशीं सकाळीं ९ वाजल्याशिवाय कोणी बंदरावर उतरावयाचें नाहीं! झालें त्यांच्या तोंडचा घास गेला व मीं पैज जिंकली. पैजेचे पैसे कोणीं दिले नाहींत व कोणीं घेतले नाहींत, पण तिजवरून बोटीचा प्रवास संपविण्यास आम्हीं किती उत्सुक झालों होतों येवढें समजेल. दुसरे दिवशीं सकाळीं उतारूंना उतरतां यावें म्हणून आदले दिवशीं परवाने तपासण्यांत आले होते. तपासनीसानें आमचे पासपोर्ट पाहून आडवेतिडवे पुष्कळ प्रश्न केले व बरीच माहिती उतरून घेतली. रविवारीं कस्टमचा मनुष्य येऊन त्यानें चांचणी घेतली व १० वाजतां आम्ही टिल्बरी बंदरच्या किनाऱ्यावर उतरून स्पेशल ट्रेनमध्यें येऊन बसलों. बोटीवरून वाफेच्या पडावांत, पडावांतून धक्यावर, धक्यावरून डब्यांत पांचसहाशें उतारूंचें सामान नेण्यांत २।३ तास गेले. शेवटीं सेंटपॅकर्स स्टेशनावरून आम्ही ३ वाजतां ब्रिऱ्हार्डीं आलों.

आमचें घर सुंदर व सोयीचें असून लिहिण्यावाचण्याचीं सर्व साधनें आहेत. युरोपियन नोकर पदरीं ठेवण्याचा अपूर्व मान आम्हांस मिळाला आहे व ते बिचारे हिंदी अन्नाचे दोन तीन पदार्थ चांगल्या रीतीनें तयार करतात. अस्पृश्य-स्पर्शाचा कडेलोट झाला आहे ! उपास सोसूनहि अभक्ष्य-भक्षण टाळलें. पण स्पर्शदोष दुर्निवार आहे, त्याला कोण काय करणार ?

**ता. २६.** कालपासून येथील हिंदी गृहस्थ मंडळी आम्हांस भेटण्यास येऊं लागली. आणखी पुष्कळ भेटावयाचीं आहेत. तात्पर्य, हिंदी चेहरे पाहण्याची वाण नाहीं व त्यांना पाहिलें म्हणजे हिंदुस्थानच वाटतें. तेव्हां हेंहि काम झालें. आजपासून आमच्या कामाकरितां बाहेर हिंडण्यास व स्थलपरिचय करण्यास सुरवात केली आहे व ट्रॅम, ऑम्नीबस, जमिनीवरची आगगाडी, तळघरांतील आगगाडी यांचा थोडाबहुत परिचय झालाहि. येथून पुढें पाहूं तें सर्व अपूर्वच. पण पत्रांतून लंडन शहरचें वर्णन देण्याचें काम करूं लागलों तर सर्व दिवस त्यांतच जाईल म्हणून येथेंच थांबतों.

# लंडनचें बातमीपत्र.

## नं. १.

## ( ता. २९ मे १९१९ )

आम्ही मुंबईहून मित्रमंडळींचा निरोप घेऊन ता. २९ एप्रीलला निघालों तें लंडन येथें ता. २५ मेला येऊन सुखरूप पोंचलों. हल्लीचे दिवस समुद्रप्रवासास चांगले असतात. भूमध्यसमुद्रांत एक दिवस वादळाचा थोडासा प्रकार झाला, याहून अधिक त्रास झाला नाहीं. सुएझचे कालव्यापासून थंड हवा सुरू होते. लंडनमध्यें हल्लीं भर उन्हाळा आहे तरी एखादे दिवशीं ५०--५५ अंशापर्यंतहि पारा खालीं जाऊं शकतो. अंगांतील कपडा काढून बसणें तर अशक्यच, पण गरम कपडे न घातले तर हवा केव्हां बाधेल याचा नियम नाहीं. लंडनची हवा अशीच ‘ विश्वास--घातक ’ आहे !

आम्हास प्रवासामध्यें जगांत काय चाललें आहे याची दाद नव्हती. त्याचा सर्व वचपा लंडनास आल्यावर निघाला. येथें वर्तमानपत्रें तिकडच्या प्रमाणें वाचावयास मनुष्य बसेल तर त्याला दिवसाचे २४ तासहि पुरणार नाहींत. तास दोन तासांनीं हवी तरी नवीन नवीन बातमी मिळूं शकते. पण नुसत्या जगाच्या बातम्या ऐकत बसून काय भागणार ? अर्थात केव्हांतरी आपले काम पुढें ओढून जगाला मागें ढकलावेंच लागतें !

आम्ही लंडन येथें पोंचण्यापूर्वीं नुकतेच मॉंटेग्युसाहेबांचें हिंदुस्थानच्या अंदाजपत्रकावर पार्लमेंटांत भाषण झालें होतें, तसेंच आम्हीं आल्यावर चार दिवसांतच साउथबरो फीथॅम कामिटयांचे रिपोर्ट, हिंदुस्थानसरकारचा खलिता व नवीन राजकीय सुधारणाबाबतचें बिल इतके महत्वाचे कागद प्रसिद्ध झाले. अर्थात् आमच्याकरितां उद्योग वाढून तयार होता. म्हणून हे कागदपत्र वाचणें व आमच्या उपयोगी पडणाऱ्या लोकांस भेटणें या कामास आम्हास ताबडतोब सुरुवात करावी लागली.

मॉंटेग्यूसाहेबांचें अंदाजपत्रकावरील भाषण ऐकण्यास पार्लमेंटचे अवघे बारा सभासद हजर होते ! यावरून पार्लमेंटांत हिंदुस्थानच्या कामकाजासंबंधीं किती कळकळ वसत आहे हें दिसून येईल. ग्यालरींत प्रेक्षकांची गर्दी, पण खालीं सभागृहांत शुकशुकाट ! मॅन्चेस्टर् गार्डियन पत्राच्या रिपोर्टरनें या प्रकाराचें वर्णन याप्रमाणें केलें आहे—The spectacle on the flour, only too common when Indian affairs are under discussion, of rank of untented benches. ' हिंदुस्थान हल्लीं सुतक्याप्रमाणें उदास आहे ' असें मॉंटेग्यू यांनीं भाषणांत बोलून दाखविलेंच आहे. अर्थात त्याच्या जोडीला पार्लमेंटांतील देखावाहि सुतकी देखाव्याप्रमाणेंच भासल्यास नवल नाहीं.

मॉंटेग्यूसाहेबांचें भाषण अंदाजपत्रकावर होतें, पण त्यांत आंकडे जवळ जवळ मुळींच नव्हते म्हटलें तरी चालेल! जमाखर्चाखेरीज इतक्या अनेक गोष्टी त्यांत होत्या कीं त्याला एखादा टवाळ ' चांभारचौकशी ' सुद्धां म्हणेल ! पण ही चांभारचौकशी करण्याचा प्रसंग वर्षांतून एकदां येतो व स्टेटसेक्रेटरीला काय किंवा इतरांना काय त्या प्रसंगाचा फायदा जरूर घ्यावा लागतो. यंदाच्या भाषणांत मुख्य चारदोन विषयच होते. अफगाणिस्थानांतील गडबडीला मॉंटेग्युसाहेबांनीं फारसें महत्व दिलें नाहीं. रौलेट आक्टाची संभावना त्यांनीं थोडक्यांतच केली. मॉंटेग्यूसाहेबांना स्वतः हा कायदा फारसा पसंत नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यांना फसवून दिल्लीसरकारनें रौलेटबिल कायदेकौंसिलांत मांडण्याची परवानगी मिळविली अशीहि एक गटारगप्प आहे. पण एकदां झालें तेंच कायम, या तत्वावर कोणत्याहि सरकारचें काम चालू असतें; तेव्हां मॉंटेग्यूसाहेब हिंदुस्थानसरकारावर तरवार कशी उपसणार ? त्यांनीं हा प्रसंग साधून हिंदी लोकांच्या राजनिष्ठेवर तरवार उपसली नाहीं हेंच उपकार ! इंडो—ब्रिटिश असोसिएशनचे मात्र त्यांनीं चांगलेच कान उपटले.

सर्वांत मुख्य विषय सुधारणांचा. या बाबतींत मात्र मॉंटेग्यूच्या अंगांत उत्साहाचा संचार झाल्यासारखा दिसला असें माडवरील प्रेक्षकांना वाटलें. दहा बारा सभासद हजर व तेहि सर्व अनुकूल; प्रतिपक्षी कोणीच

हजर नाहीं. असें असतां हिंदुस्थानच्या लोकांना दिलेलें वचन पाळण्याचें महत्व ते जोराजोरानें प्रतिपादन करीत होते, व हिंदुस्थानांत अस्वस्थता नांदत आहे, कदाचित वाढेलहि; असें आहे तरी सात्विक दिलजमाईच्या उपायांनींच सर्व अडचणींचा परिहार करण्याची आपली इच्छा आहे, असें त्यांनीं सांगितलें. प्रेक्षकांची गर्दी कमी असली तर नटाला नाट्य करण्याला अवसान चढत नाहीं म्हणतात. पण मुत्सद्यांना नाटक्याहूनहि नाटकी बनावें लागतें हेंच खरें !

एवढें मोठें हिंदुस्थान पण त्याच्या वार्षिक विवादप्रसंगाला इतके थोडे लोक हजर असतात याची शरम इकडेहि थोड्याशा इंग्लिश लोकांना वाटते. मिमेरिअठ यानें एक पत्र लिहून असा प्रश्न विचारला आहे कीं, What is likely to be the effect upon opinion in India when it is learnt that a debate of the highest moment to the future of India was sustained in the Imperial Parliament by a dozen members addresing empty benches ? हिंदुस्थानांतील लोकमतावर या गोष्टीचा परिणाम काय होतो हें दिसतच आहे. पण हिंदुस्थानांतील लोकांना किंवा लोकमताला विचारतो कोण ?

आतां हें खरें आहे कीं, हिंदी राज्यकारभाराप्रमाणें खास इंग्लंडच्या राज्यकारभाराच्या चर्चेच्या अनेक प्रसंगीं देखील पार्लमेंटचे सभासद अलीकडे असावे तितके हजर राहत नाहींत; पण त्याचें खरें कारण मात्र अनास्था हें नसून कार्यबाहुल्य हें आहे. पार्लमेंटचें पुष्कळसें काम, म्हणजे कच्चा तपशिलाचा काथ्याकूट करण्याचें काम, ग्रँड कमिटी वगैरे पोट-कमिटयांकडे सोंपविलेलें असतें व या कमिटया आणि पार्लमेंट यांची बसण्याची वेळ प्रायः एकदांच येत असल्यामुळें अनेक सभासदांना पार्लमेंटांत हजर राहतां येत नाहीं, व याबद्दल तक्रारहि सुरू आहे. पण याचा अर्थ अनास्था नसून हजर राहण्याची आस्था हाच आहे. हिंदुस्थानच्या चर्चेचा प्रकार मात्र तसा नाहीं. एरवीं दिवस मोकळा असला तरी या चर्चेला कोणी फारसें येणार नाहीं. उलट पूर्वीं सभागृह भरलें असलें तरी हिंदुस्थानचा विषय निघतांच तें मोकळें होतें. नाटकगृहांतील प्रेक्षकांपैकीं

भरतवाक्य गायलेलें ऐकण्यास किती लोक बसतात ? तितकेच पार्लमेंटरी सभासद भारतपुराण ऐकण्यास बसतात !

पण पार्लमेंटचा हा मद्दड घोडा हिंदुस्थानांतील दंगेधोपे वगैरेंची चर्चा असली म्हणजे मात्र कान टवकारतो. सरहद्दीवरील लढाईच्या बातमीच्या औषधाच्या एका घोटानें पार्लमेंटला दुष्काळी भूक लागते. मग सभासद सभागृहांत मेजवानीला हजर ! जाइल्ससाहेबांना टिळकांनीं एकदां असें म्हटलें होतें कीं, हिंदुस्थानच्या कारभारासंबंधानें इंग्लंड निरंतर झोंपीं गेलेला असतो, व तो डचकून खडबडून जागा होण्यासारखें कांहीं घडतें तेव्हांच त्याची झोंप जाते, साध्या हाकेनें तो जागा होत नाहीं,याचा अर्थ उघड व सरळ आहे. या वाक्याचा अर्थ विपरीत घेऊन त्यांनीं तेवढ्या आधारावर त्यांच्या विरुद्ध साक्ष दिली. वरील वाक्याचा अर्थ लोकांनीं दंगे करावे असा होत नाहीं; पण दंगे झाले म्हणजे त्याचा परिणाम असा होत असतो ही गोष्ट कोणा प्रामाणिक इंग्रजाला नाकबूल करितां येईल ? ग्लॅडस्टनसाहेब कांहीं आयर्लंडांत दंगेधोप्यांना उत्तेजन देणारे नव्हते, पण एका तुरुंगाला सुरुंगबत्ती लावून आयरिश बंडखोरांनीं अत्याचार केला तेव्हां ते म्हणाले कीं, या आवाजानें आयर्लंडची लोकस्थिति इंग्लंडला जितकी कळून आली तितकी इतर कोणच्याहि ओरडीनें कळून आली नाहीं!

"हिंदुस्थानच्या कारभारासंबंधानें पार्लमेंटची जबाबदारी "हे निवळ पोकळ शब्द आहेत, त्यांना फारसा अर्थ नाहीं; पण असें होणें हेंच स्वाभाविक आहे. घरचें टाकून बाहेरच्याला कोण विचारणार ? शिवाय इंग्लंडच्या राज्याचा विस्तार वाढला; पण पार्लमेंटच्या सभासदांची संख्या वाढली नाहीं, सभासदांच्या दोन हातांचे चार हात किंवा दोन कानांचे चार कान झाले नाहींत, किंवा दिवसांचे तासहि ४८ झाले नाहींत ! खाद्य फार वाढलें, पण त्याबरोबर खाण्याचीं व चावण्याचीं साधनें आणि पचनशक्ति हीं वाढलीं नाहींत तर पुष्कळसें अन्न न खातां फुकट जातें व न चावतां खाल्लें तें बाधतें. असाच प्रकार पार्लमेंटच्या कामाचा आहे.

अर्थात् त्याला उपाय एकच, म्हणजे अधिकारदान व कामाची वांटणी. हें दान आणि ही वांटणी विलायतेंतले इंग्रज यांच्यामध्यें आपापसांत होऊन तरी आम्हाला काय फायदा ? आम्ही हिंदी लोक आम्हाला

करायला कारभार नाहीं म्हणून रिकामे, आणि पार्लमेंटला करायला इतर कारभार फार म्हणून त्याला हिंदुस्थानाकडे पाहण्यास वेळ नाहीं ! पार्लमेंट आम्हां हिंदी लोकांना आपले मानसपुत्र म्हणतें तर तिचे अधिकार आमच्या लोकांच्या हातीं ! व ते आले तरच आजची ही हास्यजनक स्थिति टळेल. मॉंटेग्युसाहेबांच्या नवीन बिलानें ही स्थिति कितपत पालटते पाहावें. तूर्त सर शंकर नायर यांनीं हिंदुस्थानसरकारच्या खलित्याचा जो कयास केला आहे त्यावरून पाहतां सुधारणांचा सगळा डाव हिंदी राज्यकारभाराच्या मुख्याधिकाराचें उच्चाटन विलायतेंतून व्हावें. पण तो सर्व दिल्लीच्या सेक्रेटरीयटमध्यें स्थानापन्न व्हावा असाच दिसतो; पण हा डाव आम्ही बांधूं देतां कामा नये !

## पत्र नं. २

### ( ता. ५ जुलै १९१९ )

लो. टिळक व डेप्युटेशनची इतर मंडळी यांची प्रकृति ठीक असून कामकाज सुरू झालें आहे. टिळकांचा पाय बर्फावरून घसरल्यामुळें मुरगळला होता तो आतां साधारण बरा आहे, टिळक व मी कालच (ता. ४ जून रोजीं ) केंब्रीज येथें जाऊन आलों. केंब्रीज येथें सुमारें ८०।९० हिंदी विद्यार्थी हिंदुस्थानच्या सर्व भागांतून अभ्यासाकरितां आले आहेत. हिंदी मजलीस नांवाची संस्था केंब्रीज येथें आज कांहीं वर्षें अस्तित्वांत असल्याचें केसरीचे वाचकांस माहीत असेलच.या सभेंत व्याख्यानें, वादविवाद मोकळ्या मनानें होतात. या सभेपुढें काल टिळकांचें व्याख्यान झालें. हिंदी विद्यार्थ्यांखेरीज कांहीं थोडे युरोपिअन विद्यार्थीहि मुद्दाम आले होते. देशाच्या सद्यःस्थितीचें वर्णन करून टिळकांनीं आपल्या तरुण श्रोत्यांस असा रोखठोक प्रश्न केला कीं, " तुम्ही उच्च प्रतीचें शिक्षण मिळवून व स्वतंत्रतेच्या हवेंत पिकणारे विचार बरोबर घेऊन हिंदुस्थानांत जाणार. पण केवळ स्वार्थसाधनपर न बनतां देशकार्याला वाहून घ्यावयाचें असा निश्चय तुम्हांपैकीं कितीजणांनी केला आहे ? " याला उत्तरें देतांना कांहीं विद्यार्थ्यांनीं आपल्या पोरबुद्धीमुळें व अज्ञानामुळें बराच हंशा पिक-

विला. तथापि पुष्कळांच्या मनावर प्रश्नाचें खरें मर्म ठसून त्यांनीं आपण तुमच्या उपदेशाप्रमाणें खास वागणार आहों असें सांगितलें. एका तरतरीत ब्राह्मण मुलानें त्यांना आश्वासन दिलें कीं, मी सिव्हिल सर्विस परीक्षा पास होणार, पण नोकरींत शिरणार नाहीं असा निश्चय तुमच्या उदाहरणावरून यापूर्वींच केला आहे. ईश्वर या मुलास आपला निश्चय पाळण्यास सामर्थ्य देवो. कारण जाणूनबुजून स्वार्थत्याग कशाला म्हणतात याचें तें एक उदाहरण होईल. असो. मी केंब्रिज येथें स्वतंत्र व्याख्यान देण्यास फिरून कांहीं दिवसांनीं जाणार आहें. दरम्यान लो. टिळक हे ऑक्सफर्ड येथील मजलसीच्या निमंत्रणावरून येत्या १५ तारखेस तेथें जातील.

कॅांग्रेस डेप्युटेशनकडे सोंपविलेल्या कामांत येथील ब्रिटिश कॅांग्रेस कमिटीशीं बोलणेंचालणें करण्याचेंहि एक लहानसें काम आहे हें केसरीच्या वाचकांस माहीत असेल. गतवर्षापर्यंत ही कॅांग्रेस कमिटी व खुद्द कॅांग्रेस यांच्या दरम्यान कांहीं बेबनाव नव्हता. पण मवाळजहालांचा तंटा वाढून नेमस्तांची वेगळी परिषद भरण्याचें घाटूं लागल्यापासून येथील ब्रिटिश कॅांग्रेस कमिटीहि पक्षपात करूं लागली. पूर्वापारच्या स्नेहसंबंधामुळें तसें होणें स्वाभाविक होतें. खुद्द राष्ट्रीय सभेचे येथील यंत्र जें ' इंडिया ' त्यांत राष्ट्रीय सभेविरूद्ध मजकूर येऊं लागला. अशा स्थितींत राष्ट्रीय सभेचे पैसे ब्रिटिश कॅांग्रेसकमिटीला देऊन आपल्याच पैशानें आपल्याला शिव्या खाण्याचें सभेनें सहजच नाकारलें. तथापि राष्ट्रीय सभा व ब्रिटिश कॅांग्रेस कमिटी यांचे कायमचे संबंध कोणते असावे याचा कायमचा निकाल करणें जरूर असल्यानें कमिटीच्या सभासदांशीं प्रत्यक्ष बोलूनचालून हा निकाल लावावा अशी कामगिरी डेप्युटेशनकडे सोंपविण्यांत आली आहे. त्याप्रमाणें आम्ही येथें येतांच कमिटीचे अध्यक्ष डॉ. क्लार्क यांस पत्र पाठवून कळविलें. गेल्या सोमवारीं कमिटीची सभा भरली त्या वेळीं आम्ही निमंत्रणावरून गेलों होतों. सुमारें दीड तास वाटाघाट झाली. त्यांत कायमच्या संबंधाचा विचार पुढें स्वस्थपणानें करावा, तूर्त कमिटीनें कॅांग्रेसचें म्हणणें पार्लमेंटमध्यें व ब्रिटिश जनतेपुढें मांडण्यास सर्व प्रकारें पूर्वींप्रमाणें मदत करावी असें ठरलें. कमिटींत डॉ. रुदरफर्ड, डॉ० क्लार्क

हे बरेचसे आमच्या मताचे आहेत. लॉर्ड क्ल्युईड ( पूर्वीचे हरबर्ट रॉबर्टस ) व मि. स्विनी यांचा नेमस्त पक्षाकडे ओढा आहे व मि. पारेख व डालगॅडो हे अर्थात् सर्वस्वीं आमच्याच पक्षाचे आहेत. यामुळें बहुमत आमच्या बाजूस आहे. तथापि कमिटी व डेप्युटेशन यांची फिरून गांठ पडावी व मग कायमचा निकाल लागावा असें ठरलें आहे; तेव्हां दरम्यान मि. पोलाक यांची लावालावी कितपत यशस्वी होते हें पाहणें आहे. तूर्त एवढें मात्र दिसतें कीं, मतभेदामुळें ब्रि. कॉं. कमिटी झटून उत्साहानें आम्हांस मदत करण्यास सिद्ध न झाली तरी स्वतः कमिटी कॉंग्रेसचे तर्फे म्हणून कॉंग्रेसच्या ठरावाविरुद्ध सिलेक्ट कमिटीपुढें साक्ष देणार नाहीं ! पण ही काथ्याकूट बरेच दिवस चालणारी असल्यामुळें आज त्याविषयीं अधिक कांहीं लिहूं इच्छित नाहीं.

येथें ब्रि. कॉंग्रेस-कमिटीच्या व्यतिरिक्त राष्ट्रीय सभेस मदत करणारी दुसरी मंडळी म्हणजे मजूरपक्षाची. यांत कांहीं स्वतंत्र आहेत व कांहीं बेझंटबाईचे फार दिवसांचे स्नेही आहेत. पैकीं पहिल्यांची मदत आम्हांस केव्हांही मिळण्यासारखी आहे, दुसऱ्यांचीहि मदत आजवर पुष्कळ झाली ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केली पाहिजे, पण बेझंटबाईचें व राष्ट्रिय सभेचें बिनसल्यापासून यांच्या उत्साहांत थोडीशी शिथिलता सहजच आली आहे. आजवर लो. टिळक यांनीं कुशलतेनें सर्व पक्ष सारखे संभाळून धरले असून मजूर पक्षांत हिंदुस्थानच्या प्रश्नाला जवळजवळ कायमचें स्थान मिळविलें आहे, तथापि बेझंटबाई येथें आल्यावर काय होतें तें पाहणें आहे. गेल्या मंगळवारीं आम्हां मंडळींना या मंडळींनीं चहाला बोलविलें होतें; तेव्हां मि. लॅन्सबरी, मिसेस डेसपार्ड, मि. ग्रॅहामपोल, लेडी डीलावर, मिस व्हिलिअर्स वगैरे मंडळी हजर होती. बेझंटबाई येतांच आपण सर्व मिळून चर्चा करूं व जेणेंकरून सुधारणांचा प्रश्न पुढें ढकलला जाईल अशीच खटपट करूं असें त्यांनीं आश्वासन दिलें. मजूर पक्षाचे स्वतंत्र सभासद ह्मणजे कर्नल वेजवुड, बेनस्पूर वगैरे मंडळीच्या आम्ही अनेक वेळां गांठी घेतल्या असून ते सर्व प्रकारें मदत करावयाला तयार आहेतच. या दोघांपैकीं एक किंवा दोघेहि कदाचित् सिलेक्ट कमिटीवर नेमले जातीलसें वाटतें.

बिपिनचंद्रपाल डॉ० मेथा. टिळक. खापर्डे. पटेल. केळकर.



[ पार्लमेंटच्या एका द्वाराजवळ ]

या आठवड्यांत आम्हीं कांही थोड्या पार्लमेंटरी सभासदांच्या गांठी घेतल्या. त्या निमित्तानें पार्लमेंटची सर्व भव्य इमारत व दोनहि सभांचें कामकाजहि आम्हांस पहावयास सांपडलें. ज्या सभासदांनीं आम्हांस सभागृह दाखविलें ते अर्थात् उदारमतवादी आहेत; एवढेंच नव्हे तर एका जुन्या प्यूरिटन घराण्याचे वंशज आहेत. त्यांनीं इमारतीच्या कोणत्या भागांत लोकपक्षानें कोणता विजय मिळविला वगैरे गोष्टी मधून-मधून हौसेनें सांगितल्या. पार्लमेंटचा बराच भाग जळल्यामुळें या शतकांत तो फिरून बांधला गेला असला तरी बाराव्या शतकाइतका जुना भागहि या इमारतींत कांहीं कांहीं अवशिष्ट आहे. हिंदुस्थानांत देखील जुन्या इमारतींचा अवशेष आहे, परंतु तो केवळ दगडाच्या व आठवणीच्या रूपानें. पण पार्लमेंटच्या याच इमारतींत, याच वास्तूंत इंग्लंडचा आज सातआठशें वर्षांचा राजकीय इतिहास अखंड घडत आला आहे व त्याचें स्वातंत्र्य अबाधितपणें राखलें जाऊन उलट वाढलें आहे हें पाहिलें म्हणजे कौतुक वाटतें. अमुक ठिकाणीं फॉक्स व बर्क यांचें सुन्या उपसण्याइतकें खडाजंगी भांडण झालें, अमुक ठिकाणीं प्रजापक्षाचे पुढारी टेम्स नदींत नावा घालून राजाच्या तरवारीपासून बचावले गेले, अमुक ठिकाणीं वॉरन हेस्टिंग्सची चौकशी झाली वगैरे दाखवून शेवटीं एका लहानशा खोली-पाशीं गेल्यावर आमचे स्नेही म्हणाले, "याच खोलींत बसून पार्लमेंट-च्या कमिटीनें चार्लस राजाला शिरच्छेदाची शिक्षा दिली व त्या कमिटींत माझा त्या वेळचा पूर्वज प्रमुख होता." हाऊस ऑफ कॉमन्सच्या दिवाण-खान्यांत त्या सभेचे निम्मे देखील सभासद सुखानें बसूं शकणार नाहींत इतका तो लहान आहे ! प्रधान मंडळी बसतात त्या कोपऱ्यांत तर अंधारच होता; ज्या साम्राज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं त्याचा सर्व कारभार याच अंधारांत चालतो ! हाऊस ऑफ लार्डसचें सभागृह पाहून तर ही बड्या लोकांची वामकुक्षीची खोली, व तोंडांतील लोण्याचा गोळा विरघळूं न देतां राज्यकारभाराविषयीं वादविवाद करण्याची जागा असली पाहिजे हें कोणी परकाहि सांगूं शकेल !

गेल्या गुरुवारीं सुधारणा—बिलाचें पहिलें वाचन झालें. हें निवळ औपचारिक होतें. बिलाच्या प्रती आतां छापून वांटल्या गेल्या आहेत व

आज संध्याकाळीं मॉटेग्यूसाहेब दुसरें वाचन करवितांना त्यावर सविस्तर भाषण करणार आहेत. हा योग अपूर्व असल्यामुळें आह्मीं हाऊस ऑफ कॉमन्सच्या ग्यालरींत जाऊन बसण्याकरितां तिकिटें मिळविलीं आहेत. लंडनास आल्यावर लगेच आह्मी मॉटेग्यूसाहेबांची मुलाखत घेण्याकरितां त्यांस पत्र लिहिलें व 'पारिसहून आल्यावर नक्की तारीख ठरवून डेप्युटेशनला मुलाखतीस बोलवितों ' असें त्यांचें उत्तर आलें आहे. दरम्यान काल सायंकाळीं आठ वाजतां मॉटेग्यूसाहेबांनीं हाऊस ऑफ कॉमन्सच्या भोजनगृहांत सर्व हिंदी पाहुण्यांना एक मेजवानी दिली. या मेजवानीस त्यांनीं आम्हां डेप्युटेशनच्या मंडळीला निमंत्रण दिलें होतें व त्याप्रमाणें दिवाण बहादूर, ना. पटेल व मी गेलों होतों. त्याप्रमाणें मॉडरेट डेप्युटेशनची सर्व मंडळी, इंडिया ऑफीसचे सर्व सभासद, लंडनमध्यें हल्लीं असणारे अँग्लोइंडियन बडे अधिकारी व मॉटेग्यूसाहेबांच्या मित्रगणांपैकीं प्रमुख पार्लमेंटरी सभासद व खाजगी गृहस्थ वगैरे अनेक लोक होते. भोजनोत्तर मॉटेग्यु साहेबांनीं हिंदी पाहुण्यांच्या सन्मानार्थ पानसमारंभ ( टोस्ट ) करविला. जेवणाचे आधीं व नंतर मिळून सुमारें दोन तासपर्यंत पार्लमेंटच्या प्रचंड गच्चीवर सर्वांनीं एकमेकांच्या गांठी घेऊन संभाषणें केलीं. हा प्रसंग मन मोकळें करून बोलण्याचा असतो व या वेळीं उच्चनीच भाव विलीन होतो; यामुळें उभय शिष्टमंडळाच्या लोकांस अनेक युरोपियन गृहस्थांना आपापले विचार खुलासेवार सांगतां आले. या खासगी संभाषणांत बोलण्याचालण्याच्या खोचा बऱ्याच कळून येतात. पण खुलें बोलण्याचाच संकेत असल्यामुळें दोन टोले द्यावे व दोन टोले घ्यावे आणि वरतीं उभयतांनीं खोखो हंसून संपादणीचें सारवण घालावें असा प्रकार पुष्कळसा चालला होता.

राष्ट्रीय सभेनें अधिक मागण्या मागितल्या तर त्यापासून मांटेग्युसाहेबांचे बिलाला धोका येईल, आणि पुष्कळाच्या पाठीमागें लागून आयतें मिळत होतें तें थोडेंहि गमावलें अशी हिंदुस्थानची हास्यजनक स्थिति होईल हाच काय तो नेमस्तांचा राष्ट्रीय सभेच्या ठरावावर मुख्य आक्षेप आहे., हा आक्षेप कितपत खरा आहे याचा लो. टिळकांनीं पूर्वींच अंदाज बांधिला होता व आम्ही येथें आल्यापासून कसून तलास

काढला. त्यांत असेंच निष्पन्न झालें कीं, केवळ बिलापेक्षां अधिक मागितल्यानें बिलाला धोका येईल हें म्हणणें बिलकुल खरें नाहीं. मि. मॉटेग्यु यांनीं मंत्रिपद स्वीकारतांना इतर मंत्रिमंडळीचें व मुख्य प्रधानांचे असें आश्वासन घेतलें आहे कीं, 'मी सुधारणांचें जें बिल आणीन तें तुम्ही मान्य केलें पाहिजे; एरवीं हिंदुस्थानच्या कारभाराची जबाबदारी मी पतकरणार नाहीं.' मॉटेग्युसाहेबांच्या पक्षाला आज पार्लमेंटमध्यें भरभक्कम पाठबळ आहे व ते करतील तें आज होईल. अद्यापि संयुक्त मंत्रिमंडळाची पद्धत अमलांत असल्यामुळें विरोधी म्हणून जो पक्ष–Opposition–नांवाला आहे, तोहि स्नेहगर्भ असाच आहे. आज पार्लमेंटमध्यें तिसरा पक्ष असा मुळींच नाहीं. कांहीं तिस्मारखान किंवा एकांडे शिलेदार आहेत. ते रॅडिकल आहेत. रीस किंवा बेनेट (टाइम्स ऑफ इंडियाचे माजी संपादक) यांसारखे कॉन्झरव्हेटिव्ह आहेत, पण त्यांच्या अंगीं सामर्थ्य नाहीं. व रीससाहेबांनीं तर मॉटेग्यु साहेबांचा पक्ष अगदीं उघड उघड स्वीकारला आहे. मजूर पक्षच काय तो मंत्रिमंडळाचा प्रतिपक्ष; पण तो तर म्हणतो हिंदुस्थान चतकोर भाकरी कां मागतो, सगळीच एकदम कां मागत नाहीं ? त्यांना हां हां म्हणून उलट आम्हांलाच संभाळून धरावें लागतें, व हिंदुस्थानची स्थिति अशी आहे असें सांगून सर्व होमरूल एकदम मागणें शक्य नाहीं, असें समजून सांगावें लागतें. तात्पर्य, राष्ट्रीय सभेची मागणी केल्यास बिलास धोका नाहीं, एवढेंच नव्हे तर डॉ. क्लार्क विनोदानें म्हणाले त्याप्रमाणें " लार्ड सिडेनहॅमच्या पक्षाला वाटेल त्यानें खाऊन मिळावें; तुमच्या विरोधामुळें कांहीं होत नाहीं. तुम्हीं बिल हाणून पाडावयाचें म्हटलें तरी पडणारें नाहीं. तुम्ही नको म्हणालां तरी मॉटेग्युसाहेबांनीं योजलेल्या सुधारणा तुमच्या गळ्यांत बांधिल्याशिवाय ते सोडणार नाहींत ! " हल्लीं पार्लमेंटची स्थितीच अशी कांहीं आहे कीं, प्रधानमंडळ म्हणेल तें होईल. ही स्थिति फार दिवस टिकणार नाहीं हें उघड आहे. व इंग्लंडचे लोक आपापल्या दृष्टीनें तूर्त पार्लमेंटवर नाखूप आहेत. पण त्यांचाहि इलाज चालत नाहीं. तथापि याविषयीं पुढें केव्हां तरी मोकळा वेळ मिळेल तेव्हां खुलासेवार लिहीन. मॉटेग्युसाहेबांचें भाषण ऐकण्यास आतांच पार्लमेंटकडे निघालों आहें तेव्हां तूर्त येथेंच थांबतों.

## पत्र नं. ३

### ( ता. १२ जून १९१९ )

डेप्युटेशनची मंडळी अजून येतच आहेत. श्री. दादासाहेब खापर्डे गेल्या रविवारीं येऊन सुखरूप पोंचले. नॅशनल होमरूल लीगतर्फे बेझंटबाई, मि. तेलंग व मि. वाडिया आले आहेत.

नेमस्त पक्षातर्फे सर विनोद मित्र, ना. शास्त्री, समर्थ वगैरे पूर्वींच आले असून बाबूसुरेंद्रनाथ बानर्जी, पृथ्वीशचंद्र रॉय वगैरेहि याच आठवड्यांत येऊन दाखल झाले. ना. चिंतामणी वगैरे थोडे यावयाचे आहेत ते आले म्हणजे सर्व पक्षांच्या डेप्युटेशनांचा पुरा संच तयार झाला.

गेला आठवडा इंग्लिश लोकांचा सणाचा होता. सोमवार ते शनिवार सर्व कामकाज बंद होतें. जो तो आपलीं बायकामुलें घेऊन समुद्राकिनारीं, नदीतिरीं किंवा डोंगराळ प्रदेशांत हवा खाण्याला किंवा करमणूक करण्याला गेला होता. पार्लमेंटच्या सभासदांना पंधरा दिवसांची रजा असल्यामुळें तेही बाहेर गेले आहेत. हवा कोंदट पावसाळी असली तरी सणासुटीच्या दिवसांत लंडनमध्यें कुढलेला सुखवस्तु मनुष्य पाय मोकळे करण्याला बाहेर जातोच. यंदा तर वसंतऋतु प्रसन्न होऊन त्यानें इंग्रज लोकांना चैन व करमणूक करण्याला जणूं काय निमंत्रणच दिलेलें आहे. गेले ७।८ दिवस तर आकाश निरभ्र असून उत्कृष्ट ऊन पडतें; पारा सावलींत ७० पर्यंत व उन्हांत ११० पर्यंत जात असून आमच्यासारख्या उष्ण प्रदेशांतील लोकांसाहि येथें हल्लीं " आज थोडेंसें उकडतें खरेंच " असें म्हणावें लागतें. वसंतऋतूचा हा प्रसाद आज चारपांच वर्षांनीं लाभला असें येथील लोक म्हणतात. त्यांतून युद्धाची काळजी संपून 'समाधानकारक तह होण्याची चिन्हें' दिसत असल्यामुळें इंग्लिश लोकांच्या आनंदाला नुसतें भरतें आलें आहे. हल्लीं प्रत्येक सणाच्या नांवामागें 'व्हिक्टरी' हा जय-शब्द ते लावीत असतात. एप्सम येथील शर्यती पाहण्याला यंदाइतका लोकसमुदाय आजवर जमला नव्हता म्हणतात. क्रिकेट वगैरेचें सामने सुरूच आहेत. सामान्य गरीब लोकांनीं तर हाईड पार्कमध्यें इतका बेसुमार स्वेच्छाचार चालविला आहे कीं पोलीसास खटले भरतां भरतां पुरेवाट झाली आहे !

हिंदी सुधारणांच्या बिलाचें दुसरें वाचन गुरुवारीं होऊन सिलेक्ट कमिटी नेमली गेल्याचें वर्तमान तिकडे तुम्हांस यापूर्वींच तारेनें कळलें असेल. मागील पत्रीं लिहिल्याप्रमाणें आम्ही डेप्युटेशनची सर्व मंडळी पार्लमेंटच्या सभागृहांत या दुसऱ्या वाचनाच्या वेळीं हजर होतों. ग्यालरीखालीं सभासदांच्या बाकांना लागून असलेल्या खास चष्म्यांत मला जागा मिळाल्यानें पाहावयाला व ऐकावयाला चांगलें मिळालें. पण दुर्दैवानें पाहण्याऐकण्याइतकें चांगलें तेथें फारसें नव्हतें. प्रथम प्रश्नोत्तरें होण्याच्यावेळीं सुमारें दीडशें सभासद हजर होते; पण मॉंटेग्यूसाहेब बोलावयास उठले त्या वेळीं पन्नाससाठ शिल्लक उरले; व त्यांचें भाषण संपण्यापूर्वींच ही संख्या तीस पर्यंत आली ! प्रधानमंडळाच्या बाकावर स्वतः मॉंटेग्यू व मि. फिशर याशिवाय एकहि प्रधान नव्हता ! एकंदर सभासदांपेक्षां हिंदी प्रेक्षकच अधिक होते. वाटलें कीं, आम्हां हिंदी लोकांना समासदांच्या जागांवर बसू दिलें असतें तर सभागृह अधिक भरलेलें तरी दिसलें असतें आणि मॉंटेग्यूसाहेबांस वक्तृत्व करण्यास अधिक जोर आला असता ! तथापि मॉंटेग्यू साहेबांना मोकळया बाकांकडे पाहून बोलण्याची नेहमींच संवय असल्यामुळें आज त्यांना कांहीं विशेष अवघड वाटलें नसावें. सुदैवानें या प्रसंगीं त्यांचें भाषण ऐकण्याला हिंदी गृहस्थ तरी हजर होते व या गोष्टींची जाणवि त्यांना होती हें, ते जे मधूनमधून हिंदी लोकांकडे दृष्टिक्षेप करीत असत त्यावरून स्पष्ट दिसत होतें. पार्लमेंटमधील हा प्रकार आम्हांला नेहमीं ऐकून माहीत होताच. पण आज प्रत्यक्ष पाहावयास सांपडला ! आम्हाला तरी या अनास्थेमुळें पार्लमेंट उदास व अरण्यासारखें भयाण भासलें. मॉंटेग्यूसाहेबांना या शून्यमय सभागृहांत प्रतिध्वनीशिवाय दुसऱ्या कोणाकडून फारसें उत्तर मिळत नव्हतें.

मॉंटेग्यूसाहेब आपलें भाषण कागदावरून न वाचतां स्मरणानें व स्फूर्तीनें बोलतात. बोलतांना प्रत्येक शब्दावर जोर देतात;आपणांपुढील पेटी (ट्रेझरी बॉक्स ) वर मधूनमधून बुक्की वळून ठोसे लगावतात; मधूनमधून स्मित करितात; त्यांचा आवाज मोठा असून वक्त्याचे पुष्कळसे गुण त्यांच्या अंगीं आहेतच; पण रिकाम्या बाकांपुढें उत्साहानें बोलण्याचा गुण साध्या वक्त्यांमध्यें नसतो तोहि त्यांच्यामध्यें आहे ! कदाचित हा गुण केवळ कर्तव्य

बुद्धीनें येत असेल. त्यांच्या स्वतःच्या योजनेपलीकडे त्यांना आम्हांस कांहीं द्यावयाचे नाहीं ही गोष्ट विसरणारास त्यांचें भाषण अत्यंत कळकळीचें वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. त्यांच्या भाषणांत चार मुद्दे मुख्य होते. ( १ ) सुधारणा अमलांत आणण्यास आम्हीं उशीर केला तर आमच्यावर यापुढें कोणी विश्वास ठेवणार नाहीं; झाला हाच उशीर बेसुमार झाला. ( २ ) प्रांतिक सरकारांनीं सुचविलेल्या योजनेंत खरें जबाबदारीचें स्वराज्य मुळींच नाहीं. ( ३ )लॉर्ड सिडनहॅम व इंडो-ब्रिटिश असोसिएशन यांची योजना लबाडीची असून हातीं धरण्याच्याहि लायकीची नाहीं. ( ४ ) हिंदुस्थानांत जातीभेद असला तरी तो सुधारणेच्या मार्गांत येऊं देण्याचें कारण नाहीं; उलट जबाबदारीनें सार्वजनिक अधिकाराचीं कामें करण्यास वाव मिळेल; असा मतदारीचा हक्क दिल्यास जातिभेदादि जुन्या सामाजिक बाबींतलें वैषम्य कमी होऊन सर्व जाति व वर्ण खांद्यास खांदा भिडवून काम करूं लागतील आणि अशानेंच अखेर हिंदी राष्ट्रीयत्व सिद्ध होईल. प्रांतिक सरकारांवर टीका करितांना ते जपून व किंचित आदरयुक्त बुद्धीनें बोलले, पण इंडो-ब्रिटिश असोसिएशन व लॉर्ड सिडनहॅम यांजविषयीं बोलतांना त्यांनीं तिरस्कारयुक्त वाणीनें त्यांचा निषेध केला. ' हिंदुस्थानांत काय किंवा इंग्लंडांत काय सिव्हिल सर्विसच्या हातून कोणतचि सुधारणा आपण होऊन कोणास आजवर मिळाली नाहीं, व पुढेंहि मिळावयाची नाहीं; त्यांना नोकराप्रमाणें सांगकामे बनवून वांकाविलें म्हणजेच त्याचा खरा उपयोग होतो. बिनसरकारी लोकांच्या डोक्यांतच राजकीय सुधारणा प्रथम जन्मास येतात व तेच लोक सुधारणांचें बाळंतपण करण्यास लायक असतात ' असें मॉंटेग्यूसाहेब जोरानें म्हणाले तेव्हां सभागृहांत बरीच चळवळ उडाली !

मॉंटेग्यूसाहेबांचें भाषण सुमारें तास दीड तास झालें; त्यानंतर अनेक सभासदांनीं भाषणें केलीं. ठासून बिला विरुद्ध असें त्यांत एकच होतें. बिलाचें आहे तसें समर्थन करणारीं भाषणें कांहीं होतीं; व बिलानें थोडे हक्क दिले जातात, अधिक द्यावयास पाहिजेत, असें चारपांच सभासदांनीं प्रतिपादन केलें; पैकीं कांहींना आम्हीं कांहीं दिवसांपूर्वीं आमचें म्हणणें कळविलें होतें, कांहींनीं टिपणेंहि करून घेतलीं होतीं. पण बरेच मुद्दे गळले व

कांहीं चुकले. तरी बिलांत देऊं केलें आहे त्यापेक्षां अधिक हवें अशी हिंदी लोकांची मागणी आहे ही गोष्ट पार्लमेंटला म्हणजे हजर असणाऱ्या पंचवीस तीस सभासदांस कळली. मात्र वर्तमानपत्रांत त्यांच्या भाषणास हवी तेवढी जागा मिळाली नाहीं यामुळें सभागृहाबाहेर तिचा बोध फारच थोड्यांस झाला. सिलेक्ट कमिटींत या मतास उचलून धरणारें बहुमत मिळण्याचा संभव नाहीं. तथापि राष्ट्रीय सभेचें म्हणणें कमिटीपुढें मांडलें जातें एवढेंच आमचें पहाणें आहे व तें साधण्याच्या प्रयत्नांत आम्हीं आहों. असो; पार्लमेंटरी सभासदांची भाषणपद्धति पाहून हिंदी श्रोत्यांच्या मनावर फारसा चांगला परिणाम झाला नाहीं. वक्तृत्व, मुद्देसूदपणा व माहिती सर्व बेताबाताचीच दिसली. राष्ट्रिय सभेतील भाषणें यापेक्षां किती तरी बरीं असतात. बोलायचें म्हणून बोलणारे व प्रतिष्ठेस हपापलेलेहि कांहीं दिसतात. विषयांतर पुष्कळच होतें. सर हेनरी क्रेके नामक एका सभासदानें बिलावर बोलतांना हिंदुस्थानच्या वायव्यसरहद्दीवरील आपल्या प्रवासाचें वर्णन इतकें लांबबिलें कीं ऐकणारांस कंटाळाच आला. पार्लमेंट रोज सहासहा तास बसतें म्हणून कांहीं निभाव लागतो; एरवीं कठिण प्रसंग होता. बिलाची चर्चा सुमारें आठ तास झाली व बोलले अवघे नऊदहा असामीच ! मॉंटेग्यूसाहेबांखेरीज एकहि सभासद खऱ्या मुद्देसूदपणानें बोलला नाहीं. याप्रमाणें वादविवाद होऊन मध्यरात्रीच्या सुमारास बिलाचें दुसरें वाचन मंजूर झालें. एका सभासदानें उपसूचना करून वादविवाद लांबविण्याचा घाट घातला होता. पण बहुतेकांनीं त्यास फाजित केलें.

ता. ७ पासून २४ जूनपर्यंत पार्लमेंटला व्हिटसन सणाची सुटी आहे. पार्लमेंट फिरून उघडल्यावर हाउस ऑफ लॉर्डसमध्यें सुधारणांच्या बिलाचें दुसरें वाचन होईल व त्यानंतर सिलेक्ट कमिटीचीं सर्व नांवें प्रसिद्ध होतील. कामटीचें काम जुलै १५चे सुमारास सुरू होईल असें वाटतें. सिलेक्ट कमिटी आठवड्यांतून तीन वेळां भरते, व कमिटीपुढें साक्षी साक्षीदार बरेच येतील. यामुळें कमिटीचें काम निदान दोन महिने चालल्यास नवल नाहीं. दोन महिन्यानंतर रिपोर्ट होईल; तोंपर्यंत फिरून पार्लमेंटची दोन महिन्यांची सुटी येईल. तात्पर्य सिलेक्ट कमिटीचें काम अदमासाप्रमाणें लवकर संपलें तरी बिलाचें तिसरें वाचन दिसेंबरपर्यंत निघण्याचा

फारसा संभव आज तरी नाहीं. दरम्यान कांहीं गंडांतर आल्यास येईलहि. तहावर सह्या होऊन स्थिरस्थावर होतांच पार्लमेंटच्या निवडणुकी फिरून होण्याचा संभव आहे असें मजूरपक्षास वाटत आहे. निदान त्यांची तशी इच्छा आहे. पक्षभेदाच्या धोरणावर भांडणें भांडत राज्यकारभार करण्याची ज्यांना नित्य संवय आहे त्यांना हें संयुक्त प्रधानमंडळ (कोॲलिशन) कुळथीच्या आमटीप्रमाणें मिळमिळीत वाटतें. नव्या निवडणुकी झाल्या तर आपणांस पार्लमेंटांत अधिक जागा मिळतील असा मजूरपक्षास भरंवसा आहे. पण लाईड जार्ज यांनीं केलेला तह सर्व वाचावयास मिळून लोकांस तो पसंत पडला तर प्रधानमंडळाचा पराभव होण्याचा संभव नाहीं, व स्थानिक सुधारणा (गरीब लोकांना राहण्याची घरें बांधून देणें वगैरे)—करण्याचा "बूट" लाईड जार्ज यांनीं काढला ह्मणजे त्यावर त्यांना लोकांस सहज झुलवितां येईल व नवीन निवडणुकीचें कारण पडणार नाहीं असेंहि कित्येकांचें मत आहे.

आयर्लंडसंबंधानें बोलतांना परवां मि. ॲस्क्विथ यांनीं 'इंग्रजी मुत्सद्दीगिरीवर हा एक काळाकुट्ट डाग आहे' असें वर्णन केलें. हिंदुस्थानासंबंधीं हेंच वर्णन ते करते, पण त्यांना हिंदुस्थानची माहिती किंवा त्याविषयीं कळकळ नाहीं इतकेंच काय तें! हिंदीराष्ट्राच्या लोकनियुक्त प्रतिनिधींनां लंडनहून पारिस येथें जाण्याला पासपोर्टहि मिळाला नाहीं. आयरिश पुढाऱ्यांना पारिसला जातां आलें, पण जाऊन उपयोग झाला नाहीं. प्रे. विलसन यांच्याशीं पत्रद्वारेंच न बोलतां आयरिश पुढाऱ्यांना त्यांची समक्ष गांठ घेतां आली, व त्यांजकडून तोंडीं सामोपचाराचीं आश्वासनें मिळवितां आलीं; पण शांतता–परिषदेपुढें आयर्लंडचा प्रश्न प्रे. विलसन यांसहि काढतां आला नाहीं. मग हिंदुस्थानची काय कथा? फरक इतकाच कीं, या त्यांच्या दुबळेपणाबद्दल अमेरिकेंत प्रे. विलसन यांचा निषेध होत आहे, व हिंदुस्थानासंबंधानें त्यांना जाब विचारण्यास त्यांच्या सदसद्विवेक बुद्धीशिवाय दुसरा कोणी नाहीं. प्रे. विलसन यांच्या पारिस येथील कामगिरीविषयीं अमेरिकेंत बरेंच प्रतिकूल मत उत्पन्न झालें आहे. 'विलसन साहेबांची छाप युरोपियन मुत्सद्यांवर पडण्याऐवजीं युरोपियन मुत्सद्यांनींच त्यांना ग्रासून टाकलें.

राष्ट्रीय स्वातंत्र्याचें तत्व शांततापरिषदेंत प्रस्थापित व्हावयाचें बाजूस राहून चार मुख्य युरोपियन राष्ट्रांनीं आपापल्या पोळीवर विलसन यांच्या हातून खच्चून तूप ओतवून घेतलें; आणि वरतीं तोंडीं लावण्याबद्दल अमेरिकेच्या परंपरापुनीत अशा मनरोडॉक्ट्रिनवरही हरताळाचा बोळा फासला' असे आरोप विलसन साहेबांवर अमेरिकन लोक करूं लागले आहेत. अमेरिकेंत आयर्लंडला इतकें अनुकूल लोकमत असतां शांतता-परिषदेपुढें विलसनसाहेब आयर्लंडचा प्रश्न चर्चेस काढूं शकले नाहींत. या गोष्टीचा उघड निषेध पूर्वीं अमेरिकेच्या लोकसभेनें केला होता. गेल्या आठवड्यांत सेनेट सभेनेंहि अशाच अर्थाचा ठराव प्रचंड बहुमतानें मंजूर केला. पण त्याचाहि उपयोग होईलसें दिसत नाहीं. कदाचित जर्मनी, ऑस्ट्रिया, टर्की, बल्गेरिया यांच्यावर जबर तह लादण्याचें काम खलास झाल्यावर शेवटचा गोड घांस म्हणून खाण्याकरितां विलसनसाहेबांनीं आयर्लंदचा प्रश्न शिल्लक ठेवला असल्यास न कळे. काल रोजीं त्यांनीं अमेरिकन आयरिश डेप्युटेशनची गांठ घेतली. पण तहाचें यश पूर्णपणें पदरांत पडल्यावर इंग्रज मुत्सद्दी विलसनसाहेबांची मोहबत कितपत ठेवतील याची वानवाच आहे. अमेरिकेंत सुमारें दीड कोटि आयरिशवंशीय लोक आहेत असें म्हणतात. असें असतां अमेरिकेची मदत आयर्लंडला अद्यापि फलप्रद होत नाहीं. तेव्हां हिंदुस्थानानें स्वराज्य मिळविण्याच्या बाबतींत स्वतःखेरीज दुसऱ्या कोणाच्या पायावर उभें राहण्यांत किंवा दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्यांत अर्थ नाहीं हें उघडच दिसतें. पण सर्व दिशांना खडे मारीत असावें, चुकून एखादा कोठें लागेल तितकाच आपला फायदा, अशा बुद्धीनें सर्व बाजूंनीं काम करीत राहिलें पाहिजे, तें टळत नाहीं. मात्र मुख्य कोणतें, गौण कोणतें याची जाणीव मनाशीं स्पष्ट असली म्हणजे झालें !

असो; स्टेटसेक्रेटरी मि. मॉटेग्यू यांजकडून आम्हांस भेटीस बोलावणें यावयाचें होतें तें परवां आलें. त्याप्रमाणें काल रोजीं आम्ही त्यांची इंडिया ऑफिसमध्यें मुलाखत घेतली. या प्रसंगीं लॉर्ड सिंह, सर वुइल्यम ड्यूक, इंडिया ऑफिसचे आणखी दोन सभासद व मि. चार्लस रॉबर्टस होहि हजर होते. संभाषण सुमारें दीड तास चाललें होतें. व औपचारिकपणा

टाकून देऊन मॉँटेग्यूसाहेब मोकळया मनानें सर्वांशीं चर्चा करीत होते. मात्र लॉर्ड सिंह यांनीं अधिकाऱ्यांहून अधिकारी असल्याप्रमाणें आम्हांस अडविण्याचा प्रयत्न मधून-मधून केला, पण त्यांना योग्य उत्तरें मिळालीं. इतर गृहस्थ फारसे बोलले नाहींत. या मुलाखतींत कोण काय बोलला हें प्रसिद्ध करणें योग्य होणार नाहीं. तथापि, नवीन अॅक्टाखालीं होणाऱ्या नियमांचा सर्व मसुदा नसला तरी त्यांचें धोरण कळण्याइतकी माहिती आगाऊ प्रसिद्ध केली जाईल. 'कमिटीचें काम शक्य तितकें लवकर संपविण्याची माझी इच्छा आहे. तरीपण सर्व पक्षांना आपलें म्हणणें व आपल्या उपसूचना कमिटीपुढें मांडण्यास भरपूर अवसर मिळेल; मात्र कमिटीचें काम लांबाविणें बरें किंवा आखडतें घेणें बरें हें ज्यानें त्यानें आपापल्या बुद्धीप्रमाणे ठरवावें; आणि नियमांचीं टिपणें प्रसिद्ध झाल्यावर फिरून मुलाखतीस या, फिरून आपण बोलूं' असें आश्वासन मॉटेग्यूसाहेबांनीं डेप्युटेशनला दिलें, इतकी माहिती तूर्त उघडपणें कळविण्यास हरकत नाहीं.

## पत्र नं. ४.

### ( ता० १९ जून १९१९. )

गेल्या आठवड्यांत इकडील मानानें उन्हाळयाचा कहर झाला. पारा एक दिवस ८२ अंशांपर्यंत जाऊन ' लंडन शहर होरपळून निघालें ! ' असें वर्णन वर्तमानपत्रांनीं दिलें. मात्र आम्ही अंगांत लोंकरीचे कपडे घालून सुखानें हिंडत होतों ही गोष्ट वेगळी. सबंध महिन्यांत पाऊस नाहीं, फळांचा बहार करपून गेला, व खिस्ती भटांना देवळांतून ' पर्जन्य सूक्त' आळविण्याची पाळी आली. केळीच्या पानांत घालून ठेवलेल्या विड्याच्या पानासारखें, थंड हवेनें इंग्रज लोकांना नेहमीं तुकतुकीत ठेवलेलें असतें, यामुळें थोड्याशा उष्णतेनें त्यांचा जीव सहजच घाबरा होतो.

हल्लीं पार्लमेंटचे सभासद व इतर अनेक लोक सुटींत बाहेर गेले असल्यामुळें आमचें बरेंचसें काम घरीं बसून चाललें आहे. या कारणानें स्थानिक चळवळीकडे अधिक लक्ष देतां येतें. लंडनमध्यें आजकाल तीन विषय मुख्य आहेत.—१ युद्धकर्ज, २ तह. व ३ राष्ट्रसंघ. नव्या युद्ध-

कर्जाची मोहीम सुरू झाली असून इंग्लंडचे श्रीमंत लोक ठरलेली कोट्यावधि पौंडांची रक्कम तेव्हांच भरून काढतील याबद्दल वादच नाहीं. तरी पण त्या अनुषंगानें साधारण जनता काय म्हणते हें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. कोणी म्हणतो, कर्जाची रक्कम देशप्रीतिमुळें भरली जाईल असें नाहीं तर मोहक सवलतीमुळें! दुसरा म्हणतो, पुढील पिढीवर भारी व्याजाचा बोजा काय म्हणून? ज्यानें करावें त्यानेंच भरावें. तिसरा म्हणतो, 'श्रीमंत लोकांजवळ हवा तेवढा पैसा आहे, तेव्हां ऐनभांडवलावरच कर बसवून एकदम वसूल कां करीत नाहीं? भांडवलावर आणि नफ्यावर टक्केवारी बसविली कीं एकदम पैसाच पैसा! सालोसाल तिजोरींतून व्याज भरीत बसण्याकरितां वाढते कर देण्याचा भुर्दंड गरीबांवर कां?' चवथा म्हणतो 'मोठमोठीं कर्जें काढून प्रधानमंडळानें हवीं तशीं दिवाळीच मांडावयाची कीं नाही?' हिंदुस्थानांत युद्धाबाबत सरकारच्या उधळपटीबद्दल 'ब्र' काढण्याची सोय नाहीं. पण येथें या प्रकरणाची चौकशी करण्याकरितां कमिशन बसलें होतें. व त्याच्या रिपोर्टांत प्रधानमंडळावर बराच ठपका ठेवण्यांत आला असून युद्धव्यवस्थेच्या नांवावर कोणत्या प्रधानाच्या दिमतीस किती मोटारगाड्या होत्या व त्या खासगी कामाकरितां कशा वापरल्या गेल्या याची यादी प्रसिद्ध करण्यांत आली आहे. विमानखात्यानें विनाकारण विमानें करावीं व मोडून टाकावीं असा प्रकार राजरोस चालू होता! रशियांत सैन्य फारसें ठेवायचें नाहीं उगाच जुजबी बंदोबस्त ठेवायचा, त्याला सालिना दहा कोट पौंड लागणार, व रशियांत दोन कोटि पौंडांचा दारूगोळा रवानाहि झाला आहे. युद्धखात्याच्या एका कंत्राटदाराच्या पायीं दहा लक्ष पौंड तोटा झाला! एका निरुपयोगी स्फोटक द्रव्याच्या कारखान्यावर आठ महिन्यांत पसतीस लक्ष पौंड खर्च आला. वैमानिकांची एक शाळा काढून लगेच बंद करण्यांत आली, तिच्यावर पांच लक्ष पौंड खर्च झाले. अशा प्रकारच्या गरीबांच्या तक्रारी आहेत; पण श्रीमंताच्या घरचा कारखाना! शिवाय ताटांत सांडलें काय वाटींत सांडलें काय एकच! इंग्लंडांत उधळपट्टी झाली तरी हिंदुस्थानाप्रमाणें पैशाला परदेशीं जाण्याला पाय फुटत नाहींत हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे!

तहासंबंधानेंहि दुमत दिसून येतें. वरच्या वर्गाला अखेर जर्मनीवर जबर अटींचा तह लादण्यांत येणार याबद्दल खूप आनंद झाला आहे. मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज हे अटी थोड्याशा सौम्य करणार अशी येथें मध्यंतरीं बातमी पसरली होती; त्याबरोबर लंडन टाइम्सनें त्यांच्या या कृत्याला ' डिसग्रेसफुल् ' असें विशेषण उघड दिलें. पण जबर अटी लादण्याचा आग्रह धरण्याचें श्रेय फ्रेंच प्रधानानें मिळविल्यामुळें लॉइड जॉर्ज यांजवरील देशद्रोहाचा आरोप आयता परस्पर निभावला. मॉंटेग्यू-साहेबांनीं दिलेल्या भोजनाच्या प्रसंगीं टेबलावर माझ्या शेजारीं बसलेल्या एका बड्या गृहस्थानें, कदाचित् माझें मन पाहण्याकरितां असेल, मला विचारलें कीं, " तुम्हास तहाच्या अटींबद्दल काय वाटतें ? " मीं म्हणालों " मला यांतलें फारसें कळत नाहीं. " तथापि त्यांनीं ' तरी पण ' असें म्हटल्यावर मी म्हणालों " मला अटी फारच कडक वाटतात व यापुरती जर्मनीविषयीं कोणाहि त्रयस्थाला सहानुभूतीच वाटेल. " ते गृहस्थ म्हणाले " पण जर्मनी यशस्वी झाला असता तर त्यानें इंग्लंडवर कशा अटी लादल्या असत्या याची कल्पना तुम्हांस आहे काय ? " मी म्हणालों ' होय, जर्मनीनेंहि हेंच केलें असतें व मग तीच सहानुभूति आम्हांला तुमच्याबद्दल वाटली असती; पण त्यामुळें अटी सौम्य ठरत नाहींत.'

राष्ट्रसंघाच्या पुरस्काराकरितां येथें एक लीग स्थापन झालेली असून तिच्या विद्यमानें भरलेली जाहीर सभा पाहण्याकरितां आम्ही गेल्या शुक्र-वारीं आलबर्ट हॉलमध्यें गेलों होतों. व्हिक्टोरिया राणीच्या पतीचें स्मारक म्हणून हें प्रचंड सभागृह वीस लक्ष रुपये खर्चून बांधलेलें आहे म्हणतात. हेंच लंडनमधील सर्वांत पहिल्या नंबरचें सभागृह. यांत सुमारें आठ हजार मनुष्यें खुर्च्यांवर व दोन हजार सज्जांत बसूं शकतात. शिवाय खुर्च्यांच्या रांगामधून दुसऱ्याचा अंगस्पर्श न होतां जाण्यायेण्यास लागण्या-इतकी ऐसपैस जागा आहे. हें सभागृह सहा मजली असतांहि प्रत्येक भागांतील मनुष्यास, त्यांचे कान-डोळे धड असल्यास, मुख्य सभापीठा-वर बोललें चाललेलें ऐकावयास व पहावयास सांपडतें. सभागृहाच्या घुमटांत विजेच्या दिव्यांची मोठी झुंबरें टांगलेलीं असून कोणाच्या डोळ्यावर प्रकाश न पडतां तळमजल्यावरहि बारीक अक्षर स्वच्छ वाचतां

येतें. असो; सभेस सुमारें पांचसहा हजार श्रोते हजर होते. सभागृह आणखीहि भरावयाचें, पण राष्ट्रसंघाच्या कल्पनेविषयीं या देशांत दुमत आहे. मजूरपक्षाचा या संघावर विश्वास नाहीं. सरकारपक्षाच्या स्फूर्तीनेंच ही चळवळ सुरू आहे. या गोष्टीचा पुरावाहि चालला असतांनाच पहावयास मिळाला. कांहीं वायांनीं चवथ्या मजल्यावर निषेधाचीं अक्षरें लिहिलेलें एक मोठें निशाण उभारलें. मुख्य वक्ते लॉर्ड रॉबर्ट सेसिल हे बोलत असतां निरनिराळ्या भागांतून ' रॉट ' ' टिबवट्ट ' वगैरे उद्गार मोठ्यानें निघत. वक्त्यास मधूनमधून प्रश्न विचारले जात. शेवटीं एका प्रेक्षकानें तर " रॉबर्ट सेसिल, यू आर ए ब्लडी ट्रेटर " असे शद्ब ओरडून सभागृह दणाणून सोडलें. तेव्हां इतर कित्येक प्रेक्षकांचा राग अनावर होऊन तो ओरडत व लाथा झाडीत असतां त्यांनीं त्याची ' पालखी ' करून त्यास ढकलीत खालीं नेलें. सभा पांच मिनिटें बंद पडली. तथापि पोलीस आपली जागा सोडून हलले नाहींत. जरूरीखेरीज लोकांच्या भांडणांत न पडण्याचा येथील पोलिसांस हुकूम असावासा दिसतो.

पूर्वीं ठरल्याप्रमाणें लो. टिळक, मी व रा. जोशी गेल्या रविवारीं ऑक्सफर्ड येथें गेलों होतों. दोन प्रहरीं शहर व कांहीं प्रमुख कॉलेजें पाहून झाल्यावर रात्रीं आठ वाजतां ' मजलसी ' पुढें टिळकांचें व्याख्यान झालें. केंब्रिजप्रमाणें येथेंही त्यांनीं ' विद्यार्थ्यांचा भावी आयुष्यक्रम ' या विषयावर प्रथम सवा तास व मागून उत्तरादाखल भाषण केलें. निरनिराळ्या प्रांतांतील हिंदी विद्यार्थी, तसेंच एक इंग्रज व एक अमेरिकन विद्यार्थी बोलले. केंब्रिजपेक्षां येथें अधिक जोराचा वाद झाला. सत्याग्रहाच्याहिपेक्षां खालच्या पायरीच्या सौम्यांतील सौम्य अशा निवळ जनताधर्मापासून जालीमांतील जालीमापर्यंत सर्व उपायांचें तात्विक समर्थन करणारा एकना एक 'विद्यार्थी होताच. पण विद्यार्थिदशेंतील ध्येयें कितीहि उज्ज्वल असलीं तरी पुढें छोट्यामोठ्या संसारांत पडलेल्या विद्यार्थ्यांस येणाऱ्या प्रत्यक्ष अडचणी किती तरी दुस्तर असतात; याकरितां कोणत्याहि देशांतील जनतेस काळीं पचेल व मानवेल असें, पण लोकमताच्या वरच्या एक पायरीचें, ध्येय मनांत ठेवून जेणेंकरून ही एक पायरी जनता वर चढेल, आणि त्या मार्गाचा उघड अंगिकार करून तें

ध्येय अमलांत आणण्यास आपणांस मदत करील व आपल्या पाठोपाठ येईल अशा रीतीनें वागणें हें खरें शहाणपणाचें होय, असें जगाचा अनुभव व इतिहास मुत्सद्यांना शिकवतो ही गोष्ट टिळकांनीं आपल्या तरुण श्रोत्यांस नीट समजावून सांगितली. तात्विक विचारसरणीनेंच ठरवावयास आपण बसलों तर ध्येयें काय अनंत आहेत; पण कोणाहि देशभक्ताची तारीफ केवळ त्याच्या ध्येयावरून जग करीत नसून त्या ध्येयाकरितां तो स्वतः किती उद्योग व स्वार्थत्याग करितो यावरून करीत असतें. देशाप्रीत्यर्थ म्हणून राजकीय, धार्मिक, सामाजिक, औद्योगिक यापैकीं वाटेल तें ध्येय आपल्या स्वभावास व परिस्थितीस अनकूल म्हणून मनुष्यानें पत्करलें तरी त्याचें श्रेय सारखेंच आहे. पण आपल्या आवडत्या ध्येयाकरितां आपलें आयुष्य खर्च करण्यास तयार होणें व आपल्या कार्यक्रमांत प्राप्त होणारीं दुःखें बिनतक्रार सोसणें यांतच खरा पुरुषार्थ आहे, एरवीं ध्येयांचीं कोरडी चर्चा करीत बसणें हा नुसता चावटपणा होय! आजचीं ध्येयें व मार्ग कोणास चुकीचे वाटले तर त्यानें नवीन शोधून काढावे. नव्या पिढीच्या यशस्वी उद्योगानें आपल्या ज्या चुका उघडकीस येतील त्या कबूल करण्यास जुन्या पिढीच्या पुढाऱ्यांस केव्हांहि आनंदच वाटेल. एकाच आयुष्यक्रमांत एक ध्येय सोडून दुसरें अधिक बरें वाटलें तर तेंहि पत्करण्यास हरकत नाहीं. मात्र तात्विक ध्येयाच्या वायफळ चिकित्सेनें डोकें न पिकवितां, मध्यम वय-प्रवेशाच्या वेळीं योग्य वाटेल तें ध्येय पसंत करावें, आणि मग त्या ध्येयाकरितां जन्मभर स्वतःस वाहून घेऊन कोणत्याहि उद्योगाचें फळ देशाला वाहीन असा निश्चय मनाशीं करून विद्यार्थ्यांनीं युनिव्हर्सिटींतून बाहेर पडावें. विशेषतः ऑक्सफर्ड-केंब्रिजसारख्या पहिल्या प्रतीच्या विद्यालयांत ठेवून, हजारों रुपये खर्चून, ज्या विद्यार्थ्यांस आईबापांनीं किंवा पालकांनीं उत्तमांतलें उत्तम शिक्षण दिलें त्यांच्यावर ही जबाबदारी विशेष आहे; वगैरे गोष्टींचा उपदेश टिळकांनीं श्रोत्यांस केला.

ऑक्सफर्ड येथील युनिव्हर्सिटींत केंब्रिजहून बरेच कमी विद्यार्थी असतात. कारण एक तर केंब्रिजप्रमाणें ऑक्सफर्ड येथें हिंदी विद्यापीठांच्या पदवीधरांस प्रवेशपरीक्षा माफ नसते. शिवाय हिंदी विद्यार्थी भाषा व इतिहास यापेक्षां गणितादि विषयांकरितांच इकडे येत असून हे विषय

शिकण्याची सोय केंब्रिज येथें अधिक चांगली आहे. हल्लीं ऑक्सफर्ड येथें अवघे पंचवीस हिंदी विद्यार्थी आहेत. प्रवेशपरीक्षेची माफी मिळाल्यास—व ती बहुधा लवकरच मिळेल असें म्हणतात—ही संख्या थोडी वाटेल. ऑक्सफर्ड येथील 'मजलसी' चें अध्यक्षस्थान हल्लीं मिस शकुंतला नामक एका पंजाबी कुमारिकेकडे आहे व त्याच या दिवशीं सभेच्या अध्यक्ष होत्या. ऑक्सफर्ड व केंब्रिज या युनिव्हर्सिट्या सर्व ब्रिटिश साम्राज्यांतील उच्च शिक्षणाचें केंद्रस्थान आहेत. हिंदुस्थानखेरीज इतर देशांतील विद्यार्थीहि येथें थोडेबहुत असतात. दोनहि शहरें, त्यांतल्या त्यांत केंब्रिज विद्यार्थीमय आहेत. कॉलेजें व विद्यार्थ्यांच्या खासगी रहात्या खाणावळीं वगळल्या असतां शहर असें कांहींच उरत नाहीं. कॉलेजच्या इमारती जुनाट व बुरसलेल्या दिसतात; पण एक तर त्या खरोखरच जुनाट म्हणजे शेंकडों वर्षांच्या आहेत; व त्यांची पडझड दुरुस्त करावयाची असतां, त्यांचें पुराणस्वरूप बिघडूं नये अशाच रीतीनें ती करण्याची खबरदारी घेण्यांत येते. इंग्रजी वाङ्मयांतील व इतिहासातील बरींचशीं प्रमुख नांवें ऑक्सफर्ड किंवा केंब्रिज यापैकीं कोणत्यांना कोणत्या तरी युनिव्हर्सिटींत लेख, चित्र, पुतळे यांच्या रूपानें आढळतात. आपल्या क्षेत्रांतील उपाध्यांच्या वह्याप्रमाणें येथील कॉलेजांच्या वह्यांतून शेंकडों वर्षांच्या जुन्या नामावळीं सांपडतात. पूर्वीं परीक्षा व पदव्या यांचें महत्व नव्हतें तेव्हांहि इंग्लंडांतील श्रीमंत घराण्यांतलीं मुलें कांहीं वर्षें येथें घालवीत. युनिव्हर्सिट्यांतूनच इंग्लंडचीं प्रमुख राज्यकर्तीं माणसें निघाल्यामुळें विद्यार्थिदशेंतहि त्यांची भावी बुद्धि, पराक्रम, शौर्य वगैरेंची ओळख लोकांस पटत असे. ऑक्सफर्डचे विद्यार्थी दंगेखोर म्हणून पूर्वापार प्रसिद्ध आहेत. " When Oxford draws the knife, England is soon at strife" हें वाक्य मीं ग्रीनच्या इतिहासांत वाचलें होतें, त्याची मला परवां ऑक्सफर्ड येथें आठवण झाली. हें सर्व मान अलीकडे अर्थातच कमी झालें आहे. विशेषतः इंग्लंडांत इतर अनेक युनिव्हर्सिट्या स्थापन झाल्यापासून यांच्या महत्वांत थोडासा कमीपणा आला आहे; पण हिंदुस्थानांत संस्कृत विद्येंत जसा काशीक्षेत्राला तसाच केवळ 'बौद्धिक' शिक्षणाच्या बाबतींत इंग्लंडांत या दोन युनिव्हर्सिट्यांना अद्यापि मान आहे. केंब्रिज युनिव्हर्सिटी

ही अत्यंत श्रीमान असून तिला सरकारी मदतीची अपेक्षा नाहीं, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीला मात्र सरकारी मदतीची गरज भासूं लागली आहे. सरकारी मदत घेणें म्हणजे पाठीवर खोगीर घालून घेण्यासारखें आहे, आम्हांला ती मदत नको व तें खोगीरहि नको असें एक पक्ष मोठ्या जोरानें प्रतिपादन करीत आहे ! ऑक्सफर्ड येथें ग्रीक भाषा हा विषय अवश्य शिक्षणक्रमांत असावा कीं नाहीं याचा जंगी वाद चालू होता. ग्रीक भाषा काढून टाकूं नये असा अखेर सेनेटनें निकाल केला. ऑक्सफर्ड व केंब्रिज या दोनहि युनिव्हर्सिट्या पुराणमतवादित्वांचीं आगरें आहेत ?

या आठवड्यांत येथील हिंदी पाहुण्यांस पांचचार ठिकाणीं निमंत्रणें होतीं. काल बुधवारीं इंडिया ऑफिसमध्यें मॉटेग्यूसाहेबांनीं लेडी चेल्म्स-फर्ड यांच्या सन्मानार्थ चहापार्टी दिली, तिला राजेरजवाडे व अनेक डेप्युटेशनांची मंडळी हजर होती. लेडी लिटन यांनीं आपल्या ओळखीच्या हिंदी लोकांस चहास बोलाविलें होतें. त्याचदिवशीं लंडनच्या बाहेर मि. ब्रॅडले नांवाच्या एका सुखवस्तु गृहस्थाच्या घरीं इंग्रजी भाषेंतील हिंदी नाटकाचा प्रयोग पाहण्यास कांहीं लोकांस आमंत्रण होतें. इंग्लंडच्या उत्कृष्ट हवेंत वनांची कृत्रिम शोभा आणलेल्या उपवनांत दिवसा उजेडीं बाबूदास गुप्त व त्यांची मंडळी यांनीं गायनवादन कथानिरूपण झाल्यावर 'आराकानची राणी' हा खेळ पाऊण तासांत करून दाखविला. एका लतामंडपांत ग्रीनरूम केली असून वृक्षवेलींची भूमिका पडद्यांचें काम करीत होती ! नाटकाचा सर्व प्रकार घेडगुजरीच होता; पण युरोपियन बाया खूप टाळ्या पिटीत. दास गुप्त, त्यांचा वेष व भाषा पाहून, असाहि मनुष्य उद्योगाच्या भरावर इंग्लंडांत पोट भरूं शकतो याचें आश्चर्य वाटलें. उद्योग करून नुसतें पोटच भरावयाचें तर तें हिंदुस्थानांतच भरलेलें काय वाईट ? इंग्लंडांत पोट भरावयाचें तें भरून शक्य तर इंग्रज लोकांकडून पैसे मिळविणारे व शिवाय आपल्या मातृभूमीचें स्मरण ठेऊन तिच्याकरितां चळवळ करणारे लोक मात्र मिळतील तितके थोडेच आहेत !

## पत्र नं. ९

### ( ता० २६ जून १९१९ )

गेल्या आठवड्यांत इंद्रानें विलायतच्या लोकांची प्रार्थना मान्य करून थोडेसें 'पाणी' पाडलें. त्याबरोबर सर्वत्र आनंदीआनंद झाला. दीड दिवसांत उणापुरा एक इंच पाऊस झाल्याबरोबर "एक एकरीं शंभर टन पाणी मिळालें" असा हिशेबहि करून टाकून वर्तमानपत्रांनीं "आतां पिकें वांचलीं" असा शेरा मारला. इंग्रज लोक पावसाप्रमाणें अधिकाराच्या बाबतींतहि अल्पसंतुष्ट असते तर काय बहार झाली असती ! आज आभाळ गडगडून गाराहि पडल्या. फिरून स्वच्छ ऊन. येथें ऊन व पाऊस हीं एका दिवसांत दहापांच वेळां पाठशिवणीचा खेळ खेळतात आणि त्यापैकीं एकालाहि येथील लोक भीत नाहींत. इंग्रज लोकांना स्वतःकरितां छत्री लागत नाहीं; पण आपलें छत्र जगांतील सर्व लोकांच्या डोक्यावर राहावें याविषयीं मात्र त्यांना अहर्निश काळजी वाटत असते ! कोणी म्हणेल हा हवेचा मजकूर पत्रांत कशाला ? पण इंग्रजी सांप्रदायाप्रमाणें हवामानाचे दोन शब्द बोलल्याखेरीज इतर गोष्टी बोलण्याच्या नसतात.

निरनिराळ्या शिष्टमंडळांचे प्रतिनिधी येथें जमले असल्यामुळें, सर्वांनीं मिळून संयुक्त स्वरूपाची व किमान दर्जाची म्हणून एखादी योजना सिलेक्ट कमिटीपुढें मांडणें शक्य आहे काय अशा दृष्टीनें गेल्या आठवड्यांत येथें कांहीं खटपट करण्यांत आली. ज्यांच्या शिरावर 'मँडेट' नाहीं ते अर्थातच मुखत्यार आहेत. पण ज्यांच्या शिरावर 'मँडेट' आहे त्यांना म्हणजे राष्ट्रीय सभेच्या शिष्टमंडळालाहि निदान ऑल—इंडिया काँग्रेसकमिटीला लिहून कदाचित् एखाद्या बाबतींत फेरसंमति मिळवितां येण्याचा संभव आहे, नाहीं कशावरून ? मॉंटेग्यूसाहेबांना बहुमताचें पाठबळ असल्यामुळें त्यांचें बिल पास होण्यास कांहीं हरकत नाहीं, व मॉडरेट पक्षाचे साक्षीदार मॉंटेग्युसाहेबांचे या बाबतीपुरते राजकीय 'स्नेही' असें म्हणवीत असले तरी ते देखील हल्लींचें बिल किंवा मांटेग्यू यांची योजना यांनीं समाधान न पावतां हिंदु-

स्थानसरकारच्या राज्यकारभारांत जबाबदारीची खातीं, खजिन्याची किल्ली, जकातीचें 'स्वातंत्र्य वगैरे अनेक भारी महत्वाच्या व मॉंटेग्यु-साहेब कधींहि एकदम देणार नाहींत अशा मागण्या उघडपणें मागणारच. मग संयुक्त मागणी करण्यानें कांहीं हित होणार असेल तर मॉडरेट व राष्ट्रीय सभा यांच्या शिष्टमंडळांनीं एकविचार करून संयुक्त मागणी कां मागूं नये ? पार्लमेंट नाहीं म्हणणार तर तें सर्व पक्षांना मिळून तरी नाहीं म्हणूं दे ' असा युक्तिवाद करण्यांत येऊन त्याप्रमाणें बेझंटबाईच्या होमरूल लीगच्या स्थानिक पुरस्कर्त्यांच्या निमंत्रणावरून सर्व पक्षांतील कांहीं निवडक मंडळींची खासगी सभा कर्नल वेजवुड यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली होती. दोन तासभर एखाद्या सबजेक्ट कमिटींतल्यासारखा पण सौम्य वाद झाला; पण अखेर ज्या त्या पक्षानें आपापल्या मागण्या स्वतंत्र रीतीनें मांडाव्या किंवा अनुकूल पार्लमेंटरी मेंबरांना समजून द्याव्या असाच निष्कर्ष निघाला. असो; सर्व पक्षांचीं शिष्टमंडळें एकत्र होण्याचा योग पुनः एकवार म्हणजे गेल्या शनिवारीं आला. त्या दिवशीं येथील ब्रिटन–इंडिया नामक सभेनें सर्व हिंदी मंडळीला नॅशनल लिबरल क्लबमध्यें चहास बोलाविलें होतें. केंब्रिज–ऑक्सफर्डचे विद्यार्थी, इंग्रज पाहुणे वगैरे मिळून सुमारें दीडशें मनुष्यें होतीं. चहानंतर टिळक, बेझंटबाई, बॅ. दुबे, हार्निमन, सत्यमूर्ति वगैरे मंडळींचीं भाषणें झालीं. ना. शास्त्री यांस भाषण करण्याबद्दल विनंति करण्यांत आली होती, पण ती त्यांनीं नाकारली. नेमस्त शिष्टमंडळांनां स्वतंत्रपणें भाषणें करण्याची संधि देण्याकरितां गेल्या मंगळवारीं नॅशनल लिबरल क्लबांत लिबरल फेडरेशनतर्फे सभा भरविण्यांत आली होती. या सभेंत मुख्य भाषण मि. मॉंटेग्यु व दुय्यम भाषण लार्ड सिंह यांचें व्हावें व त्यानंतर नेमस्त पुढाऱ्यांचीं भाषणें व्हावीं अशी योजना करण्यांत आली होती. पण प्रधानोपप्रधानांना पारिसला जावें लागल्यामुळें हा अपूर्व योग तसा साधला नाहीं. मॉंटेग्युसाहेबांच्या जागीं आयत्या वेळीं मि. चार्लस राबर्टस् यांची योजना झाली होती. त्यांनीं आपल्या अज्ञ श्रोतृवृंदाला सुधारणांची योजना समजून सांगितल्यावर, सुधारणांचें पाऊल याहून पुढें कां गेलें नाहीं याचा डिफेन्स

३७(५)

देतांना सांगितलें कीं, स्वातंत्र्याचा अतिरेक झाला असतां फ्रान्स व रशिया यांत पूर्वी घडले तसे प्रकार हिंदुस्थानांत घडावयाचे ! बाबू सुरेंद्रनाथ यांनीं मॉंटेग्युसाहेबांची स्तुति व हिंदी कृतज्ञतेचें रसभरित वर्णन करून जातांजातां हिंदुस्थानसरकारच्या राज्यकारभारांत थोडासा अधिकार मिळाला तर हवा असें सांगितलें. ना. शास्त्री यांनीं नवीन परिस्थितींत गव्हर्नराचें काम किती नाजूक व जोखमीचें होणार आहे याचें वर्णन करून आठहि प्रांतांत गव्हर्नर नेमावयाचे ते विलायतेंतून न्यावे, सिव्हिल सर्वंट लोकांना या जागा देऊं नयेत, विलायतेंतल्या पार्लमेंटरी पद्धतीचें उत्तम ज्ञान व अनुभव असणाऱ्या मुत्सद्यांनीं या जागा पतकरण्यास बिलकूल संकोच करूं नये अशी विनती केली. शेवटीं रा. समर्थ यांनीं व्याख्यात्यांचे आभार मानतांना हल्लींची योजना हिंदुस्थानांतील चांगल्या मनाच्या लोकांना ( Better mind of India ) अतिशय पसंत आहे असें ह्मणून नेहमींच्या पद्धतीप्रमाणें आपणाला शाबासकी घेऊन प्रतिपक्षावर शिंतोडा उडविलाच ! सभेचे अध्यक्ष मि. कॉटन हे आपल्या परिचयाच्या कॉटन साहेबांचे चिरंजीव आहेत; पण त्यांच्या वडिलांच्या अंगचे बरेच गुण त्यांच्यामध्यें दिसत नाहींत !

एका अर्थानें सर्व हिंदी राष्ट्राचे डोळे राजकीय सुधारणांकडे लागलेले आहेतच. पण त्यांतल्या त्यांत मुसलमानांचें लक्ष याच वेळीं दुसऱ्या एका गोष्टीकडे इतकें वेधून राहिलें आहे कीं, त्यापुढें राजकीय सुधारणा ही बाब त्यांना तूर्त क्षुल्लक वाटते. जर्मनी–आस्ट्रिया यांची वाट लागली कीं, पारीस येथील ‘ बडी चौकडी ’ टर्कीला पुढें आणणार. आजच्या झोंकावरून ही चौकडी मुसलमानी साम्राज्याचीं शकलें करून सुलतान व मुसलमानी खलिफत यांची फूट पाडणार अशी धास्ती वाटूं लागली आहे. सर्व जगांतील मुसलमानांना ही गोष्ट अप्रिय असून त्यांचा राग अतिशय भडकला आहे. जे हिंदी मुसलमान पूर्वी इंग्रज सरकारला केवळ मायबाप मानीत होते तेच आतां त्यांच्यावर एवढाले डोळे करूं लागले आहेत. राजकीय सुधारणांच्या बाबतींत चळवळ करण्याला इतर शिष्टमंडळें इतकीं आलीं असतां मुसलमानांतर्फे फक्त एकच गृहस्थ इंग्लंडला आले आहेत; पण त्यांचाहि येथें मुख्य उद्योग तहाच्या वाटाघा-

र्टीत टर्कीचें काय होणार या संबंधाचा आहे ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. त्यांनीं कांग्रेसप्रमाणें इंग्रज लोकांच्या पाठीस पडून काम न करितां स्वतःच्या नांवावर काम चालविलें आहे. ना. आगाखान वगैरे मंडळी राजकीय सुधारणांच्या बाबतींत फारसें बोलत नाहींत, पण हिंदुस्थानापेक्षां टर्कीच्या सुलतानाची चिंता त्यांना अधिक असून ते या दुसऱ्या विषयाची चर्चा उघड करितात. गेल्या सोमवारीं लंडन येथील सेंट्रल मॉसलिम असोसिएशनच्या वतीनें सेक्रेटरी मि. इस्पहानी यांनीं आम्हां सर्व शिष्ट-मंडळांना चहास बोलाविलें होतें. त्या वेळीं मुसलमान गृहस्थांनीं याच विषयावर भाषणें केली. येत्या शनिवारीं बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं मि. याकूब हसन यांचें या विषयावर ‘ एसेक्स ’ हॉल-मध्यें भाषण होणार आहे. मि. मॉंटेग्यु हे मुसलमानांचा पक्ष घेऊन प्रधान मंडळांत भांडत असतात असें म्हणतात. पण याचा मोबदला म्हणून मुसलमानांकडून राजकीय सुधारणांच्या वादांत तटस्थ व अल्पसंतुष्ट राहण्याचें वचन मागून न घेवोत ह्मणजे मिळविली !

स्वतःच्या साम्राज्यांतील लोकांची मनें कितीहि उद्विग्न होवोत, पण इंग्लंड व अमेरिका यांचे संबंध दृढ करणें हा तूर्त इंग्रजांच्या मुत्सद्दी-गिरिला मुख्य विषय होऊन बसला आहे. तीन शतकांपूर्वी इंग्लंडच्या जुलमाला कंटाळून कांहीं इंग्रजांनीं अमेरिकेला जाऊन वसाहत केली. तेथेंहि त्यांजवर जुलूम झाल्यामुळें ते बंडखोर बनले व त्यांनीं इंग्लंडचा तावा झुगारून देऊन स्वतंत्र स्वराज्य स्थापलें. हल्लीं इंग्लंडला अमेरिकेची गरज पडली तेव्हां, अमेरिकन व इंग्रज हे मूळचे भाऊभाऊ आहेत हा मुद्दा पुढें करण्यांत येऊन इंग्रजांनीं अमेरिकन लोकांची मदत मिळविली. हें सख्य पुढें किती दिवस अबाधित राहील हें जरी आज सांगवत नाहीं, तरी तूर्त या बंधुप्रेमाच्या समुद्राला अटलांटिक महासागराहून-हि मोठी भरती आली आहे; व उभयतांमधील हा महासागर जर नाहींसा करून टाकतां येईल तर हवा आहे अशा अर्थाचे उद्गार उभयपक्षीं निघत आहेत. वाफेच्या जहाजाच्या साह्यानें इंग्लंड व अमेरिका यांच्या-तलें अंतर एका आठवडयाच्या मजलेइतकें या पूर्वी ठरविण्यांत आलेंच होतें, पण आतां विमानें झाल्यापासून तें अंतर संपूर्ण नष्टप्राय करतां

येईल अशी आशा उभयपक्षीं उत्पन्न झाली आहे. गेल्या आठवड्यांत अलकॉक नांवाच्या वैमानिकानें अवघ्या सोळा तासांत अमेरिकेहून एका मजलेंत अटलांटिक ओलांडिला या गोष्टीनें विमानविद्येच्या धन्यवादाबरोबर ॲंग्लो अमेरिकन स्नेहवादानें सर्व इंग्लंड दुमदुमून गेलें. चारशें वर्षांपूर्वी कोलंबसाला जो प्रवास करण्याला तीन महिने लागले तो अलकॉक यानें पांच प्रहरांत केला. थोड्याच काळांत लंडनचीं वर्तमानपत्रें ज्या दिवसाचीं त्या दिवसास अमेरिकेंत वाचावयास मिळूं लागतील! हल्लीं इकडची तार देखील तिकडच्या माणसाच्या हातांत पडण्यास 'सरासरीनें' सोळा तास सहज लागतात असें म्हणतात. असो. विमानविद्येंत इंग्लंडनें थोड्याच काळांत सर्व राष्ट्रांवर आघाडी मारली खरी! इंग्रजांची राजनीति कशीहि असो त्यांचें धाडस व त्यांचा उद्योग यांची कोणासहि प्रशंसाच केली पाहिजे, एवढेंच नव्हे तर त्यांना साम्राज्य लाभण्यास हे गुण विशेष कारणीभूत झाले आहेत हें कोणासहि—विशेषतः हिंदी लोकांना—विसरून चालावयाचें नाहीं.

जर्मन वकिलांनीं तहावर सह्या करण्याचें कबूल केलें आहे. पण तहावर 'प्रत्यक्ष सह्या होणार कीं नाहीं' हें येत्या शनिवारपर्यंत नक्की कळणार नाहीं. यामुळें तहासंबंधीं लंडनमध्यें होणारा उत्सव थोपवून धरण्यांत आला आहे. तथापि, तहावर सह्या अखेर होणार अशा समजुतीनें पुढील यादींची तयारी एव्हांपासून सिद्ध होऊं लागली आहे. आयर्लंडचा लढा मिटविला जावा अशा संबंधानें अमेरिकन खास आग्रह धरणार. लुटुपटीच्या आयरिश रिपब्लिकचा अध्यक्ष डी. व्हॅलेरा हा अमेरिकेंत प्रगट झाला असून तो तेथें मजा करीत आहे. तो गुप्तपणानें देशपर्यटन करतो, व वाटेल तेथें अवचित प्रगट होतो. आयरिशरिपब्लिक अमेरिकन सरकारानें मान्य करावें असा प्रश्न उघडपणें कांहीं अमेरिकन लोकांनीं उपस्थित केला असून, न्यूयार्कच्या म्युनिसिपल सभासदांनीं डी. व्हॅलेरा यास नागरिकत्वाचे हक्क सन्मानार्थ द्यावे असा ठराव केला आहे. आयर्लंडांत धामधुम सुरूच आहे. खुद्द इंग्लंडांत मजुरपक्षास जोर येऊन भांडवलवाल्यांवर जय मिळवण्याकरितां त्यांनीं कंबर उघडपणानें बांधिली आहे. कोळशांच्या खाणी सरकारानें आपल्या ताब्यांत घ्याव्या असा कमि-

ज्यानें निकाल दिल्यामुळें मजूरपक्ष हा आपणास मोठा जय मिळाला असें मानीत असून, तह झाल्याबरोबर पार्लमेंटच्या नव्या निवडणुकी होणार असें मजूरपक्षाचे पुढारी म्हणूं लागले आहेत. कालपासून साऊथपोर्ट येथें मजूरपक्षाचें फार महत्वाचें कान्फरन्स भरलें असून, भांडवलवाल्याशीं असणारा मजूरपक्षाचा वाद केवळ पार्लमेंटांत बहुमत मिळविण्याचा प्रयत्न करून संपवावा, कीं संपाचें हत्यार चालवून संपवावा, हा येथें चर्चेचा मुख्य विषय होऊन राहिला होता. राष्ट्रसंघ ही संस्था रहावी पण जर्मनीवर लादलेल्या तहाच्या अटी दुरुस्त व्हाव्या, रशियाशीं चाललेलें युद्ध थांबवावें, व सर्व राष्ट्रांतील सोशिआलिष्ट लोकांनीं मिळून प्रे. विलसन यांच्या हातून घडलेली चूक दुरुस्त करावी असें प्रतिपादन करणारीं बरींच भाषणें या मजूर परिषदेंत झालीं. बेझंटबाई पूर्वीं फेबिअन सोसायटींत सामील होत्या, त्यांनीं आपण मजूरपक्षाचे राजरोस सभासद झाल्याचें जाहिर केलें असून कदाचित पार्लमेंटमध्यें सभासद होण्याचा त्यांचा इरादा असावा असा त्यांच्या जाहिरनाम्यावरून ध्वनि निघतो. बाई साऊथपोर्ट येथील सभेस गेल्या असून बहुधा त्या तेथें हिंदुस्थानसंबंधीं कांहीं तरी उद्गार काढतील. काय बोलतात पहावें !

## पत्र नं. ६

### ( ता. ३ जुलई १९१९ )

लंडनचा या आठवड्यांतील मुख्य विषय म्हटला म्हणजे तह. जर्मनी तहावर सही करणार ही गोष्ट निश्चितप्राय होती. तथापि अखेरपर्यंत काय होतें काय नाहीं याविषयीं इंग्रजांना धागधुग वाटे. शेवटीं शनिवारीं दुपारीं सव्वातीन वाजतां तहावर सह्या झाल्याची बातमी येथें साडेतीन वाजतां प्रसिद्ध झाली, त्याबरोबर विजयोत्सव सुरु झाला. सरकारी बडा उत्सव अजून पुढें व्हावयाचाच आहे; पण लोकांनीं छोटा उत्सव तावडतोब उरकून घेतला. शहरचा मुख्य चव्हाटा ट्राफलगार स्क्वेअर; या ठिकाणीं हजारों रिकामटेकडे लोक पॅरिसहून बातमी येण्याची वाट पहात आगाऊच बसले होते. त्यांतच दुकानें, कचेऱ्या बंद होऊन बाहेर पडलेल्य

लोकांची भर पडली. गाड्या व मोटारी यांची वाहतुक अशक्यच झाली. चोहोंकडे तोफांचे प्रचंड आवाज व त्यांतच फटाक्यांचे बार होऊं लागले. वर आकाशांत विमानें घारीसारखीं फिरूं लागलीं. लहान मोठीं निशाणें डोक्यांतलि टोप्यांपासून तों उंच इमारतीच्या शिखरापर्यंत लागलीं. इतर सर्व बाजार बंद पडून निशाणांची खरेदी-विक्री हाच मुख्य व्यापार होऊन बसला. भररस्त्यावर स्त्रीपुरुष उड्या मारूं लागले. एखाद्या जत्रें-तल्याप्रमाणें नाच, गाणें बजावणें, खेळ, तमाशे, मद्यपान व भामटेगिरी यांना ऊत आला. हौशी लोकांच्या थव्यांनीं राजवाडा वेढून गेला व राजाराणी सज्जांत येऊन लोकांना दर्शन देऊं लागलीं. रात्रीं अनेक विमानांनीं हजारों फुटांवरून लखलखीत दीपकिरण पाडून राजवाडा पुष्कळ वेळ पाजळून धरला होता. इंग्लंडच्या ऐहिक वैभवाचा कळस झाला असें चार्चिल साहेबांनीं नुकतेंच बोलून दाखविलें तें खरेंच आहे. जगांतल्या सांधीकोपऱ्यांत लक्ष्मी अजून दडून बसली असेल तिला तेथून खेचून आपल्या देशांत आणण्यास या विजयानें इंग्रजांना मार्ग मोकळा झाला. हिंदुस्थानच्या वतीनें बिकानेरच्या महाराजांनीं तहावर सही करून या बोडणांत हात ओला करून घेतला. पण हिंददेवीच्या कपाळावर स्वराज्याचा टिळा मात्र आतांच लागण्याचें चिन्ह दिसत नाहीं ! बारशाच्या समारंभांत वांझोटीकडे पाळण्याला चार झोके देण्याचें काम येणें यांत फारसें औचित्य नाहीं, पण श्रीमंतांच्या घरचे सोन्याचे जड पाळणे हालवायाला गरीब शेजारणीहि उपयोगीं पडतात ! त्यांना चोळीचा एक खण दिला म्हणजे पुरतो !

तहावर सह्या झाल्या याचा अर्थ, युद्ध संपलें तेव्हां आपल्या तोंडावरचें कुलूप निघालें, सरळ सरळ बोलायला राजरोस मोकळीक झाली, असें प्रधानमंडळाचे प्रतिपक्षी म्हणूं लागले आहेत. साऊथपोर्ट येथें भरलेल्या मजूरपक्षाच्या वार्षिक संमेलनांत तहावर सह्या होणार हें गृहीत धरून भरपूर टीका करण्यांत आली. मजूरपक्ष सर्वच युद्धाला विरोध करणारा नव्हता; पण जर्मनीवर लादलेल्या अटी फार कडक आहेत त्या आपण होऊन राष्ट्रसंघानें ढिल्या केल्या पाहिजेत असा ठराव रॅमसे मॅकडोनाल्ड यांच्या सूचनेवरून मजूर परिषदेंत करण्यांत आला.

याहून महत्त्वाचा ठराव म्हटला म्हणजे पार्लमेंटवर भिस्त न ठेवतां मजूरपक्षानें स्वावलंबनाचा आश्रय करून—अर्थात संप करून आपल्या मागण्या मान्य करण्यास प्रधानमंडळाला भाग पाडावें हा होय. या ठरावावर दुमत झालें. बहुमतानें तो मंजूर झाला. हा ठराव अर्थातच शिफारशीच्या स्वरूपाचा आहे; कारण अखेर निकाल ट्रेड युनियन्सकडे म्हणजे मजूरपक्षाच्या अनेक संघांकडे आहे, व या संघांतील बहुमत कदाचित याच्या विरुद्धहि जाण्याचा तूर्त संभव आहे. तथापि पार्लमेंटमधील आपल्या प्रतिनिधींच्या कामगिरीवर मजूरपक्ष संतुष्ट नसून अवघ्या साठ सभासदांच्या सहाय्यानें आपणांस कांहींएक मिळणार नाहीं, असें त्यास वाटत आहे ! इग्लंडांत तरी सनदशीर चळवळ आणि बिन-सनदशीर चळवळ असा भेद करण्यास जागा नसेल असें सकृद्दर्शनीं कोणासहि वाटण्यासारखें आहे. पण त्या शब्दांना येथेंहि अर्थ आहेच. मजुरांनीं संप करून कारखानदारांवर शक्य तर आपल्या मागण्या लादणें हा ट्रेड युनि-यनच्या लोकांचा मार्ग सनदशीर असा ठरला आहे. पण पार्लमेंटवर आपलें मत लादण्यास त्यांनीं संपाचा अवलंब करणें हा मार्ग बिनसनदशीर मानला जात असून या कृत्याला बंड किंवा राज्यक्रांति ( रेव्होल्यूशन ) या सदराखालीं कायदेपंडित ओढूं पहात अहेत. पूर्वीं मजूरपक्षाला मतदारीचा हक्क फारसा नव्हता; हल्लीं देशांत त्यांचें बहुमत असून मनांत आणल्यास त्यांना पार्लमेंटांतील निम्याहून अधिक सभासद निवडून देतां येणें तात्त्विक दृष्टया शक्य आहे; या गोष्टीनें वरील युक्तिवादाचें समर्थनहि होऊं शकतें. पण ज्याच्या हातीं जी सद्यःफलदायी सत्ता तिचा त्यानें उपयोग करणें हाच स्वतंत्र देशांतील लोकांची सनदशीर चळवळ असें मजूर-पक्षास वाटत असावेंसें दिसतें. असो. साउथपोर्ट—परिषदेला बेझंटबाई गेल्या होत्या व मजूर पक्षाच्या प्रतिनिधी म्हणून नव्हे पण सभासद या नात्यानें तेथें त्यांनीं हिंदुस्थानासंबंधानें चांगलें भाषण केलें. आमच्या डेप्युटेशनपैकीं परिषदेस प्रेक्षक या नात्यानें गेलेल्या लोकांचा खाजगी रीतीनें सत्कार करण्यांत आला.

डेप्युटेशनचें काम शक्य त्या प्रमाणांत सुरू आहे. उपयोगीं पडणाऱ्या गृहस्थांच्या गांठी घेणें, व्याख्यानें देणें व देवाविणें, वर्तमानपत्रांकरितां किंवा खासगी गृहस्थांच्या माहितीकरितां लेख व टांचणें करून देणें,

सिलेक्ट कमिटीकरितां साक्षीचा व उपसूचनांचा मसुदा करणें वगैरे कामें डेप्युटेशनच्या लोकांकडे सोईप्रमाणें वांटून देण्यांत आलीं आहेत. गेल्या शुक्रवारीं रात्रीं हॅकने येथील सन्डे–स्कूलच्या जागेंत लो. टिळक यांचें " हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणा " या विषयावर व्याख्यान झालें. श्रोतृसमुदाय बराच असून सर्वस्वीं मध्यम वर्गाच्या इंग्रजांचा होता. सदर व्याख्यानांत टिळकांनीं एक तासभर सांगितलेली माहिती श्रोत्यांना सर्वच नवीन होती. हिंदुस्थानच्या दारिद्र्याविषयीं त्यांनीं सांगितलेल्या गोष्टीवर मनुष्याचा प्रथम विश्वासहि बसत नाहीं असें श्रोत्यांनीं आपल्या उद्गारां-वरून दर्शविलें. व्याख्यानानंतर अनेकांनीं अनेक प्रश्न केले. कित्येकांनीं हिंदुस्थानानें अमुक करावें तमुक करावें असा आपापल्या बुद्धीप्रमाणें उप-देश केला व इतर कित्येकांनीं त्यांना परस्पर उत्तरादाखल असें सांगितलें कीं, प्रत्येक देशाची स्थिति वेगवेगळी असते म्हणून हिंदुस्थानांत प्रस्तुत काळीं लोकांनीं कसें वागणें योग्य होईल व कोणते उपाय योजले जाणें हें स्थानिक पुढाऱ्यांनीं ठरविणेंच बरें व ते करीत आहेत तेंच त्यांच्या स्थितीच्या मानानें योग्य आहे. असो. त्यानंतर गेल्या सोमवारीं एसेक्स हॉलमध्यें दिवाण माधवराव व सत्यमूर्ति यांचीं मजूरपक्षाच्या एका सभे-पुढें भाषणें झालीं. अध्यक्ष मि. नील मॅकनील एम्. पी. हे होते. सत्यमूर्ति यांनीं हिंदुस्थानच्या दारिद्र्यासंबंधानें आंकडेवार माहिती सांगितली. नंतर मि. सकलादवाला यांनीं हिंदुस्थानला स्वराज्याचे हक्क देण्यांत इंग्लं-डांतील कामकरी वर्गाचा कसा फायदा आहे हें समजावून सांगितलें. विलायतेंत भांडवलवाल्यांना कामकरी वर्गाचा जाच वाटूं लागला म्हणजे ते परदेशांत, विशेषत: हिंदुस्थानांत जाऊन कारखाने काढतात; त्यामुळें तेथील मजूर वर्गाची स्थिती बिघडते. शिवाय तिकडे कारखान्यांचा रोज-गार चांगला चालतो; यामुळें इकडे कारखाने फार खर्चानें चालविणें परवडत नाहीं; म्हणून येथील कारखान्यांना ओहटी लागून मजुरांचें नुक-सान होतें; म्हणून साम्राज्याच्या सर्व भागांत सारखेंच लोकस्वातंत्र्य व स्वराज्य पाहिजे आणि हिंदुस्थान व इंग्लंड यांची स्थिति तंतोतंत सारखी नसली तरी कनिष्ठ वर्गाला सुस्थिति प्राप्त करून देणें व प्रजापक्षाचें वर्चस्व स्थापित करणें हे दोनहि विषय दोनहि देशांत सारख्याच जरूरीचे

आहेत असें त्यांनीं प्रतिपादलें.

जर्मनी व ऑस्ट्रियानंतर तुर्कांशीं तहाची वाटाघाट सुरू झाली आहे. वाटाघाटींत काय निष्पन्न होणार हें दिसतच आहे. तुर्की वकिलांचें म्हणणें ऐकून घेऊन त्यांना पारिसमध्यें राहूं न देतां परत धाडले, या गोष्टीवरून परस्पर विरुद्ध असे तर्कवितर्क लोक करीत आहेत. या विषयावर ना. आगाखान व अमीरअली यांच्या सहीचें पत्र पूर्वीं प्रसिद्ध झालेंच होतें. तथापि मुसलमानांतर्फे इंग्लंडांत आतां फारशी चळवळ चाललेली दिसून येत नाहीं. येथें मुसलमानांची एक संस्था आहे. पण आगाखान, अमीर-अली वगैरे लोक या संस्थेशीं उघड संबंध ठेवतातसें दिसून येत नाहीं. सदर संस्थेमार्फत गेल्या शनिवारीं एसेक्स हॉलमध्यें ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं मद्रासचे ना. याकूब हसन यांचें व्याख्यान झालें. ना. याकूब हसन हे हिंदुस्थानांत मवाळपक्षांत आपला समावेश करून घेतात; व राष्ट्रीय सभेला बहकलेली म्हणणारांपैकीं ते आहेत. असें असतां त्यांनीं वाचलेला निबंध इतका सणसणीत होता कीं त्यांना मवाळ कोण म्हणेल ? नेमस्त लोकहि त्यांचें स्वतःचें कांहीं बिघडलें किंवा त्यांनीं स्वतः हातीं घेतलेल्या विषयांत सरकारकडून अन्यायाचा विरोध झाला म्हणजे असेंच बोलण्यास कमी करीत नाहींत. राष्ट्रीय पक्षाचे लोक आपली दृष्टि अधिक व्यापक ठेवतात. व त्यांना अनेक विषयांत तोच प्रकार आढळून येतो; यामुळें नेमस्तांकडून एक वेळ घडणारी गोष्ट राष्ट्रीयपक्षाचा मनुष्य अनेक वेळां करतो इतकाच फरक उभयतांत नसेल काय, असा प्रश्न मुसलमान पुढाऱ्यांच्या भाषणांवरून विचारावासा वाटतो. असो; या सभेंत दोन इंग्रज गृहस्थांचीं भाषणें झालीं. एकानें इंग्रज दुसरीं साम्राज्यें नष्ट करीत असतां त्यांना स्वतःला साम्राज्याची हाव किती आहे या मुद्यावर जोर दिला; व इंग्लंडची टर्कीशीं आजवरच्या धोरणांत कशी चलबिचल झाली हें सांगितलें. दुसरा गृहस्थ प्रोफेसर असून त्यानें तुर्कस्थानांत वीस वर्षें घालविलीं आहेत. तुर्क लोकांनीं केलेल्या कत्तलींचे म्हणून खोटे रिपोर्ट इंग्रजी वर्तमानपत्रांत पूर्वापार कसे येत, त्या पत्रांना खरी वस्तुस्थिति लिहून कळविली तरी ते तिला कशी दाद देत नसत, तुर्कस्थानांत शिक्षणाची सोय गांवोगांव कशी आहे वगैरे गोष्टी

त्यांनीं स्वानुभवानें सांगितल्या. बाबू सुरेंद्र यांनींहि इंग्रज मुत्सद्यांच्या भाषणाचे उतारे देऊन ते सत्यापासून भ्रष्ट कसे होत आहेत याचें विवेचन केलें.

काल ' ईस्ट व वेस्ट ' नामक संस्थेमार्फत एसेक्स हॉलमध्यें व्याख्यानें झालीं. अध्यक्षस्थानीं लॉर्ड इसलिंगटन हे होते. त्यांनीं पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीचा उल्लेख करून हिंदुस्थानची कींव करावयाची ती सोडून सिलेक्ट कमिटीच्या कामाबद्दल व रिपोर्टाबद्दल लोकांनीं सहिष्णुता व सहानुभूति दाखविली पाहिजे असें भलतेंच विधान केलें. कमिटीचा रिपोर्ट निराशाजनक होणार असें इसलिंगटनसाहेबानां स्वप्न पडलें असावें ! असो; नंतर सुरेंद्रबाबूंनीं सवादीड तास भाषण केलें. अखेर अखेर लोक कंटाळले व उशीर झाल्यामुळें कांहीं उठूनहि गेले ! या सवा तासांत सुरेंद्रबाबूंनीं बुद्धधर्म गौतममाहात्म्य इत्यादि पुराण-कथाच सर्व सांगितल्या ! नाहीं म्हणायाला हिंदी राजकीय सुधारणांसंबंधानें ते शपथेला मोजकीं दोनतीन वाक्येंच बोलले व त्यांचें तात्पर्य इतकेंच होतें कीं, " मॉटेग्यूसाहेबांची योजना उत्तम असून ती सर्वांनीं मान्य करावी. तिनें आम्हांस जो न्याय पाहिजे तो मिळेल. त्या योजनेंत फक्त एखाददुसरी सुधारणा शक्य तर व्हावी. " एवढीं वाक्यें ते न बोलते तर त्यांच्याबरोबर श्रोत्यांनाहि बुद्धाचें भिक्षापात्र घेऊन ' जुन्यापुराण्या अरण्यां ' तून हिंडूनच आपल्या कानांची भूक भागवावी लागली असती ! नंतर ना. शास्त्री बोलले; त्यांनीं पांच मिनिटांत वरिष्ठ सरकारांत जबाबदारीचा हिस्सा व आर्थिक स्वातंत्र्य दिल्याशिवाय आजची सुधारणांची गरज भागणार नाहीं असें मुद्देसूद रीतीनें सांगितलें. गेल्या सोमवारीं हाउस ऑफ लॉर्डस्मध्यें लॉर्ड सिंह यांच्या अभावीं लॉर्ड कर्झन यांनीं हिंदी राजकीय सुधारणांच्या बिलाच्या वाटाघाटीकरितां संयुक्त कामिटीवर सभासद नेमून देण्याचा ठराव मांडला व तो लॉर्ड सालिसबरी यांच्या भाषणानंतर मंजूर करण्यांत आला. या दोनहि भाषणांचा सारांश तारेनें तुम्हाला पूर्वींच वाचावयास सांपडला असेल. पैकीं लॉर्ड सॅलिसबरी यांनीं उघड उघड विरुद्ध भाषण केलें. लॉर्ड कर्झन हे १९१७ च्या जाहिरनाम्याला गुंतले गेले असल्यामुळें व ते स्वतः प्रधानमंडळाचें वरिष्ठ सभेंतील प्रतिनिधी असल्यामुळें त्यांना बिलाविरुद्ध भाषण करितां आलें नाहीं. तथापि त्यांनीं त्यांतल्या त्यांत प्रच्छन्न विरोध बराच केला.

आपल्या वेळचें हिंदुस्थान व आतांचें हिंदुस्थान यांमध्यें सर्व बाजूंनीं बरेंच अंतर पडलें आहे एवढी गोष्ट मात्र त्यांनीं कबूल केली, ही तरी कृपाच म्हणावयाची. असो. सिलेक्ट कमिटीचीं जीं नांवें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांपैकीं मि. स्पूर एवढेच काय ते मजूर-पक्षाचे असून सर डोनाल्ड मॅकलीन एवढेच काय ते लिबरल पक्षाचे आहेत. हाऊस ऑफ कॉमन्सनें नेमून दिलेले सहा सभासद मॉंटेग्यूसाहेबाचा पक्ष बहुधा उचलून धरतील आणि वरिष्ठ सभेच्या सभासदांपैकीं त्यांच्या पक्षास दोन तरी रहातील असें वाटतें. घोडामैदान जवळच आहे. काय होतें तें पहावें. मॉंटेग्यूसाहेबांना बहुमत मिळेल हें उघड दिसतें, पण मॉंटेग्यूसाहेब जें देणार तें फार थोडें आहे याची वाट काय !

## पत्र नं० ७

### ( ता० १० जुलै १९१९ )

सुधारणा–बिलाच्या सिलेक्ट कमिटीचें काम पुढील आठवड्यापासून सुरू होईल. कमिटीचें काम सहा आठड्यांहून अधिक चालेलसें दिसत नाहीं, व कमिटीपुढें साक्ष देऊं इच्छिणाऱ्या संस्था तर पुष्कळच आहेत. अर्थात प्रत्येक डेप्युटेशनच्या तर्फे एक किंवा दोन साक्षीदार घेण्यांत येतील असा रंग आहे. असें झालें तरी साक्षीदारांची संख्या बरीच होईल. तूर्त इतकी साक्षीदारांची संख्या नियमित केली जाईल असें मानल्यास नांवें निश्चितप्राय आहेत. हिंदुस्थानसरकारतर्फे सर जेम्स मेस्टन; प्रांतिक सरकारातर्फे सर मायकेल ओडवायर; विलायतसरकारांतर्फे सर वि. ड्यूक्; इंडो-ब्रिटिश असोसिएशनतर्फे वेल्बी व कर्टिस, मागसलेल्या वर्गातर्फे डॉ. नायर व लॉर्ड पेंटलंड; राष्ट्रीय सभेतर्फे दिवाण माधवराव व ना. पटेल; इंडियन होमरूललीगतर्फे लो. टिळक व ना. खापर्डे; ऑल इंडिया होमरूललीगतर्फे श्री. रामस्वामी अय्यर व बॅ. जिना; नॅशनल होमरूललीगतर्फे मिसेस बेझंट; मॉडरेट डेप्युटेशनतर्फे ना. सुरेंद्रनाथ बानर्जी व ना. शास्त्री; मॉस्लेम लीगतर्फे मि. याकूब हसन व वेळेवर आल्यास हसन इमाम (अगर बॅ. जिना.) यांखेरीज जमल्यास, डेक्कन सभेमार्फत मि. गुते; महाराष्ट्रांतील मागसलेल्या लोकांतर्फे ना. कामत; पुण्यांतील सार्वजनिक

सभेतर्फे रा. केळकर वगैरे साक्ष देण्यास तयार आहेत. तसेंच सर के. जी गुप्त, ना. चिंतामणी, रा. समर्थ, रा. रामचंद्रराव यांचा समावेश कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें करण्याची खटपट होईलच. ना. सर शंकर नायर, सर आगाखान, बाबू भूपेंद्रनाथ वसू वगैरे मंडळीच्याहि साक्षी होण्याचा संभव बराच आहे. सरकार याशिवाय आणखी कोण साक्षीदार देईल याची परिस्फुटता झालेली नाहीं. तात्पर्य, रात्र थोडी आणि सोंगें फार अशांतला सिलेक्ट कमिटीचा प्रकार होणार आहे. नोव्हेंबरच्या सुमारास बिल पास न झालें तर पुढील वर्षीं सर्व खटाटोप प्रथमपासून करावा लागणार व दरम्यान पार्लमेंट जुन्याचें नवें होऊन प्रधानमंडळ बदलतें कीं काय ही भीति; यामुळें सर्व काम झपाट्यानें उरकावें असा मॉंटेग्यू साहेबांचा प्रयत्न आहे. पण याचा परिणाम इतर साक्षीदार हवे तितके घेऊन लोकपक्षाच्या संस्थांचे साक्षीदार कमी घ्यावयाचे असा विपरीत होतो कीं काय हें पहावयाचें आहे. इंडो–ब्रिटिश असोसिएशनचा विचार हरप्रयत्नानें बिलाचें काम लांबविण्याचा असून त्यास लॉर्ड सिडनहॅम साहेबांची पूर्ण मदत आहे असें लोक उघड बोलतात.

राष्ट्रीय सभेचें खास शिष्टमंडळ येथें येऊन तिच्या ठरावानुसार चळवळ करीत असतां तिच्या पैशानें चालविलेल्या ‘ इंडिया ’ वर्तमानपत्रानें तिच्या ठरावांविरुद्ध व धोरणाविरुद्ध लिहीत असावें, एवढेंच नव्हे तर तिच्याविरुद्ध उठलेल्या नेमस्त शिष्टमंडळाचा उघड किंवा प्रच्छन्नपणानें पाठपुरावा करीत रहावें, हा अप्रयोजकपणाचा कळस होय; किंबहुना इंडिया पत्राचें हें वर्तन पाहून ‘ मदीयेन भक्तपरिव्ययेन पारलौकिको भर्ता अन्विष्यते ! ’ या मृच्छकटिकांतील वाक्याचें स्मरण होतें. असो. ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीचें आम्हाशीं वागण्याचें धोरण सामोपचाराचें आहे हें मी मागें लिहिलेंच होतें; व कमिटीच्या ऑफिसची जागाहि तिनें आमच्या ऑफिसकरितां वापरण्यास दिली; यामुळें इंडियाचे संपादक मि. पोलक यांनीं आम्हांस असें कळविलें कीं, तुमच्यापैकीं सहीनिशीं कोणी लेख वेळेवर दिल्यास तो आपण इंडियांत घालूं. पण आपल्याच वर्तमानपत्रांत आपण परक्याप्रमाणें लेख सहीवर द्यावा आणि संपादकांनीं त्यावर मालकीहक्कानें टीका करावी ही गोष्ट हास्यास्पद वाटून आम्ही मि. पोलक यांनीं

दिलेल्या सवलतीचा फारसा उपयोग केला नाहीं. शेवटीं थोडे दिवस वाट पाहून आम्ही इंडिया पत्राच्या स्थानिक चालक ( डायरेक्टर ) मंडळास पत्र लिहिलें तेव्हां त्यांनीं असा ठराव केला कीं, “ इंडिया पत्रानें दिल्ली येथील राष्ट्रीय सभेच्या ठरावानुसारच लिहिलें पाहिजे. ’ हा ठराव हातीं येतांच संपादकांच्या तब्बेतीची चांचणी पहाण्याकरितां आम्हीं कांहीं मजकूर ताबडतोब मि. पोलक यांच्याकडे पाठविला, पण त्यांना तो पसंत पडला नाहीं. पण पोलाकसाहेब हे कांहीं इंडिया पत्राचे मालक नव्हत, त्यांना डायरेक्टरांचा हुकूम अमान्य करण्याचा काय अधिकार ? अर्थात् त्यांना केवळ आपलेंच धोरण चालवावयाचें तर संपादकाच्या जागेचा राजीनामा देण्याखेरीज गत्यंतर नाहीं व त्याप्रमाणें ते आपला राजीनामा डॉ. क्लार्क यांच्याकडे धाडणार आहेत असें समजतें. तसें झाल्यास डेप्युटेशनच्या मंडळीस इंडिया पत्र आपल्या हातीं घेऊन चालवावें लागेल व त्यास आम्ही एका पायावर तयार आहों. कॉंग्रेसच्या सत्तेचें येऊन जाऊन एक वर्तमानपत्र, तें कोणत्याहि कारणानें हातीं न राहिल्यास आम्हांस तात्पुरतें स्वतंत्र वर्तमानपत्र काढावें लागणार ! पण बहुधा हा प्रसंग ‘इंडिया’च्या डायरेक्टर मंडळीच्या समजूतदारपणानें टळावा असें वाटतें. पोलाकसाहेबांनीं सहा आठवडे तरी गोता देऊन घेतला. पुढें काय होतें पहावें.

पंजाबांत घडलेल्या गोष्टी मि. मॉंटेग्यु यांस फारशा पसंत नाहींत असें म्हणतात. पण हिंदुस्थानांतील शहाणे अधिकारी करितील ती पूर्व-दिशा असें मानण्याचा प्रघात असल्यामुळें स्टेटसेक्रेटरीसाहेबांनाहि गरीब प्रजाजनां-प्रमाणें तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करावा लागतो. रौलेट-ॲक्टाच्या वेळींहि असाच थोडासा प्रकार झाला म्हणतात. या ॲक्टासंबंधीं हिंदुस्थानांतून तारेनें परवानगी मागितली एका गोष्टीकरितां व ती वापरली दुसऱ्या कामाकरितां अशी बाजारगप्प आहे. पण होऊन गेल्यावर मॉंटेग्यु-साहेब काय करणार ? ॲक्ट राजाकडून रद्द करवावा तर व्हाइसरॉय-साहेब राजीनामा देणार; आणि ‘ मी राजीनामा देतों ’ अशा व्हाइस-रॉयांनीं उच्चारलेल्या शब्दांना जो मान प्रधानमंडळांत आहे तो मान तेच शब्द खुद्द स्टेटसेक्रेटरी यांनीं उच्चारल्यास त्यांना मात्र नाहीं ! असो;

मॉंटेग्युसाहेबांच्या मनास मोठेपणा देणाऱ्या या वरील बातम्यांत तथ्यांश कितपत आहे हें आज नक्की कसें कळणार ? कदाचित् लार्ड मोर्ले यांच्याप्रमाणें ते म्हातारपणीं आपल्या 'आठवणी' लिहितील तेव्हां कळून येईल. तूर्त इतकें खरें कीं, निदान पंजाब प्रकरणाची चौकशी करण्याचें मॉंटेग्यूसाहेबांनीं ठरविलें असून त्याकरितां लॉर्ड जस्टिस केव्ह, व दोघे इंडियन अशा तिघांचें कमिशन नेमलें जाईल असें म्हणतात ! लॉर्ड केव्ह हीं न्यायमूर्ति रौलेटसाहेबांसारखीच आहे असें बोलतात. पण त्यांचे सहकारी सभासद म्हणून ज्यांचीं नांवें पुढें येत आहेत ते बरे दिसतात. कमिशननें सर मायकेल ओडवायर यांच्यावर टपका ठेवला तरी त्यांचें पारिपत्य काय होणार ? ते आपलें पेनशन पदरांत बांधून घेऊन स्वदेशीं परत आले असून हिंदुस्थानची बदनामी करण्यास ते कमिशनपुढें साक्षीदार म्हणून येणार आहेत ! "राजा कधीं चूक करूं शकत नाहीं" अशी म्हण इंग्लंडांत आहे तीच अँग्लो इंडियन अधिकाऱ्यांस हिंदुस्थानांतहि आजकाल त्यांच्या सद्दीमुळें लागू आहे. स्वर्गांत देवांच्या शरीराची सावली पडत नाहीं त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यांच्या हातून कृष्णकृत्य व्हावयाचेंच नाहीं अशी येथें समजूत असते. आधीं चौकशी व्हावयाची नाहीं, झाली तर साक्षीपुराव्यांत अधिकारी हात साधून घ्यावयाचे; त्यांतून बचावून विरुद्ध रिपोर्ट झाला तर तो सहसा प्रसिद्ध व्हावयाचा नाहीं, प्रसिद्ध झाला तरी त्याचा अंमल व्हावयाचा नाहीं;अशी ही संकटपरंपरा हिंदी लोकांच्या मार्गांत आहे. वॉरन हेस्टिंग्जपासून मुंबईच्या क्राफर्डप्रकरणापर्यंत हाच अनुभव आला. मग ओडवायरसाहेब हे एकच त्याला अपवाद कसे होतील ?

हिंदुस्थानांत अधिकाऱ्यांना हरप्रयत्नानें सावरून धरणारे इंग्रज येथें म्हणजे आपल्या स्वतःच्या कारभारांत त्यांना 'उठतां लाथ बसतां बुक्की' कशी देतात हें मोठें पहाण्यासारखें आहे. नोकरीबद्दल कृतज्ञता किंवा चुकीबद्दल क्षमा हा पदार्थ इकडे ठाऊक नाहीं. उदाहरणार्थ, हल्लींच्या प्रधानमंडळाची शोभा तहावर सह्या होण्यापुरती होती. दुसऱ्याच दिवसापासून इंग्रज लोक घरच्या भांडणाच्या गोष्टी बोलूं लागले. वादाचे व मतभेदाच विषय नसले तरी आम्हांस पार्लमेंटांत पूर्वीसारखे पक्षभेद पाहि-

जेत असें म्हणणारे लोक जेथें आहेत तेथें मतभेदाचे विषय असल्यावर संयुक्त प्रधानमंडळ कोणास आवडणार? मुख्य प्रधान पारिसहून परत आल्यापासून एकीकडे तहासंबंधीं राजकीय, धार्मिक, व सामाजिक समारंभ सुरू झाले आहेत तर दुसरीकडे पार्लमेंटांत खुद्द त्यांचे साथीदार बंडाळी करूं लागले असून, एका प्रश्नावर नुकताच प्रधानमंडळाचा पराजयहि झाला. पण पराजय झाला म्हणजे प्रधानमंडळानें राजीनामा दिलाच पाहिजे हा जुना संकेत हळुहळू मागें पडूं लागला आहे! पाठीवर वार घेऊन घरीं तोंड दाखविण्यापेक्षां मरण बरें असें म्हणणाऱ्या आमच्या रजपुतांच्या शीलासारखें पूर्वी इंग्रज प्रधानमंडळाचें शील असे. हल्लीं तें कालमान बदलून कोणीकडून तरी आपली प्रधानकी कायम राखावयाची. मग शत्रुपक्षाशीं संगनमत करून स्वकीयांशीं बेइमान होण्याचा, किंवा बहुमताचे पराजय सोसून 'थापडवाईक' बनण्याचा प्रसंग आला तरी चालेल असें हें नवें शील इंग्रज मुत्सद्दी वर्गांत प्रस्थापित होऊं पहात आहे. लॉइड जॉर्ज यांच्यापुढें फार भानगडीचे असे चारदोन प्रश्न उपस्थित झालेले आहेत. आयर्लंडचें काय करावयाचें? अर्थात् युद्ध चालू असतां कन्व्हेनशन भरविण्याच्या वेळीं कबूल केल्याप्रमाणें ते कोणतें तरी होमरूलचें बिल पास करून घेऊन त्याचा अंमल करणार? कीं फिरून पूर्ववत कार्सनसाहेबांच्या विरोधाची आणि आयरिश लोकांचें एकमत न होण्याची सबब सांगून कानावर हात ठेवणार? होमरूल देत नाहीं म्हणावें तर आयर्लंडांतली बंडाळी वाढणार व नवे जिगर दोस्त अमेरिकन रागावणार; बरें होय म्हणावें तर कॉन्झरव्हेटिव्ह स्नेही रागावणार व कार्सनसाहेब मोहरा करणार. कोळशांच्या खाणी सरकारी मालकीच्या करणार कीं नाहीं? होय म्हणावें तर कॉन्झरव्हेटिव्ह लोक संयुक्त प्रधानमंडळांतून जाणार, आणि नाहीं म्हणावें तर कोळसा–कमिशन उलट अभिप्राय देऊन बसलें असून मजूरपक्ष उचल खाणार! वास्तविक लॉइड जॉर्ज हे केवळ आपल्या वचनांना जाणणारे वेडेपीर नसल्यामुळें आणि वेळ मारून नेण्याचें कसब त्यांच्या अंगीं असल्यामुळें त्यांना या पेचांतून कांहीं तरी मार्ग सुचेलहि. पण "केसरचा मोड कसा झाला हें पाहिलेंच. पण लॉइड जॉर्ज यांचा शेंदूर कोणत्या रीतीनें उतरतो हें आतां पहावयाचें राहिलें आहे, आणि

तोहि चमत्कार आम्हाला लवकरच दिसेल" असें गंमत पहाणारे त्रयस्थ लोक उघडपणें म्हणूं लागले आहेत.

पण लॉइड जॉर्ज यांनीं पारिसहून येतांनाच एक भारलेला ताईत आत्मरक्षणाकरितां दंडांत बांधून आणला आहे. हा ताईत म्हणजे केसरच्या इनसाफाचें कारस्थान. केसरची चौकशी लंडनमध्यें व्हावयाची असें बड्या चौकडीनें ठरविलें आहे. ही बातमी मुख्य प्रधानांनीं गेल्या गुरुवारीं तहावर भाषण करितांना पार्लमेंटांत फोडली. ती ऐकून सर्व इंग्लंड आनंदानें—किंवा अद्‌भुतरसपूर्ण कौतुकानें असें म्हटलें असतां अधिक शोभेल—क्षणभर हालून गेलें. मुत्सद्यांपेक्षां कोणत्याहि देशांत तमासगीर अधिक असावयाचेच ही गोष्ट मनांत बाळगून लॉइड जॉर्ज यांनीं केसरच्या इनसाफाचा डोंबारी खेळ सुरू करण्याकरितां अशा रीतीनें मुहूर्तमेढ रोवली. त्यांना हें पक्कें माहीत आहे कीं, हा खेळ सुमारें एक वर्ष टिकेल. अर्थात् एक वर्षापर्यंत प्रधानमंडळांत क्रांति घडवून आणण्याची चळवळ बंद पडेल, निदान फारशी प्रभावी होणार नाहीं. प्रे. विल्सन आणि लॉइड जॉर्ज हे पारिस येथें जर्मनीवर तह लादीत असतांना इकडे त्यांच्याच देशांत त्यांच्याविरुद्ध बंडाळी सुरू झाली होती; व दोघांनाहि लोकप्रियतेचें कांहीं तरी भक्कम साधन बरोबर घेऊन जावयास पाहिजे होतें; व दोघांनीं तें नेलेंहि—मात्र आपापल्या स्वभावानुसार. विल्सनसाहेब भाबडे आहेत व त्यांना वेड असलें तरी तें परोपकाराचें; म्हणून त्यांनीं आपल्या पदरांत राष्ट्रसंघाचा मसुदा बांधून नेला. लॉइड जॉर्ज पडले मुत्सद्दी; तेव्हां आपल्या देशांतील प्रतिपक्षीयांची नजरबंदी करितां यावी म्हणून त्यांनीं केसरच्या इनसाफाचा गुप्त बीजमंत्र ताइतांत बांधून घेतला; कारण राष्ट्रसंघाच्या मसुद्यांच्या जोरावर इंग्लंडचे चैनी गडी संतुष्ट होऊन राहतील असें त्यांचें मन घेईनाच. विलसनसाहेब अमेरिकेस पोंचण्याच्या आधींच त्यांच्या जडीबुटीचा निम्मा गुण उडून गेला होता; लॉइड जॉर्ज यांच्या ताइताचा दर्प अधिक प्रभावी दिसतो; तथापि केसरचा इनसाफ इंग्लंडांत न होईल तर फार बरें असें चांगले चांगले इंग्रज निरनिराळ्या दृष्टीनें सुचवूं लागले आहेत. पुढील निवडणुकीस उभें न राहण्याचा विलसनसाहेबांचा बेत जाहीर झालेला आहे; लॉइड जॉर्ज यांना निवृत्ति—मार्ग फारसा माहीत नाहीं.

इंग्रज लोक हे जितके प्रगमनशील तितकेच पुराणमतवादी आहेत. इकडे प्रगतीचें पाणी त्यांच्या हनुवटीपर्यंत येऊन भिडलेलें असतें, व इकडे ते तोंडानें जुन्या गोष्टींचा पुरस्कार करीत असतात. केंब्रिज युनिव्हार्सिटींत बायका परीक्षा पास झाल्या तरी त्यांना पदवी देत नाहींत, पण इकडे बायकांना मतदारीचा हक्क मिळून एक बायको पार्लमेंटाची सभासद म्हणून निवडलीहि गेली ! बायकांना मतदारीचा हक्क मिळेना, पण त्यापूर्वीं सर्व प्रकारच्या कचेऱ्यांतून बायका पुरुषांप्रमाणें कामधाम करीत होत्या ! पार्लमेंटांत राजाला कांहींएक अधिकार उरलेला नाहीं, व ' गॉड सेव्ह धि किंग ' (राजस्तोत्र) गाइलें जात असतां एखादा पार्लमेंटचा सभासद खुशाल बसला तरी त्याचें कोणास कांहीं कारितां येत नाहीं; पण सर्व कारभार राजाच्या नांवानेंच चालला पाहिजे ! वर्तमानपत्रांतून तहाची बातमी लोकांनीं वाचून व तत्संबंधीं केलेल्या मद्यप्राशनाच्या धुंदींतून लोक शुद्धीवर येऊन कामाला लागल्यावर कांहीं दिवसांनीं जुन्या पद्धतीप्रमाणें राजाच्या तुतारीवाल्यांनीं मोठ्या लवाजम्यानिशीं मिरवणूक काढून शहरांत चारचवाठ्यांवर तहाचा जाहिरनामा वाचून दाखवावाच लागतो. जुनें लंडन शहर व नवें लंडन शहर यांच्यांतला भेद लोपून शेंकडों वर्षें झालीं तरी अजून या दोहोंच्या दरम्यान काल्पनिक सीमेवर राजदूतांनीं उभें राहून पलीकडे दहा हातांवर उभा राहिलेल्या लॉर्ड मेयरला तुतारी वाजवून आपल्या आगमनाची वर्दी दिली पाहिजे, त्यांनीं कोण म्हणून विचारिलें पाहिजे, यांनीं आम्ही राजदूत म्हणून सांगितलें पाहिजे, मग जुन्या काळचें वेशी उघडण्याचें नाटक करण्याकरितां, रस्त्यावर आडवा लावलेला रेशमाचा दोरा तोडला पाहिजे व मग राजदूतांनीं आंत प्रवेश केला पाहिजे ! पार्लमेंटांत सभासदाच्या नांवानें निर्देश करावयाचा नाहीं तर त्याची निवडणूक करून दिलेल्या गांवाच्या किंवा पेठेच्या नांवानें करावयाचा ! वडील राजपुत्राला ' परवां ' बारिस्टर करून घेण्यांत आलें. श्रीमंताच्या मुलांचा अभ्यास त्यांच्या शिक्षकांनीं घोकला तरी चालतो; त्याचप्रमाणें त्यांच्या परीक्षाहि अभ्यास केल्याशिवाय उतरतात, हें ठीकच आहे; पण राजपुत्राला तो " बडे बापका बेटा " म्हणून जर बॅरिस्टर करून घेतां येतें तर त्याजकडून नेहमींच्या सरनाम्यांतील तपशील भरून घेण्याचें कां वगळतां येऊं

नये ? ज्याला परीक्षा माफ त्याला प्रतिज्ञालेख कां माफ होऊं नये ? पण नाहीं; त्यांत जुना नमुना बरोबर वठला पाहिजे. मौज ही कीं, त्याप्रमाणें सरनामा (declaration) भरून देतांना राजपुत्राला आपल्या हातानें खालील गोष्टी लिहून द्याव्या लागल्या. प्र.–'तुझ्या बापाचा धंदा कोणता'? उ.–'माझ्या बापाचा सांगण्यासारखा धंदा नाहीं.' प्र.—'तूं स्वतः काय करीत असतोस' ? उ.— 'मीं बेकार निरुद्योगी आहें !' सारांश, इतका पुराण-मतवादीपणा इतर देशांत क्वचितच आढळेल; आणि हे इंग्लिश लोक हिंदी लोकांना जुन्या मताच्या अभिमानाबद्दल हंसणार !

## पत्र नं. ८

### ( ता० १७ जुलै १९१९ )

सुधारणा–बिलावरील सिलेक्ट कमिटीचें काम काल ( ता. १६ जुलै ) रोजीं ११ वाजतां जाहीर रीतीनें हाउस ऑफ लॉर्ड्सच्या कमिटीरूममध्यें सुरू झालें. सोमवारीं व मंगळवारींहि कमिटी भरली होती, पण तिचें या दोन दिवसांचें काम गुप्तपणें चाललें होतें. या गुप्त बैठकींत कमिटीचें काम केव्हां कसें करावें, किती साक्षीदार घ्यावे वगैरे गोष्टींचा विचार होऊन शिवाय कमिटीचे सभासद मि. मॉंटेग्यू व लॉर्ड क्रयू यांच्या साक्षी घेतल्या गेल्या असें म्हणतात. कालची बैठक जाहीर होती तरी डेप्युटेशनच्या लोकांखेरीज अवांतर एकहि प्रेक्षक हजर नव्हता व नुसती डेप्युटेशनची सर्व मंडळी हजर असती तरी त्यांनाहि बसण्याइतकी जागा मिळाली नसती ! वर्तमान-पत्रांकरितां ठेवलेल्या टेबलाचा फायदा घेण्यास तीनचार पत्रांचे बातमीदार आले होते. परंतु दहावीस ओळींपेक्षां अधिक मजकूर कोणत्याहि वर्तमान-पत्रांत येईल असें वाटत नाहीं. प्रेक्षकवर्गाच्या बाकांवर जागा न मिळा-ल्यानें मी वर्तमानपत्राच्या बातमीदारांत शिरलों होतों. माझ्या पुढच्याच खुर्चीवर लॉर्ड सिडनहॅमसाहेबांची स्वारी विराजमान झाली होती. त्यांना अध्यक्षांच्या उजव्या रांगेंत 'लास्ट' नंबर मिळाला होता. उजव्या हाताला मॉंटेग्यूसाहेब, डाव्या हाताला लॉर्ड सिंह, एका बाजूस ओळीनें तीन स्टेट-सेक्रेटरी, दुसऱ्या बाजूस मॉंटेग्यूसाहेबांचे हस्तक रीज-बेनेट अशा प्रभाव-ळींत अध्यक्ष लॉर्ड सेलबोर्न हे बसले होते.

काल पहिली साक्ष सर जेम्स मेस्टन यांची झाली. त्यांनीं प्रथम बिलांतील पांचचार कलमांत हिंदुस्थानसरकारास काय सुधारणा हव्या तें सांगितल्यावर, अध्यक्षांच्या विनंतीवरून प्रांतिक व्यवस्थेंत राखून ठेवलेल्या खात्यांची व देऊन टाकलेल्या खात्यांची पिशवी वेगवेगळी कां असावी याचें त्यांनीं सरकारी दृष्टीनें विस्तृत विवेचन केलें. साक्षीच्या सुरुवातीस त्यांनीं असें सांगितलें होतें कीं, २० आगष्टच्या जाहिरनाम्याचें धोरण, मॉंटेग्यू चेल्म्सफर्ड यांची योजना व हल्लींचें बिल या सर्व गोष्टी हिंदुस्थानसरकारास पूर्णपणें संमत असून त्यांना पिछेहाटीचें धोरण स्वीकारावयाचें नाहीं. पण हीं विधानें औपचारिक होतीं. कारण बिलांतील ४, ६, ८, ९. १५, २१, २३, २७ इतक्या कलमांत त्यांनीं ज्या सुधारणा सुचविल्या त्यांचें धोरण कृपणपणाचें होतें. तथापि उलट तपासणींत त्यांनीं बरींच उदारपणाचीं मतें कबूल केलीं. काल ऑर्मसबी गोअर, बेनेट व रीज या तिघांनीं केलेली उलटतपासणी संपली. बाकीच्यांच्या उलटतपासणीस सोमवारीं प्रारंभ व्हावयाचा आहे. हिंदुस्थानांत गेल्या दहा वर्षांत फारच फरक पडला आहे, व तीस वर्षांपूर्वींचें हिंदुस्थान तेंच आजचें हिंदुस्थान काय असा भ्रमहि पडतो, राष्ट्रीयत्वाची भावना व राजकीय सत्तेची आवड अगदीं खालच्या लोकांपर्यंत भिनली आहे, उत्तरहिंदुस्थानांत जातींच्या भांडणाचा प्रश्न नाहीं, व स्वराज्याचे अधिकार दिल्यानें ब्राह्मणांविरुद्ध ब्राह्मणेतर उठून नवीन भांडणें उपस्थित होतील असें आपणास वाटत नाहीं, असें सर जेम्स मेस्टन यांनीं आपल्या उलटतपासणींत सांगितलें. केसरीच्या वाचकांस या सर्व जबान्या कळण्याची उत्कंठा असेल; पण आक्टोबरपर्यंत त्या सरकारी रीत्या प्रसिद्ध होऊं शकत नाहींत. जबान्या व कमिटीचा रिपोर्टहि एकदमच आक्टोबरमध्यें प्रसिद्ध होईल असा अंदाज आहे.

इंग्रज लोकांना हिंदुस्थानाविषयीं पार्लमेंटांत काय वाटाघाट चालली आहे याची दादहि नाहीं व ती असावी तरी कां ? त्यांचे स्वतःचे प्रश्नच त्यांना धुंरून उरण्यासारखे पुष्कळ व भारी महत्त्वाचे आहेत. जर्मन कायसरचा खटला लंडनमध्यें चालावा कीं नाहीं, यावर एक आठवडाभर वर्तमानपत्रांतून एकसारखा वाद चालू असून त्याचा निष्कर्ष नकारार्थी निघाल्यासारखा दिसतो. टाइम्सपासून तों डेली हेरल्डपर्यंत एकाहि पत्रानें कायसरल

लंडन येथें आणण्यास संमति न दिल्यानें मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज यांनीं तिजोरीच्या गुप्त कप्प्यांतून जो हिरा म्हणून काढला ती गारगोटी ठरून ते जवळ जवळ मूर्खांच्या मालिकेंत ओढले जात आहेत. आपलें पद कायम ठेवण्याचा हा डाव फुकट गेल्यामुळें त्यांना दुसरेंच कांहीं तरी कारस्थान उभारावें लागणार. दगडी कोळसा तो काय, पण या दगडी कोळशाच्या वादांत प्रधानमंडळ ढासळून पडण्याच्या बेतांत आलें होतें; पण बोनर लॉ यांनीं सामोपचाराचें घोरण स्वीकारल्यामुळें तूर्त तो प्रसंग टळलासा दिसतो. आयर्लंडच्या प्रश्नावर लॉर्ड मॅकडोनेल यांनीं वाद उकरून काढला, त्यांत आयर्लंडमधील सर्व पक्षांस अप्रिय असा १९१४ चा होमरूल ॲक्ट रद्द करून त्याच्या जागीं एखादी सर्वसंमत अशी व वसाहतींच्या स्वराज्याच्या घाटाची योजना पुढें आणण्याचा प्रधानमंडळाचा विचार आहे असें लॉर्ड चॅन्सेलर यांनीं जाहिर केलें. पण हें आश्वासन रिकाम्या डब्याप्रमाणें पोकळ वाजत होतें, खणखणत नव्हतें. आयरिश होमरूल म्हणजे वानराची जखम; सगळ्या वानरांनीं येतांजातां खुशाल चिवडावी !

इंग्रज लोक सनदशीर चळवळीचे मोठे भोक्ते आहेत याबद्दल वाद नाहीं. पण निराशेचा प्रसंग स्वतः त्यांच्यावर आला असतां त्यांनाहि आपण काय बोलतों, काय करतों याचें भान रहात नाहीं. पार्लमेंट हेंच साम्राज्यांतील सर्वाधिकाराचें स्थान आहे. जी काय सुधारणा व्हावी अगर न व्हावी असें कोणास वाटत असेल ती त्यानें पार्लमेंटकडून हवी तशी करवून घ्यावी हाच राजमार्ग, हाच सनदशीरपणा. पण आज निदान तीन लोक तीन तऱ्हेनें हा राजमार्ग सोडून आडरानांत शिरूं पाहत आहेत. सिनफेनर आयरिश लोक इकडे पार्लमेंटांतील जागा अडवून बसले असून तिकडे प्रजासत्ताक राज्य स्थापीत आहेत. मजूर—पक्ष इकडे पार्लमेंटांत बहुमत होण्याची खटपट करीत असून तिकडे संपाच्या साधनानें आपलें कार्य साधूं पहात आहे. तिसरें उदाहरण म्हटलें म्हणजे सर एडवर्ड कार्सन यांचें. ते इकडे पार्लमेंटचे सभासद असून ब्रिटिश पार्लमेंटचें वर्चस्व आयर्लंडवर कायम राहावें असा आग्रह धरीत आहेत, पण त्याच पार्लमेंटनें बहुमतानें रीतसर मंजूर केलेले कायदे अमलांत येतील तर आपण ते मोडूं व सशस्त्र-प्रतिकार करूं अशी धमकी घालीत आहेत ! !

ता. १२ जुलै रोजीं बेलफास्ट येथें अल्स्टरवाल्यांनीं एक प्रचंड सभा भरविली होती, व तींत कार्सनसाहेबांनीं आयरिश क्याथोलिकांना मनसोक्त शिव्या देऊन बंड करण्याची धमकी घातली. सुमारें सवादोनशें वर्षांपूर्वी बॉईन नदीच्या कांठीं प्रॉटेस्टंट इंग्रजी सैन्यानें क्याथोलिक आयरिश बंडवाल्यांवर जो मोठा जय मिळविला त्याच्या स्मरणार्थ दरवर्षीं या दिवशीं अल्स्टरवाले अशीच सभा भरवीत असतात. शिवाजी व अफझुलखान यांच्या युद्धाविषयीं खुली चर्चा करणें हिंदुस्थानांत निषिद्ध आहे. पण संभाजीच्या मृत्यूच्या सालीं प्रॉटेस्टंट व क्याथोलिक यांच्या दरम्यान आयर्लंडांत झालेल्या युद्धाची चर्चा इकडे खुशाल हवी तशी करितां येते; येवढेंच नव्हे तर प्रॉटेस्टंट लोकांना क्यार्थोलिक लोकांचा धर्मगुरु जो पोप त्याची प्रतिमा चवाठ्यावर जाळण्यांत येते. अशा अपमानामुळें मनें चेतलीं न जाण्याइतके आयरिश लोक निगरगट्ट आहेत म्हणावें तर तसेंहि नाहीं, कारण अत्याचारांची खाई आयर्लंडमध्यें रात्रंदिवस पेटलेलीच आहे. असें असतां दारूनें भरलेल्या तळघरांत जळती मशाल टाकण्याच्या अपराधाबद्दल सर एडवर्ड कार्सन यांच्यावर सरकार खटला करीत नाहीं! आणि याच कार्सनसाहेबांनीं टिळकांचा मुकदमा चालू असतां चिरोलसाहेबांचे वकील या नात्यानें टिळकांवर करुकसें तोंड टाकलें हें केसरीच्या वाचकांस स्मरत असेलच. कार्सनसाहेबांना कायदा लागतो कीं नाहीं असा एका सभासदानें पार्लमेंटांत प्रश्न केला. पण बोनर लॉ यांनीं त्याला केवळ धरसोडीचें उत्तर दिलें.

चालू आठवड्यांत ब्रिटिश कॉंग्रेसकमिटी व इंडियापत्र यांजविषयींच्या वादास थोडेंसें तोंड लागलें हें सांगण्यास आनंद वाटतो. राष्ट्रीय सभेच्या पैशानें विलायतेंत चाललेली चळवळ त्या सभेच्या ठरावांना अनुसरून चालावी ही गोष्ट आंधळ्यासहि दिसण्यासारखी आहे. पण राष्ट्रीय सभा म्हणजे ‘ आम्ही ’ असा व्यक्तिनिष्ठ अभिमान कित्येक जुन्या खोडांच्या मनांतून नाहींसा होत नसल्यामुळें या साध्या सरळ गोष्टीचा प्रकाश त्यांच्या डोक्यांत पडण्यास बराच वेळ लागला; आणि हा प्रकाश आपल्या डोक्यांत पडूं नये म्हणून कित्येकांनीं अजूनहि आपल्या विवेकबुद्धीच्या खिडक्या घट्ट लावून घेतल्या आहेत. पण पडद्यांनीं प्रकाश अंत

न येऊं दिला तरी कोंबड्याच्या आरवण्याचा आवाज त्यांना अडवून धरतां येत नाहीं. नेमस्त लोकांना हिंदुस्थानामध्यें राष्ट्रीय सभेच्या नांवाचा विटाळ सोसत नसला तरी विलायतेंतील कॉंग्रेसकमिटी आपल्या हातीं ठेवण्याचा लोभ कां सुटत नाहीं, किंबहुना तेवढ्यापुरता कॉंग्रेसच्या नांवाचा विटाळहि मानूं नये असें त्यांच्या मनानें कां ध्यावें समजत नाहीं. खुद्द तर विल्यम वेडरबर्न, ह्यूम, कॉटन ही मंडळी आज हयात असती तरी ब्रिटिश कॉंग्रेसकामिटीच्या धोरणाविषयींचा बिकट प्रश्न त्यांच्यापुढें आलाच असता, व कॉंग्रेसचें धोरण तरी संभाळावें किंवा कमिटीनें नांव तरी बदलावें यांतून कोणता तरी एक मार्ग त्यांनीं ताबडतोब पत्करला असता. वास्तविक त्यांच्याबद्दल हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत किती तरी आदर होता व तो सकारणहि होता, कारण त्यांनीं आमच्याकरितां परिश्रम केले, स्वकीयांचा उपहास सहन केला व पदराला खारहि लावून घेतला. तथापि अशांनाहि टाळतां आला नसता असा हा प्रश्न महत्वाचा आहे, पण त्यांच्या पश्चात् राष्ट्रीय सभेंतील पुढाऱ्यांशीं फार तर बरोबरीच्या नात्यानें वागण्याचा ज्यांचा अधिकार त्यांनीं ब्रिटिश कॉंग्रेसकमिटी आपल्या हातीं ठेवून तिच्याकडून कॉंग्रेसचा उपमर्द करण्याची हांव धरावी हें विपरीत नव्हे काय ? गतवर्षीं मुंबईस जादा कॉंग्रेस भरली तेव्हांच आपणापुढें वाढून ठेवलेला बेबनाव येथील कॉंग्रेसकमिटीस दिसून आला असला पाहिजे. पुढें दिल्लीच्या सभेंत हा बेबनाव विकोपास जाऊन ब्रिटिश कॉंग्रेसनें राष्ट्रीय सभेच्या अधिकाऱ्यांना विचारल्याशिवाय नवीन सालाकरितां कोणतीहि पैशाची जबाबदारी पतकरूं नये असें कमिटीस तारेनें कळविण्यांतहि आलें होतें. अर्थात कमिटीनें यापूर्वींच जागें होऊन आपल्या ठिकाणीं पोक्त विचार करून आपला निकाल राष्ट्रीय सभेस कळवावयास पाहिजे होता. तें तर राहिलेंच, पण खुद्द डेप्युटेशन येथें आल्यावर त्यांच्याशीं हुजत घालण्यापर्यंत कमिटीनें मजल नेली.

पण या आठवड्यांत ' इंडिया ' पत्राच्या कारणानें हा वाद नेटाला लागून पत्राच्या डायरेक्टरांनीं व ब्रिटिश कॉंग्रेसकमिटीनें असा ठराव केला कीं, इंडिया पत्राच्या संपादकांनीं पत्राचें धोरण राष्ट्रीयसभेच्या ठरावाप्रमाणें ठेवलें पाहिजे व त्यांचें समर्थन केलें पाहिजे. ही गोष्ट संपादक मि. पोलाक

यांस मान्य होण्यासारखी नसल्यानें त्यांना अर्थातच राजीनामा द्यावा लागणार. असो. गतवर्षी राष्ट्रीय सभेकडून ठराविक हुंडी न आल्यामुळें येत्या डिसेंबरच्यापुढें इंडियापत्र चालविण्यास कमिटीच्या हातीं पैसा नाहीं, या गोष्टी लक्षांत घेऊन जरूर तर सर्व प्रकारें इंडियापत्राची जबाबदारी संभाळण्यास आम्ही तयार आहों असें डेप्युटेशनच्या वतीनें पत्राच्या डायरेक्टर बोर्डास कळविण्यांत आलें. बोर्डास ही गोष्ट इष्टच होती. अखेर गेल्या सोमवारीं बोर्डाची व डेप्युटेशनची सभा भरून तींत असा ठराव करण्यांत आला कीं, पोलाकसाहेबांस काँग्रेसच्या धोरणाप्रमाणें पत्रांत लिहिण्याबद्दल फिरून निक्षून सांगण्यांत यावें. त्याप्रमाणें मंगळवारीं त्यांना सांगण्यांत आलें, तेव्हां त्यांनीं डायरेक्टर यांजकडे आपला राजीनामा दिला व ता. २४ जुलैपासून डेप्युटेशननें इंडिया पत्र आपल्या हातीं घेऊन तें चालवावें असें ठरलें.

इतकें झालें तरी मि. पोलाक यांच्या मनांतील आढी गेलेली नसून त्यांनीं लॉर्ड क्ल्यूइड यांच्या करवीं फिरून हा प्रश्न ब्रिटिश काँग्रेसकमिटीपुढें विचाराकरितां काढावा असें योजिलें आहे, व या प्रश्नाचा कायमचा निकाल येत्या शुक्रवारच्या सभेंत लागेल असा अदमास आहे. काँग्रेस व लंडन येथील ब्रिटिश काँग्रेसकमिटी यांचा खरा संबंध काय आहे हें न कळण्याइतके लॉर्ड क्ल्यूइड, मि. पोलाक किंवा त्यांचे नेमस्त पक्षांतील स्नेही अप्रबुद्ध आहेत असें नाहीं; शिवाय असेंहि ऐकण्यांत आहे कीं मुंबईच्या नेमस्ताग्रणींनीं जुन्या काँग्रेसफंडापैकीं दहावीस हजार रुपये विलायतेस पाठविले असून पोलाकसाहेबांच्या संपादकत्वाखालीं लंडन येथें एक नेमस्त पक्षाचें पत्र वेगळें काढण्याचें त्यांनीं ठरविलेंहि आहे. परंतु इंडिया पत्र हातीं आहे तें कसें तरी करून घालवूं देऊं नये व राष्ट्रीय सभेस त्याचा फायदा प्रस्तुतच्या बिलाची चळवळ संपेपर्यंत मिळूं देऊं नये येवढ्याकरितांच हा सर्व वाममार्गाचा खटाटोप चालू असावा. पण तो खटाटोप यापुढें सिद्धीस जाण्याचा फारसा संभव आहे असें वाटत नाहीं.

ब्रिटिश काँग्रेसकमिटीची घटना नियमबद्ध नाहीं. काँग्रेस जन्मण्यापूर्वी लंडन येथें इंडियन रिफॉर्म असोसिएशन नांवाची संस्था लॉर्ड रिपन यांच्या उदार धोरणास पुष्टि देण्याकरितां स्थापण्यांत आली. पुढें काँग्रेस

जन्मास आल्यावर या सभेनें ब्रिटिश कॉंग्रेसकमिटी हें नांव धारण केलें. या सभेचें चालकत्व आरंभापासून आतांपर्यंत ह्यूम, वेडरबर्न, कॉटन, डिग्बी, हरबर्ट रॉबर्टस्, डॉ. क्लार्क वगैरे इंग्रज लोकांच्या हातीं होतें; पैकीं शेवटच्या दोघांखेरीज बाकी सर्व स्मृतिशेष झाले आहेत. हरबर्ट रॉबर्टस् हे लॉर्ड क्ल्युइड आल्यापासून हिंदुस्थानच्या चळवळींत लक्ष घालण्याचें त्यांनीं सोडून दिलें. येऊन जाऊन डॉ. क्लार्क हे एकटेच काय ते उरले असून ते अजूनहि लक्ष घालतात. पण तेहि आतां वृद्ध झाले आहेतच. तेव्हां यापुढें ब्रिटिश कॉंग्रेसकमिटीचें काय करावें हा येथील लोकांसहि प्रश्नच होता. शिवाय यापुढें विलायतेंतील चळवळ हिंदी लोकांनीं आपल्या जबाबदारीवरच केली पाहिजे, इंग्रजांच्या ओंजळीनें पाणी पिण्याचें त्यांनीं सोडून द्यावें, असें नवीन मत येथें इंग्रज लोकांतहि प्रचलित झालें आहे. वाटल्यास स्थानिक इंग्रज मित्रमंडळींची एक सभा स्थापावी व तिची सल्लामसलत घ्यावी. पण सर्व विधायक सत्ता आपल्या हातीं ठेऊन हिंदी लोकांनीं स्वतः पुढें होऊन राष्ट्रीय सभेच्या नांवानें चळवळीचें काम केलें पाहिजे, व यापुढें झाला तर अशा कामाचाच कांहीं परिणाम होईल असें येथें सर्व लोक म्हणतात. जुन्या इंग्रज पुढाऱ्यांच्या कामाबद्दल योग्य ती कृतज्ञता बाळगून यापुढील कामाच्या जबाबदारीपासून त्यांना मोकळें करणें हें हिंदी पुढाऱ्यांचें काम आहे. इंग्रज लोकांनीं तरी आपलें काम काय म्हणून व किती दिवस संभाळावें ? तात्पर्य दोन टोकांनीं बोगदा पोखरतांना पोखरणारे एकमेकांस मध्येंच भेटावे व बोगदा तयार होऊन डोंगरांतून नवीन मार्ग निर्माण व्हावा, त्याप्रमाणें एकीकडून हिंदी लोकांचे विचार व दुसरीकडून लंडन येथील इंग्रज मित्रांचे विचार यांची एकवाक्यता होऊन इंग्लंडच्या राजधानींतील हिंदी चळवळीचें काम यापुढें हिंदी लोकांनीं चालवावें व जरूर तेथें इंग्रजांची फक्त मदत घ्यावी असें धोरण प्रस्थापित झाल्यासारखें दिसतें. हिंदुस्थानांतील चळवळीच्या मानानें विलायतेंतील चळवळ फारच कमी महत्वाची आहे; तथापि तेंहि जरूरीचें काम असून तें अंगावर घेण्यास विशेष योग्यतेचे हिंदी गृहस्थ मिळाले पाहिजेत; ते कसे मिळवावे हा राष्ट्रीय सभेपुढें एकदोन वर्षें मोठाच प्रश्न होऊन राहील असें वाटतें.

## पत्र नं. ९

### ( ता. २४ जुलै १९१९ )

गेल्या शनिवारीं इंग्लंडभर विजयोत्सव ऊर्फ शांततोत्सव झाला. सर्व प्रकारची चैनबाजी व दिमाखाचे देखावे चोवीस तास चालू होते. नुसत्या गर्दीनेंच शेंकडों लोक जखमी झाले. देशांत उत्सवाबरोबर दंगे झाल्याचेंहि वर्तमान आलें आहे. लटन ( Luton ) येथें दंग्याबरोबर आगी लागून लाखों रुपयांचें नुकसान झालें. दिवस नेमका ठरवून सरकारी हुकुमानें आनंदोत्सव व सण करणें ही गोष्ट कष्टसाध्य असते. तहावर सह्या झाल्याची बातमी आली त्या दिवशीं लोकांत जो अंतःस्फूर्तीचा उमाळा होता तो शनवारच्या उत्सवांत दिसून आला नाहीं असें तज्ज्ञ लोक म्हणतात. सुटी दिली, मिरवणूक काढली व दारूकाम सोडलें म्हणजे लाज सोडून, रस्त्यांतून नाचणारे हजारों लोक मिळतात. पण विचारी इंग्रजांच्या तोंडावर गंभीरपणाच होता. याचें कारण देशांत खरी शांतता नसून कांहीं तरी संकट वाढून ठेवलें आहे असें त्यांचें मन त्यांना सांगत आहे. मजूरपक्ष दिवसानुदिवस चढाई करण्याच्या बेतांत आहे व या पक्षाचा पाडाव करून त्याचे दांत, आपल्या हातीं सत्ता आहे तोंवरच, पाडून मोकळें व्हावें असें अधिकारीपक्षास वाटूं लागलें आहे. अशी कज्ञाची उभय पक्षीं तयारी आहे. कोळशाच्या खाणींतून आजवर संपत्ति बाहेर निघाली तितकी कोळशाच्या भांडणाच्या पायीं खड्डयांत जाते कीं काय अशी भीति वाटते. खाणींतील मजुरांच्या संपास प्रारंभ झाला आहे. युद्धाच्या वेळीं कर्ज मिळालें तितकें जय झाल्यावर मिळालें नाहीं. दोन सवादोनशें कोटि पौंडांची मागणी होती त्यापैकीं खरें नवें कर्ज असें पन्नाससाठ कोटीच मिळालें. बाकीचें काम सरकारांत मुदतीच्या हुंड्यांवर भागवीत बसावें लागणार ! तात्पर्य, आम्हीं हिंदुस्थानांतील गरीब, परावलंबी लोक आमच्या मानानें दुःखी व धनाढ्य स्वतंत्र इंग्लंडचे लोक त्यांच्या मानानें दुःखी !

सुधारणा—बिलाच्या वाटाघाटीचें काम सिलेक्ट कमिटीपुढें सोमवार, मंगळवार, बुधवार असे तीन दिवस चाललें. सोमवारीं व मंगळवारीं सर जेम्स मेस्टन यांची उलटतपासणी झाली ती पाहण्यास ॲंग्लो-इंडियन

अधिकारी बरेचसे आले होते. सर मायकेल ओडवायर, सर क्लॉड हिल, सर फ्रँक स्लाय, मि. लॉरेन्स वगैरे बरीच मंडळी आमच्याबरोबर बाकांवर बसली होती. तुरुंगांत घालणारे, तुरुंगांत जाणारे, राजकीय राव, रंक येथें एकाच मापानें मोजले जातात. सर क्लॉड हिल ज्या बाकावर निम्मे टेंकले होते तें वर्तमानपत्रांच्या बातमीदारांकरितां राखून ठेवलें होतें. म्हणून कमिटीचा गोरा कारकून त्यांना म्हणूं लागला 'येथून उठा' ; तेव्हां 'सर जेम्स मेस्टन यांच्यानंतर माझी साक्ष व्हावयाची आहे ना' असें हिलसाहेबांस सांगावें लागलें. अर्थात् इतकें सांगितल्यावर बहुमानाची जागा दुसरीकडे मिळाली हें सांगावयास नको. असो; सर जेम्स मेस्टन हे कमिटीपुढें येणाऱ्या साक्षीदारांपैकीं सर्वांत महत्वाचे साक्षीदार. तेव्हां त्यांची साक्ष तीन दिवस चालावी यांत आश्चर्य नाहीं. मुख्य तपासणी कमिटीचे चेअरमन यांनीं केली. बाकी सर्वांनीं केली ती उलटतपासणीच म्हणावयाची। पैकीं खरी तपासणी अशी तिघांनींच केली. हे तिघे म्हणजे, लॉर्ड इसलिंगटन, लॉर्ड सिंह व मि. मॉंटेग्यू. पण यांच्या तपासणीचा सारांश सांगण्यापूर्वीं बाकीच्यांबद्दल दोन शब्द सांगणें बरें.

कॅप्पटन ऑर्मसबीगोर हे तरुण आहेत व तरतरीत दिसतात. हे पुढेंमागें एखाद्या प्रांताचे गव्हर्नर होण्याचा संभव आहे; कारण ते एका लॉर्डाचे मुलगे व दुसऱ्या एका लॉर्डाचे जांवई आहेत. यांनीं दोनतीनच प्रश्न विचारले; त्यांत अमुक एका बाजूस झोंक असा दिसून आला नाहीं, पण ते मॉंटेग्यूसाहेबांचे मित्र आहेत. मि. बेनेट यांचे प्रश्न थोडे पण उपयुक्त होते. हिंदुस्थानांत सर्व वर्गांपर्यंत राष्ट्रीयत्वाची भावना भिनली आहे, वगैरे उदारपणाचे उद्गार मेस्टनसाहेबांच्या तोंडून निघण्यास यांचेच प्रश्न कारणीभूत झाले. बेनेटसाहेब मॉंटेग्यूसाहेबांना मदत करणारे आहेत. रीससाहेबांच्या अंगीं म्हातारपणाचे वाचालत्वादि सर्व गुण आले आहेत. यामुळें त्यांचे प्रश्न पायांत पाय अडखळून पडत व साक्षीदारापर्यंत पोंचत नसत. " हल्लीं सुद्धां वरिष्ठ सरकार, प्रांतिक सरकार यांच्या अधिकारांच्या गुंतागुंतीमुळें संयुक्तपणा भासला तरी द्विदळस्वरूपाचीच पद्धती चालू करण्यास हरकत नाहीं; आणि नवीन अधिकार लोकांस मिळणार असले तरी त्यामुळें अब्राह्मणांच्या मनांत ब्राह्मणांविषयीं, निदान उत्तरहिंदुस्था-

नांत तरी, मत्सर उत्पन्न होईल असें नाहीं" हीं आपलीं मतें त्यांनीं मेस्टन साहेबांच्या तोंडून काढलीं. हेंहि मॉंटेग्युसाहेबांचे सहाय्यकर्तेच आहेत. रीससाहेबांस पाहण्यापूर्वीं त्यांच्या पार्लमेंटांतील प्रश्नोत्तरांवरून त्यांच्या मूर्तीची जी कल्पना मीं केली होती तीच त्यांच्या हालचाली, भाषणाची ढब, दातांच्या कवळींतून निघणारें 'शकारत्व' वगैरे पाहून खरी ठरली! मि. बेनस्पूर हे तीन दिवस हजरच नव्हते, पण ते असते तरी त्यांनीं कांहीं मुद्याचे प्रश्न विचारले असते असें वाटत नाहीं. बिलानें देऊं केलें त्याहून अधिक देण्यासंबंधाचा प्रश्न विचारणारा कोणी या कमिटींत असला तर तो येवढाच गृहस्थ आहे. मात्र त्यांच्यामागें कामें फार व त्यांचा या विषयाचा अभ्यास मुळींच नाहीं. ते मॉंटेग्यूसाहेबांचे नसले तरी सुधारणांचे सहाय्यकर्ते आहेत, व त्यांनीं कामिटीच्या रिपोर्टास उदारमतवादी अशी मतभेदपत्रिका अखेर न लिहिली तर त्याचें कारण त्यांच्या मनापेक्षां त्यांचें अज्ञान असें धेऊन चालण्यास हरकत नाहीं. सर हेनरी क्रेक हे दुसरे एक म्हातारेबुवा आहेत. विषयाच्या माहितीइतकेंच यांचें प्रश्नचातुर्य आहे! पण त्यांनीं जे चार प्रश्न विचारले त्यांत त्यांचा झोंक मॉंटेग्यूसाहेबांच्या विरुद्ध दिसला! ड्यूक ऑफ नॉर्दबलॅंद हे पोरसवदा ड्यूक आहेत येवढें सांगितलें म्हणजे निराळें बोलावयास नको. साक्षीदारांस त्यांच्याकडून त्रास होण्याची भीति नको. लॉर्ड क्र्यू उलटतपासणीच्या वेळीं हजरच नव्हते. पण ते मॉंटेग्यूसाहेबांचे सहाय्यकर्ते आहेत. लॉर्ड मिडलटन हे विरुद्ध आहेत, पण त्यांनीं फारसे प्रश्न विचारले नाहींत, यावरून त्यांचा विरोध कामिटीचें काम संपण्यापूर्वीं वितळून जाण्याचा संभव आहे असें वाटतें.

लॉर्ड इसलिंगटन यांनीं द्विदळपद्धतीविरुद्ध कटाक्ष ठेऊन प्रश्न विचारले, त्यांना एकंदर विषयाची थोडीशी माहिती दिसते. लार्ड सिंह यांना उलटतपासणी हा तळहाताचा मळ आहे हें सांगावयास नको. त्यांनीं सुटसुटीत व मार्मिक प्रश्न विचारून कमिटींत आपलें तेज पाडलें. मॉंटेग्युसाहेबांचे वकील या नात्यानें त्यांनीं चांगली कामगिरी केली. त्यांच्या प्रश्नांचा सारा झोंक असा होता कीं, " बिलांतें संयुक्त योजनेपेक्षां थोडे कमी अधिकार देण्यास आम्हांस कारण होतें असें नाहीं, पण थोडेसें कमी

दिले गेले आहेत खरें; पण एवढयावर संतुष्ट रहावयाचें सोडून फिरून आणखी कमी करूं कां पाहतां ? बिनसरकारी लोक अधिक मागण्याचा आग्रह धरणार नाहींत हीच कृपा कां समजत नाहीं ? त्यांना बिल पसंत असलें तरी दिल्लीसरकारच्या पीछेहाटीच्या धोरणावर ते नाराज आहेत." मॉंटेग्युसाहेबांनीं मात्र सर्वांत अधीक कळकळीनें उलटतपासणी केली "चेल्म्सफर्डसाहेब व मी दोघांनीं मिळून जी सुधारणांची योजना तयार केली तत्पूर्वी स्थानिक सरकारचीं मतें घेतलीं होतीं व हिंदुस्थानसरकारच्या कार्यकारी मंडळीनें संयुक्त योजनेस संमति दिली होती; असें असतां स्थानिक सरकारांच्या मतांचें निमित्त करून व्हॉइसरायसाहेबांनीं माघार घ्यावी व माझे पाय तोडावे हा विश्वासघात आहे. कोणाच्या तरी चिथावणीमुळें हा मागून सुचलेला विचार आहे. खास संयुक्त योजनेवरील प्रतिकूळ टीकेमुळेंच जर मत बदलावें असें हिंदुस्थानसरकारास वाटलें म्हणावें तर बिनसरकारी टीकाकारांनीं या योजनेंत वरिष्ठ सरकारांस अधिकार नाहींत म्हणून जी टीका केली ती जमेस धरून मूळ योजनेपेक्षां अधिक देण्याची उदारपणाची बुद्धी त्यांना कां झाली नाहीं ? प्रतिकूळ टीका दोन विरुद्ध दिशांनीं झाल्या; मग त्यांतली कृपणपणाची टीका तेवढीच तुम्हांला आवडली याचा अर्थ उघड आहे !" अशा अर्थाच्या प्रश्नांनीं मॉंटेग्युसाहेबांनीं मेस्टनसाहेबांना झोडलें व त्यांना बरेंच वेळां निरुत्तर केलें. हिंदुस्थानसरकारचा विश्वासघात त्यांच्या मनाला बराच लागला असें दिसलें.

सर्वांच्या अखेरीस लॉर्ड सिडनहॅम यांनीं उलटतपासणी केली. त्यांनीं सुटसुटीत असे दहावीस प्रश्न खडाखड विचारले. पण मेस्टनसाहेबांनीं कांहींचीं उत्तरें त्यांच्याविरुद्ध दिलीं व कांहींसंबंधानें कानांवर हात ठेवले. सिडनहॅमसाहेबांचा व मॉंटेग्युसाहेबांचा उभा दावा दिसतो. मेस्टनसाहेबांच्या तपासणीच्या वेळीं मद्रासेहून येणाऱ्या ब्राह्मणेतर डेप्युटेशनच्या बाबतींत तर त्यांची सर्वांदेखत खडाजंगी उडाली. सिडनहॅम म्हणाले, "तुम्हीं परवां अमुक बोललां;" मॉंटेग्यु म्हणाले, "मी तसें बोललों नाहीं." अब्राह्मण लोक गरीब नसते तर त्यांनीं पैसे जमा करून आणखी डेप्युटेशनें पाठविलीं असतीं हें मेस्टनच्या तोंडून काढण्याचा सिडनहॅमसाहे-

बांचा इरादा होता हें त्यांचें आत्मगत भाषण समजून मेस्टन गप बसले, पण मॉंटेग्यु मध्यें पडून त्यांनीं मेस्टनसाहेबांकडून वदविलें कीं, " याबद्दल मला कांहीं माहिती नाहीं. मला काय विचारतां ? " सिडनॅहॅमसाहेबांनीं प्रथम अशा झोंकाचे प्रश्न विचारले कीं, प्रधान, कायदे कौन्सिलें व मतदार या सर्वांवर त्यांच्या स्वप्नींहि आली नसेल अशी जबाबदारी टाकली जात आहे, व ग्रॅंड कमिटी वगैरे संबंधानें तरी सरकारचें म्हणणेंच तडीस लागेल असा नियम नाहीं; पण थोडया वेळानें त्यांनीं उलट खाऊन प्रश्न केला कीं, समंजस हिंदी लोकांना तुम्हीं घालतां इतकीं बंधनें कशीं आवडतील ? तात्पर्य प्रगति करूं नका व बंधनेंहि घालूं नका असें म्हणण्याचा त्यांचा सर्व झोंक होता.

मंगळवारीं दोन प्रहरीं हिलसाहेबांची साक्ष झाली. त्यांनीं आपला लेखी जबाब वाचून दाखविल्यावर मॉंटेग्युसाहेबांच्या उलटतपासणींत सांगितलें कीं, स्थानिक सरकारचा सल्ला पूर्वीं घेऊनच मॉंटेग्यु चेम्सफर्ड योजना तयार करण्यांत आली होती. स्थानिक सरकारची योजना, दिल्ली सरकारची योजना व मॉं.चेम्सफर्ड योजना यांपैकीं तिसरीच लोकांनां सर्वांत अधीक पसंत पडेल. त्यांच्या साक्षींत इतर विशेष महत्वाचें कांहीं निघालें नाहीं.

काल बुधवारीं लॉर्ड साऊथबरो यांची साक्ष झाली. त्यांच्या सर्व जबानीचा मिळून झोंक हा होता कीं, " मतदारसंघ बनविले गेले ते प्रांतिक सरकारच्या संमतीनेंच नव्हे तर प्रायः त्यांच्या मूळ सूचनांप्रमाणें बनविले गेले. नाहीं म्हणावयास मद्राससरकारानें दुराग्रहानें प्रातिगतिक धोरण स्वीकारलें असून आपल्या इलाख्यांत हजार लोकसंख्येस एक मतदार यांहून अधिक मतदार मिळणार नाहींत असें प्रतिपादण्यास सुरवात केली होती. पण आम्ही समजूत घालून त्यांना उगीच थोडेसें वठणीवर आणलें. त्यांतच अब्राह्मणांच्या दुराग्रहाची तेथें भर पडली. ते आमच्या पुढें येऊन साक्ष देतचना ! शेवटीं आम्ही आमच्या न्यायबुद्धीस योग्य वाटल्या त्या सूचना करून मोकळे झालों.हिंदु मुसलमानांचा लखनौस करार झाला तो फारच फार महत्वाचा आहे. तो नसता झाला तर आम्हांस काय रिपोर्ट करावा हेंच कळलें नसतें. असें असतां हिंदुस्थानसरकारानें

बंगालच्या मुसलमानांची सबब सांगून खपली काढण्याचा प्रयत्न केलेला पाहून मला वाईट वाटलें. ब्राह्मणांविरुद्ध अब्राह्मण ही चळवळ मद्रास व क्वचित् मुंबई यांखेरीज बाहेर कोठेंहि नाहीं. वास्तविक अब्राह्मणांच्या बाजूस मतदारसंघांत प्रचंड बहुमत असतां फिरून आमच्या रक्षणाची कांहीं तजवीज करा असें ते म्हणतात तेव्हां त्यांचें रक्षण करावें तरी कोठ· वर व काय म्हणून ? ब्राह्मण लोक श्रीमंत नाहींत फक्त विद्वान व बुद्धि· मान आहेत. ब्राह्मणेतरांनीं ब्राह्मणांच्या नांवानें चळवळ न करतां सार्व-जनिक कामकाजांत व नवीन मतदारीचा उत्तम उपयोग करण्यांत यापुढें आपलें लक्ष घालावें हेंच बरें." लॉर्ड साऊथबरो यांची अपुरी तपासणी येत्या सोमवारीं संपेल.

परवां कमिटीच्या कामास सुरवात होण्यापूर्वीं लॉर्ड सेलबोर्न यांनीं डेप्युटेशनच्या लोकांस उद्देशून असें सांगितलें कीं, या कमिटीचें खरें स्वरूप लक्षांत न येऊन निरनिराळ्या डेप्युटेशनांनीं आपल्या लेखी टांच-णांत बिलाखेरीज अवांतर गोष्टी लिहिल्या आहेत, पण हा पुरावा जमेस धरण्यांत येणार नाहीं. कमिटी दहावीस नेमके प्रश्न काढणार असून त्याला दिलेलीं संक्षिप्त उत्तरें हाच पुरावा मानला जाऊन त्यांना धरूनच तोंडीं जबानी घेतली जाईल. शिवाय वेळ फार थोडा असल्यामुळे विशेष प्राति-निधिक स्वरूपाचे असे थोडकेसे साक्षीदार घेण्यांत येतील. हिंदुस्थानची सर्वसाधारण राजकीय स्थिति, हा कमिटीचा विषय नव्हे; इतकेंच नाहीं तर हिंदुस्थानास कोणती राजकीय घटना चांगली होईल हाहि कमिटीपुढें विषय नाहीं; तर साक्षीदारांनीं बिलांत सुधारणा काय कराव्या, हें प्रत्यक्ष शब्दांनीं सांगावें एवढीच आमची अपेक्षा आहे. कॉंग्रेसच्या डेप्युटेशनमा-र्फत सादर झालेल्या लेखी जबानींत सर्वसाधारण स्वरूपाची प्रस्तावना आहे खरी, तरी पण त्याशिवाय बिलांत कलमवार सुचविलेल्या दुरुस्त्या हा एक स्वतंत्र भाग आहे. त्यामुळें लार्ड सेलबोर्न यांच्या नियमाप्रमाणें ही जबानी टाकाऊ ठरणार नाहीं. तथापि, नावडतीचें मीठ अळणी हें आपण पाहतोंच ! थोड्या वेळाची सबब म्हणजे लोकमतदर्शक थोडे साक्षीदार घेण्याची प्रस्तावना हें उघड आहे. कोणाचे किती साक्षीदार घेणार हें बहुधा उद्यां कमिटीच्या सेक्रेटरीकडून आम्हांस कळेल. प्रथम

सरकारी साक्षीदार, मग बिनसरकारी साक्षीदार, मग मागसलेल्यांचे साक्षीदार व शेवटीं राष्ट्रीय सभा व होमरूल लीग अशी परंपरा लावली गेल्यास आश्चर्य वाटणार नाहीं. इकडे पाहावें तों वेळ थोडा म्हणून घाई, इकडे पहावें तों सर्वांना आपापलें म्हणणें सांगण्याची संधि देऊं हें आश्वासन, व इकडे पाहावें तों आमचे छापील जबाब कमिटीकडे पाठवून आठदहा दिवस झाल्यावर फिरून प्रश्नोत्तरांची तयारी, आणि कोणत्या डेप्युटेशनचे किती साक्षीदार घेणार याची माहितीहि देण्यांत येत नाहीं. याला काय म्हणावें ?

या आठवड्यापासून ‘ इंडिया ’ पत्र कॉंग्रेसच्या पक्षाचें झालें. आतां त्याच्याविषयीं पैशाची कायमची तरतूद व संपादकीय व्यवस्था लवकरच करावी लागेल. इंडियापत्राचा संपादक हिंदी असावा ही कल्पना जुनी, बऱ्याच दिवसांची आहे. यापुढें तरी ती कल्पना फलद्रूप होते कां पहावें. येथील ब्रिटिश कॉंग्रेसकामिटी नियमबद्ध नाहीं. हें मीं मागील पत्रांत लिहिलेंच होतें. ही गोष्ट खुद्द ब्रिटिश कमिटीच्या लक्षांत येऊन या आठवड्यांत तिची घटना कशी असावी याविषयीं डेप्युटेशनची पोटकमिटी व ब्रि. कॉं. कामिटीची पोटकामिटी यांनीं एकत्र बसून चर्चा केली असून, लवकरच हा विषय कामिटीपुढें मांडण्यांत येईल व तिच्या संमतीनें घटना कायम झाल्यास त्याप्रमाणें येत्या डिसेंबरांत राष्ट्रीय सभेपुढें ती घटना मंजूर करण्यास ठेवण्यांत येईल. ‘ इंडिया ’ पत्रासंबंधानें मि. पोलाक यांच्या खटपटीनें पुनः उलटें पालटें होतें कीं काय असें वाटत होतें, पण झालें हें अयोग्य झालें येवढें पत्राच्या रूपानें डायरेक्टरांपुढें मांडून ते स्वस्थ बसले असें वाटतें.

हिंदुस्थानांत ‘इंग्लिशमन’ पत्रानें टिळकांच्या प्रकृतीसंबंधानें निराधार विपरीत बातमी पसरून फारच गोंधळ उडवून दिला, असें दिसतें. वास्तविक टिळक हिंडते फिरते असतां व सभांस जात असतां येथील कोणा बातमीदारानें झालें तरी असली बातमी तिकडे कशी पाठवावी हें कळत नाहीं. टिळकांबरोबर डॉ. नायर यांच्या आजाराची जी बातमी त्याच बातमीदारानें पाठविली ती मात्र खरी होती. कारण डॉ. नायर काळजाच्या विकारानें बरेच आजारी होते व या आठवड्यांत ते वारलेहि. त्यांचा पर-

देशांत एकाएकीं असा अंत झाला हें शोचनीय होय. असो, पण टिळकांच्या बातमीसंबंधानें यत्किंचितहि आधार नव्हता. अर्थात् ता. २४ जूनच्या केसरींतील या विषयावरील स्फुट वाचून सर्व मंडळींनां खूप करमणूक झाली. टिळक हे कोणत्या 'ब्रॉडस्टेअर्स गांवीं मेंदूच्या विकारानें आजारी होते' याचा आम्ही कसून शोध चालविला आहे व शोध लागल्यास तुम्हांस कळवूं !

## पत्र नं. १०

### ( ता. ३० जुलै १९१९ )

सिलेक्ट कमिटीचें काम या आठवड्यांत साडेसात तास झालें. आतांपर्यंत कमिटीच्या जाहिर बैठका सहा झाल्या त्यांत सहा साक्षीदार तपासले गेले. पैकीं लॉर्ड साउथबरोसुद्धां तीन सरकारी व बिनसरकारी होते, सहा दिवसांपैकीं पहिले अडीच दिवस सर जेम्स मेस्टन यांनीं एकट्यांनीं घेतले सबंध दीड दिवस लॉर्ड साउथबरो यांनीं घेतला. उरल्या दीड दिवसांत तीन साक्षीदार लोकांतर्फेचे झाले. यावरून बिनअधिकाऱ्यांची बोळवण थोडक्यांत होत आहे असें दिसून येईल. हें झटपट निकालाचें प्रमाण दिवसानुदिवस वाढेल असा अदमास आहे. कोणत्याहि सभेचें काम प्रथम संथपणानें चालतें, मागाहून घाई सुरू होते; पहिल्या वक्त्यांनां भरपूर वेळ मिळतो, मागाहून येणारांना अध्यक्ष चिमटे घेतात. तसाच प्रकार याहि कमिटीचा चालला आहे.

दिसण्यांत थाट न्यायकोर्टाचा आहे. साक्षीदारांचा कोण मान ! त्याला येतांजातां आभारप्रदर्शनाचा आहेर ! शिवाय प्रत्येक सभासद आपले प्रश्न विचारून झाले म्हणजे आभार मानतो ते वेगळेच. लागू प्रश्न कोणता, गैरलागू कोणता, याची जाणीव आपणास आहे हें दाखविण्याची अध्यक्ष खबरदारी घेतात. अमुक प्रश्न मला विचारणें योग्य आहे काय ? तुम्ही भाग पाडाल तरच उत्तर देईल असें एकादा साक्षीदार अध्यक्षांना काकुळतीनें विचारतो. तेव्हां अध्यक्ष न्यायमूर्तीच्या आविर्भावानें मध्यें पडतात व स्वारी भरून खालच्या गड्याला माती चारणाऱ्या पैलवानाचा पंचांनीं निषेध करावा तसा करून साक्षीदाराचा बचाव करितात. प्रश्न न समजलासा

वाटला तर विशद करूं देण्याघेण्याला परवानगी देतात. कोणी साक्षीदार सरकारावर तुटून पडलासा वाटला तर अध्यक्ष सरकाराची बाजू संभाळ-ण्यास तत्पर असतात गुंतागुंतीचे प्रश्न विचारू देत नाहींत. तात्पर्य, सर्व बाजूंनीं न्यायकोर्टाचें काम चालू आहे असें भासतें. हें स्वरूप खरें असतें तर जें लोकांचें म्हणणें सरकारनें खोडून काढलें नाहीं तें सरकारच्या गळ्यांत बांधलें जाण्याची व्यवस्था झाली पाहिजे. पण तेवढें मात्र होण्याचा संभव नाहीं !

सर जेम्स मेस्टन दिसण्यांत धिमे आणि बुद्धीनें मोठे चलाख आहेत. प्रश्न संपण्याचा अवकाश कीं लगेच त्यांचें उत्तर ठेवलेलें व तेंहि समर्पक. मनांत लोकपक्षाबद्दल किती तरी अनादर पण बोलण्यांत एक शब्दहि वावगा नाहीं. हिंदुस्थानसरकारच्या तर्फेचे ते साक्षीदार, पण कांहीं बाबतींत त्यांनीं सरळ कबुल्या दिल्या व आपण आग्रही नाहीं असें भासविलें. मॉंटे-ग्युसाहेब हिंदुस्थानसरकारच्या योजनेला उद्देशून बोलावयाचें असतां 'तुमची योजना ' असे सर जेम्स मेस्टन यांना प्रायः म्हणत; व आपण भलत्याला भलतें म्हटलें अशी आठवण झाल्यासारखें दाखवून मुद्दाम चूक सुधारीत ! पण परस्परांच्या मनांत काय होतें हें परस्पर तेचसे काय पण लोकहि जाणत होते. सर क्लॉड हिल यांच्या साक्षींत मनोरंजक असा भाग फारसा नव्हता. एकंदरीनें पाहतां झालेल्या पुराव्यांवरून हिंदुस्थानसरका-रच्या विरुद्ध बाजू गेली व मॉंटेग्यूसाहेबांनीं कुस्ती जिंकली असें सर्व प्रेक्ष-कांचें मत झालें आहे. बिलापेक्षां आणखी कांहीं अधिक द्यावयाचें मनांत आल्यास मॉंटेग्यूसाहेबांचा मार्ग मोकळा झाला आहे. पण ते देण्याची बुद्धी त्यांना झाली तर मोकळ्या मार्गाचा उपयोग !

लॉर्ड साउथबरो यांची तपासणी पुष्कळच कसून झाली. त्यांनीं आपल्या रिपोर्टाच्या विषयाचा अभ्यास परीक्षेकरितां चांगलाच केला होता. प्रश्नाचें उत्तर देण्याला ते बराच वेळ घेत व उत्तर द्यावयाचें तेंहि शब्द घोळघो-ळून देत. पुष्कळ प्रेक्षकांना त्यांची साक्ष कंटाळवाणी वाटली. पण मॉंटे-ग्यूसाहेबांना ती फारच उपयुक्त अशी झाली. त्यांनीं हिंदुस्थानसरकारावर उघड उघड हत्यार उपसलें होतें एका अर्थानें तो हल्ला नसून त्यांचा स्वतः-चा बचावच होता कारण साउथबरो-कमिटीनें केलेल्या सर्व सूचना मत-

दारीचा किचकट प्रश्नांवर फिरून चौकशीचा घोळ घालण्याचा डाव हिंदुस्थानसरकारानें योजला असल्यामुळें त्यांना आपली सर्व मेहनत फुकट जाण्याची भीति वाटत होती. ब्राह्मण—ब्राह्मणेतर या प्रश्नांचा बहुतेक फडशा त्यांनीं आपल्या साक्षींत पाडला. स्त्रियांना मत देण्याच्या व इतर एक दोन प्रश्नांत त्यांनीं दिसण्यांत अनुदार मतवादित्व पत्करलें होतें; पण ना. शास्त्री व सुरेंद्रबाबू यांचा आपणास पाठिंबा होता असें सांगून ते मोकळे झाले.

बाबु सुरेंद्रनाथ यांची साक्ष डळमळीत झाली. ते मॉडरेट पक्षाचे अध्वर्यु स्वतः लंडनास आलेले म्हणून त्यांच्या मंडळीचा नाइलाज झाला; नाहीं तर त्यांना बाजूला बसवून तरुण योद्ध्यांना पुढें ढकलावें असेंच त्यांच्याहि लोकांना वाटत होतें असें म्हणतात. नेमस्त पक्षाचे चार पुढारी साक्षीदार होण्यास लायक, एवढेंच नव्हे, पण साक्ष द्यायला उत्सुक. हे चार म्हणजे सुरेंद्र, शास्त्री, समर्थ व चिंतामणी; व मॅाँटेग्यूसाहेबांना पूर्ण अखत्यारी असती तर या चारहि स्नेह्यांच्या साक्षी घेण्याची त्यांनीं तजवीज केली असती पण नेस्मतांप्रमाणें इतर आणखी बरींच डेप्युटेशनें आलीं असून प्रत्येकांत अनेक सभासद; आणि कमिटीच्या मनांतून ओढा कोणीकडेहि असला तरी जनाच्या दृष्टीनें एक नियम सर्वांस सारखा लागू करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. तेव्हां नेमस्तांतर्फे असा एकच साक्षीदार घ्यावा लागला व तोहि वरील कारणाकरितां सुरेंद्रबाबू पण माझी अशी पक्की खातरी आहे कीं उपरिनिर्दिष्ट तिघांचाहि अखेर कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें समावेश करण्यांत येईल !

मि. बेन स्पूर यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना सुरेंद्रबाबू म्हणाले, "आमच्या नेमस्त संस्था पुष्कळ असून वाटेल त्याला त्यांचें सभासद होता येतें." मॉडरेट कॉन्फरन्ससंबंधीं मात्र त्यांनीं तें विधान केलें नाहीं. "तुमच्या बाजूला आज किती लोक आहेत" या प्रश्नास त्यांनीं "आजहि बरेचसे लोक आमच्या पक्षास आहेत-पण पुढें पुष्कळच येऊन मिळणार; बंगाल्यांतील बहुतेक विचारी लोक आमच्या मताचे मॉडरेट आहेत" असें उत्तर दिलें. "तुमच्या आणि राष्ट्रीय सभेच्या मनांत खरा फरक काय आहे ?" या प्रश्नास त्यांनीं उत्तर दिलें कीं "तपशीलांत फारसा फरक

नाहीं, पण दृष्टींत फरक आहे. आम्हाला ही योजना प्रथमपासून मान्य होती व राष्ट्रीय सभेची सूत्रें आपल्या हातीं यावी अशी इच्छा ज्यांना झाली त्यांनीं या योजनेचा प्रथमपासून धिःकार चालविला, व आतां ते हळूहळू आमच्या मताला येऊन मिळत आहेत." हा टोला त्यांतल्या त्यांत बेझंट-बाईंवर विशेष होता. तें लक्षांत घेऊन स्पूरसाहेब म्हणाले, "नेमस्त व राष्ट्रीय यापैकीं कोण कोणाकडे अधिक झुकत आहे हें ठरविणें कठीण दिसतें" या टीकेचा रोख सुरेंद्रबाबूंविरुद्ध होता. तरी पण ते म्हणाले "छेः, छेः, आम्ही त्यांच्याकडे ओढले जात नसून तेच आमच्याकडे ओढले जात आहेत." पण बिलाबद्दल तुमचें काय म्हणणें आहे असें विचारतां त्यांनीं आपलें खरें स्वरूप प्रगट केलें, ते म्हणाले "आम्हाला हिंदुस्थान-सरकारच्या कारभारांत थोडीशी सत्ता मिळाली तर हवी आहे खरी, पण मॉ—चे—योजनेप्रमाणें सुधारणा झाल्या आणि मग ही सत्ता आम्हालां न मिळाली तरी चालेल; आम्ही खूष आहों."

बेझंटबाईंची साक्ष मनोरंजक झाली. या वयांत ही बाई इतक्या परिश्रम-पूर्वक कमिटीपुढें येण्याचा उद्योग करिते व हिंदुस्थान आपला देश अशा भाव-नेनें साक्ष देते हें पाहून कौतुकच नव्हे पण आदरहि वाटला. बेझंटबाईंची येथें झालेलीं बहुतेक भाषणें चांगलीं सणसणीत असून त्यांत आक्षेप घेण्या-सारखें फारसें कांहीं नव्हतें. हिंदुस्थानांतील भांडणें त्या येथें फारशीं पुढें आणींत नाहींत. त्यांच्या जुन्या ओळखीचा फायदा या दृष्टीनें हिंदुस्था-नाला हल्लीं बराच होत आहे. पण कारण नसतांहि पक्षपात दाखविण्याची त्यांची हातोटी अप्रतिम आहे. वास्तविक नेमस्त लोक बाईंना थारा देत नाहींत हें प्रसिद्ध आहे पण आपण व नेमस्त पक्ष एक आहों असें भास-विण्याकरितां असंबद्धता दूरान्वय वगैरे दोष त्या पत्करतात. ना. शास्त्री व ना. गोखले यांचा एखाद्या ठिकाणीं तरी उगीच आधार दाखविल्या-शिवाय त्यांचें एकहि व्याख्यान फुकट जात नाहीं. गरीब लोक आम्ही अमक्या अमक्याचे अमुक अमुक असें श्रीमंताशीं नातें जोडण्याकरितां सांगत असतात त्यांतलाच हा प्रकार आहे. त्यांनीं आपल्या साक्षींतहि कारण नसतां वरचेवर सुरेंद्रनाथ यांच्यासारखींच माझीं मतें आहेत" असें अनेक वेळां बोलून दाखविलें, पण ही गोष्ट विलक्षण वाटूं नये म्हणून

कांग्रेसचेंहि नांव एक वेळां घेतलें. वास्तविक नांव घेण्यांत एरवीं कांहीं फारसें नाहीं. पण त्यानें मनाची दिशा दिसते !

कॅप्टन ऑर्मसबी गोर यांनीं त्यांना शेवटीं एक प्रश्न सहज म्हणून टाकला. ते म्हणाले " तुमच्या मागें कितीसे लोक आहेत ? तुमची होमरूल लीग ही कोणती ? " या प्रश्नास बाईनीं उत्तर दिलें तें असें— " टिळकांचा स्वराज्यसंघ व माझा संघ मूळगसूनच वेगवेगळे होते. कारण आमचा व्यक्तिशः द्वेष करणारांचा निरनिराळ्या संघांत समावेश करितां यावा. मी हिंदी लोकांची स्थिति सुधारण्याची खटपट अनेक बाजूंनीं करिते. इतर लोक ही गोष्ट माझ्याइतकी करीत नाहींत म्हणून व्यक्तिशः मला अनुसरणारे फार व म्हणून माझ्या चळवळींत माझें व्यक्तित्व दिसून येतें. मद्रास—संघाची मीं संस्थापक; पण गांधीच्या चळवळीमुळें मीं अप्रिय झाले; मुंबईच्या रंगेल संघवाल्यांनीं मला शिष्टमंडळांत न घाडण्याचें ठरविलें व मला तर यावयाचें होतें म्हणून त्याकरितां मीं माझा नवा संघ निर्माण केला. " या उत्तरांतील गुणदोष बाईच्या इतर बऱ्याच प्रश्नांस लागू होते त्यांचा दोष असा कीं, उत्तरें प्रश्नांच्या मानानें बेसुमार पाल्हाळिक अशीं दिसत. पण गुण हा कीं, बाईना थोडेच प्रश्न विचारावयाचे असा सभासदांचा जो कट होतासा दिसला त्याचा मोड बाईनीं या पाल्हाळिक उत्तरांनींच केला. प्रश्न विचारणाराचें काम संपलें असलें तरी बाईचें काम शिल्लकच असे. प्रश्नांची सबब पुढें करून त्या सरकारावर जी टीका सुरू करीत ती आतां संपणार तरी केव्हां असें सभासदांस होऊन ते चुळबूळ करावयास लागत. पण बाईमाणूस इंग्लंडांत विजयी असतें. तें बोलत असतां त्याला थांबविणें हा सामाजिक गुन्हा आहेना ! बाईहि मनांत म्हणाल्या, ' तुम्हीं विचारीत नाहीं कां ? नका विचारूं तरीहि मीं सांगतें घ्या ! व असे करून त्यांनीं सरकारी धोरणाविरुद्ध टीकेचें भेंडोळेच्या भेंडोळें आपल्या तरळ जिव्हेनें अनेक वेळां लघुलेखकांच्या चोपडींत घुसडून दिलें.

रामस्वामी अय्यर यांची साक्ष चांगली झाली, त्यांची तडातड बोलण्याची हातोटी, मुद्याला न सोडण्याचें वकीली धोरण, मर्म समजून घाव घालण्याची तत्परता, विचारांचा विशदपणा, विषयाचा अभ्यास, निर्भीड व

निर्भयपणाची स्पष्टोक्ति याचा परिणाम कमिटीच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नसेल. ब्राह्मण– ब्राह्मणेतर या मुद्यावर त्यांनीं अशी खरपूस साक्ष दिली कीं लॉर्ड सिडनहॅम यांनीं त्या मुद्यावर एकहि प्रश्न विचारण्याचें धाडस केलें नाहीं. "देशी संस्थानांत अशा सुधारणा घडून कां येत नाहींत" असा अडचणीचा प्रश्न करण्यांत आला असतां 'ब्रिटिश सरकारचें धोरणहि त्याबद्दल अंशतः जबाबदार आहे' हें खरें उत्तर त्यांनीं ठांसून दिलें. लगेच मॉंटेग्युसाहेब व चेअरमन यांच्यांत खलबत होऊन "हें मत निराधार आहे व असलें हें मत निषेधाशिवाय हिंदी राजेरजवाड्यांच्या कानांवर जाणें योग्य नाहीं" असें त्यांना जाहीर रीतीनें सांगण्यांत आलें. "युद्ध सुरू झाल्यावर वादग्रस्त प्रश्न काढावयाचे नाहींत असें असतां तुम्ही स्वराज्यसंघ काढलांत ना?" या लार्ड सिडेनहॅमी प्रश्नास "आपला उपदेश सरकारानें स्वतः तरी कुठें पाळला?" असा त्यांनीं जबाब दिला. 'हिंदुस्थानसरकारच्या कारभारांत तुम्हाला थोडासा सत्तांश तरी कां हवा?' असा प्रश्न त्यांना एकानें केला असतां सुरेंद्रबाबूप्रमाणें मिळमिळीत उत्तर न देतां ते म्हणाले "एरवीं २० आगष्टचा जाहीरनामा सार्थच होत नाहीं." हें उत्तर नुसतें वकीली बाण्याच्या दृष्टीनें उत्तम आहे इतकेंच नव्हे तर सर्वस्वी खरें आहे. प्रांतिक सरकारासंबंधानें जाहीरनाम्यांत एक अक्षरहि नाहीं. सरसकट हिंदुस्थानच्या राज्याधिकाराचा असला एकच त्यांत उल्लेख आहे 'प्रांतापुरतें काय ते बोला' ही भाषा पुढें 'मल्लीनाथी' टीकेंत सुरू झाली!

राष्ट्रीय सभेच्या डेप्युटेशनतर्फे साक्षीदार बहुधा पुढील आठवड्यांत घेतला जाईल असें वाटतें. राष्ट्रीय सभेतर्फे कमींत कमी दोन साक्षीदार तरी घेतले जावे असें कमिटीस लिहिण्यांत आलें आहे त्याचें काय होतें पहावें. तसें झाल्यास ना. पटेल, व दिवाण माधवराव हे साक्ष देतील असा अदमास आहे. कमिटीच्या प्रश्नांचीं उत्तरें व तत्पूर्वी सविस्तर खलिता पाठविण्यांत आलाच आहे नेमस्तांप्रमाणें कमिटीहि राष्ट्रीय सभेवर नाराजच दिसते. अधिक द्या म्हणणारा पापी हें ठरलेलेंच आहे. असो. राष्ट्रीय सभेला जो नियम लावावयाचा तोच इतरांनाहि लावला पाहिजे ही एक प्रकारची अडचण होऊन राहिली आहे. तथापि तींतून कमिटीस मार्ग

सुचणार नाहीं असेंच कांहीं म्हणवत नाहीं. कारण मी तर असें ऐकतों कीं 'प्रातिनिधिक नसले तरी स्वतंत्र विचाराचे व अनुभवशीर' असें एक नवीन सदर निर्माण करून त्यांत राष्ट्रीय सभेखेरीज इतर शिष्टमंडळांतील कांहीं सभासद ढकलून त्यांस शेवटीं साक्षीला बोलवावयाचें आहे. पहावें काय होते तें.

राष्ट्रीय सभेच्या डेप्युटेशनचें काम इतर रीतीनें बरें चाललें आहे. बिनसरकारी सभासद गांठून त्यांस या प्रश्नाची हौस उत्पन्न करण्याचें मुख्य काम सुरू आहे. गेल्या मंगळवारीं सायंकाळीं पार्लमेंटांतील 'कमिटी रूम नं. ७' मध्यें सभा भरविण्यांत आली होती. मि. थॉर्न व मि. ओग्रेडी या पार्लमेंटरी सभासदांनीं आपल्या सहीनें निमंत्रणपत्रिका काढली होती. सभेस मजूरपक्षाचे पण सरकारच्या ऋणानुबंधाचे सभासद व अन्नखात्याचे एक माजी उपप्रधान मि. क्लाइन्स, तसेंच मि. जॅक जोन्स व इतर कांहीं लोक आले होते. आणखी कांहीं प्रमुख सभासद यावयाचे होते. पण याच वेळीं खालीं हाऊस ऑफ कॉमन्समध्यें रशियाचे प्रश्नांवर कडाक्याचा वाद सुरू असल्यामुळें त्यांना येतां आलें नाहीं. अध्यक्षस्थानीं मि. हिंडमन हे होते. प्रथम टिळकांनीं बिलाचा विषय व हिंदुस्थानची परिस्थिति समजावून सांगितल्यावर क्लाइन्स, जोन्स, डॉ. क्लार्क, पटेल, खापर्डे, दिवाण माधवराव वगैरेंचीं लहान लहान भाषणें झालीं. आम्हास हिंदुस्थानच्या स्थितीविषयीं ज्ञान नाहीं, पण समजून घेण्याची आमची उत्कृष्ट इच्छा आहे, व बिल पुढें येईल तेव्हां होईल ती मदत आम्हीं करूं अशा अर्थाचे उद्गार मि. क्लाइन्स यांनीं काढले. पार्लमेंटच्या सभागृहांत आणखीहि कांहीं सभा व भोजनाचे प्रसंग घडवून आणण्याचा विचार आहे. ब्रिटिश कॉंग्रेसकमिटीतर्फे मि. बर्नार्ड हाउटन स्वतः, मि. हिंडमन, मि. रामसे मॅकडोनाल्ड या गृहस्थांनीं कमिटीपुढें साक्षी देण्यास जावें अशाविषयीं खटपट चालू आहे. साध्य होईल तें खरें. ब्रिटिश कॉंग्रेसकमिटीची घटना बहुधा मुक्रर झाली असून 'इंडिया' पत्राची कायम व्यवस्था काय असावी याची वाटाघाट सुरू आहे. अर्थात् यंदाच्या राष्ट्रीय सभेपुढें सर्व प्रश्न ठेवून तिची संमति मिळाल्यावरच कोणत्याहि व्यवस्थेस कायमपणा येणार, पण सर्वसंमत अशी व्यवस्था होण्याचा बराच संभव आहे.

हिंदी स्वराज्यसंघातर्फे साक्ष द्यावयाची ती टिळक देणार असून कमिटीच्या प्रश्नांचीं उत्तरें त्यांनीं कमिटीकडे रवाना केलीं आहेत. त्यांची साक्ष बहुधा येत्या आठवड्यांत होईल. परवां सायंकाळीं टिळकांना मॉंटेग्यू-साहेबांना इंडियाऑफिसमध्यें भेटण्यास बोलाविलें होतें. उभयतांचें संभाषण अर्धा तास झालें. त्यांत पंजाबांतील स्थिति, सुधारणांचें बिल, राष्ट्रीय सभेच्या मागण्या वगैरे विषय आले होते. अर्थात् कोण काय बोलले याची माहिती नाहीं; तथापि पंजाबसंबंधानें पुढील आठवड्यापर्यंत कांहीं तरी निश्चित सरकारी धोरण ठरून जाहीर होईल असा अदमास आहे, आणि पुढील आठवड्यांत मॉंटेग्यूसाहेबांशीं टिळकांची फिरून एक वेळ गांठ पडेल असेंहि वाटतें.

## पत्र नं. ११

### ( ता. ७ आगष्ट १९१९ )

चालू आठवड्यांत आम्ही जुनें घर सोडून दुसऱ्या एका बिऱ्हाडीं राहावयास आलों आहों. आमचा नवा पत्ता " नं. ६० टालबटरोड बेजवॉटर डब्ल्यू २ " असा आहे.

या आठवड्यांत सिलेक्ट कमिटीचें काम मंगळवारीं व बुधवारीं मिळून अवघे सहा तास झालें. तेवढ्यांत सुमारें पांच साक्षीदार संपावेण्यांत आले. ताज्या दमांत सरकारतर्फेच्या साक्षीदारांवर पुष्कळसा वेळ घालवून आतां लोकपक्षाच्या साक्षीचें काम कमिटी चटश्राद्धाप्रमाणें तडकाफडकीं उरकून घेत आहे ! प्रथम ना. पटेल यांची साक्ष सुमारें तीन तास झाली. पैकीं दीड तास त्यांनीं स्वतःच्या भाषणासच घेतला. राष्ट्रीय सभेनें कमिटीच्या प्रश्नांस उत्तरें पाठविलीं होतीं. त्यापूर्वीं एक सविस्तर समर्पक मेमोरँडमहि पाठविण्यांत आलें होतें; तथापि प्रश्नोत्तरांशिवाय साक्षीदारास आणखी कांहीं सांगावयाचे आहे काय असा सवाल, अध्यक्षांनीं करण्याचा प्रघात घातल्यामुळें फिरून कांहीं गोष्टी सांगाव्या लागतात. त्याचा फायदा घेऊन पटेल यांनीं अनेक हकीकती सांगितल्या व बिलावर टीका केली. आधीं राष्ट्रीय सभा नावडती, त्यांतून पटेल हे स्वभावतःच थोडे " भांडल्यासारखें "

बोलतात. त्यांतूनहि राष्ट्रीय सभेचें म्हणणें जोरानें मांडलें जावें, त्यांत कसूर होऊं नये, अशा बुद्धीनें ते ठांसून बोलले त्यांतच त्यांनीं इतर होमरूल लीग, मॉडरेट कॉन्फरन्स वगैरेंचा उल्लेख केला. यामुळें कमिटीच्या खोलींत थोडासा मिरच्यांची पूड उधळल्यासारखा प्रकार झाला. शिंक कोणासच आली नाहीं; पण बऱ्याच लोकांना ठसका लागला. पटेल यांनीं वास्तविक खऱ्या त्याच गोष्टी सांगितल्या. प्रांतिक स्वराज्याच्या मागणीचा इतिहास कसा घडला, असुक वर्षांत स्वराज्य पूर्णपणें मिळावें अशी मर्यादा मूळ कोणी सुचविली, तिचें समर्थन आपल्या भाषणांत कोणी कसें केलें, मॉंटेग्यूसाहेबाचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यापासून दुही कोणत्या धोरणावर झाली, मुंबईच्या जादा राष्ट्रीय सभेपुढें दिल्लीची सभा फक्त कोणत्या बाबतींत कोणत्या कारणानें गेली हेंच त्यांनीं सांगितलें. व तेंहि सांगण्याचें कारण इतकेंच कीं, पुढें जाणें ही चूक व मागें राहणें हाच खरा शहाणपणा, असा आक्षेप राष्ट्रीय सभेवर असल्याचें प्रसिद्धच होतें म्हणून खरा प्रकार कमिटीस समजून सांगणें जरूर होतें. आतां याच गोष्टी उलट साक्षींत सवालास जबाब, अशा रीतीनें आल्या असत्या तर पटेल यांचें काम अधिक सोपें व कमी अप्रिय झालें असतें. पण राष्ट्रीयपक्षाच्या साक्षीदारांस फारसे प्रश्न विचारण्याचा मान द्यावयाचा नाहीं असा बऱ्याच सभासदांचा बेत असल्याची गुणगुण कानीं आली होती. यामुळें पटेल यांना प्रश्नांची वाट पाहणें सुरक्षित वाटलें नाहीं. पटेल यांच्या साक्षीचा सारांश 'इंडिया'-पत्रांत आला आहे आणि मेमोरँडम व प्रश्नोत्तरें हींहि प्रसिद्ध झालीं आहेत. त्यावरून राष्ट्रीय सभेची मागणी डेप्युटेशननें ना. पटेल यांच्या द्वारें किती पद्धतशीर व समर्पक रीतीनें कमिटीपुढें मांडली हें केसरीच्या वाचकांच्या लक्षांत येईलच. मला इतकेंच सांगणें जरूर वाटतें कीं, या मागणीला कमिटी मान्यता देवो अगर न देवो, राष्ट्रीय सभेचें म्हणणें जसेंच्या तसें, रतिभर कसूर न होतां, कमिटीच्या सभासदांना कळविण्यांत आलें, येवढें समाधान मानण्यास भरपूर जागा आहे.

त्यानंतर दिवाण माधवराव यांची साक्ष घेण्यांत आली. त्यांनीं आपलें म्हणणें कमिटीस वाचून दाखविलें. त्यांत मुख्य विषय प्रांतिक स्वराज्याचा होता. प्रांतिक स्वराज्य चालविण्याची पात्रता म्हैसूर, बडोदें या संस्थानांच्या

कारभारांवरून सिद्ध होणारी आहे. संस्थानांतून ‘जबाबदारीचें स्वराज्यच’ नसलें तरी थोडेंबहुत प्रमाणावर तें तेथें असतें. कारण कारभार करणारे लोक तद्देशीय असल्यामुळें त्यांना प्रजाजनांच्या गरजा चांगल्या कळतात, ब्रिटिश मुलखांत तसें होत नाहीं. कारण कारभारी परकीय असतात; तथापि देशी संस्थानांतूनहि जबाबदारीचें स्वराज्य असणें इष्ट आहे, व त्याची थोडीबहुत पूर्वतयारी कित्येक संस्थानांतून होऊन राहिलेली आहे. संस्थानांतून ब्राह्मण-ब्राह्मणेतर किंवा हिंदुमुसलमान असले तंट्याचे प्रश्न ब्रिटिश मुलखापेक्षां कमी उपस्थित होतात. सिव्हिल सर्व्हंट लोकांचें कर्तव्य संपलें, त्यांनीं आतां हिंदी लोकांच्या हातीं कारभार दिला पाहिजे, हिंदी लोक स्वराज्यास पूर्णपणें पात्र आहेत, संस्थानांत सुधारणा सिव्हिल सर्व्हंटांशिवायहि होतात, जातीजातींतील द्वेषाचा बाऊ हेच लोक विशेष करतात, इत्यादि विषय त्यांच्या साक्षींत मुख्यत: होते.

दिवाणसाहेबांचा पोक्त देखावा, संथपणा, त्यांच्या वाचनाचा भारदस्तपणा व विषयाचें महत्व यांच्या योगानें ऐकणारावर ग्रह चांगला झाला. सिव्हिल सर्व्हंट लोकांवरील त्यांची टीका ऐकत असतां कमिटीच्या अनेक सभासदांना कानांत तापलेलें तेल ओतल्यासारखें दु:ख झाल्याचें त्यांच्या चेहऱ्यांवरून दिसत होतें. त्याचा वचपा त्यांनीं दुसरे दिवशीं दिवाणसाहेबांच्या उलटतपासणींत काढला. बहुतेक सभासदांनीं त्यांच्यावर तरवार उपसली होती. अध्यक्षांनीं त्यांना वारंवार बजावलें कीं, तुम्हीं सांगतां, हें तुमचें व्यक्तिश: मत आहे व तें आम्हांस मान्य नाहीं हें तुम्हास आतांच स्पष्ट सांगणें जरूर आहे. सर हेनरी क्रेक यांनीं तर त्यांचा फक्त हुंकारयुक्त धि:क्कार करून एकदोन प्रश्नानंतर या साक्षीदारांस मी अधिक कांहीं विचारूं इच्छित नाहीं असें साफ सांगितलें. दुसऱ्या एकदोघांनीं त्यांना फार छेडून सिव्हिल सर्व्हंट लोकांबद्दल तुम्ही असे बेअब्रूकारक उद्गार कसे काढले ? अजून तरी त्यांत कांहीं फिरवाफिरवीचे शब्द घाला, तुम्हाला संधि देतों असें रागरागावून आग्रहानें सांगितलें. तेव्हां ते म्हणाले, “ मी म्हटलें तें सामान्यत: खरें आहे, व सिव्हिल सर्व्हंट लोकांबद्दल माझा आदर आहे, पण सुधारणांचा हा वाद उपस्थित झाल्यापासून कांहीं न देण्याच्या बुद्धीनें त्यांनीं इकडील लोकांस गैरवाका समजावून देण्याचा प्रयत्न चाल-



लो० बा० गं० टिळक,
[ होमरूल लीगच्या शिष्टमंडळाचे अध्यक्ष ]

विला आहे एवढ्यापुरताच माझा निषेध आहे, त्यांचा अपमान करण्याची माझी बुद्धि नाहीं, व तसा माझ्या शब्दांचा अर्थ होत असेल, तर मला त्याबद्दल दिलगिरी वाटते." लॉर्ड सिडनहॅम यांनीं म्हैसुरांतील प्रेस-ॲक्टासंबंधीं कांहीं प्रश्न त्यांना विचारले, तेव्हां स्वतःपुरती हकीकत सांगून महाराजासंबंधाची हकीकत मी जाहीर रीतीनें सांगूं इच्छित नाहीं, असें त्यांनीं कमिटीस सांगितलें.

ह्यानंतर लो. टिळक यांची साक्ष झाली. यासंबंधानें थोडी प्रास्ताविक हकीकत सांगणें जरूर आहे. स्वराज्यसंघातर्फे साक्षी देण्यास राष्ट्रीय सभेच्या डेप्युटेशनप्रमाणें संघाचेहि सर्व सभासद म्हणजे टिळक, खापर्डे व केळकर तिघेहि तयार आहेत, तिघांच्याहि साक्षी घेण्यांत याव्या व तिघांच्या नांवें कमिटीचे प्रश्न पाठविण्यांत यावे असें कमिटीच्या चिटणिसांस कळविण्यांत आलें होतें. पण दर डेप्युटेशनागणिक होतां होईतों एकच साक्षीदार घ्यावयाचा असें कमिटीनें ठरविलें आहे, सबब एकाच गृहस्थाचें नांव द्या, असें उलट लिहून आल्यावरून अर्थात् टिळक हेच संघाचे एक साक्षीदार असें चिटणिसांस लिहून गेलें. तेव्हां टिळकांची साक्ष घ्यावयाची कीं नाहीं हा प्रश्न कमिटीपुढें अध्यक्षांनीं मांडला. कमिटींतला वादविवाद अर्थात् गुप्त होता; पण अशाहि गुप्त खलबतांचे अनुकरणात्मक ध्वनि भिंतींतून बाहेर पडत असतात. त्यांवरून असें समजतें कीं, टिळकांची साक्षच घेऊं नये असें म्हणणारें बहुमत कमिटींत होतें, तथापि ती कां घेऊं नये या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मात्र या बहुमतवाल्यांस सुचेना! तेव्हां नाइलाज म्हणून टिळकांची साक्ष घेण्याचें ठरून टिळकांकडे प्रश्नांची यादी पाठविण्यांत आली; व त्या प्रश्नांचीं उत्तरें टिळकांनीं लिहून पाठविलीं, त्यावरून टिळकांना काल बुधवारीं सकाळीं साक्षीस बोलाविलें. रीतीप्रमाणें अध्यक्षांनीं टिळकांना प्रश्नोत्तरांखेरीज तुम्हांला आणखी कांहीं सांगावयाचें असल्यास सांगा, असें विचारल्यावरून त्यांनीं सुमारें दहा मुख्य मुद्यांवर सुसंगत, सुव्यवस्थितपणें, अवांतर किंवा अधिक उणा एकहि शब्द न बोलतां राष्ट्रीय सभेची स्वराज्ययोजना कमिटीस सांगितली. प्रश्नोत्तरांचें टिपण जें त्यांनीं प्रथम पाठविलें होतें त्याला धरून पण त्याची सूत्ररूपानें एकवाक्यता करून टिळकांनीं कमिटीपुढें आपला खुलासा

मांडला व तो सर्वांस फारच पसंत पडला. यानंतर मधली सुट्टी झाली व फिरून कमिटी भरल्यावर टिळकांची उलटतपासणी पहावयास सांपडेल अशी लोक उत्सुकतेनें वाट पहात होते. पण कमिटीच्या पोटांतलें पाप या वेळीं बाहेर आले. तिनें टिळकांस साक्षीस बोलवावयाचें, पण एकहि प्रश्न विचारावयाचा नाहीं असा आपणांत निश्चय केलेला असल्यामुळें त्यांची साक्ष उलटतपासणीशिवायच संपली. लॉर्ड सिडनहॅमसाहेब तर आधींच उठून गेले होते !

टिळकांना उलट तपासणींत एकहि प्रश्न विचारावयाचा नाहीं याचा अर्थ त्यांच्यावर कमिटीची इतराजी हाच होय हें उघड आहे व ही इतराजी कां तर ती टिळकांच्या राजकीय मतांकरितां, किंवा सरकारचा व त्यांचा जो अपूर्व ऋणानुबंध आहे त्याकरितां हेंहि उघड आहे. पण ही गोष्ट घेऊन चाललें, तरी त्यांना प्रश्न न विचारण्याचा जो पोरकटपणा कमिटीनें केला त्याचें मात्र पुष्कळांना हंसू आलें. कमिटीचा टिळकांवर राग होता तर तिनें टिळकांना साक्षीसच बोलवावयाचें नव्हतें. तसें करण्यास त्यांना भाग पाडण्यास होमरूल लीगला साधन काय होतें ? हा केवळ खुषीचा सौदा आहे. " टिळकांना नाकारतां त्याअर्थी आम्ही आमच्या वतीनें दुसरा कोणीच साक्षीदार पाठवीत नाहीं " असें फार तर लीगनें उत्तर दिलें असतें, व जगानें झाली ही गोष्ट बरी अगर वाईट याचा न्याय आपल्या ठिकाणीं केला असता. पण तसें करण्याची कमिटीची छाती झाली नाहीं. बरें, भलेपणा घेण्याकरितां किंवा सरळ सार्वजनिक बुद्धीनें जर कमिटीनें त्यांना साक्षीला बोलावलें तर रीतीप्रमाणें इतर साक्षीदारांसारखे चार प्रश्न विचारावयास काय हरकत होती ? तसें केल्यानें कमिटीस बट्टा लागण्याचा संभव नव्हता. पण साक्षीस तर बोलावलें, त्यांना आपलें म्हणणें सर्व मांडूं दिलें, पण उलटसाक्षीपुरता त्यांच्याशीं अबोला धरला यांत कमिटीनें कोणतें तत्त्व किंवा कार्य साधलें हें कमिटीसच माहीत ! पण उलट प्रश्न न विचारले तरी होमरूल लीगचें काम झालें. अशा कमिट्या व त्यांपुढील साक्षी यांचा मुख्य उपयोग हाच असतो कीं ज्याला त्याला आपलें म्हणणें जाहीर रीतीनें मांडतां यावें; आणि टिळक, पटेल व माधवराव यांच्या साक्षी वाचल्या म्हणजे इंग्रज राष्ट्राचे

पुढारी, मुत्सद्यांतले मुरब्बी, अधिकाऱ्यांतले अग्रगण्य अशांच्या समोर तोंडावर लोकपक्षाचे खरे खरे विचार स्पष्ट निर्भीड भाषेंत मांडण्यांत आले यांत सर्व कार्यभाग आला. ज्यांना अधिकाऱ्यांचे स्नेह जोडण्याला किंवा आपापले खासगी कावे साधण्याला येथें यावयाचें असेल त्यांची गोष्ट अर्थात् निराळी.

पण आपला पक्षपातीपणा लोकांच्या लक्षांत येऊं नये अशा बुद्धीनेंच जणुं काय कमिटीनें उलटतपासणी न करण्याचा मान इतर एकदोघांसहि दिला. कारण टिळकांनंतर मिसेस नायडू यांची साक्ष झाली, व त्याच्यानंतर सर फ्रँक स्लाय यांची साक्ष झाली. त्या दोघांनाहि उलट सवाल विचारण्यांत आले नाहींत. मिसेस नायडू यांचा विषय स्त्रियांना मतदारीचा हक्क हा होता. या विषयावर कमिटीनें आपलें मत बहुधा आगाऊच बनविलें असून—म्हणजे स्त्रियांना मतदारीचा हक्क न देण्याचें ठरविलें असून—मिसेस नायडू यांची साक्ष केवळ औपचारिकरीत्या घेतली गेली. प्रारंभीं अध्यक्ष त्यांना विनोदानें म्हणाले 'आमच्या कामांत सगळा नीरसपणाच आजवर होता. तो आपल्या काव्यमय वाणीनें तुम्ही घालविणार आहां याबद्दल तुमचे आभार मानतों. नंतर मिसेस नायडू यांनीं सुमारें अर्धा तासपर्यंत अस्खलित व सुरस भाषण करून स्त्रियांच्या हक्कांचें समर्थन केलें. त्यांचें मुख्य म्हणणें असें होतें कीं, हिंदुस्थानांतील कांहीं भागांतून पडद्याची चाल असली तरी ज्या भागांत ती नाहीं त्या भागांतील स्त्रियांना मतदारीचा हक्क द्यावयास हरकत नाहीं; मतें नमूद करण्यास विशेष व्यवस्था हवी असली तरी ती ठिकाठिकाणचे स्थानिक अधिकारी करूं शकतील; सर्व कांहीं आम्हांलाच तेवढें करतां येतें अशी घमेंड इंग्रजांना आहे व ती घालविणें जरूर आहे, या दृष्टीनें पाहतां मिसेस नायडू यांची साक्ष फारच इष्ट होती. ही हिंदी स्त्री किती सुंदर बोलते, किती प्रगल्भपणानें आपले विचार मांडते हें पाहून कमिटीच्या सभासदांचा जातिविषयक गर्व बराचसा हटला असल्यास नवल नाहीं. माझ्या मतें मिसेस बेझंटइतक्या वक्तृत्वपूर्ण वाणीनें मिसेस नायडू यांनीं आपला विषय मांडला. हिंदी स्त्रियांच्या बुद्धिमत्तेचा हा मासला पाहून कमिटीला अर्थातच कौतुक वाटलें असलें पाहिजे. पण 'इंग्रज' हा प्राणी 'अधिकाराभ्यासजड' 'स्वातंत्र्यव्या-

वृत्तकौतूहल ' असा आहे. त्यांच्या मनाची आढी स्त्रियांच्या नाजूक युक्तिवादांनीं निघत नाहीं ! त्याच्या मेंदूचा वर्फ स्त्रियांच्या जिभलीच्या विजलीनेंहि वितळत नाहीं !

कमिटीच्या कामाशिवाय या आठवड्यांतील महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे मंगळवारीं हाउस ऑफ कॉमन्सच्या भोजनगृहांत मजूरपक्षाच्या अधिकाऱ्यांनीं कॉंग्रेसच्या शिष्टमंडळास दिलेली मेजवानी ही होय. या पक्षाचे पार्लमेंटांतील मुख्य चालक मि. टायसन विलसन यांच्या निमंत्रणावरून या भोजनास आठदहा हिंदी गृहस्थ व मजूरपक्षाचे सुमारें वीस पार्लमेंटरी सभासद आले होते, त्यांस राईट ऑनरेबल मि. ब्रेस, रा. ऑ. क्लाईन्स, मि. हार्टशॉर्न, मि. वॉल्श, मि. ॲडमसन, मि. जॅक जोन्स वगैरे प्रमुख होते. किंबहुना ' पार्लमेंटरी ' मजूरपक्षाचे सर्व मुख्य अधिकारी व वजनदार सभासद हजर होते म्हटलें तरी चालेल. जेवण दोन तास चालूं होतें. नंतर भाषणप्रसंग दोन तास झाला. जितक्या निरनिराळ्या रीतींनें हिंदुस्थानास स्वराज्य मिळविण्यास मदत करतां येणें शक्य आहे तितक्या रीतींनीं आम्ही ती करूं असें सर्वांनीं भाषणांत कबूल केलें. मजूरपक्षातर्फे हिंदुस्थानच्या स्थितीचें अवलोकन करण्यास त्या पक्षाचें एक डेप्युटेशन पाठविण्याचेंहि घाटत आहे. काय होईल पहावें. तात्पर्य, महर्षी दादाभाई यांनीं विलायतेंत जी कामगिरी केली तिच्याच अनुरोधानें पुढच्या पायरीचा पराक्रम होण्यास अनुकूल अशी संधि आज विलायतेंत आहे, तिचा काय फायदा होईल तो खरा.

## पत्र नं. १२

### ( ता. १४ आगष्ट १९१९ )

ऑगष्ट हा इंग्लंडचा सर्वांत उष्ण महिना. गेले आठ दिवस ऊन कडक पडतें. पारा ८२ ते ८५ आहे. खिडक्या उघड्या टाकून वारा घेणें, धोतर नेसून मलमलीचा सदरा घालून घरांत बसणें शक्य झालें आहे. सार्वजनिक जागांतून पंख्यांची हालचाल दृष्टीस पडते. उपहारगृहांतून

लोक 'आईस्क्रीम' मागून घेतांना आढळतात. कामकाजांत राबणार लोकहि इरप्रयत्नानें सुट्टी काढून दहापंधरा दिवसांकरितां समुद्रकांठीं किंवा डोंगराळ मुलखांत जाऊं लागले आहेत. त्यामुळें 'सनस्ट्रोक' होऊन लोक इस्पितळांतून जात आहेत. सर्व 'तमसा' नदीभर जलक्रीडा सुरू आहे.

गेल्या शुक्रवारीं कमिटी फिरून बसली होती. नेहमीं बुधवारापलीकडे बसत नाहीं, सर फ्रँक स्लाय यांची उलटतपासणी संपून मि. फीथॅम यांची उलटतपासणी झाली. या दोनहि साक्षी घेण्याचें फारसें कारण नव्हतें. सर फ्रँक स्लाय यांनीं एकंदरीनें मॅटेग्युसाहेबांची बाजू उचलून धरली, पण मॅटेग्युसाहेबांनीं विचारलेल्या प्रश्नांस उत्तर देतांना असें सांगितलें कीं, वरिष्ठ सरकारच्या कारभारांत हिंदी लोकांस जबाबदारी देण्याचें तूर्त कारण नाहीं. फीथॅमसाहेबांनीं त्याच मताचा अनुवाद केला. फीथॅमसाहेब अनेक वेळां आपल्या ज्ञानाचा हवाला देत ! पण हिंदुस्थानविषयक सुधारणांच्या कमिटीवर या दक्षिणआफ्रिकन पार्लमेंटच्या सभासदास नेमण्याचें काय कारण होतें ? हिंदुस्थानासंबंधाच्या प्रश्नांवर वाटेल तो परका मनुष्य मत देण्यास पात्र होतो, व स्वतः हिंदी लोकांचें मत मात्र अग्राह्य ठरतें हा कोठचा न्याय ? पण सत्तेच्या नांवाखालीं असले चमत्कार केले तरी राज्यकर्त्यांना विचारणार कोण ?

सोमवारच्या बैठकींत सकाळीं नेमस्त शिष्टमंडळातर्फे फिरून साक्षी घेण्यांत आल्या. नेमस्तांची कांहीं तरी सोय निघणार असें मी पूर्वी अंदाजलें होतें तसेंच झालें. प्रथम सुरेंद्र एकटे झालेच होते. दुसरी पाळी समर्थ, चिंतामणी, के. सी. रॉय व पी. सी. रॉय यांची होती. मात्र प्रत्येकाची वेगवेगळी साक्ष न घेतां या चौघांस एकत्र बसवून साक्ष घेण्यांत आली. या चक्रीपुराणांत समर्थ व चिंतामणी हे पुढारी असून रॉयद्वय हे अनुयायी होते. समर्थांनीं बराच वेळ घेतला, तेव्हां इतर मंडळी उतावळेपणानें घड्याळाकडे पाहूं लागलीं. समर्थांची साक्ष कशी झाली असेल याची कल्पना न सांगतांहि येईलच. 'राष्ट्रीय सभेचें पहिलें आर्टिकल हेंच आमचें ध्येय असून २० आगष्टच्या जाहिरनाम्यांत त्याचाच अनुवाद आहे. जाहिरनाम्यांतील सर्व बंधनें व अटी आम्हांस मान्य आहेत, नेमस्त लोक हेच देशांतले विचारवंत व 'शुद्धीवर असलेले' लोक होत; मॅटेग्यूचेम्सफर्ड-

योजना सर्वस्वी ठीक आहे, त्यांत कमी पडेल तर मात्र आम्ही योजना पत्करणार नाहीं; मॉ. चे. योजना मान्य आहे. तरी पण त्यांत न दिलेली अशी वरिष्ठ सरकारच्या कारभागांत आम्हाला थोडीशी जबाबदारी हवी; स्वतः मुंबईसरकारनें जमीनबाबीसुद्धां बहुतेक खातीं तोडून देण्याची शिफारस केली असतां फीर्थम–कमिटीनं त्यांतहि कृपणपणा केला; सर्व जमाखर्चावर कायदेकौंसिलाची सत्ता चालली पाहिजे, वरिष्ठ सरकारांत थोडीशी जबाबदारी न मिळेल तर लोक नाखुष होतील, चांगलीं माणसें वरच्या कायदेकौंसिलांत जाणार नाहींत, देशांत अशी भयंकर चळवळ होईल कीं कल्पना करवणार नाहीं व तीं पाहून सरकार थक्क होईल (There will be an agitation that will stagger imagination ). मी क्रयू कमिटीपुढें साक्ष दिली त्यांतील बऱ्याच सूचना कमिटीनें मान्य केल्या आहेत' वगैरे गोष्टी समर्थांनीं सांगितल्या. सरतपासणींत व उलट तपासणींत समर्थ बरेच वहावत जात; तेव्हां अध्यक्षांना 'शुद्धीवर असणाऱ्या' या साक्षीदारास शुद्धीवर आणून आतां पुरें करा असें अनेक वेळां सांगावें लागलें.

समर्थांचा आविर्भाव पाहून कमिटीच्या कांहीं सभासदांस आश्चर्य वाटलें असावेंसें दिसलें. उलटतपासणींत मि. बेनेट त्यांना म्हणाले, "समर्थ, तुम्ही तर आपले शब्द तोलून मापून बोलणारे म्हणवितां, मग जगाला थक्क करून टाकणाऱ्या चळवळीबद्दल शब्द तोंडांतून काढलेत ते जरा बेसुमार किंवा फाजीलच ( extravagant ) नव्हेत काय ?" पण समर्थ आपले शब्द मागें घेणारे नव्हत, ते म्हणाले, "ते शब्द मी जाणूनबुजूनच उच्चारले आहेत. रौलेट–आक्टाविषयीं झालेल्या चळवळीवरून सरकारानें बोध घ्यावा असें माझें म्हणणें आहे." पण या उत्तरानें कमिटीचें समाधान झालेलें दिसलें नाहीं. मॉ.–चे.–योजना जर समाधानकारक आहे, तर मग तींत मुद्दाम न दिलेला वरिष्ठ राज्यकारभारांतला अधिकार गाजवायला कां मागतां ? बरें, लगेच ती कांहीं आमची आग्रहाची मागणी नाहीं, त्याशिवाय ही योजना आम्हांस मान्य आहे असेंहि म्हणतां, आणि 'मग जगाला थक्क करून सोडणाऱ्या चळवळीचा धाक कां घालतां ? या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर कमिटीला त्यांच्या-

कडून मिळालें नाहीं. लॉर्ड सिंह यांनीं त्यांचें उत्तर सुधारून घेण्याचा प्रयत्न केला. वरिष्ठ सरकारांत अधिकार मिळाल्यास आधींच मान्य असणारी योजना अधिक मान्य होईल इतकेंचना तुमचें म्हणणें ? असा सूचक प्रश्न त्यांनीं समर्थांस विचारला. पण वकील हा अडाण्याला सुधारून घेऊं शकतो, वकिलाची चूक वकील सुधारूं शकत नाहीं या गोष्टीचा अनुभव या ठिकाणीं आला. लॉर्ड सिडनहॅम यांनीं तर समर्थ यांस एक फारच नाजूक प्रश्न विचारला. ते म्हणाले, 'तुमची नेमस्तपणाची मागणी अमान्य झाल्यास प्रचंड चळवळ होण्याचा धाक तुम्ही घालतां, पण या जगाला थक्क करून सोडणाऱ्या चळवळींत तुम्ही स्वतः भाग कांहीं घेणार कीं नाहीं ?' समर्थांना आड व विहीर असें झालें. अशा भयंकर चळवळींत आपण पडणार म्हणावें तर जहालांत आणि आपणांत फरक काय राहिला ? बरें, पडणार नाहीं म्हणावें तर परस्पर तिऱ्हाइतांनीं चळवळ करावी आणि आपण फक्त तिचा हवाला द्यावा यांत पुरुषार्थ कोणता ? तेव्हां समर्थ क्षणभर घोंटाळून व हंसून म्हणाले "हो–हो–हो तशी वेळ येऊन ठेपली तर–तसा प्रसंगच आला तर–तर पहातां येईल, मीहि चळवळींत कदाचित् सामील होईन !" तेव्हां सर्वजण हंसूं लागले. तात्पर्य, जगाला थक्क करून सोडणाऱ्या चळवळीच्या धाकाचा अशा रीतीनें हास्यरसांत शेवट झाला !

चिंतामणीची साक्ष अधिक सुधेपणाची झाली. त्यांनीं वायव्यप्रांतास अनुलक्षून कांहीं सचना केल्या व एकंदर सुधारणांविषयीं असें मत दिलें कीं, मूळ माँ–चे–योजनेपेक्षां कमी अशा कोणत्याहि सुधारणांस नेमस्त लोक संमति देणार नाहींत. त्यांनीं एक गोष्ट कमिटीला स्पष्ट सांगितली, ती ही कीं, पार्लमेंटच्या जबाबदारीचें नेहमीं स्तोम माजविण्यांत येतें; पण ही गोष्ट खोटी आहे, या जबाबदारींत कांहींच अर्थ नाहीं, पार्लमेंटवर हिंदुस्थानचा हवाला आहे म्हणण्यापेक्षां ईश्वरावर हवाला आहे येवढी गोष्ट खरी. कारण परमेश्वरानें हिंदुस्थानचें कल्याण करण्याची जबाबदारी पार्लमेंटच्या स्वाधीन केली पण पार्लमेंटनें या न्यायाचा प्रतिन्यास ईश्वराच्याच हातीं केला, पार्लमेंटचें नांव सांगून स्टेटसेक्रेटरी वाटेल तसा अधिकार गाजवितात ! चिंतामणीनंतर के. सी. रॉय यांनीं साक्ष दिली. यांचा आवाज इतका मृदु व नेमस्त होता कीं, एका वितीच्या अंतरावर बस-

लेल्या लघुलेखकासहि तो ऐकूं येईना ! सभासदांचीहि तीच तक्रार. तेव्हां त्यांची खुर्ची अध्यक्षांच्या खुर्चीला नेऊन भिडवावी लागली. त्यांनीं किरकोळ एक दोन गोष्टी सांगितल्या. नंतर पी. सी. रॉय, सुरेंद्रबाबूंचे हस्तक, यांनीं लिहून आणलेलीं दोन पानें आपली साक्ष म्हणून वाचली; त्यांत सांगण्यासारखें फारसें नव्हतें. उलटतपासणींत चिंतामणीस दोनचार प्रश्न विचारण्यांत आले, के. सी. रॉय यांची बोळवण एका प्रश्नावर झाली, व पी. सी. रॉय यांच्या वांटणीस एकहि प्रश्न आला नाहीं. तें कसेंहि असो; नेमस्तांची सर्व मंडळी कोर्टांतून एकदांची जाऊन आली. साक्ष कोणी द्यावी, कोणी प्रथम बोलावें याविषयीं नेमस्त शिष्टमंडळांत किती रणें माजून राहिलीं होतीं याचा वृत्तांत फार मनोरंजक आहे, पण तो देण्याचें कारण नाहीं.

सोमवारीं दोन प्रहरीं सरदार ठाकूरसिंग नांवाच्या एका शीख गृहस्थाची साक्ष झाली. यांना आयत्या वेळीं धरून आणल्याचा बोभाटा आहे ! निदान आपणास साक्ष देण्यास हवी तेवढी सवड मिळाली नाहीं हें त्यांनीं आपल्या लेखी जबानींत प्रथमच उघड सांगितलें, व तो जबाब रें–रें करीत कसा तरी वाचला. वास्तविक शीखांचा सरकारास लष्करी कामांत तेवढा उपयोग आहे, व त्याकरितां त्यांना स्वतंत्र प्रतिनिधी देण्याची शिफारस झालेली आहे. मग ती शिफारस दृढ करण्याला अशा मोडक्या तोडक्या साक्षीदाराची काय गरज होती कळत नाहीं. सरदार ठाकूरसिंग यांना साक्षीस आणून त्यांचें हंसें करण्यापेक्षां त्यांच्याकडून तरवारीचे दोन हात करून दाखविले असते तर अधिक बरें झालें असतें. कमिटीच्या दालनांत तितकी जागा खास होती. असो. त्यांच्या साक्षीचे तात्पर्य इतकेंच होतें कीं, खानेसुमारींत शीखांची लोकसंख्या मुद्दाम कमी दाखविण्याचा प्रयत्न होतो, ती संख्या भरावी तितकी पुढें भरली तर आज त्यांना दिलेले प्रतिनिधि यथाप्रमाण होणार नाहींत ! पंजाबी शेतकऱ्यांस विशेष हक्क असावे व सुशिक्षितांना कमी असावे. उलट साक्षींत 'या साक्षीदाराला संभाळून घेण्याचा बराच प्रयत्न लॉर्ड सिडनर्हॅम यांनीं केला; पण बाकीच्यांनीं त्यांची टर उडविली. मॉंटेग्युसाहेबांना अशी साक्ष सिडनर्हॅमसाहेबांनीं मुद्दाम देवविली याचें वैषम्य वाटलेंसें भासलें

ठाकूरसिंग यांनीं आपण सुधारणांची योजना व बिल वगैरेंचा अभ्यास केला नाहीं असें सांगितलें. शहरांतले लोक खेडेगांवच्या लोकांच्या हिताचे प्रश्न बाजूस टाकतात असें म्हणतां तर याचें उदाहरण द्या पाहूं असा प्रश्न मॉंटेग्यूसाहेबांनीं केला; त्यास त्यांना कांहींच उदाहरण देतां आलें नाहीं. शेवटीं आठवल्यासारखें करून ते म्हणाले, ‘ प्राथमिकशिक्षण.’ ‘ म्हणजे काय ? ’ असा प्रश्न मॉंटेग्यूनीं फिरून केला तेव्हां ठाकूरसिंग म्हणाले, “ सक्तीचें प्राथमिक शिक्षण पंजाबांतील शेतकऱ्यांना सोईचें नाहीं, असें असतां सुशिक्षित लोक सक्तीचें शिक्षण द्या म्हणतात ! ” तेव्हां सर्व लोक हंसूं लागले. ‘शीखाकरितां कोणत्या कोणत्या तत्त्वांवर किती अधीक प्रतिनिधि मागतां ? ’ या प्रश्नास ‘ आणखी पुष्कळ द्या ’ एवढेंच उत्तर मिळालें. आजवर सुशिक्षित लोकांनीं शेतीकडे पाहिलें नाहीं, शेतीकरितां सरकारीरीत्या कांहीं केलें नाहीं अशी तक्रार ठाकूरसिंग यांनीं केली तेव्हां मॉंटेग्यू म्हणाले, ‘ आजवर त्यांना ती सत्ता होती कोठें ? बरें पण यापुढें त्यांना तें खातें तोडून द्यावें कीं नाहीं ? याचें त्यांनीं ‘ होय ’ असें उत्तर दिलें !

मंगळवारीं सकाळीं प. वा. डॉ. नायर यांचे शिष्य मि. वेंकट रेड्डी, तेलगू प्रांतांतले एक वकील, यांची साक्ष झाली. हे हुशार आहेत व लघुलेखकास उतरून घेतां येत नाहीं इतकें जलद बोलतात, व उत्तरें समर्पक पण लांबट देतात. त्यांचे मुख्य मुद्दे दोन होते. पहिला असा कीं, मद्रासरकाराशीं संगनमत करून आम्ही ही चळवळ आरंभिली हा आक्षेप खरा नाहीं, व जातवार प्रतिनिधि निवडण्याचा हक्क न मिळेल तर मद्रासच्या ब्राह्मणेतरांस सुधारणा नकोत. सुदैवानें त्यांनीं एक गोष्ट कबूल केली. ती ही कीं, मद्रासपुरताच हा प्रश्न इतका बिकट आहे; इतर प्रांतांत नाहीं. लॉर्ड सिडनॅहम यांस हा साक्षीदार म्हणजे एक घबाडच मिळाल्यासारखें झालें. त्याजकडून त्यांनीं वाटेल तें कबूल करून घेतलें. सुधारणा आहेत तशा अमलांत आल्यास मद्रासेंत जातिद्वेष वाढेल, कमी होणार नाहीं. मतदार संघांत ब्राह्मण असला कीं, तो सर्व मतदार फोडून अब्राह्मण उमेदवाराचा पराभव करतो; मग ब्राह्मण मतदारांपेक्षां ब्राह्मणेतर मतदार संख्येनें कितीका अधिक असेनात; ब्राह्मणाळलेल्या ब्राह्मणेतरांना आपलें खरें हित कळत नाहीं. खिस्ती, मुसलमान हे लोक ब्राह्मणे-

तर मतदारसंघांत मिसळले तरी चालेल पण ब्राह्मण नकोत इ. इ. ! !

त्यांची उलटतपासणी सर्व सभासदांनीं करून घेतली. साउथबरो-- कमिटी मद्रासेस गेली असतां ब्राह्मणेतरांनीं पुरावा देण्याचें नाकरलें या मुद्यावर लॉर्ड मिडलटन व मॅंटेग्यूसाहेब यानीं झाडें उठविलीं. स्पूरसाहेबांनीं खुद्द विलायतेंत सामाजिक विषमता कशी होती हें जाणविलें; रीससाहेब म्हणाले, ब्राह्मणांना वाटेल तशीं नांवें ठेवितां; मग तुम्ही स्वतः जातिनिर्बंध पाळतां ? लॉर्ड क्र्यू यांनीं असें दर्शविलें कीं, ब्राह्मणेतर मतदारांचें इतकें मताधिक्य असतां ब्राह्मणांची जी इतकी भीति दाखविली जाते ती खरी वाटत नाहीं, साक्षीदार स्वतः राष्ट्रीय सभेचे पूर्वी सभासद असतां तेथें त्यांनीं हा प्रश्न काढला नाहीं, ब्राह्मणेतर हा एक वर्ग नाहीं, त्यांच्यात्यांच्यांत पुष्कळ फूट व विरोध आहे वगैरे माहिती लॉर्ड सिंह यांनीं काढून घेतली. तात्पर्य, ब्राह्मण--ब्राह्मणेतर या वादाचा परिणाम कमिटीवर झाला नाहीं. तथापि या वादाची खळबळ कमिटीपुढें निघून सर्व बाजूंनीं खुलें--खुलें मतप्रदर्शन झालें, याचें मला बरें वाटलें. या एका साक्षीदारास पुरे सवातीन तास देण्यांत आले.

मद्रासचे जमीनदार रामरायनिंगर व बेझंटबाईंचे शिष्य मि. बी. पी. वाडिया यांच्या साक्षी सुटीनंतर झाल्या. जमीनदारांनीं जमीदारांकरितां स्वतंत्र मतदारसंघ व वाडिया यांनीं मजूरपक्षाचा समावेश होण्याइतका विस्तृत मतदारीचा हक्क मागितला.

बुधवारीं सकाळीं व दुपारीं मि. जिना यांची साक्ष घेण्यांत आली. त्यांचा मुख्य मुद्दा वरिष्ठ सरकारच्या कारभारांत द्विदलपद्धतीचा अवलंब करून लोकप्रतिनिधींना जबाबदारीचा वांटा द्यावा असा होता; व तो फारच उत्तम तऱ्हेनें मांडिला. आपण सर्व शिष्टमंडळांहून थोडेसे वेगळ्या मताचे आहों असें भासविण्याचा व स्वतःचें स्वतंत्र व्यक्तित्व स्थापण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. सगळें जग एकीकडे व मी एकीकडे असा बहाणा करण्याची जिनासाहेबांची रीत प्रसिद्धच आहे. पण लोकांना लाथ व सरकारला हात असा प्रकार मात्र त्यांनीं केला नाहीं. त्यांनीं आपली अग्रयता सरकारलाहि पूर्णपणें दाखविली. त्यांचा बॅरिस्टरी बाणा, मतप्रतिपादनाचा जोर व सफाई, तसेंच निर्भीडपणा यांचा परिणाम प्रेक्षकां-

वर झाल्याशिवाय राहिला नाहीं. कमिटीचे सर्व सभासद मनांतल्या मनांत त्यांच्यावर दांतओंठ खात होते; पण त्यांनीं सभासदांना बरोबरीच्याच काय पण तुच्छतेच्या नात्यानें वागविलें. हल्लींचें बिल आहे असेंच मंजूर झाल्यास लोकांतील असंतोष कमी होणार नाहीं, बिलाचें धोरण भित्रेपणाचें व अविश्वासाचें आहे, वरिष्ठ कारभारांत सत्ता मागतों ती कांहीं तरी अधिक मागावयाचें म्हणून मागत नाहीं तर लोकांची प्रथमपासून तशीच अपेक्षा बनून राहिली आहे वगैरे सांगून ते म्हणाले, 'मॉंटेग्युसाहेबांना या वेळीं आधार दिला पाहिजे नाहीं तर घात होईल' असें म्हणणारा मी नाहीं. मॉंटेग्युसाहेबांनीं त्यांना विचारलें तुम्ही सार्वजनिक कामांत पडूं लागल्या पासून सरकारला कधीं तरी आधार दिला होता काय! जिना हे प्रेस आक्टाला संमति देणारांपैकीं होते. पण ते म्हणाले, त्या कायद्याला मी संमति दिली ही माझी चूक झाली. नंतर प्रांतिक कारभारांत कांहीं ठिकाणीं संपूर्ण स्वराज्यहि आज द्यावयास हरकत नाहीं व कोठें फार तर न्याय व पोलीस एवढीं खातीं सरकाराकडे ठेविलीं तरी पुष्कळ झालीं. आजपर्यंत आमचें हात बांधले होते, नाहीं तर कारभारांत आम्ही याहून अधिक कामगिरी करून खास दाखवूं, हिंदु-मुसलमानांतील द्वेष कमी होत असल्यानें कांहीं वर्षांनीं मुसलमानहि आपणाला स्वतंत्र मतदारसंघ नको असें म्हणतील वगैरे गोष्टी त्यांनीं सांगितल्या.

जिनाबरोबरच मद्रासचे याकूब हसन हे पुण्याहवाचनास बसले होते. आणि त्यांना अध्यक्षांनीं सांगितलें कीं, तुमचा लेखी निबंध दाखल करा म्हणजे झालें. या जोडीनंतर दुसरी जोडी साक्षीस बसली. ती ना. शास्त्री व ना. रामचंद्रराव यांची होय. बुधवार संध्याकाळपर्यंत यांची साक्ष निम्मीदेखील झाली नव्हती, यास्तव बाकीची हकीकत पुढच्या टपालास पाठवीन. येत्या आठवड्यांत बिनसरकारी साक्षीदार संपतील असा अंदाज आहे.

2718

## पत्र नं. १३

### ( ता० २१ आगष्ट १९१९ )

चालू आठवडयांत सभा वगैरे कांहीं झालें नाहीं. खासगी भेटी घेणें वगैरे कामें सुरू आहेत. लो. टिळक यांनीं मॉंटेग्युसाहेबांची पूर्वीं एक वेळ गांठ घेतल्याचें लिहिलेंच होतें. या गांठींत ' फिरून एक वेळ या, फिरून आपण आणखी बोलूं ' असें मॉंटेग्युसाहेबांनीं टिळकांना सांगितलें होतें. त्याप्रमाणें गेल्या सोमवारीं टिळक स्टेटसेक्रेटरींना भेटण्यास गेले होते. याहि वेळीं पूर्वीप्रमाणें बराच वेळ बोलणें झालें. बोलणें काय झालें हें सांगणें अर्थात् शक्य नाहीं. तथापि मॉंटेग्युसाहेब शिष्टाचार पाळून सौम्य व खुल्या दिलानें बोलतात, एवढें लिहिण्यास हरकत नाहीं. लॉर्ड सिंह यांनीं लॉर्ड सभेंत आश्वासन दिल्याप्रमाणें स्टेटसेक्रेटरी हे पंजाब-प्रकरणाच्या चौकशीकरितां लवकरच कमिशन नेमणार आहेत; तेव्हां ती चौकशी संपेपर्यंत पंजाबच्या पुढाऱ्यांस तुरुंगवास भोगल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें लोक बोलतात. तावडंतोब सर्वांना जाहीर माफी दिली असती तर ती लोकांना आवडली असती हें उघड आहे पण, लोकांना आवडणारी गोष्ट अधिकाऱ्यांनीं केली तर पूर्वेचा सूर्य पश्चिमेस कां उगवणार नाहीं?

बुधवारीं ना. शास्त्री ना. रामचंद्रराव यांची सजोड साक्ष झाली. प्रत्येकानें आपापलें म्हणणें निरनिराळें लिहून पाठविलें होतें व तोंडीं जबानी निरनिराळया मुद्यांवर दिली. उलटतपासणींत ना. शास्त्री यांच्या वाट्यांसच बहुतेक प्रश्न आले. ना. शास्त्री यांची साक्ष चांगली झाली. त्यांनीं बिलांत आपणास काय सुधारणा पाहिजेत हें कलमवार सांगितलें. ' ही पूर्वींच्या कोणत्याहि साक्षीदारांनीं न केलेली गोष्ट म्हणून मी ती करीत आहे ' असें ते म्हणून गेले, पण ती त्यांची चूक होय. कारण राष्ट्रीय सभेतर्फे दाखल केलेल्या लेखी जबानींत अशाच कलमवार नुसत्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत हें त्यास माहीत नसावें किंवा माहीत असून ते विसरले असावे. वरिष्ठ सरकारच्या कारभारांत लोकांस सत्ता पाहिजे, प्रांतिक कारभारांत कायदे-कौन्सिलांत जमाखर्चावर पूर्ण ताबा असला पाहिजे वगैरे मुद्दे त्यांच्या मुख्य जबानींत आले होते. उलटतपासणींत त्यांना

ब्राह्मण–ब्राह्मणेतर यांचा वाद, स्त्रियांना मतदारीचा हक्क वगैरे मुद्यांवर प्रश्न विचारण्यांत आले. पैकीं ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादांत फारसा अर्थ नाहीं. ब्राह्मण लोक हल्लीं तरी अब्राह्मणांकरितां पुष्कळ मेहनत करितात असें सांगून स्त्रियांना आजच मत न दिलें तरी चालण्यासारखें आहे, या साउथबरो-कमिटीच्या शिफारशीचा त्यांनीं अनुवाद केला !

उलटतपासणींत लॉर्ड सिडनहॅम यांनीं ना. शास्त्री यांस विचारलेल्या कांहीं प्रश्नांचा उल्लेख करणें जरूर आहे. सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी ही सर्वस्वी सामाजिक काम करणारी संस्था आहे अशी लॉर्ड सिडनहॅम यांची समजूत व तिला आधार काय तर कै. ना. गोखले यांनीं लाट-साहेबांना तसें एके वेळीं सांगितलें असें त्यांना स्मरत आहे ! ना. गोखले यांनीं सिडनहॅमसाहेबांना काय सांगितलें हें समजण्यास मार्ग नाहीं, पण सोसायटीच्या कांहीं सभासदांचा सर्व भर सामाजिक चळवळीवर असला तरी इतर कांहीं सभासद नेमस्तपणाची का होईना, पण राजकीय स्वरू-पाची चळवळ करीत होते हें उघड आहे. व स्वतः ना. गोखले तर आपला सर्व वेळ केवळ राजकीय चळवळींत घालवीत व सामाजिक बाब-तींत ते उदार मतवादी असले तरी केवळ सामाजिक स्वरूपाच्या अशा कोणत्याहि चळवळींत त्यांनीं कधींहि पुढाकार घेतला नाहीं हें प्रसिद्ध आहे. अर्थात गोखल्यांनीं लाटसाहेबांस आपली सोसायटी ही निवळ सामाजिक परिषदेची एक शाखा असल्याचें सांगावें हें संभवत नाहीं. पण सांगणारा आपल्या मतलबापुरतें सांगतो आणि ऐकणारा आपल्या मतल-बाच्या दृष्टीनें पाहतो, हा साहेब लोकांशीं वागतांना जो एक प्रकार नेहमीं घडतो, त्याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. असो. ना. शास्त्री यांनीं लॉर्ड सिडनहॅमसाहेबांची ही समजूत खोडून काढली, ही बरी गोष्ट झाली. ते म्हणाले ‘ साहेब, असें कसें म्हणतां ? तुम्ही आमच्या सोसायटींत आलां, तुम्हीं आम्ही मिळून चहा घेतला, आम्ही छात्रगण राजकीय विषयांचा अभ्यास करितों असें तुम्हांस सांगितलें, सर्वस्वी राजकीय विष-यावरचा असा सोसायटीचा मोठा ग्रंथसंग्रह तुम्हाला दाखविला आणि तुम्ही आम्हाला कांहीं पुस्तकेंहि नजर केलींना ? ’ असें सांगून ना. शास्त्री यांनीं लाटसाहेबांच्या गळयांत धोंगडें घातलें. तेव्हां मी ‘ तुम्हांस

पुस्तकें दिलीं. ; पण तीं खास राजकीय विषयावरचीं नव्हतीं ' असा शेरा मारून लाटसाहेबांनीं त्यांतून आपली सुटका करून घेतली.

मवाळाग्रणी मि. समर्थ यांनीं हव्या त्या सुधारणा न मिळाल्यास प्रचंड चळवळीची धमकी कमिटीस कशी घातली, हें मागिल पत्रांत लिहिलेंच आहे. ना. शास्त्री साक्षीला आले तेव्हां आयतें एका मवाळाच्या हातून दुसऱ्या मवाळास मारण्यास सांपडेल असें पाहून लॉर्ड सिडनहॅम यांनीं समर्थांच्या या उक्तीबद्दल ना. शास्त्री यांना नेमके प्रश्न घातले. ते म्हणाले, "समर्थांच्या या धमकीबद्दल तुमचे मत काय आहे?" त्यावर ना. शास्त्री थोडें कचरत म्हणाले, " मनुष्यकल्पनेला थक्क करून सोडणारी चळवळ होईल हे समर्थांचे शब्द थोडेसे अति शयोक्तीचेच खरे. " तेवढयानें समाधान न होतां फिरून लाटसाहेबांनीं त्याच मुद्यावर आणखी प्रश्न विचारले. तेव्हां ' मौनं सर्वार्थसाधनं 'या न्यायानें शास्त्र्यांनीं " या मुद्यावर मला प्रश्न न विचाराल तर बरें होईल " असें उत्तर दिलें व स्वपक्षीयांच्या मतावर टीका करण्याच्या संकटांतून स्वतःची मुक्तता करून घेतली.

शुक्रवारीं सकाळीं मद्रासचे एक नेटिव्ह ख्रिश्चन चावरीअप्पा यांची साक्ष झाली. हे ब्राह्मणेतरांचे अकारणबंधु म्हणून पुढें आले होते. नेटिव्ह ख्रिश्चन लोकांना स्वतंत्र मतदारसंघ किंवा प्रतिनिधि यांची फारशी गरज नाहीं, पण कसेंहि करून ब्राह्मणांच्या हातून ब्राह्मणेतरांस सोडवा, ब्राह्मणांपुरते ठरीविक प्रतिनिधि द्या, व ब्राह्मणेतरांस जातवार प्रतिनिधि द्या असें त्यांचें मागणें होतें. सर जॉन रीस, बेनेट, मॅटेग्यू व सिंह यांनीं चावरीअप्पांची तपासणी कसून केली. या चौघांपैकीं एकहि ब्राह्मण नव्हता, तथापि त्यांना चावरीअप्पा यांचें म्हणणें पटलें नाहीं. ब्राह्मण बाजूला राहोत, पण सर्व ब्राह्मणेतर तरी एक आहेत काय? ब्राह्मणेतरांचें बहुमत मतदारसंघांत असतां त्यांनीं आपण एक झालों तरी आपणांस जागा मिळणार नाहींत हें म्हणणें जरासें दुबळेपणाचेंच नाहीं काय? या प्रश्नांस त्यांना समाधानकारक उत्तर देतां आलें नाहीं.

शुक्रवारीं दोन प्रहरीं आसामचे माजी ले. गव्हर्नर सर आ. अर्ल यांची साक्ष बरीच उदारपणाची झाली. सुधारणांची योजना अमलांत आणलीच पाहिजे व आसाम प्रांताला देखील ती पूर्णपणें लागू केली पाहिजे. आसाम

मागासलेला नाहीं, तेथेंहि अबकारी व पब्लिक वर्क्स हीं खातीं सरकारनें आपल्या हातीं राखून ठेवण्याचें कारण नाहीं, शिक्षणाचें खातें लोकप्रतिनिधींच्या हातींच द्यावयास पाहिजे. लोक या खात्याची जितकी सुधारणा करूं शकतील तितकी सरकार कधींहि करूं शकणार नाहीं, लोकांच्या हातीं कारभार गेल्यास तो बिघडेल या म्हणण्यांत फारसा अर्थ नाहीं, आणि तो थोडासा बिघडला तरी चालेल, पण तो त्यांच्या हातीं दिला पाहिजे, मात्र तूर्त वरिष्ठ सरकारच्या कारभारांत लोकांना सत्ता देऊन चालावयाचें नाहीं इत्यादि मतें त्यांनीं प्रगट केलीं. शेवटच्या या मतानें त्यांच्या साक्षीला थोडासा कमीपणा आला, पण सिव्हिल सर्व्हंट या नात्यानें पाहतां त्यांनीं बराच उदारपणा दाखविला असें म्हणावें लागतें.

सोमवार ता. १८ रोजीं युरोपियन असोसिएशनचे सेक्रेटरी व मद्रास–मेलचे माजी संपादक मि. वेल्बी यांची साक्ष झाली. त्यांच्या कृतीला साजेसा यांचा चेहरा आहे. यांनीं आपल्या साक्षींत काय सांगितलें हें मी न लिहितांहि वाचकांस सजजेल ! पण मौज ही कीं, यांचा मारा लोकांवर होता तसाच मॉटेग्यू चेल्म्सफर्डयोजनेवरहि होता. एकीकडे जबाबदारीचे अधिकार लोकप्रतिनिधींना देऊं नयेत असें तें ह्मणत व इकडे ह्मणत कीं, सुधारणांची ही योजना वाईट आहे. कारण तींत लोकप्रतिनिधींना जबाबदारी दिलेली नाहीं; एकीकडे म्हणत मतदार संघ मोठा नाहीं म्हणून अधिकार देऊं नयेत व दुसरीकडे मतदार-संघ वाढवावा काय असें विचारलें तर वाढवूं नये असें म्हणत ! "सर जेम्स मेस्टन, सर क्लॉड हिल अशा लोकांनीं हिंदी जनतेमध्यें राजकीय आकांक्षा उत्पन्न झाल्या आहेत म्हटलें पण तें खरेंच नाहीं, मूठभर सुशिक्षितच खेळखंडोबा करितात, तोंडानें लोक स्वराज्य मागतात, पण आपण काय मागतों हें त्यांस समजतच नाहीं" वगैरे मतें त्यांनीं स्पूर व रीज यांच्या उलटतपासणींत सांगितलीं. लॉर्ड सिडनहॅम यांनीं वेल्बीसाहेबांना विचारण्याचे पांचपन्नास प्रश्न वहींत टिपून आणले होते; व लाटसाहेबांनीं झट्दिशीं प्रश्न वाचून टाकावयाचा व कोर्टांतल्या पाढिक साक्षीदाराप्रमाणें वेल्बीसाहेबांनीं 'होय' किंवा 'नाहीं' म्हणून टाकावयाचें, असा क्रम चालला होता. लघुलेखकहि या घोकंपट्टींत पराभव पावून शरण आला व कांहीं प्रश्न झाल्यावर खुद्द चेअरमन यांनीं सिडनहॅमसाहे-

बांना असें बजावलें कीं, "अहो तुम्ही आपल्या स्वतःचीं मतें प्रश्नांत गोवून सूचक सवाल टाकतां व साक्षीदार नुसतें 'होय' किंवा 'नाहीं' असें ठरीव उत्तर देतो हें शोभत नाहीं ! सिडनहॅमसाहेबांनीं आपल्या हस्तकाकडून असें वदविलें कीं हिंदी लोकांना पात्रता नाहीं, अनुभव नाहीं, ते अधिकारी बनले तर युरोपियन व्यापाराला धक्का बसेल, अधिकार न दिले तर चळवळ होईल पण ती मूठभर माणसें करणार! तिकडे लक्ष देऊं नये. तात्पर्य स्थानिक स्वराज्यापेक्षां लोकांना काडीइतकाहि अधिक अधिकार देऊं नये ! मॉंटेग्यू, सिंह व बेनेट यांनीं वेल्बीसाहेबांना उलटतपासणींत घुष्कळच अडवून फजीत केलें. पण त्यांच्या गुरूनें त्यांना एक मंत्र शिकवून ठेवला होता तो हा कीं, प्रश्नाचें उत्तर देऊं नयेसें वाटलें म्हणजे मला या प्रश्नाचें उत्तर माझ्या असोसिएशनचें मत विचारल्याशिवाय देतां येत नाहीं असें म्हणावें !

सोमवारीं दोन प्रहरीं प्रो. सॅडलर यांची साक्ष झाली. हे लीड्स युनिव्हर्सिटीचे व्हाइस-चॅन्सेलर आहेत व कलकत्ता युनिव्हर्सिटीचे कमिशनचे अध्यक्ष होते. त्यांची साक्ष मुख्यतःशिक्षणविषयावर होती; तथापि, प्रस्तुत राजकीय सुधारणा घडवून आणून लोकांना अधिकाधिक अधिकार देण्यासंबंधानें त्यांनीं अत्यंत सहानुभूतीचे उद्गार काढले. शिक्षणासंबंधानें त्यांनीं असें मत दिलें कीं, खालपासून वरपर्यंत सर्व शिक्षणाचें खातें लोकप्रतिनिधींच्या हातीं दिलें पाहिजे तरच तें सुधारेल. शिक्षण सुधारण्यास पैसा लागेल व लोक तो देतीलहि; पण जोपर्यंत आपण दिलेल्या पैशाची व्यवस्था व शिक्षणाचीं सूत्रें परक्याच्या हातीं आहेत असें लोकांस वाटतें, तोंपर्यंत ते या कामास पैसा काय म्हणून देतील ? शिक्षण लोकांच्या हातीं देण्यांत धोका नाहीं व असला तरी तें द्यावयास पाहिजे. सॅडलरसाहेबांच्या साक्षीचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर चांगला झाला.

मंगळवारीं सकाळींदुपारीं मिळून बरेच साक्षीदार झाले. मात्र सकाळचा सर्व वेळ मुंबईच्या टाइम्सचे संपादक सर स्टॅनले रीड यांनींच घेतला. त्यांचीं मतें टाईम्स ऑफ इंडियापत्राच्या मतांना सोडून नव्हती तथापि प्रत्यक्ष ऐकणाराला हे फारच उदारमतवादी आहेत, असा भास झाल्याशिवाय राहिला नाहीं. जुन्या चालीनें यापुढें कारभार चालल्यास देशावर

संकट येईल, आज बराचसा अधिकाराचा हप्ता ताबडतोब द्यावा व दहा वर्षांनीं फेरतपासणी करावी, लोकांमध्यें विलक्षण जागृति झाली आहे, लोकांचे पुढारी समाजसेवा खऱ्या भावानें करूं लागले आहेत, प्रांतिक कारभारांत योजनेइतकें दिलें तरी पुरे, वरिष्ठ कारभारांत आर्थिक स्वातंत्र्य दिलें तरच जबाबदारी देण्याचा उपयोग, हें बिल जर समाधानकारक असें केलें नाहीं तर हिंदुस्थानांत नेमस्त किंवा मवाळ हा औषधालाही मिळावयाचा नाहीं, वरिष्ठ कारभारांत जबाबदारीचा अधिकार दिल्यास लोक अधिक उमद्या दिलानें सहकारिता करितील, जातवार मतदार-संघ जरूर तर देऊन हें सुधारणांचें गाडें कोणीकडून तरी एकदम चालतें करावें, स्त्रियांना मतदारीचा हक्क देणें न देणें हें प्रांतांनिहाय योग्ययोग्य पाहून ठरवावें वगैरे आपलीं मतें त्यांनीं उलटतपासणींत मोठ्या गोड भाषेनें पण करारीपणानें सांगितलीं.

मंगळवारीं दुपारीं पांचसहा साक्षीदार दीड तासांत भाजून काढण्यांत आले. प्रथम मद्रास प्रेसिडेन्सी असोसिएशनचे तीन प्रतिनिधि मि. चकराय मि. चिंचय्या व मि. वाडिया यांची एकत्र साक्ष झाली. वाडिया उगाच शोभेस बसले होते. मुख्य भाग चकराय यांनीं सांगितला. चिंचय्या थोडेंसेंच बोलले. हे दोघेहि अब्राम्हण ख्रिस्ती आहेत. त्यांची सभाहि अब्राम्हणांचीच आहे. त्यांच्या साक्षीचें तात्पर्य असें होतें कीं, जातवार मतदार संघ कोठेंहि करूं नयेत; फार तर कांहीं जातींना जागा राखून ठेवाव्या अथवा हवीच तर ब्राम्हण प्रतिनिधी अमुक इतक्याहून जास्त येऊं नयेत अशी मर्यादा घालावी, जातींजातींत एकोपा व सहकारिता राहूनच काम अधिक होईल, कॉंग्रेसचें धोरण मद्रास इलाख्यांतील निम्म्यांहून अधिक ब्राम्हणेतरांस मान्य आहे, जातीच्या तंट्याची जबाबदारी उभयपक्षांवर सारखीच आहे, वगैरे मतें चकराय यांनीं सांगितल्यावर मि. चिंचय्या यांनीं पुरवणीदाखल असें सांगितलें कीं, तामिल भागापेक्षां तेलगू भागांत ब्राम्हण-अब्राम्हणेतरांचा वाद फारच कमी आहे. या साक्षीदारांची उलटतपासणी करण्याचें कारण नाहीं असें कमिटीनें ठरविलें.

नंतर कोल्हापूरचे अधिकारी व डेक्कन सभेचे अध्यक्ष रा. ब. भास्करराव जाधव यांची साक्ष झाली. त्यांच्या लेखी साक्षींतला मजकूर मला

बांना असें बजावलें कीं, "अहो तुम्ही आपल्या स्वतःचीं मतें प्रश्नांत गोवून सूचक सवाल टाकतां व साक्षीदार नुसतें 'होय' किंवा 'नाहीं' असें ठरीव उत्तर देतो हें शोभत नाहीं ! सिडनहॅमसाहेबांनीं आपल्या हस्तकाकडून असें वदविलें कीं हिंदी लोकांना पात्रता नाहीं, अनुभव नाहीं, ते अधिकारी बनले तर युरोपियन व्यापाराला धक्का बसेल, अधिकार न दिले तर चळवळ होईल पण ती मूठभर माणसें करणार! तिकडे लक्ष देऊं नये. तात्पर्य स्थानिक स्वराज्यापेक्षां लोकांना काडीइतकाहि अधिक अधिकार देऊं नये ! मॉटेग्यू, सिंह व बेनेट यांनीं वेल्बीसाहेबांना उलटतपासणींत घुष्कळच अडवून फजीत केलें. पण त्यांच्या गुरूनें त्यांना एक मंत्र शिकवून ठेवला होता तो हा कीं, प्रश्नाचें उत्तर देऊं नयेसें वाटलें म्हणजे मला या प्रश्नाचें उत्तर माझ्या असोसिएशनचें मत विचारल्याशिवाय देतां येत नाहीं असें म्हणावें !

सोमवारीं दोन प्रहरीं प्रो. सॅडलर यांची साक्ष झाली. हे लीड्स युनिव्हर्सिटीचे व्हाइस-चॅन्सेलर आहेत व कलकत्ता युनिव्हर्सिटीचे कमिशनचे अध्यक्ष होते. त्यांची साक्ष मुख्यतःशिक्षणविषयावर होती; तथापि, प्रस्तुत राजकीय सुधारणा घडवून आणून लोकांना अधिकाधिक अधिकार देण्यासंबंधानें त्यांनीं अत्यंत सहानुभूतीचे उद्गार काढले. शिक्षणासंबंधानें त्यांनीं असें मत दिलें कीं, खालपासून वरपर्यंत सर्व शिक्षणाचें खातें लोकप्रतिनिधींच्या हातीं दिलें पाहिजे तरच तें सुधारेल. शिक्षण सुधारण्यास पैसा लागेल व लोक तो देतीलहि; पण जोपर्यंत आपण दिलेल्या पैशाची व्यवस्था व शिक्षणाचीं सूत्रें परक्याच्या हातीं आहेत असें लोकांस वाटतें, तोंपर्यंत ते या कामास पैसा काय म्हणून देतील ? शिक्षण लोकांच्या हातीं देण्यांत धोका नाहीं व असला तरी तें द्यावयास पाहिजे. सॅडलरसाहेबांच्या साक्षीचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर चांगला झाला.

मंगळवारीं सकाळींदुपारीं मिळून बरेच साक्षीदार झाले. मात्र सकाळचा सर्व वेळ मुंबईच्या टाइम्सचे संपादक सर स्टॅनले रीड यांनींच घेतला. त्यांचीं मतें टाईम्स ऑफ इंडियापत्राच्या मतांना सोडून नव्हती तथापि प्रत्यक्ष ऐकणाराला हे फारच उदारमतवादी आहेत, असा भास झाल्याशिवाय राहिला नाहीं. जुन्या चालीनें यापुढें कारभार चालल्यास देशावर

संकट येईल, आज बराचसा अधिकाराचा हप्ता ताबडतोब द्यावा व दहा वर्षांनीं फेरतपासणी करावी, लोकांमध्यें विलक्षण जागृति झाली आहे, लोकांचे पुढारी समाजसेवा खऱ्या भावानें करूं लागले आहेत, प्रांतिक कारभारांत योजनेइतकें दिलें तरी पुरे, वरिष्ठ कारभारांत आर्थिक स्वातंत्र्य दिलें तरच जबाबदारी देण्याचा उपयोग, हें बिल जर समाधानकारक असें केलें नाहीं तर हिंदुस्थानांत नेमस्त किंवा मवाळ हा औषधालाही मिळाव-याचा नाहीं, वरिष्ठ कारभारांत जबाबदारीचा अधिकार दिल्यास लोक अधिक उमद्या दिलानें सहकारिता करितील, जातवार मतदार–संघ जरूर तर देऊन हें सुधारणांचें गाडें कोणीकडून तरी एकदम चालतें करावें, स्त्रियांना मतदारीचा हक्क देणें न देणें हें प्रांतांनिहाय योग्ययोग्य पाहून ठरवावें वगैरे आपलीं मतें त्यांनीं उलटतपासणींत मोठ्या गोड भाषेनें पण करारी-पणानें सांगितलीं.

मंगळवारीं दुपारीं पांचसहा साक्षीदार दीड तासांत भाजून काढण्यांत आले. प्रथम मद्रास प्रेसिडेन्सी असोसिएशनचे तीन प्रतिनिधि मि. चकराय मि. चिंचय्या व मि. वाडिया यांची एकत्र साक्ष झाली. वाडिया उगाच शोभेस बसले होते. मुख्य भाग चकराय यांनीं सांगितला. चिंचय्या थोडें-सेंच बोलले. हे दोघेहि अब्राम्हण ख्रिस्ती आहेत. त्यांची सभाहि अब्राम्ह-णांचीच आहे. त्यांच्या साक्षीचें तात्पर्य असें होतें कीं, जातवार मतदार संघ कोठेंहि करूं नयेत; फार तर कांहीं जातींना जागा राखून ठेवाव्या अथवा हवीच तर ब्राम्हण प्रतिनिधी अमुक इतक्याहून जास्त येऊ नयेत अशी मर्यादा घालावी, जातींजातींत एकोपा व सहकारिता राहूनच काम अधिक होईल, काँग्रेसचें धोरण मद्रास इलाख्यांतील निम्म्यांहून अधिक ब्राम्ह-णेतरांस मान्य आहे, जातीच्या तंट्याची जबाबदारी उभयपक्षांवर सार-खीच आहे, वगैरे मतें चकराय यांनीं सांगितल्यावर मि. चिंचय्या यांनीं पुरवणीदाखल असें सांगितलें कीं, तामिल भागापेक्षां तेलगू भागांत ब्राम्हण-ब्राम्हणेतरांचा वाद फारच कमी आहे. या साक्षीदारांची उलटतपासणी करण्याचें कारण नाहीं असें कमिटीनें ठरविलें.

नतर कोल्हापूरचे अधिकारी व डेक्कन सभेचे अध्यक्ष रा. ब. भास्कर-राव जाधव यांची साक्ष झाली. त्यांच्या लेखी साक्षींतला मजकूर मला

अद्यापि वाचावयास मिळाला नाहीं; पण तोंडीं साक्षींत तरी त्यांनीं ब्राम्हण-ब्राम्हणेतर या वादाचा उल्लेख न करतां, मराठे हे स्वतः मागसलेले नाहींत, पण कुणब्यांचा समावेश मराठ्यांत करण्यांत येतो व कुणबी मागसलेले आहेत, जातवार मतदार-संघ नसले तरी मराठ्यांकरितां शेंकडा तीस इतक्या जागा राखून ठेवण्यांत याव्या व प्रथम अशा रीतीनें मराठे लोक कायदेकौन्सिलांत आल्यावर पुढें पुढें जागा कमी राखून ठेवाव्या लागतील वगैरे गोष्टी अवघ्या पांचसहा मिनिटांत सांगितल्या व त्यांचीहि उलटतपासणी न करितां मोकळीक करण्यांत आली.

नंतर ब्रह्मदेशांतील प्रजेतर्फे मि मॉंगपू व ब्रह्मी लोकांपैकीं मागसलेल्या जातींचें प्रतिनिधि मि. लूनी यांच्या वेगवेगळ्या साक्षी झाल्या. मॉंगपू यांचें म्हणणें असें होतें कीं, सर रेजिनाल्ड क्रॅडॉक यांची योजना ब्रह्मी लोकांस मान्य नाहीं, त्यांना मॉं.-चे. योजनेप्रमाणें व राष्ट्रीय सभेच्या दुरुस्तीप्रमाणें सुधारणा हव्या; ब्रह्मी लोकांत जातिभेद नाहीं, स्त्रीस्वातंत्र्य भरपूर आहे, हिंदुस्थानापेक्षां ब्रह्मदेशांत साक्षर लोकांचें शेंकडा प्रमाण अधिकआहे, कमींत कमी अलाहाबाद प्रांताइतका तरी ब्रह्मदेशाचा दर्जा राखला जावा, ब्रह्मदेश हिंदुस्थानाला सोडून जाण्यास तयार नाहीं. मि. लूनी यांनीं सांगितलें कीं, मागललेले म्हणून आमचे प्रतिनिधी सरकार नेमणार हें आम्हास पसंत नसून आम्हास निवडणुकीचाच हक्क पाहिजे.

बुधवारीं कलकत्ता हायकोर्टाचे एक माजी न्यायाधीश सर हॅरी स्टीफन यांची एकट्याचीच साक्ष झाली. त्यांनीं इंडो–ब्रिटिश असोसिएशनच्या सर्व मतांचें समर्थन केलें. वेल्बीसाहेब जरा जपून तरी बोलत; पण हा म्हातारा खवीस वाटेल तीं विधानें जोराजोराने करी, स्वतःच हंसे, व जणुं काय कमिटीपुढें आपण बसलों नसून आपल्या अँग्लो इंडियनी-क्लबांतच बसून बोलत आहों अशा भावनेनें हिंदी लोकांची निंदा करी. वास्तविक त्यांनीं बिल वाचलेंहि नव्हतें हें कबूल केलें ! पण म्हाताऱ्या माणसाला अभिप्राय द्यायाला बिल वाचायलाच कशाला हवें ? हिंदुस्थानांत जातिभेद आहे, म्हणून त्यांना स्वराज्य नको, व बिलांतील सुधारणा पाश्चात्य पद्धतीवर रचल्या आहेत म्हणून बिल नको ! मग तुम्हीच काय सुधारणा कराव्या त्या सांगाना? याचें उत्तर हिंदी लोकांना जागा द्या! व या जागांवर

काम करून त्यांनीं आपलें डोकें चालवून योजना तयार केली म्हणजे ती द्या, ही नको ! यांच्या साक्षीइतका हंशा आजवर केव्हांहि कमिटींत झाला नाहीं. प्रेक्षकांप्रमाणें सभासदहि हंसत, मग चेअरमन 'खामोष' करून नाकाला बोट लावीत ! लॉर्ड सिडनहॅम यांना हें कूळ मनाजोगें मिळालें होतें. त्यांनीं हवे तितके लेखी प्रश्न वाचून स्टीफनसाहेबांच्या तोंडून नुसते रुकार घेतले, पण लॉर्ड सिंह यांनीं स्टीफनसाहेबांना उलटतपासणीच्या मंदाग्नीवर पापडासारखें भाजून वांकडेतिकडे करून सोडले. एकहि हिंदी भाषा न येतां आपण हिंदी लोकांचें खरें मनोगत जाणतों व बिल न वाचतां त्यावर अभिप्राय देतों असल्या कबुल्या काढून घेऊन, हट्टी गाढवाचे कान धरून त्याला पाणवठ्यावर न्यावें त्याप्रमाणें लॉर्ड सिंह यांनीं युक्तिच्या सवालांनीं त्यांजकडून बिल कबूल करवून घेतलें ! विशेष अडवणुकीचा प्रश्न विचारला म्हणजे साहेब म्हणत "याचा साधकबाधक वाद मजपुढें होऊं द्या म्हणजे मी निकाल देतों;" बरोबरच आहे, जन्मभर ज्यांनी तेंच केलें, व दुसऱ्याला अडवून स्वतःचें अज्ञान झांकलें, त्यांना स्वतः उत्तर कसें देतां येणार ? या साक्षीदारावर सबंध दिवस गेला, पण सर्वांना बरींच करमणूक झाली !

आज गुरुवारीं लॉर्ड कारमायकेल यांची साक्ष व्हावयाची आहे. तो मजकूर पुढील पत्रीं लिहीन. असो; कमिटीचें काम ता. २० आगष्टपर्यंत चालून ता. १ आक्टोबरपर्यंत कमिटी शरदृतूकरितां सुटी घेणार, नंतर आणखी एक आठवडा साक्षी घेऊन रिपोर्ट लिहावयास बसणार !

## पत्र नं० १४

### ( ता. २८ आगष्ट १९१९ )

निरानिराळ्या डेप्युटेशनांचीं माणसें अद्यापि येतच आहेत. पण कमिटी एक महिन्यानंतर फिरून थोडसें काम करणार असल्यामुळें त्यांचें येणें 'वरातमागून घोडें' होईल असेंच केवळ नाहीं. सर शंकर नायर, मि. हसन इमाम, डॉ सप्रू, बाबू बिपिन चंद्र पाल, ए. रंगास्वामी अयंगार, रा. प्रधान डॉ. वेलकर वगैरे लोक गेल्या शनिवारपर्यंत येऊन दाखल झाले. त्यांपैकीं कांहींच्या तरी साक्षी होतील, असें वाटतें. पार्लमेंटच्या बैठकी थांबल्या-

मुळें सुटींतील कामास सुरुवात झाली आहे. रविवारीं लेटनस्टन येथील हॉलमध्यें माझें व्याख्यान झालें. माझें भाषण सुमारें एक तास झाल्यानंतर प्रश्नोत्तरें झालीं. चालू आठवड्यांत मि. रामस्वामी अय्यर यांचें व्याख्यान होणार आहे. ता. १ सप्टेंबर रोजीं एसेक्स-हॉलमध्यें पंजाबासंबंधीं सभा होणार आहे. लो. टिळक ता. ७ रोजीं ग्लासगो येथें जाणार असून तेथून एडिंबरो वगैरेकडे एक आठवडा व्याख्यानें देत फिरणार आहेत. बेझंट-बाईनीं या सुटींत सुमारें तीस ठिकाणीं व्याख्यानें देण्याचें ठरविलें असून त्या आपल्या छात्रगणासह दौऱ्यावर निघाल्या आहेत. नेमस्त शिष्टमंडळानें गेल्या शुक्रवारीं मि. मॉंटेग्यूप्रभृति लोकांस उपहारास बोलाविलें होतें; व त्यांच्यापैकीं कित्येकांचीं व्याख्यानें झालीं आहेत व होणार आहेत. तात्पर्य हिंदुस्थानासंबंधीं सर्व पक्षांकडून आपापल्या परीनें शक्य ती खटपट सुरू आहे. कार्यक्रम इतके फैलावले आहेत कीं सर्वांची संकलित बातमी तिकडे कळविण्याची इच्छा असली तरी त्यांची संपूर्ण माहिती वेळेवर मिळत नाहीं.

गेल्या आठवड्यांत नॅशनल सोशियालिस्ट पार्टीचें वार्षिक संमेलन नॉर्थम्टन येथें भरलें होतें. हा पक्ष समाजवादी असला तरी युद्धाला अनुकूल होता. त्यामध्यें क्रांतिकारक अशीं माणसें मुळींच नाहींत; तथापि या पक्षास हिंदुस्थानची आजची स्थिति मुळींच मान्य नाहीं. यंदाच्या त्यांच्या वार्षिक संमेलनांत हा विषय चर्चेस येऊन त्यावर एक ठराव झाला. त्याचा आशय असा आहे कीं, "हल्लीं हिंदुस्थानांत इंग्रज लोकांची हुकमत सर्व प्रकारें चालते ती तशी कायम राहणें योग्य नाहीं. हिंदी लोकांना आपल्या मताप्रमाणें व मर्जीप्रमाणें कामें करण्याचें स्वातंत्र्य मिळणें जरूर आहे, तथापि हें स्वातंत्र्य किती व कसें मिळावें याचा निकाल हिंदी लोक व इंग्रज लोक यांनीं मिळून शांत विचारानें व शांततेच्या मार्गानें केला पाहिजे व तो तसा करण्यांत यावा आर्थत राजकीय सुधारणेच्या लोकसंमत योजना सरकारानें मंजूर करव्या" हाठराव जस्टिस पत्राचे संपादक मि. हाइंडमन यांनीं पुढें मांडला व तो अवघ्या एका माताशिवाय बाकी सर्वांनीं मंजूर केला. विरुद्ध मत देणाऱ्या एका गृहस्थानें उपसूचना आणली होती. तींत शब्दाचा फरक होता, अर्थाचा फारसा नव्हता. हाइंडमन यांचीं हिंदुस्थानसंबंधीं मतें आज पसतीस चाळीस वर्षे सुसंगत असून दादाभाईंचे व त्यांचे सिद्धांत सर्वस्वीं जुळतात.

कमिटीपुढें गेल्या गुरुवारीं सकाळीं लॉर्ड कारमायकेल यांची, व दुपारीं सर अॅलेग्झँडर कारड्यू यांची अशा दोन साक्षी परस्परविरुद्ध झाल्या. कारमायकेल हे बंगाल्यांत लोकप्रिय झालेच होते व त्यांचीं उदार मतें अद्यापि कायम आहेत. सुधारणा तावडतोब अमलांत आणल्या पाहिजेत, योजना चांगली–वाईट याची घासाघीस करीत बसूं नये. एरवीं शब्दाची किंमत जाते, सर्व शिक्षणखातें लोकांच्या स्वाधीन करावें, ग्रँड कमिटी नसावी, लोकमताविरुद्ध जावें लागल्यास ती जबाबदारी गव्हर्नरानें आपल्या शिरावर घ्यावी, कौंसिलचा अध्यक्ष सरकारी अधिकारी नसावा, गव्हर्नर नवा जातो त्याला तरी अनुभव असतोच असें नाहीं, ब्राह्मणेतरांचें हित ब्राह्मण पहात नाहींत असें नाहीं, स्वतंत्र मतदारसंघ नसावे, इकडे स्कॉचमन व इंग्रज यांच्यांत बेबनाव किंवा मत्सर असेल तितकाच फार तर तिकडे ब्राह्मणब्राह्मणेतरांत असेल. हिंदी प्रधान सिव्हिलियन लोकांचा सल्ला जरूर तितका घेतील. बिलापेक्षां अधिक सुधारणा केल्या तरी हरकत नाहीं, वगैरे मुद्दे त्यांच्या उलटजबानींत त्यांनीं सांगितले. लॉर्ड सिडनहॅम यांनीं लॉर्ड कारमायकेल यांस फार छेडलें पण त्यांनीं आपलीं मतें बदललीं नाहींत.

सर अॅलेग्झांडर कारड्यू यांची साक्ष अँग्लो–इंडियनला साजे अशी झाली, इतकें सांगितलें म्हणजे त्यांच्या जबानीचा सारांश लक्षांत येईल. लॉर्ड सिडनहॅम यांनीं त्यांच्याकडून आपल्या मतांना सर्वस्वी पुष्टि मिळविली. पण मॉँटेग्यू, लॉर्ड सिंह वगैरेंनीं उलटतपासणींत त्यांचीं हजेरी बरीच घेतली. सुधारणांच्या बिलाला हरकत कां तर त्यानें द्विदळपद्धति निर्माण होते. 'पण तुमची योजना म्हणून कांहीं आहे काय?' याला उत्तर तीनचार जिल्ह्यांचें एक असें कौंसिल करावें ! बरें, यानें द्विदळपद्धतीऐवजीं सप्तदळपद्धति निर्माण होते याची वाट काय ? या प्रश्नाला उत्तर, मौज. कारड्यू म्हणाले, बिलाच्या योगानें शांतताभंग अधिक होईल ! कसा तो त्यांनाच माहीत. पण सुधारणा जर केल्या तर शांतताभंग व्हावयाचा राहील काय ? या प्रश्नास उत्तर कांहीं नाहीं. ब्राह्मण आपल्या हाताखालच्या जागा ब्राह्मण लावून भरतात, पण ब्राह्मणेतरहि तेंच कर-

वात कीं नाहीं ? असा प्रश्न लॉर्ड सिंह यांनीं केला तेव्हां साक्षीदारास 'होय' असेंच उत्तर द्यावें लागलें.

शुक्रवारीं सकाळीं कलकत्त्याचे व्यापारी ए. जे. प्यू यांची साक्ष झाली. त्यांनीं तोंडीं जबानींत सांगितलें कीं, तूर्त तरी इंग्रज व्यापारी, हिंदुस्थानांत व्यापाराखेरीज इतर गोष्टींकडे फारसें लक्ष देत नाहींत. हिंदी लोक कारभार करण्यास पात्र आहेत. फक्त त्यांना अद्यापि कामाचा अनुभव कमी आहे इतकेंच काय तें. युरोपियन व्यापाऱ्यांना हिंदी कारभारांत प्रधानपद दिलें तर ते त्या कामीं लक्ष घालतील. शास्त्री, बानर्जीसारख्या लोकांना प्रांताचा कारभार शिकण्यास संधि द्यावी व मग मध्यवर्ती कारभारांत त्यांना सत्ता ओघानें द्यावी. वेल्बी साहेबांनीं दिलेली साक्ष व केलेलीं मूर्खपणाचीं विधानें त्यांना पसंत नव्हतीं असें दिसलें. त्यांनीं दिलेली जबानी सर्व इंडो-ब्रिटिश असोसिएशनपुढें ठेवून मंजूर करण्यांत आली नव्हती असें त्यांनीं दर्शविलें. तथापि मी आपला माझ्यापुरता बोलतों असें समजा, बेल्वीसाहेबांना दोष लागतो असे दिसणारे प्रश्न कशाला विचारतां असें ते म्हणाले. सरकार पूर्वींपेक्षां हल्लीं लोकमताला अधिक मान देतें काय ? या बेनेटसाहेबांच्या प्रश्नास प्यूसाहेबांनीं 'होय' असें उत्तर दिलें, तेव्हां मॉटेग्युसाहेबांना मौज वाटून ते एकदम उद्गारले. " उदाहणार्थ, रौलेट आक्ट ! " सुधारणा केल्यानें युरोपियन व्यापाऱ्यांच्या हितास धोका नसून त्या न केल्या तर मात्र धोका आहे, जातिभेदानें सार्वजनिक कामास हरकत येतेच असें नाहीं, सुधारणा केल्यानें हिंदी लोक व युरोपियन अधिकारानें बद्ध होतील, हिंदी लोकांना युरोपियन व्यापारी शिव्या देतात, तेव्हां उत्तरादाखल हिंदी लोक त्यांना शिव्या देतात; एका सभेंत एक युरोपियन व्यापारी म्हणाला, चळवळ हा सगळा वकील व सावकार यांचा चावटपणा आहे, तेव्हां पुढच्या एका प्रसंगीं एक जहाल वक्ता म्हणाला, " हे तुटपुंजे उपरी युरोपियन व्यापारीच इकडे येऊन घाण करितात त्यांना हांकून द्याना कसे, म्हणजे सर्व ठीक होईल; " अशीं उत्तरप्रत्युत्तरें होतात इतकेंच काय तें; बाकी याकडे फारसें कोणी लक्ष देत नाहीं, वगैरे मतें त्यांनीं कमिटीपुढें मांडलीं. तात्पर्य, प्यूसाहेबांची साक्ष हा वेल्बीसाहेबांच्या साक्षीला योग्य उतारा मिळाला !

शुक्रवारीं दोन प्रहरीं रे. भाभा व के. टी. पाल (इंडियन ख्रिश्चन) यांच्या साक्षी झाल्या. भाभा हे " इंडियन ख्रिश्चन यूनियन ऑफ ग्रेटब्रिटन अँड आयर्लंड " या संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्यांनीं जबानींत सांगितलें कीं, हिंदी लोक सर्वस्वीं धर्मसहिष्णु आहेत. नेटिव्ह ख्रिश्चन लोकांना राजकीय सुधारणा मान्य आहेत; अँग्लो-इंडियन मिशनरी मधून मधून त्यांचा बुद्धिभेद करितात; जातिभेद वाईट असेल पण त्यानें राजकीय गोष्टींत नुकसान होत आहे, या म्हणण्यांत तथ्यांश नाहीं; ख्रिस्ती लोकांना ब्राह्मण किंवा मुसलमान यांच्या वर्चस्वाची भीति वाटत नाहीं; इकडे मात्र प्रॉटेस्टंट रोमन-क्याथोलिक झाला तर त्याचा इंग्लंडांतहि एक प्रकारचा भयंकर छळ होतो. पाल हे शंभर वर्षें धर्मांतर केलेल्या बंगाली घराण्यांतले असून अखिल भारतीय यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएशनचे सेक्रेटरी आहेत. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, नेटिव्ह ख्रिश्चन लोकांकरितां प्रांतिक कौंसिलांत वेगळ्या जागांची सोय करण्यांत आली तेवढी बस आहे; मात्र वरिष्ठ कायदेकौंसिलांत त्यांच्या धार्मिक व सामाजिक बाबींचे कायदे येण्याचा संभव असतो म्हणून तेथें एक जागा राखून ठेवावी. ख्रिस्ती लोकांपैकीं कित्येक राजकीय कामांत पुढारी झाले होते व आहेत वगैरे.

फिरून सोमवारीं कमिटीचे कामास सुरुवात झाली. सकाळीं सर विल्यम मायर, हिंदुस्थानसरकारचे माजी फडणवीस, यांची साक्ष झाली. यांनीं वरिष्ठ सरकारच्या कारभारांत तूर्त फाळणीफोड करूं नये व जबाबदार प्रधान नेमूं नये व या मताखेरीज बाकी सर्व साक्ष हिंदी लोकांच्या तर्फें दिली. सर जेम्स मेस्टन यांना प्रतिस्पर्धी साक्षीदार या नात्यानें यांची योजना झाली होती. सुधारणा तावडतोब न केल्या तर धोका आहे, हिंदी लोक प्रांतिक कारभार करण्यास पात्र आहेत, प्रांतिक सरकाराची राखून ठेवलेली व लोकांना दिलेली खातीं असा भेद केला तरी सर्व प्रांतिक जमा व खर्च हा सर्वांचा मिळून समजावा; या खात्याची पिशवी ही व त्या खात्याची पिशवी ती असा विभाग करण्याचें कारण नाहीं; जबाबदार प्रधान हे उधळपट्टी करतील असें, किंवा जरूर तर कर बसविण्यास माघार घेतील असें तरी मानण्यास आज काय आधार? प्रधान व कौंसिलदार मिळून सर्व एकच गट समजावा, कांहीं खात्यापुरता अधिकार मुखत्यारीनें कौंसि-

लदाराकडे रहावा, सर्व शिक्षणखातें प्रधानाकडे द्यावें आणि मध्यवर्ती सरकारच्या कारभारांत आजच विभाग पाडून न दिला तरी पांचसहा वर्षांनीं ही गोष्ट करूं असें आश्वासन सरकारानें जबाबदार रीतीनें दिलें पाहिजे; हें आश्वासन कदाचित् कायद्यामध्यें ग्रथित करितां येणार नाहीं, तरी सरकारच्या मनांत असल्यास तें देतां येईल वगैरे गोष्टी सर विल्यम मायर यांनीं सांगितल्या; त्यांचा ग्रह कमिटीवर बराच झाला.

दोन प्रहरीं सर व्हार्ने लोव्हेट यांची साक्ष झाली. हे सिव्हिलियन असून पुरा अँग्लो इंडियनी बाणा त्यांच्या अंगीं दिसून आला. त्यांनीं ता. २० आगष्टचा जाहिरनामा अर्थशून्य आहे, त्यांतून काय वाटेल तें निघेल, व कांहीं न दिलें तरीसुद्धां तें जाहिरनाम्याशीं सुसंगत होईल, येथपासून सर्व नन्नाचा पाढाच वाचला; पण उलटतपासणींत कारड्यूसाहेबांसारखीच त्यांची स्थिति झाली, यामुळें जास्त पाल्हाळ लिहीत नाहीं. त्यानंतर मि. नायडू व रा. तुळशीराम या दोघां मद्रासी गृहस्थांच्या साक्षी झाल्या. त्यांचें धोरण ब्राह्मणेतरांस स्वतंत्र मतदारसंघ व प्रतिनिधि मागण्याचें असून त्यांनीं ब्राह्मणांवरील आक्षेप कडक भाषेंत सांगितले. तसेंच ना. केशव पिले हे पूर्वीं गम खाणारे असतांहि गेल्या निवडणुकीच्या निकालापासून ते बिथरले ही माहिती त्यांनीं कमिटीस दिली. तथापि या दोघांच्या मतें हा वाद मद्रास इलाख्यापुरताच आहे. बंगालचे ब्राह्मण बोलूनचालून गरीब, निरुपद्रवी आहेत व मुंबई इलाख्यांतील ब्राह्मण साहिष्णु आहेत असें सर्टिफिकीट त्यांनीं जातां जातां दिलें. या साक्षीदारांना उलटतपासणी न करितांच मोकळें करण्यांत आलें.

मंगळवारीं सर मायकेल ओडवायर साक्षीस येणार अशी वदंता होती, पण अखेर सर जेम्स मेस्टन हेच फिरून आले हें पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें. यांना साक्षीस आणण्याचा हेतु दोन प्रकारचा होता. एक तर नवीन बिलांत बहुतेक हवाला भावी नियमांवर दिला आहे व हे नियम कमिटीपुढें यावे अशी सर्वांची इच्छा होती. पण हे नियम आजवर पुढें आले नाहींत, याकरितां त्यांच्या हातून नियमांचा कच्चा मसुदा कमिटीपुढें मांडावा; व दुसरा हा कीं, आजवर झालेल्या साक्षींत जे मुद्दे निर्माण झाले त्यावर हिंदुस्थानसरकारमार्फत देण्याचें उत्तर कमिटीपुढें नमूद करण्यास

संधि द्यावी. सर जेम्स मेस्टन फिरून साक्षीस येणें ही स्वतः त्यांची आग्रहाची इच्छा व कमिटींतील प्रतिगामी मंडळीची कारवाई यांचा परिणाम होय हें उघड दिसलें. असो. कच्चे नियम कच्चे आहेत असें म्हणून दाखल करण्यांत आले आहेत. आतां त्यांच्या प्रती साक्षीदारांस केव्हां मिळतात हें पाहावयाचें आहे. नियम हाच बिलाचा मुख्य भाग असल्यामुळें त्यांच्या प्रती सर्वांस आधीं मिळाव्या व त्यांवरील आपलें म्हणणें कमिटीपुढें मांडण्याची संधि सर्व शिष्टमंडळांस मिळावी अशी पहिल्यापासून मागणी होती असें असतां आज ते दाखल झाले. कमिटी उद्यांपासून एक महिन्याची सुटी घेणार व फिरून भरल्यावर एकच आठवडाभर काम करणार. अर्थात् नियमांवर शिष्टमंडळांस आपलें म्हणणें कमिटीपुढें मांडतां येणें शक्य नाहीं हें उघड दिसतें. कमिटीच त्याचा काय विचार करील तो करील. पण कमिटीचा विचारहि फारसा उपयोगी नाहीं. कारण बिलाचा कायदा बसल्यावर त्याअन्वयें जे नियम करण्याचा ज्याला अधिकार तो ते आपल्या मनास वाटतील तसे ठरविणार ! नियमांच्या मुद्यावर सर्वच असंतुष्ट आहेत. सिडनहॅमसाहेबांस मॅाँटेग्यूंचा विश्वास नाहीं, मॅाँटेग्यूसाहेबांस हिंदुस्थानसरकारचा विश्वास नाहीं, व हिंदुस्थानच्या लोकांस तर आज कोणावरच विश्वास ठेवतां येत नाहीं !

मेस्टनसाहेबांनीं झालेल्या पुराव्यास फारच लांबलचक उत्तर देऊन हिंदुस्थानसरकारचें मत पुनः प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मॅाँटेग्यूंनीं मात्र त्यांना एक बराच मार्मिक प्रश्न टाकला. ते म्हणाले—' कमिटीपुढें झालेला पुरावा हिंदुस्थानसरकारापुढें नाहीं, तेव्हां तुम्ही उत्तर देतां तें सरकारचें कीं तुमचें ! पण वकिलाला स्वतःला वेळेवर सुचेल तें आपल्या अशीलातर्फें म्हणून सांगण्याचा अधिकार असतो हें प्रसिद्धच आहे. तेव्हां तो मुद्दा संपला. नंतर मॅाँटेग्यूंनीं मेस्टन यांना असें विचारलें कीं, हिंदी लोकमतातर्फें इतका पुरावा कमिटीपुढें आला आहे त्याची वाट काय ? बिलाची योग्य दिशेनें सुधारणा व्हावी अशी जोराची मागणी पुढें आली आहे त्याला उत्तर काय द्यावें ? यांवर मेस्टन साहेब म्हणाले कीं, वरिष्ठ कारभारांत लोकांना सत्ता देण्याला सरकार तयार नाहीं, फारच झालें तर तोडून देण्याच्या खात्यांत आणखी थोडी भर घाला म्हणजे झालें.

मंगळवारीं संध्याकाळीं मेस्टन यांची साक्ष संपल्यावर डॉ. सप्रू यांची साक्ष घाईघाईनें घेण्यांत आली व संपलीहि. सप्रू यांनीं थोडक्यांत पण जोरदार भाषेंत शिक्षणखातें लोकांना तोडून कां द्यावें याची चर्चा केली व त्यांची उलटतपासणी एकदोन प्रश्नांतच संपली. अशा रीतीनें कमिटीचें बरेंचसें काम संपलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कमिटीपुढील साक्षीचा वृत्तांत कित्येक वाचकांस कदाचित् कंटाळवाणा वाटण्याचा संभव आहे; तथापि रूटरच्या तारा तिकडे या विषयावर गेल्या तर फारच त्रोटक जात असतील, व छापील साक्षी अद्यापि प्रसिद्ध झाल्या नाहींत. याकरितां साक्षी-धुराव्याची कल्पना येण्याकरितां तो वृत्तांत मुद्दाम दिला आहे. असो. सर्व-चजण येथें हल्लीं सुटी घेत आहेत. तेव्हां पुढील आठवड्यास मींहि सुटी घेणार आहे, म्हणून केसरीच्या वाचकांना भेट देणार नाहीं.

## पत्र नं. १९

### ( ता. ११ सप्टेंबर १९१९ )

या आठवड्यांत सिलेक्ट कमिटी बंद असली तरी डेप्युटेशनांचें खासगी काम बरेंच झालें. लो. टिळक गेल्या शुक्रवारीं ग्लासगोकडे गेले ते दोन दिवसांनीं परत येतील. ग्लासगो येथें जातांच त्यांचे कामास सुरुवात झाली. शनिवारीं 'युनियन ऑफ डेमोक्रॅटिक कंट्रोल' या संस्थेच्या विद्यमानें सभा भरली होती. मि. विशार्ट यांच्या अध्यक्षतेखालीं मि. बक्स्टन व रामसे मॅकडोनाल्ड यांनीं भाषणें केलीं. सभेचे पाहुणे म्हणून अध्यक्षांनीं टिळकांचें स्वागत केलें व हिंदी लोकांच्या कार्यास या सभेचीच काय पण या संघाची निरंतर सहानुभूति मिळेल असें आश्वासन दिलें. सोमवार ता. ८ रोजीं ॲव्हेन्यू नामक नाटकगृहांत इंडिपेंडंट लेबर पार्टीच्या विद्यमानें 'हिंदी राजकीय सुधारणा' या विषयावर टिळकांचें स्वतंत्र व्याख्यान झालें. या सभेस शेंकडों लोक हजर होते. त्याच दिवशीं सायंकाळीं सेंट ॲड्र्यूज नामक शहरच्या मुख्य सभागृहांत ट्रेडस युनियन काँग्रेसची अत्यंत महत्वाची परिषद भरली होती. या परिषदेपुढें परिषदेबाहेरच्या वक्त्यांचीं भाषणें झालीं. त्यांतील मुख्य भाषण टिळकांकडे होतें. सभागृहांतील पांचसहा हजार श्रोतृवृं-

द्यांनीं उत्थापनपूर्वक टिळकांचें जंगी स्वागत केलें. टिळकांनीं थोडक्यांत डेप्युटेशनचे हेतु परिषदेस सांगून तुमची सर्वांची सहानुभूति असेल तरच हें आमचें अवघड काम होईल अशी कळकळीची विनंति केली. नंतर परिषदेच्या खास कार्यक्रमास सुरुवात झाली. तथापि परिषदेपुढील विषयावर रामसे मॅकडोनाल्ड यांचें जें मुख्य भाषण झालें, त्यांत टिळकांनीं केलेल्या विनंतीस अनुलक्षून व लेबर पक्षास उद्देशून त्यांनीं मुद्दाम भाषण केलें. ते म्हणाले कीं ' हिंदुस्थानांत सरकारविरुद्ध लोकपक्षाचीं जीं गाऱ्हाणीं आहेत, त्यांना जीं दुःखें भोगावीं लागत आहेत, त्यांची प्रत्यक्ष देहमय-मूर्ति म्हणजेच टिळक असें समजा व आज तेच स्वतः तुमच्यापुढें उभे आहेत, व हिंदी लोकांना राजकीय स्वातंत्र्य मिळण्याविषयीं जो झगडा सुरू आहे त्यांत मदत करा अशी विनंति करीत आहेत तरी तुमच्या वतीनें मी त्यांना आश्वासन देतों कीं, ही मदत स्वतंत्र मजूरपक्षाकडून त्यांना अवश्य मिळेल. सोशिॲलिस्ट उर्फ समाजसत्तावादी लोकांचा पक्ष हा अमुक एका देशाचाच आहे असें नाहीं, तर जगांतील कोणत्याहि भागांत न्याय, स्वातंत्र्य, लोकमत यांचाच अंमल चालू व्हावा अशाविषयीं त्याचे प्रयत्न अव्याहत चालू असतात.' असो. ही सभा झाल्यावर त्याच दिवशीं रात्रीं ' ग्लासगो इंडियन यूनिअन ' नामक संस्थेच्या विद्यमानें इंग्रज स्कॉच व हिंदी अशा सर्व लोकांना मिळून ॲट-होम-पार्टी देण्यांत आली होती. या ठिकाणीं मजूर–पक्षाशिवाय इतर पंथांचेहि लोक होते. त्यांना उद्देशून टिळकांनीं सुमारें एक तासभर भाषण केलें. रा. नामजोशी वगैरे इतर हिंदी गृहस्थांचींहि भाषणें झालीं. ता. १० रोजीं 'वुइमेन्स वर्कर्स' नामक स्त्री संघाची सभा होती, तेथेंहि टिळकांनीं लहानसें भाषण केलें. नंतर त्या दिवशीं टिळक एडिंबरोस निघून गेले. तेथें त्यांना रात्रीं मेल हिल टेरेस येथें स्थानिक हिंदी लोकांकडून मेजवानी व्हावयाची होती.

खुद्द लंडन येथील हकीकत थोडक्यांत खालीलप्रमाणें आहे. ता. २८ आगष्ट रोजीं दक्षिणआफ्रिकेंतील हिंदी लोकांविरुद्ध केलेल्या कायद्याच्या संबंधांत मॉँटेग्यूसाहेबांकडे हिंदी डेप्युटेशन गेलें होतें. प्रत्येक शिष्टमंडळा-पैकीं कांहीं कांहीं गृहस्थांशिवाय सर विल्यम मायर, सर जॉन रीज, मि. युसफ अली वगैरे कांहीं इतरहि होते. बाबू सुरेंद्र यांनीं डेप्युटेशनची कैफि-

यत वाचून दाखविल्यावर सुरेंद्र सप्रू, मायर, रीज यांनीं प्रत्येकीं लहानसें भाषण केलें, उत्तरादाखल मि. मॉँटेग्यू यांनीं जोराचें व सहानुभूतिपूर्ण भाषण केलें. कायदा होऊन गेला, चौकशीकरितां कमिटी नेमली जाणार आहे, त्यावर एक सरकारी व एक खासगी गृहस्थाची नेमणूक व्हावी अशी शिफारस वसाहतसरकारामार्फत हिंदुस्थानसरकार करणार, व ती प्रायः मंजूर होणार असें दिसतें. सर बेंजामिन रॉबर्टसन यांस दक्षिणआफ्रिकेंत पाठविण्यांत येणार आहे. आफ्रिकेच्या या प्रश्नानें एक गोष्ट हिंदी लोकांच्या मनावर चांगली ठसते. आमच्यावर पारतंत्र्याचीं पुटावर पुढें चढलेलीं आहेत. एक घासून निघालें तरी दुसरें त्याखालून उमटतेंच ! राजकीय सुधारणांच्या बाबतींत स्टेटसेक्रेटरी अनुकूल तर हिंदुस्थानसरकार प्रतिकूल व या दक्षिणआफ्रिकेच्या बाबतींत हे दोनही अनुकूल तर वसाहतसरकार प्रतिकूल ! साम्राज्यसरकारची आम्ही सर्व प्रजा; पण वसाहतसरकार स्वराज्य-शाली म्हणून त्याचें चालते व आम्ही स्वराज्यविहीन म्हणून आमचें चालत नाहीं. साम्राज्यसरकारचें छत्र सर्वांवर सारखें असावें, पण वसाह-तींवर त्याची छाया भरपूर पडते आणि आमच्यावरचें छत फाटकें असल्या-मुळें आम्ही उन्हांत करपतों. वसाहतींवर उद्यां शत्रूची स्वारी झाली तर, साम्राज्यसरकार हिंदी सैन्य सत्तेनें तिच्या रक्षणार्थ पाठवील. पण हिंदी लोकांना वसाहतींवर नीट वागवा म्हणण्याला मात्र सरकारला सत्ता नाहीं.

सोमवार ता. १ सप्टेंबर रोजीं एसेक्स हॉलमध्यें सय्यद हसन इमाम यांच्या अध्यक्षतेखालीं पंजाब–प्रकरणीं लोकमत व्यक्त करण्याकरितां सभा भरली होती. याच्या आधीं तीन दिवस ब्रिटिश कॉंग्रेसकमिटीतर्फे डॉ क्लार्क-डॉ. रुदरफर्ड व मि. हॉलफर्ड नाईट यांचें डेप्युटेशन मॉंटेग्यूसाहेबांशीं याच विषयावर बोलण्याकरितां गेलें होतें. या प्रसंगीं मॉंटेग्यूसाहेबांनीं बरेंच सहा-नुभूतिपर भाषण त्यांच्याशीं केलें व दुसरे दिवशीं ब्रिटिश कॉंग्रेसकमिटीनें ठराव करून मॉंटेग्यूसाहेबांस आपलें मत म्हणून असें कळविलें कीं, पंजाब–प्रकरणाची चौकशी करणार तर कामिटीवर राष्ट्रीय सभेतर्फे कोणी तरी लोकनियुक्त न्यायाधीश असावा. या ठरावावरून उघडच अनुमान निघतें कीं. या कामिटीच्या सभासदांची निवड एकपक्षीय होणार असा डेप्युटेश-नच्या मंडळीचा ग्रह मॉंटेग्यूच्या बोलण्यावरून झाला. असावा व हल्लीं

कमिटीची जीं नावें जाहीर झालीं आहेत त्यावरून ही भीति साधार होती असेंच ठरतें. असो. या प्रकरणीं ब्रिटिश कॉंग्रेसकमिटीप्रमाणें लंडनमधील हिंदी लोकांचेंहि मत सरकारच्या कानावर जावें याकरितां वरील सभा भरविण्यांत आली होती. प्रथम हसन इमाम यांनीं सुमारें पाउण तासपर्यंत पंजाबची सर्व हकीकत समजावून सांगितली. आणखीहि ते बोलले असते; पण कित्येक पंजाबी गृहस्थांचीं अपीलें प्रिव्ही कौंसिलपुढें असल्यामुळें व्यक्तिशः झालेल्या अन्यायाबद्दल त्यांना मौनव्रतच पतकरावें लागलें. त्यानंतर दोनतीन ठरावांवर मिळून हॉर्निमन, बिपिन चंद्र पाल इत्यादि हिंदी व कमांडर केनवर्दी, मि. लान्सबरी वगैरे युरोपियन गृहस्थांचीं भाषणें झालीं. भाषणें जीव तोडून झालीं हें सांगावयास नकोच. लान्सबरी यांनीं असें सुचविलें कीं, ही अत्याचारांची माहिती इंग्लंडच्या शहरानशहरीं जाऊन सांगितली पाहिजे पण याला मनुष्यबळ व द्रव्यबळ अर्थात् फार पाहिजे, तें कोठून मिळणार ?

या सभेंत एक गोष्ट दिसून आली ती ही कीं, लंडनमधील कांहीं हिंदी लोकांच्या मतें निषेधाची मजल शब्दापलीकडे जाऊन तिला सरकारावर निदान नवीन सुधारणांवर बहिष्कार घालण्याच्या कृतीचें स्वरूप यावें. किंबहुना मि. सकलादावला, मि. सत्यमूर्ति, मि. चमनलाल यांनीं अशा अर्थाची उपसूचना पुढें आणून तीवर वादविवादहि करविला. पण लो. टिळक व लंडनमधील कायमचे रहिवासी बॅरिस्टर डुबे व पारिख यांनीं या उपसूचनेविरुद्ध भाषणें केलीं व अखेर मोठ्या बहुमतानें ही उपसूचना नामंजूर झाली. लोकांचे नागरिकत्वाचे मूलभूत हक्क नष्ट झाले तर सुधारणा आम्हाला कितपत अंगीं लागणार ? याच दृष्टीनें राष्ट्रीय सभेच्या डेप्युटेशनाच्या लेखी कैफियतींत लोकांना व्यक्तिस्वातंत्र्याची सनद आधीं दिली पाहिजे अशी मागणी करण्यांत आली आहे. तथापि उपसूचनेच्या स्वरूपाचा ठराव लंडनमध्यें न होतां तो हिंदुस्थानांत हिंदी लोकसमूहाच्या संमतीनें झाला पाहिजे. लंडनमध्यें भाषणें किंवा ठराव करतांना हिंदुस्थानांतील लोकस्थितीचा विसर पडून उपयोगी नाहीं हा युक्तिवाद सभेंतील बहुमतास पटला व सत्यमूर्तींची उपसूचना नामंजूर झाली. वास्तविक अशाप्रकाराची उपसूचना आपल्यापैकींच एकाकडून आयत्या वेळीं पुढें येणेंच योग्य नव्हतें. पण सत्यमूर्ति यांचा समावेश कॉंग्रेसच्या खास डेप्युटेशनमध्यें

पंडित मदन मोहन यांनीं न केल्यामुळें ते केवळ व्यक्तिशः मनास वाटेल त्याप्रमाणें भाषणें करीत असतात. 'हिंदी' पत्रास सत्यमूर्ति यांचीं पत्रें एक-तर्फी किंबहुना व्यक्तिविषयक मजकुरानेंच अशीं जातात याचें आश्चर्य पुष्कळांस वाटतें असें मला समजलें आहे. पण या सर्वांच्या मुळाशीं काय आहे याचा उल्लेख केव्हां तरी मला करावयाचा होता तो नाइलाजानें या प्रसंगीं केला आहे. सत्यमूर्ति हे डेप्युटेशनमध्यें नाहींत हें लक्षांत ठेवूनच त्यांचीं भाषणें व हालचाली यांचा वृत्तांत वाचला पाहिजे.

मंगळवार ता. २ रोजीं मिसेस नायडू यांच्या निमंत्रणावरून इलायजी भोजनगृहांत अनेक शिष्टमंडळांची मंडळी जमली होती. निमंत्रण बाईच्या नांवाचें असलें तरी त्या निमंत्रणाची यजमानकी रामस्वामी अय्यर यांच्या-कडेहि थोडीबहुत असावी असें दिसलें. मिसेस नायडू या विचारानें नॅशन-लिस्ट आहेत, पण सर्व पक्षांशीं त्या समत्वानें वागतात. रामस्वामी यांस नेमस्त पक्षांत फिरून घेतलें गेलें असतें तर ते त्यांत यापूर्वींच जाऊन मिस-ळावयाचे. असो. या प्रसंगीं कमरेवर हात ठेवून भाषणें झालीं नाहींत. पण तशीं झालीं नाहींत हेंच बरें. कारण बोलण्याची हौस असणाऱ्या कांहीं लोकांना येथें श्रोतृगण केवढा किंवा कसा आहे याचें फारसें भान रहात नाहीं, याचें प्रत्यंतर दुसरेच दिवशीं आलें. या दिवशीं हिंदी प्रेस असोसि-एशनच्या वतीनें एक उपभोजनाविधि गटी नामक भोजनगृहांत झाला. या समारंभाचा हेतु लंडनमधील प्रमुख वर्तमानपत्रकारांस एकत्र करून त्यांना हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांच्या मुस्कटदाबीची हकीकत सांगावयाची. पण या वेळीं पुष्कळ लोक बाहेर गेलेले, त्यांतून या समारंभाच्या दिवशीं व या घटकेला लॉर्ड बरनहॅम यांच्या विद्यमानें नेमस्त पक्षांतील कांहीं लोकांनीं अशाच प्रकारचा दुसरा एक समारंभ घडवून आणण्याचें ठरविलें होतें. यामुळें जागेवर असणाऱ्या वर्तमानपत्रवाल्यांची दोन ठिकाणीं वांटणी झाली. गटी भोजनगृहाच्या वांटणीस लान्सबरी, हॉबसन, बेलसफर्ड, रॅटक्लिफ वगैरे मंडळी आली होती. अशा प्रसंगीं हिंदी लोकांचीं भाषणें शक्य तितकीं कमी होऊन येथील इंग्रज लोकांना बोलण्याची संधि अधिक द्यावयास पाहिजे होती. पण ज्यांच्याकडे या समारंभाचें काम गेलें होतें त्यांनीं म्हणजे हॉर्निमन व रंगास्वामी अयंगार यांनीं तर बोलून घेतलेंच; पण वाडिया व

सत्यमूर्ति यांनाहि भाषणें करण्याची सूचना करण्यांत आली. यामुळें वेळ तर धुष्कळ लागलाच, पण भाषणेंहि व्हावीं तशीं झालीं नाहींत.

उदाहरणार्थ, वाडिया म्हणाले कीं, सर्व वर्तमानपत्रकारांनीं एक दिवस ठरवून प्रेसआक्टाविरुद्ध जाणारा असा एखादा ठराविक लेख प्रसिद्ध करावा. त्याचा हेतु असा कीं, असें झालें म्हणजे मग सरकार काय करील ? सरकार काय करील हें जसें काय वाडिया यांना माहीतच नाहीं. आक्षेपार्ह लेखाकरितां ' मद्रास मेल ' सारख्या ॲंग्लो इंडियन–पत्रावर किंवा ' लीडर ' सारख्या नेमस्त पत्रावर सरकार कायद्याचें शस्त्र चालवीत नाहीं या गोष्टी स्वतः वाडिया यांनीं पूर्वी आपल्याच भाषणांत सांगितल्या होत्या. तेव्हां त्यांनीं सुचविलेली युक्ति अमलांत आणल्यास सरकार काय करील हें निराळें सांगावयास कशाला हवें ? सत्यमूर्ति यांनीं तर त्यांच्या-वर ताण केली व सर्व हिंदी वर्तमानपत्रांवरच ते घसरले. ते म्हणाले अजून वर्तमानपत्रें लिहावें तसें जहाल लिहीतच नाहींत म्हणून असें होतें. हा आक्षेप दोन दृष्टीनीं खोटा होता. एक तर ज्यांनीं ज्यांनीं आपल्या पत्रांकरितां जामीनकीच्या रकमा दिल्या होत्या, असेच वर्तमानपत्रकार या प्रसंगीं हजर होते; शिवाय गेल्या तीन महिन्यांत प्रेस आक्टानें कसा धुमाकूळ घातला त्याची हकीकत प्रसिद्धच आहे. पण सत्यमूर्तींना अद्यापि दुसऱ्याच्या वर्तमानपत्रांत पत्रें लिहिण्यापलीकडे जबाबदारीचा अनुभव नाहीं, व त्यांना सर्व जग अद्यापि नेमस्तच दिसत आहे; तेव्हां त्यांच्या कल्पना अशा रहाव्या हें स्वाभाविकच आहे. पण या दोघांचें बोलणें युक्त असो अयुक्त असो, त्या प्रसंगास तरी आपापल्यांत विरोधी अशीं भाषणें न होतां इंग्रज वर्तमानपत्रकारांचीं मतेंच अधिक कळावयास पाहिजे होतीं !

एकदोन इंग्रज पत्रकार बोलले. त्यांच्या भाषणांतील मुद्दा हा होता कीं, हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांची स्थिति प्रेसआक्टामुळें वाईट झाली आहे ही गोष्ट खरीच पण आजच्या घटकेला खुद्द विलायतेंतहि लेखनस्वातं-त्र्यास बराच आळा पडला आहे. 'डोरा'–डिफेन्स ऑफ धिरेल्म आक्ट या कायद्यानें युद्ध सुरू असतां बराच जाच केला. पण प्रत्यक्ष जाचापेक्षां येथील सरकार अनुग्रहशस्त्रानें अर्थात् आवडत्यांना लालूच देऊन आपला हेतु अधिक साधीत आहे. या दोषाचे धनी लालूच देणाऱ्या सरकारा-

प्रमाणें ती घेणारे वर्तमानपत्रकर्तेंहि आहेत ही गोष्ट खरी; पण आज इंग्लंडांत दोनतीन वर्तमानपत्रांखेरीज मनास येईल तें स्पष्ट बोलणारीं वर्तमानपत्रें नाहींत, येवढें निर्विवाद आहे. पण इंग्लंडांत स्वराज्याप्रमाणें स्वकीयांचें राज्य असल्यामुळें सत्तेचा प्रकार ताटांत सांडलें काय वाटींत सांडलें काय असा आहे हें विसरतां येत नाहीं.

व्याख्यानांच्या कार्यक्रमास सुरुवात झाली आहे. गेल्या आठवड्यांत दादासाहेब खापर्डे दक्षिणवेल्स प्रांतांत पार्टिप्रिड येथें व्याख्यानाकरितां जाऊन आले; त्यांच्याबरोबर रा. प्रधान यांस पाठविण्यांत आलें होतें. ता. ७ रोजीं कार्डिफ येथें बाबू बिपिन चंद्रपाल व आसामचे प्रतिनिधि बारडोलाई हे गेले होते. या सभेस सुमारें एक हजार लोक होते. पालबाबूंचें भाषण सुमारें दीड तास झालें. कॉंग्रेसच्या ठरावांना धरून ठराव व पंजाबसंबंधीं ठराव मंजूर करण्यांत आले. ज्या त्या ठिकाणच्या लोकांनीं आपल्या तर्फें निवडून दिलेल्या पार्लमेंटांतील सभासदांना आपलें मत कळवून त्यांजकडून पार्लमेंटमध्यें हिंदुस्थानासंबंधीं खटपट करवावी असाहि एक भाग ठरावांतून होता. ता. १०, ११ व १२ या तीन दिवशीं पुनः कार्डिफ व त्याजवळच्या गांवीं मिळून तीन सभा व्हावयाच्या आहेत व त्याकरितां येथील पूर्वींच्या रहिवाश्यांपैकीं दीप नारायण सिंह, चमनलाल व मिश्र हे गेले आहेत. ता. १२ रोजीं बोर्नमथ येथें सभा आहे. त्याकरितां दिवाण माधवराव, दादासाहेब खापर्डे, मिसेस नायडू, पटेल वगैरे मंडळी जात आहेत. ता. १९ ते २४ पर्यंत फिरून साउथवेल्समध्यें सभा आहेत. त्यांकरितां बाबू बिपिन पाल व मि. हॉर्निमन यांची योजना करण्यांत आली आहे.

पंजाब प्रकरणाची चौकशी करण्याकरितां नेमलेलें कामिशन येथें कोणासच पसंत नाहीं. लोकमताच्या दृष्टीनें काम करणारीं अशीं सहांतील एकदोनहि माणसें नाहींत. निदान एक तरी सभासद लोकांच्या—अर्थात ऑलइंडिया कॉंग्रेसकामिटी व मास्लिम लीग यांच्या—पसंतीचा असावा अशासंबंधानें ब्रिटिश कॉंग्रेसकमिटीनें स्टेटसेक्रेटरी यांच्याशीं पत्रव्यवहार केला, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. कामिशनची नेमणूक व्हाइसरॉयसाहेबांनीं जाहीर केल्याची त्रोटक हकीकत येथें मंगळवारीं कळली. त्याच दिवशीं

ब्रिटिश कॉंग्रेसकमिटीची जादा सभा भरविण्यांत येऊन या बाबतींत कमिशनची कारवाई असमाधानकारक आहे या मुद्याला अनुलक्षून ठराव करून तो स्टेटसेक्रेटरीकडे पाठविण्यांत आला. या संबंधानें लवकरच येथें एक जाहीर सभा भरविण्याचा कॉं. कमिटीचा विचार आहे.

## पत्र नं. १६

### ( ता. १८ सप्टेंबर १९१९ )

दक्षिणवेल्स, बोर्नमाउथ व सॉउथॅम्टन येथें व्याख्यानाकरितां गेलेली डेप्युटेशनची मंडळी परत आली. लो. टिळक व डॉ. वेलकर हेहि एडिंबरोहून परत आले. या सर्वांच्या मिळून या आठवड्यांत कमींत कमी दहा सभा झाल्या. सरोजिनी नायडू यांचीं भाषणें लोकांस फार आवडलीं. दादासाहेब खापर्डे यांच्या विनोदाची छाप पडून एका सभेंत त्यांना हिंदुस्थानचे 'मार्कट्वेन' म्हणजे मूर्धाभिषिक्त विनोदी व्याख्याते अशी पदवी एका गृहस्थानें दिली. या सभांपैकीं अर्थात् कांहीं लहान, पण कांहीं बऱ्याच मोठ्या होत्या. सहानुभूतीच्या दृष्टीनें वेल्स व स्कॉटलंड यांचा नंबर इंग्लंडपेक्षां वर लागतो. स्कॉटलंड व वेल्स या दोनहि प्रांतांत राष्ट्रीयत्वाची जागृति चांगलीच असून तेथील लोक आमच्याप्रमाणेंच होमरूल मागत आहेत, आपला पैसा इंग्लंड खर्च करतें असें म्हणत आहेत, व सर्व देशांच्या कारभाराला एकटें एक व अवजड पार्लमेंट निरुपयोगी असून त्यामुळें आपल्या राष्ट्रीय सुधारणा मागें पडतात किंवा हाणून पाडतात अशी तक्रार करीत आहेत. अर्थात् त्यांच्या व हिंदी लोकांच्या मनांत एक प्रकारचें समरसत्व आहे.

बेझंटबाई व्याख्यानें देत बाहेर फिरत आहेत. बरोबर रा. तेलंग, वाडिया, जमनादास हे आहेत. वाडिया हे ग्लासगो येथील ट्रेड्स युनियन सभेला विलायतेबाहेरचे प्रतिनिधि म्हणून हजर होते. वाडिया यांचीं भाषणें मजूरपक्षास बरींच आवडतात. कारण ते थेट मजूरपक्षाच्या दृष्टीनें बोलतात. बेझंटबाईच्या खटपटीनें मजूरपक्षानें त्यांस एक पदक दिलें. लंडन येथें एक साप्ताहिक वर्तमानपत्र काढण्याच्या खटपटींत बाई असून

नेमस्तपक्षाच्या कांहीं प्रतिनिधींच्या सल्ल्यानें व सहाय्यानें हें पत्र आक्टोबर एक तारखेपासून प्रसिद्ध होऊं लागेल असें वाटतें.

चळवळीच्या दृष्टीनें राहता राहिलें आयर्लंड, पण आयर्लंडांत जाऊन हिंदुस्थानांकरितां चळवळ करण्याची आज सोय नाहींच, वस्तुतः गरजहि नाहीं. होमरूलकरितां आयर्लंडांत जाऊन चळवळ करावयाची म्हणजे उघडा दरवाजा उघडण्याचें श्रम करण्यासारखें निरर्थक आहे. किंबहुना आयरिश लोकांपुढें आपला प्रश्न काढण्याची हिंदी लोकांची छातीच नाहीं. याचा अनुभव आम्हांस खुद्द इंग्लंडांतहि येत आहे, मग तिकडे जा कशाला ? इंग्लंड, स्कॉटलंड वगैरे ठिकाणीं सभा होतात किंवा खाजगी चहापार्ट्या वगैरे होतात तेथें, श्रोतृवर्गांत आयरिश लोक भेटतात व ते आम्हाला आमची भूक होमरूलनें भागेल म्हटलें तर नुसते हंसतात झालें ! ते म्हणतात आम्ही मूठभर आयरिश लोक, सत्तर मैलांवरचे म्हणजे इंग्लंडच्या टांचेखालीं सांपडलेले, स्वातंत्र्य मागतों, आणि तुम्हीं सहा हजार-मैलांवरचे तीस कोटि लोक नुसतें होमरूल मागतां ! तुम्ही माणसें आहां, कीं जनावरें ? पण अशा प्रश्नांस उत्तर देण्याच्या भानगडींत न पडावें हेंच श्रेयस्कर असें आम्हांस वाटून आम्ही प्रायः गप्प बसतों. बारा वर्षांपूर्वी तुम्हीं आयरिश लोक झाला तरी स्वातंत्र्य कोठें मागत होतां ? होमरूलवरच तुमचीहि तहान भागत होतीच कीं नाहीं ? विलायतसरकार गाढव म्हणून वेळेवर तुम्हांस होमरूल नसलें तरी पार्लमेंटांत तुमचे ऐंशी सभासद, तुम्हांला पार्लमेंटांतलि पक्ष एकमेकांविरुद्ध लढविण्याचें साधन आहे, सिव्हिल सर्व्हिस व लष्कर यांतल्या वरिष्ठ जागा तुम्हाला इंग्रजांप्रमाणें मिळूं शकतात, अमेरिकेसारखा तुम्हाला पाठिराखा आहे. तात्पर्य, इतर बऱ्याच गोष्टींत स्वास्थ्य असल्यामुळें तुम्हांला स्वातंत्र्य आठवतें, आमची गोष्ट तशी नाहीं, दुष्काळ पडला तर म्हणे दूधभातच का नाहीं खात, असें तुम्ही आम्हांस विचारतां, पण त्याचा काय उपयोग ? व त्याला आम्ही उत्तर तरी काय द्यावें ? असे उलट प्रश्न विचारून आम्ही वेळ मारून नेऊं शकतों. आयरिश लोकांचें या युक्तिवादानें अर्थातच समाधान होत नाहीं; पण सांगावयाचा मुद्दा इतकाच कीं; त्यांचें समाधान होवो न होवो, आमच्या होमरूलच्या मागणीला आयरिश लोक सोळा आणेच

तर काय पण अठरा आणे अनुकूल आहेत ! मजूरपक्षाइतकें देखील त्यांचें मन वळविण्याचे श्रम नाहींत. आयरिश सभासद पूर्वी पार्लमेंटांत हजर रहात तेव्हां त्यांनीं सदैव हिंदुस्थानास मदतच केलेली आहे. व आज जर ते सिनफेनर बनले नसते तर आम्हांस हल्लींच्या बिलाच्या कामीं त्यांचा पुष्कळच उपयोग झाला असता.

आयर्लंडमध्यें गेल्या दोन दिवसांपासून धुमश्चक्री माजल्याचें वर्तमान तुम्हाला तारेनें कळलेंच असेल. पण या धुमश्चक्रीबद्दल खुद्द इंग्लंडच्या लोकांस काय वाटतें याचें सूक्ष्म प्रत्यंतर परवांच्या लंडन टाइम्सच्या अग्रलेखांत पहावयास सांपडलें. या अग्रलेखाचा सारांश रूटर तारेनें हिंदुस्थानास सहसा पाठविणार नाहीं या समजुतीनें तो खालीं थोडक्यांत देतों. पण त्यापूर्वी फक्त एकच गोष्ट सांगणें जरूर आहे ती ही कीं, गेल्या महिन्यांत टाइम्सनें अमेरिकेला खूष करण्याकरितां आयर्लंडला वसाहतीच्या नमुन्याचें स्वराज्य द्यावें अशी जोराची चळवळ केली. तिचा उपयोग झाला नाहीं याचें टाइम्सला अर्थात वैषम्य वाटलें, पण त्याचा सदुपयोग इतकाच झाला कीं, आयर्लंडांतील असंतोषावर टाइम्सनें हत्यार उपसून उठावयाचें तें न करितां त्यानें त्या असंतोषाचें एक प्रकारें समर्थनच केलें आहे. टाइम्स म्हणतो–" आयर्लंडांतील दंगेधोपे मोडण्याचा प्रयत्न सरकारानें करावा हें ठीकच आहे. पण त्यानें अधिकारी मुत्सद्यांच्या शहाणपणाची दिवाळखोरी झांकत नाहीं. एकानें दंगे करावे व दुसऱ्यानें ते मोडावे या पाठशिवणीच्या भातुकलीच्या खेळापासून कोणासच कांहीं फायदा नाहीं. दडपशाही हाही एक मार्ग आहे पण तो एकतोंडी बोळाप्रमाणें आहे. या बोळांत एक तोंडानें शिरतां येतें पण दुसऱ्या तोंडानें बाहेर मात्र निघतां येत नाहीं. या स्थितीची जबाबदारी सर्वस्वी सरकारावर आहे. अत्याचार हें निराशेच्या परमावधीस जाऊन पोंचलेल्या अल्प संख्यांकाचे शेवटचें हत्यार आहे. आयर्लंडांतील जनसमाजाला अत्याचार व खून आवडतात असें म्हणणें ही गोष्ट खोटी आहे. तसें म्हणणें अन्यायाचें होईल. इंग्रज लोकांचा द्वेष आयरिश लोकांच्या मनांत जुनाच आहे, पण निराशेच्या रोज मिळणाऱ्या नव्या पुराव्यानेंच तो दृढ होत आहे.. स्वराज्याची आशा दिसती तर जे लोक नेमस्तपणानें वागले असते, त्यांनां आज एकीकडे दडपशाही-

सरकार व दुसरीकडे अत्याचारी लोक या दोन दगडांत सांपडून भरडून निघाल्यासारखें वाटत आहे या सर्वांना स्वराज्य देणें हाच उपाय. तो उपाय करवत नसेल तर प्रधानमंडळानें राजीनामा द्यावा ! ”

असो. या दंग्याधोप्यांच्या गोष्टी बाजूस ठेवून या आठवड्यांत दुसऱ्याच एका प्रकारची जी गोष्ट लंडनमध्यें घडली तिच्याबद्दल दोन शब्द अधिक लिहितों. ही गोष्ट म्हणजे सिटी टेंपल नामक धार्मिक सभागृहांत शनवार ते बुधवार भरलेली ‘ विश्वबंधु-मंडळा ’ ची परिषद्. या मंडळाला ही परिषद् यंदा इंग्लंडांतच भरविण्याची प्रेरणा कां झाली माहीत नाहीं. पण तीनचार दिवस परिषदेचें काम पाहून केव्हां गंभीर सोज्वळ विचार मनांत येत तर केव्हां या इंग्रज लोकांच्या ढोंगीपणाचें पोट धरधरून हंसूं येई ! मंडळाचे हेतु जगांतील युद्ध थांबविणें व शांततेच्या काळांत सर्व देशांतील मनुष्यवर्गामध्यें बंधुप्रेम वृद्धिंगत करणें असे आहेत. परिषद् डॉ. क्लिफर्ड यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. हे ८४ वर्षांचे परम पवित्र गृहस्थ केवळ पाटलोण घातलेले ऋषि आहेत, येवढें म्हटलें म्हणजे त्यांत त्यांचें सर्व गुणवर्णन आलें. त्यांचा जन्म धर्मपंथांचें द्वंद्व मोडण्यांत आणि नाठाळांच्या पाठींत कांठया घालण्यांत गेला आहे. त्यांचें अध्यक्ष या नात्याचें भाषण ऐकून कोणाच्याहि मनांत सत्स्फूर्ति झाल्याशिवाय राहणार नाहीं. पण दैव असें लबाड कीं, त्यानें या विश्वबंधुत्वाच्या परिषदेंत लॉइड जार्जसारखे पाताळयंत्री राजकीय मुत्सद्दीहि आणवून परिषदेचें मातेरें केलें ! या परिषदेस अनेक देशांचे लोक आले होते, पण त्यांतल्या त्यांत बहुतेक साम्राज्यांतलेच होते. आमच्या राष्ट्रीय सभेतर्फे डेप्युटेशनची मंडळी या परिषदेस प्रतिनिधि म्हणून गेली होती. प्रार्थना, व्याख्यानें, धर्मोपदेश, चर्चा या सर्वांना आम्ही मधून मधून हजर होतों. सोमवारीं लंडनच्या लॉर्ड मेयरनें सर्व प्रतिनिधींना आपल्या इतिहासप्रसिद्ध प्रासादांत ( मॅन्शन हाऊस ) चहास बोलावून सत्कार केला.

मि. स्पेंडर, लॉर्ड रॉबर्ट, सेसील वगैरेंचे निबंध चांगले होते. मि. मैत्र नांवाच्या एका बंगाली गृहस्थानेंहि एक निबंध वाचला. बुधवारीं सकाळीं मुख्य प्रधान मि. लॉइड जॉर्ज यांचें भाषण झालें. आम्ही प्रतिनिधींत

सामील असल्यानें आम्हांस अगदीं चार हातांवरून हें भाषण ऐकावयास सांपडलें. लॉइड जॉर्ज यांचें वक्तृत्व दांडगें आहे; पण त्यांच्या योग्यतेचे वक्ते हिंदुस्थानांतहि अनेक आहेत. त्यांचा आवाज मोठा व चांगला आहे; पण वरचेवर टिपणाकडे पाहणें व चष्म्याच्या घालकाढीचा खेळ करणें यामुळें स्वारस्य जातें. त्यांचे हातवारे व नाटकी थाट हे पूर्वीं शोभत असतील, पण मुख्य प्रधानाच्या दर्जाच्या माणसास ते शोभत नाहींत. ही सभा उत्तमोत्तम लोकांची होती. पण खूप टाळ्या पिटणें वगैरे फाजील दिखाऊ प्रकार अशाहि सभांमधून होतात असें दिसून आलें.

या परिषदेच्या निमित्तानें चार दिवस लंडन शहरांत, निदान त्याच्या एका लहानशा भागांत, बंधुप्रेमाचा पूर वहात होता तो इतका कीं खऱ्या भाविक श्रोत्यांस आपण कलियुगांत नसून सत्ययुगांत, किंवा तत्पूर्वींच्या म्हणून वर्णन केलेल्या सुवर्णयुगांत, आहों असें वाटलें असतें. वर आकाशांत एक बाप आणि खालीं पृथ्वीवर सर्व भाऊबहिणी याशिवाय तिसरा पदार्थ नाहीं ! चार दिवस ईश्वराच्या प्रार्थनेचा एकसारखा मारा सुरू होता. कोणत्याहि कार्यक्रमाच्या आधीं प्रार्थना, मध्यें प्रार्थना व शेवटीं प्रार्थना ! मधूनमधून सर्व सभा मुक्तकंठानें गीतें गायी व हरदास ‘ टाळी महाराज’ म्हणतो त्याप्रमाणें उपदेशक उपदेशाचा कोरडा ओढी. जितका वेळ डोळे उघडून काम चाललें होतें तितकाच वेळ डोळे मिटून चाललें असेल ! ज्या व्यासपीठावरून नुकतेच द्वेषाग्नीचे लोळ उठत होते त्यावरून आतां विश्वप्रेमाच्या गुलाबपाण्याचे हजारे उडूं लागले. ईश्वरस्तुतिरूपी गुलाबाच्या फुलांचा एक थर तर लगेच त्याच्यावर बंधुप्रेमाच्या खडीसाखरेचा एक थर असे पांचपंचवीस थर रचले जाऊन जणुं काय सर्व जगाला खायला पुरण्याइतका मिष्ठ स्वादिष्ट व औषधी गुलकंद बनत होता. मींहि एक वेळ डोळे मिटून अंतर्मुख होत्साता पाहूं लागलों तों पोर्णिमेच्या चांदण्यामध्यें स्फाटिकाच्या मंडपांत बसून ‘ आइसक्रीम ’ खात असल्याप्रमाणें मला अंतर्बाह्य शीतळता वाटली ! मी इंग्रजांचा भाऊ, इंग्रज माझे भाऊ; आतां कसलें साम्राज्य आणि कसला होमरूल ! खुद्द लंडन हेंच पुणें झालें ! ‘हें विश्वचि माझें घर’ असें म्हणून टाळ्याहि पिटल्या असत्या, पण असली समाधी निमिषमात्रच टिकणार !

तथापि, हा सर्वस्वी माझाच दोष होता असें म्हणवत नाहीं. विश्वबंधूंच्या या मेळ्यांत सर्वच भोंदू होते असें मी म्हणेन तर तो अन्याय होईल. कांहीं खास सच्चे होते. पण सूर्यप्रकाशाप्रमाणें तिऱ्हाइतास स्पष्ट दिसणाऱ्या कांहीं गोष्टी यांना दिसत नव्हत्या याचें नवल वाटलें. विश्वबंधुत्वाची इमारत बांधावयाची. पण यांचा विचार ती ख्रिस्ती धर्माच्या पायावर बांधावयाची, ख्रिस्ती धर्माचे अनुयायी नसणारे लोक जर या परिषदेस सभासद म्हणून जाऊं शकतात, तर नुसत्या ईश्वराचे नांवानें प्रार्थनादि कां होऊं नये ? त्यांत ख्रिस्ताचें नांवच कशाला ? बरें, तुमचा ख्राइस्ट तर आमचाहि राम काढून तेथें त्याच्या नांवानें प्रार्थना करा म्हटलें असतें, किंवा आमची आम्हीहि केली असती तर तें मात्र चाललें नसतें ! 'ख्रिस्ती विश्वबंधुत्व ' हा शब्दप्रयोग 'ब्राह्मणांचा जगद्गुरु' या शब्दप्रयोगाप्रमाणेंच अतिव्याप्तिदुष्ट नव्हे काय ? पण हा भोळसरपणा नुसत्या धर्मकल्पनेपुरताच नव्हता. विश्वबंधुत्वाच्या या गोमुखीला आंतून साम्राज्यमूलक स्वार्थपरायणतेचें खूप जाड अस्तर लावलें होतें. या विश्वबंधुपरिषदेचा हेतु राष्ट्रसंघाला मदत करण्याचा आहे. राष्ट्रसंघाच्या हातून जगाची शांतता कितपत राहणार हें दिसतच आहे. पण राष्ट्रसंघाच्या अंतर्व्यवस्थेंत जो धडधडीत अन्याय दिसून येतो तोहि या मायावी लोकांच्या नजरेस पडत नाहीं, असा बहाणा ! राष्ट्रसंघाच्या रचनेंत इंग्लंडला प्रमुख मान पाहिजे; तो न मिळेल तर कुणा लेकाला हवा राष्ट्रसंघ ? युरोपांतल्या टीचभर परक्या राष्ट्रांच्या हक्कांचें रक्षण करण्यास हा राष्ट्रसंघ निर्माण झाला. पण याच्या अवतारकृत्यांत आजचीं साम्राज्यें मात्र कायमच राहणार ! जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान व रशिया यांचें साम्राज्य मोडलें तर तें चालेल; पण इंग्रजांचें साम्राज्य मात्र अबाधित राहिलें पाहिजे; एवढेंच नव्हे तर त्यांतल्या प्रचंड पुराण राष्ट्रांनीं स्वराज्य मागितलें तर त्यांचा न्याय माल करण्यास या राष्ट्रसंघास अधिकार नाहीं ! आमचें आम्हींच पाहून घेऊं आणि दुसऱ्याचेंहि पण आम्ही पाहूं. हा न्याय ! 'तुम्ही आम्ही भाऊभाऊ पण तुमचें-आमचें आम्हीच खाऊ ! ' ही बंधुप्रेमदर्शनाची उत्सुकता हिंदी लोकांप्रमाणेंच जगांतील इतर अनेकांना हास्यास्पद वाटली तर त्यांत त्यांचा काय दोष ? आपल्या बुडाखालचें तर संभाळायचेंच पण

दुसऱ्याचेंहि साधल्यास हाताखालीं घालावयाचें. या भोळेपणास भाळणारा कोण असेल तो असो ! राष्ट्रसंघांत एक मत अधिक मिळावें म्हणून वसाहतींबरोबर हिंदुस्थानास इंग्लंडनें आपल्याबरोबर घेतलें. अमेरिकेनें हें ओळखून या कावेबाजपणाला हरकत घेतलीच, पण ज्याला आपल्या घरीं स्वराज्याचा मान नाहीं त्याला आमच्या बरोबरीला आम्ही बसवून कां घेऊं असें उघड म्हणून तिनें हिंदुस्थानच्या जखमेंत मीठ भरलें. पण याची लाज इंग्लंडला कोठें आहे ? असेल तर हिंदुस्थानास स्वराज्य दिल्याशिवाय इंग्लंड एक दिवसभरहि रहाणार नाहीं; असो. अशा अंतर्बाह्य विषम स्थितींत विश्वबंधुत्वाचा उपदेश कुणाला करतां ? या परिषदेस जमलेल्या कांहीं लोकांना हें म्हणणें पटण्यासारखें आहे; पण त्यांचें ऐकणार कोण ?

या विश्वबंधूंच्या मेंढयांच्या कळपांत कांहीं लांडगेहि होते. मंगळवारच्या सभेंत सर हॅरी जॉन्स्टन यांनीं 'विश्वबंधुत्व व देशोदेशींचे नेटिव्ह लोक' या विषयावर निबंध वाचला. त्यांत त्यांनीं धडधडीत असें विधान केलें कीं, काळ्या लोकांची सुधारणा गोऱ्यांनीं करून त्यांना उच्च पदाला पोंचविलें त्याअर्थीं त्यांच्या दरम्यानचा आजचा संबंध, अर्थात् वरिष्ठ कनिष्ठ भावाचा, पुढेंहि असाच राहिला पाहिजे. या विधानाचा श्रोतृवर्गापैकीं एका न्यायप्रिय गोऱ्या मनुष्यानेंच निषेध केला; पण आमच्या पालबाबूंनींहि जागच्या जागीं जॉन्स्टनसाहेबांना खणखणीत उत्तर दिलें. हें उत्तर श्रोतृवृंदाला इतकें आवडलें कीं, त्यांनीं अनेक वेळा टाळ्यांचा गजर केला; व पालबाबूंचें भाषण संपल्यावर पांचपंचवीस स्त्रीपुरुषांनीं त्यांच्याशीं हस्तांदोलन करून त्यांचें अभिनंदन केलें.

गेल्या पंधरवड्यांत अमेरिकेंत लाला लजपतराय यांनीं हिंदुस्थानासंबंधानें एक चांगली कामगिरी केली. अमेरिकेंत आमच्या होमरूललीगची शाखा काढून व डॉ. हर्डीकर यांनीं स्वराज्यसंघाच्या प्रसाराचें काम आज कित्येक दिवस मोठ्या परिश्रमपूर्वक चालविलें असून अमेरिकन वर्तमानपत्रांतून आपला प्रवेश बराचसा करून घेतला आहे. हल्लीं अमेरिकेंत शांतता–परिषदेनें मंजूर केलेल्या तहाच्या मसुद्यासंबंधानें फारच वाद माजला असून विलसनसाहेबांचें यश डळमळूं लागल्याचें केसरीच्या वाच-

कांस माहीत असेलच. या संधीचा फायदा घेऊन लाला लजपतराय यांनीं हिंदुस्थानचें घोडें दामटलें. अमेरिकन सेनेटनें वरील मसुद्यास संमति देण्यापूर्वी चर्चा करण्याकरितां 'परराष्ट्रीय' संबंधाची म्हणून एक कमिटी नेमली असून या मसुद्यास साधकबाधक असा पुरावा तिजपुढें मांडला जात आहे, व भाषणें होत आहेत. या कमिटीपुढें हिंदुस्थानच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काचा प्रश्न मि. डडले मॅलोन नामक एका वकिलामार्फत लालाजींनीं ता. २९ आगष्ट रोजीं मांडला. मि. मॅलोन हे गृहस्थ कांही वर्षांपूर्वीं अमेरिकन सरकारचे एक अंडर-सेक्रेटरी ऑफ स्टेट व पोर्ट—कमिशनर होते. हे वकील असतांहि त्यांनीं कांहीं एक फी वगैरे न घेतां, इतकेंच नव्हे तर आपला प्रवासखर्च आपण करून केवळ अमेरिकन नागरिक या नात्यानें कमिटीपुढें आमची शिष्टाई केली. या शिष्टाईचा परिणाम या हाताचा त्या हातावर दाखवितां येण्यासारखा काय होणार ? पण प्रयत्नांत प्रयत्नाची भर. शांतता—परिषदेला टिळकांनीं अर्ज पाठविला होता त्याला धरून त्याच्या पुढची ही पायरी होय. राष्ट्रसंघाची प्राणप्रतिष्ठा होईल तेव्हां याच दिशेनें आणखी प्रयत्न करतां येण्यासारखे आहेत. तूर्त अमेरिकन सेनेटपुढें हा प्रश्न तिच्या पोटकमिटीमार्फत मांडला जात आहे. अमेरिकन सरकारच्या कागदोपत्रीं आमचें म्हणणें दाखल झालें आहे इतकाच ग्राह्यांश. या प्रकरणाची अधिक सुसंगत व सविस्तर माहिती पुढच्या आठवड्याच्या 'इंडिया' पत्रांत मी देणार आहें त्यावरून पहावी.

## पत्र नं. १७

### ( ता० २ आक्टोबर १९१९ )

मागच्या आठवड्यांत लिहून पाठविण्यासारखें फारसें घडलें नाहीं म्हणून नेहमीचें बातमीपत्र पाठविलें नाहीं. या आठवड्यांत लिहून पाठविण्यासारखें बरेंच आहे म्हणून लिहावयास बसलों आहें. पण हें पत्र नेणारें टपाल या आठवड्यास येथून निघतें कीं, नाहीं याची शंका वाटत आहे. पुढील मजकूर वाचल्यावर या शंकेचें कारण कळून येईल.

राष्ट्रीय सभेच्या डेप्युटेशनचें काम हल्लीं व्याख्यानांच्या रूपानें सुरू आहे. लंडनबाहेर सप्टेंबरच्या २५ व्या तारखेस न्यूकॅसल येथें, २६ ला मँचेस्टर, २७ ला डंडी, ३० लिव्हरपूल, आक्टोबर १ फिरून मँचेस्टर येथें, अशीं व्याख्यानें ठरलीं असून तीं देण्याकरितां खापर्डे, सरोजिनी नायडू, पाल, पटेल हे गेले आहेत. ठरल्याप्रमाणें पहिलीं दोन व्याख्यानें पार पडलीं. पण त्यापुढील बातमी अद्यापि आली नाहीं. ता. २६ रोजीं मीं स्वतः एरिथ येथें व्याख्यान देण्यास गेलों होतों. बरोबर ए. रंगस्वामी आयंगार यांस नेलें होतें. हवा फारशी चांगली नव्हती. तथापि पूर्वी ठरल्याप्रमाणें गांवांतलि एका मोठया चवाटयावर उघडया जागेंत व्याख्यान झालें. व्याख्यान करविणार व ऐकणार मंडळी ' स्वतंत्र मजूर ' पक्षाची होती. व्याख्यात्यांप्रमाणें श्रोतृगणहि सर्व वेळ उभाच होता. सभेचा सर्व थाट गणपत्युत्सवांतलि मैदानी व्याख्यानासारखा होता. आम्हां उभयतांचीं भाषणें झाल्यावर एक दोन स्थानिक वक्त्यांचीं भाषणें झालीं, पण आम्हांस अधिक थांबण्यास वेळ नव्हता. मध्यरात्रीच्या आंत परत लंडनला पोंचणें जरूर होते त्याप्रमाणें आम्हीं घाईनें आलों. कारण मध्यरात्रीपासून आगगाडयांवरील प्रचंड संपास सुरवात व्हावयाची होती व त्याप्रमाणें ती झालीहि !

नाटकांत ट्रान्सफर सीन करतात त्याप्रमाणें हा संपाचा घाला अचानक पडला. शुक्रवारीं सकाळीं संप होणार अशी बातमी पत्रांतून वाचली व रात्रीं संप सुरू झाला. याच्याहि आधीं एक दिवस गुप्त खलबतें चालू होतीं म्हणतात. पण सरकार व रेलवेचे लोक यांच्या दरम्यानच्या भांडणांचा कडेलोट, निर्वाणीचा खलिता, व युद्धाचा पुकारा हीं सर्व चोवीस तासांत घडून आलीं ! रात्रीं दहा व बारा यांच्या दरम्यान रेलवेचे लोक आपल्या कामांत शिथिलता करूं लागले व बाराच्या ठोक्यास सर्व इंग्लंड व स्काटलंडभर रेलवेकामगार काम टाकून घरोघर चालते झाले. स्टेशनांस कुलपें पडलीं. शनिवारीं सकाळीं ट्रॅम व बस सुरू होत्या त्यांवरच कामकाजास जाणाऱ्या सर्व लोकांची धाड पडली. शेंकडों लोकांच्या रांगा या वाहनांची वाट पहात तास-तास उभ्या होत्या. रात्रीच्या सुमारास ही गर्दी थोडी कमी झाली; कारण अगदीं जरूरीच्या कामाशिवाय

बाहेर पडून मैल-मैल विनाकारण चालत येण्याचें साहस कोण करणार ? शनिवार व रविवार दोनहि दिवस जवळ जवळ बिनकामकाजाचे असल्यामुळें कसें तरी भागलें. पण फिरून सोमवारपासून दंगल उडाली. लंडनच्या आसपास पन्नाससाठ मैलांपासून रोज शहरांत कामकाजास येणारे धंदेवाले अनेक आहेत त्यांचे तर खाडेच पडले, पण खुद्द शहरची वस्ती या टोकापासून त्या टोकापर्यंत सुमारें बावीस पंचवीस मैल चौफेर पसरलेली आहे; यामुळें शहरांत राहणाऱ्या लोकांचीहि जवळ जवळ तीच स्थिति झाली. विजेच्या चमकेप्रमाणें झालेला हा संप विजेच्या चमकेप्रमाणें संपेल ही आशा नष्ट होतांच सरकार व लोक आपापली सोय करण्याच्या मार्गास लागले. त्यांतल्यात्यांत लोकांपेक्षांहि सरकारावर वाहनांची सोय करून देण्याची जबाबदारी अधिक, यामुळें सरकारनें जाहीरनामा काढून लोकांस धीर दिला व आपलीं सर्व साधनें सज्ज केलीं.

पहिली तयारी सैन्य आणण्याची. कारण दंग्याधोप्यास सुरवात होते कीं काय ही भीति. पण संपवाल्यांचे पुढारी शहाणे आहेत. त्यांनीं संपवाल्यांस थोपवून धरलें. संपवाल्यांना त्यांच्या फंडांतून रोज थोडेंबहुत पोटास मिळण्यासारखें असल्यामुळें बाजारहाट एकदम लुटले जाण्याचें कारण नव्हतें. संपवाल्यांची संख्या पांचलक्ष, पण ती सर्व देशभर पसरलेली. यामुळें सैन्यास दंगेधोपे मोडण्याचें नसलें तरी आगगाडया चालू करण्याचें काम होतेंच. पण त्याहिपेक्षां लोकांस अन्न, भाजीपाला, दूध पुरविण्याचें काम अधिक महत्वाचें होतें. जेथें शें-पन्नास आगगाडया दिवसांत सुटावयाच्या तेथून सैनिकांच्या मदतीनें दहापांच तरी बऱ्या असें मानून लष्करी अधिकारी अस्तन्या सारून इंजिनड्रायव्हर व फायरमन बनले. सरकारी तबेल्यांतल्या सर्व मोटारगाडया बाहेर निघाल्या. हाईड पार्कांत लोकांना मज्जाव करून हजारों मोटारगाडया जमविण्यांत आल्या, व ज्या स्टेशनावरून धान्य, अन्न, दूध वगैरे रोज गांवांत यावयाचें तेथून तें आणून गांवांत घाऊक व्यापाऱ्यांच्या घरीं पोंचविण्याचें काम सुरु झालें. शिवाय हें काम पुरें पडावें म्हणून युद्धाच्या दिवसाप्रमाणें संप चालू असेपर्यंत तिकिटाशिवाय कोणास कांहीं पदार्थ मिळू नये व मिळावयाचा तोही फारच माफक मिळावा, एक आठवड्यापेक्षां

अधिक कोणीहि आपल्याजवळ शिधा ठेऊं नये असे हुकूम सुटले. दिवा-बत्ती, कोळसा, ग्यास जरूरी पुरतीच वापरावी, कामापेक्षां अधिक तारा करूं नये, पत्रें पाठवूं नये असा इशारा देण्यांत आला. सर्व सरकारी नोकरांची रजा रद्द करण्यांत येऊन वाहतुकीच्या कामास उपयोगी पडणारें स्वयंसेवकाचें पथक उभारण्यांत आलें. आरमाराच्या नोकरपेशाची जहाजें टेम्सनदीमध्यें आणून नांगरलीं; सर्व सरकारी व खासगी विमानें कामगिरीस धरून तीं टपाल व पार्सलें नेण्याकरितां व क्वचित् उतारू वगैरेच्या उपयोगा-करितां संचारार्थ योजण्यांत आलीं कारण सरकारला हरप्रयत्नानें संप मोडावयाचा होता.

खासगी लोकांनींहि आपल्या साधनांची शिकस्त केली; मात्र ती संप मोडण्याच्या हेतूनें नव्हे, तर स्वतःच्या सोईकरितां. लोकांस खरोखर एकी-कडे आड व एकीकडे विहीर असें झालें, मनांतून संपवाल्यांशीं सहानुभूति पण संप सिद्धीस जावा म्हणून स्वतःची गैरसोय कोण किती सोसणार? बरें, संपवाल्यांचीहि खरी इच्छा लोकांची गैरसोय व्हावी ही नसून आपली मजुरी वाढावी इतकीच आहे. तात्पर्य दोघांचा कटाक्ष एकमेकांवर नसून सरकारावरच आहे. सरकार व रेलवे—नोकर यांची जंगी कुस्ती पाहण्याची लोकांस हौस आहे. पण पेहेलवानांची कुस्ती पाहतांनां आपल्या अंगावर त्यांची धुडें कोसळूं नयेत किंवा त्यांनीं उडवलेली माती पडूं नये याविषयीं प्रेक्षक जितकी खबरदारी घेतात तितकी खबरदारी येथलि लोक घेत आहेत इतकेंच काय ते. असो. लोकांनीं आपल्या केलेल्या सोयी तजाविजीमुळें शहरांत खूप गडबड उडून राहिली असून नवीन देखावे दिसूं लागले. रस्ते मोटारगाड्यांनीं फुलून गेले. श्रीमंतांच्या मोटारींतून पूर्वीं एखादुसरा मनुष्य तणावून बसलेला दिसावयाचा तेथें स्त्रीपुरुषांची खेंच झाली. ठेवणींतल्या सर्व शोभिवंत चार—चाकी गाड्या व उमदे घोडे बाहेर निघाले असून दोहोंचाहि बैठा शीण लांब मजलांनीं निघून जाऊं लागला. सर्व हरप्रकारच्या वाहनांतून निर्जीव मालाच्या जोडीला सजीव मालहि शींग लागेपर्यंत भरला गेला. बाहेरून लांबून येणाऱ्या भाजीपाल्याच्या गाड्यांतून उत्तम उंची पोषाख केलेले लोकहि बागवानाच्या नोकरासारखे उंच आरूढ झालेले असे रोज सकाळीं

गांवांत येतांना पाहून शहरचे लोक त्यांच्याकडे व ते लोकांकडे पाहून हंसण्याची रेलचेल उडाली. भाड्याच्या मोटारी तर भिंगऱ्यासारख्या फिरत होत्या. साध्या बायसिकली लंडनच्या रस्त्यांनीं पूर्वी क्वचित् दिसत, पण आतां त्यांची अखंड रांग लागून राहिली, येवढेंच नव्हे तर एकानें सायकल चालवावी व त्याच्या मागें दोघांतिघांनीं एकमेकांच्या आंगाखांद्यावर बसावें असे सर्कशीचे खेळ फुकट पहावयास सांपडूं लागले ! पायाला पाय फुटल्याप्रमाणें हजारों स्त्रीपुरुष तुडुतुडु चालतांना दिसत. पायांनीं कोणी किती मजल मारली याविषयीं चढाओढ सुरू झाली. बाहेर प्रांतांत कित्येक लोकांनीं जरूरीच्या कामाकरितां पन्नास–पन्नास मैल प्रवास केल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. अखेर गाढवांच्या गाड्यांतून बसण्यापर्यंत पाळी आली. एका विनोदी पत्रांत चितारलेल्या गाढवाला वाचा फुटली असून तें म्हणतें "बाबांनों घाबरूं नका. मी गाढव जिवंत असे तोंपर्यंत तुम्हाला काळजी नको !" बायबलांतल्या एका शहाण्या 'गाढवाला' अशीच वाचा फुटली होती !

संप मोडण्याचे सरकारचे व टिकून राहण्याचे मजूरपक्षाचे प्रयत्न जोरानें सुरू आहेत. उभयपक्षांची पत्रें उभयपक्षांवर वाटेल ते आरोप करीत आहेत. भांडणाचा खरा मुद्दा लहान आहे. येत्या जानेवारीपर्यंत रेलवेच्या नौकरांना युद्धाची 'महागाई' सरकार देणारच आहे. ड्रायव्हर वगैरे कांहीं नोकरांना पुढेंहि महागाईचे दर असेंपर्यंत महागाई चालू राहणार आहे. पण खालच्या नोकरांना हें आश्वासन देण्यास सरकार तयार नाहीं. म्हणून रेलवे–नोकरांच्या संघाचा पुढारी व प्रधानमंडळ यांचें कान्फरन्स भरलें, त्यांत शब्दाचा गैरसमज होऊन संप पुकारला गेला. "संप केलांतच तर मग ठीक आहे, आतां महागाई देतच नाहीं. असें सरकार घेऊन बसलें, व "केव्हां तरी गोष्ट निकरावर यावयाचीच होती. आतांच आली बरें झालें" असें मजूरपक्षाचे पुढारी म्हणत आहेत. इतक्या तावडतोबीनें संप करूं नका अशी विनवणी प्रधानांनीं केली; पण तावडतोबी हीच संपाच्या यशाची गुरुकिल्ली हें मजूरपक्षास माहीत होतें. गेल्या चार महिन्यांत तीन संप झाले.–एक पोलीसांचा, दुसरा खाणींतील मजूरांचा व तिसरा हा रेलवे–नोकरांचा. पैकीं पहिला फसला, दुसरा साधला

तिसरा साधतो कीं फसतो हें अद्यापि पहावयाचें आहे. प्रत्यक्षापेक्षां अप्रत्यक्ष हेतूच या संपांत मुख्य व महत्वाचे आहेत. पार्लमेंटांत आपलें चालत नाहीं म्हणून सरकारास वठणीला आणण्याचा धोपट मार्ग म्हणून मजूर पक्षानें त्यावर भिस्त ठेविली आहे. संपाचा हेतु बराचसा राजकीय आहे असें जाणून सरकार–पक्षाची वर्तमानपत्रें संपवाल्यांना जहाल, अराजक, अत्याचारी, क्रांतिकारक, बोलशेविक असलीं शेलकीं विशेषणें लावीत आहेत. सुदैवानें जर्मनी या वेळीं आपल्या पराभवामुळें बचावला. नाहीं तर इंग्लंडांत पैसा पेरून त्याच्या प्रभावानें संप घडवून आणल्याचा आरोप त्याच्यावरहि आला असता !

या नुसत्या आरोपांनीं वास्तविक कोणाचाच पाडाव होण्याचा संभव नाहीं. केवळ संप झाला म्हणून प्रधानमंडळ उलथून पडत नाहीं व संपवाल्यांना बोलशेव्हिक म्हटल्यानें आगगाड्यांचीं इंजिनें आपोआप देशभक्तीच्या जोरानें चालूं लागत नाहींत. लोकहि गैरसोईचा कडेलोट होईपर्यंत तटस्थपणानें वाट पहाणार. पण सरकारविरुद्ध रेलवेनोकर असाच सामना पुष्कळ दिवस जुंपून राहिल्यास सरकारची सरशी होण्याचा संभव अधिक दिसतो. याच्या उलट, संपवाल्यांना इतर खात्यांतील मजूरपक्षाची मदत मिळाल्यास सरकारचा पाडाव खास होईल. खाणीवाले, रेलवेवाले, व इतर वाहतुकवाले असे मजूरपक्षाचे मुख्य तीन वर्ग आहेत. सरकार या प्रत्येकास राजकीय शरीरांतील एकेक दोष असेंच मानतें. हे दोष एकएकटे प्रबळ झाले तरी सरकार त्याला दाद देत नाहीं. पण या तिघांची एकी ही त्रिदोषसन्निपाताप्रमाणें कोणत्याहि पक्षाच्या प्रधानमंडळास घातक झाल्याशिवाय राहणार नाहीं. लंडन शहरांत अजून ट्रामगाड्या व ऑमनीबसा चालू आहेत. पण त्या बंद झाल्या म्हणजे राजधानीच्या नाड्याच आंखडल्या. खाणी बंद होणें हें शेवटचें हत्यार. तें घडून आल्यास राज्यक्रांतीच येऊन ठेपली असें समजावें ! जेव्हां इंग्लंडांत दगडी कोळसा नव्हता, आगगाड्या नव्हत्या, ट्रॅम व 'बस' नव्हत्या असाहि काळ एकदां होता खरा, पण तेव्हां एवढा व्याप व एवढा पसारहि नव्हता. भौतिक सुधारणा सरळ चालू आहे तोंपर्यंत तो देवदूत, नाहीं तर तें भूत ! सोन्याचें ताट चोरानें अवचित् चोरून नेलें आणि जुनें खापराचें परळ

पूर्वी आपल्याच हातानें भिकार म्हणून फोडून टाकलें; मिळून जेवायला ताट नाहीं म्हणून उपाशी, अशांतला हा प्रकार आहे !

मजूरपक्षाची मंडळी खूष आहेत, अजून डगमगली नाहींत. संपाच्याच रात्रीं व दुसऱ्या रात्रीं त्यांचा एक बडा नाच होबर्न येथील एका सभागृहामध्यें झाला. हा आधींपासूनचा बेत किंवा काकतालीयन्याय कळत नाहीं. पण नाचणाऱ्या मंडळीला संपामुळें अधिक स्फुरण आलें होतें खास. या नाचाच्या प्रसंगीं पुढाऱ्यांचीं भाषणें व्हावयाचीं होतीं. शुक्रवारीं मिसेस बेझंट, वाडिया वगैरेंनीं तेथें भाषणें केलीं. ते सध्यां मजूरपक्षाशीं सर्वतोपरी समरस होऊन गेले आहेत. शनिवारीं थॉमस व लान्सबरी यांचीं भाषणें व्हावयाचीं होतीं. पण याच वेळीं आलबर्ट-हॉलमध्यें मजूरपक्षाचें बडें संमेलन मुद्दाम संपाच्या निमित्तानें आयत्या वेळीं भरविण्यांत आल्यामुळें होबर्न सभागृह त्यांना अंतरलें. आम्ही कांहीं मंडळीहि भाषणें ऐकावयास गेलों होतों; पण भाषणें ऐकण्याऐवजीं नाच मात्र पहावयास सांपडला. एका अर्थीं त्या भाषणांपेक्षां त्या नाचामध्येंच मजूरपक्षाच्या स्त्रीपुरुषांचें खरें मनोगत अधिक व्यक्त होत होतें. कोण तो त्यांचा उल्हास ! व या उल्हासाचें कारण काय तर राजकीय उत्कर्षाची जाणीव ! सुमारें एक हजार स्त्रीपुरुष बँडच्या सुरांत नुसता धुडगूस घालीत होते. या प्रसंगाचें—म्हणजे येथील गर्दी, स्त्रीपुरुषसंमर्द, न दमतां नाचण्याची हौस, हास्यविनोद यांचें—वर्णन देणें कठीण आहे. थोडीशी कल्पना हवी तर एखाद्या संस्थानिकाच्या लग्नाच्या पहिल्या वर्षीं राजवाड्यांत झालेल्या महालक्ष्मीच्या समारंभाची कल्पना करावी ! महालक्ष्मीच्या नाचांत दोघीचौघींच्याच अंगांत फार तर येतें. या नाचांत सुमारें पांचशें स्त्रियांच्या अंगांत वारें भरलें होतें असें वाटलें ! आलबर्ट हॉलनंतर संपवाल्यांची दुसरी प्रचंड सभा सोमवारीं टॉवरहिलवर झाली. टॉवरहिलची टेंकडी व मैदान लंडन-टॉवरला लागून आहे. टॉवर, हा सर्वांत जुनापुराणा किल्ला पुष्कळ वर्षेंपर्यंत तुरुंगासारखा वापरला जात असे. या किल्ल्यांत ठेवलेल्या राजकीय कैद्यांचा जाहीर शिरच्छेद करण्याची जागा म्हणजे टॉवरहिल. या दृष्टीनें राजकीय सत्तेला तुच्छ लेखणाऱ्या नव्या जनतेची जाहीर सभा

येथें भरावी हें योग्यच होतें. सभेस सुमारें पन्नास हजार तरी लोक असावे. अनेक व्यासपीठांवरून भाषणें होत होतीं.

असो. आतां फिरून आपल्या विषयाकडे वळूं. मिसस बेझंट यांचें ' युनाइटेड इंडिया ' नामक नवें वर्तमानपत्र येथें काल प्रसिद्ध व्हावयाचें होतें. या पत्राकरितां पांचसात हजार पौंडांच्या भांडवलाची तजवीज झाली असावी. या पत्रांत प्रथम तरी नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांचे लेख बाईंच्या लेखाबरोबर प्रसिद्ध व्हावयाचे असल्याचें जाहीर झालें आहे. वास्तविक हिंदुस्थानासंबंधीं इकडील लोकांस माहिती देणारीं व हिंदी राजकारणाची चर्चा करणारीं वर्तमानपत्रें जितकीं असतील तितकीं हवींच आहेत. तथापि बाईंचा झोंक हल्लीं कसा आहे याची माहिती मीं पूर्वीं एका पत्रांत लिहिलीच होती त्याचें हें प्रत्यंतर आहे. असो. त्यांची साधनें जुळविण्याची हातोटी मात्र घेण्यासारखी आहे. वरील प्रत्यंतराखेरीज दुसरेंहि एक दिसून आलें आहे. आक्टोबर ता. ४ रोजीं ब्रिटन–इंडिया सोसायटीच्या विद्यमानें एक सभा भरावयाची असून बाई त्या सभेच्या अध्यक्ष योजल्या गेल्या आहेत. ही सभा प्रथम सामान्य स्वरूपाची ठरली होती. परंतु पुढें सभेमध्यें ठराव आणण्याचा घाट घातला जाऊन त्या ठरावानें राष्ट्रीय सभेच्या मागणीपेक्षां कमी दर्जाच्या मागणीस संमति व्यक्त करण्याचा हेतु प्रगट झाला. सर्व प्रगतिपर शिष्टमंडळास संमत असलेल्या सुधारणा तरी बिलांत घालाव्या अशी मॉंटेग्यूसाहेबांना विनंति करण्याचा हा ठराव आहे. प्रगतिपर शिष्टमंडळांत, अर्थात त्यांत नेमस्त शिष्टमंडळ व बाईंच्या होमरूलचें शिष्टमंडळ हीं येतात, त्यांना जें मान्य तेंच मॉंटेग्यूसाहेबांनीं मान्य करावें. कॉंग्रेसची याच्या पलीकडची मागणी अमान्य झाली तरी चालेल असा या ठरावांतून ध्वनि निघतो. कोणास वाटेल कीं, मॉंटेग्यूसाहेबांचें व बाईचें खलबत होऊन बिलांत काय घालावयाचें हें ठरलें असेल व बाहेरून त्या ठरावास लोकसंमति देण्याचें काम बाईंनीं आपणावर घेतलें असेल ! हें खरें असतें व निदान सर्व प्रगतिपर शिष्टमंडळांना संमत असलेल्या का होईना पण तशा सुधारणा बिलांत प्रविष्ट होण्याचा संभव हटकून असता तर त्याबद्दल काय म्हणावयाचें याचा विचार केला असता. पण मुळांत हें खरेंच नाहीं, व म्हणूनच हा निवळ ' अव्यापारेषु व्यापार '

आहे असें म्हणणें प्राप्त होतें. (—यानंतर ता. ८ च्या पत्रावरून अखेरीस हा ठराव करण्याचा विचार सोडून देण्यांत आला असें कळलें आहे. —सं. के. ) बाहेर लोक काय मागतात यावरून अंत कामिटी आपला रिपोर्ट तयार करील हा निवळ भ्रम आहे. म्हणून ही सभा आपल्या तोंडाची वाफ मात्र व्यर्थ दवडणार याचें वाईट वाटतें. स्वतःस तूर्त हवें तितकें देण्याचा जोंपर्यंत सरकारचा बाणा आहे तोंपर्यंत स्वतःस तूर्त हवें तितकें सर्व बेलाशक मागण्याचा बाणा लोकप्रतिनिधींनीं ठेवावा हेंच बरें नव्हे काय ?

आयर्लंद, इजिप्त वगैरे ब्रिटिश साम्राज्यांतील परतंत्र राष्ट्रें हेंच करीत आहेत. आयर्लंदची हकीकत लिहिण्याचें कारणच नाहीं. इजिप्तच्या चळवळीमुळें लॉर्ड मिल्नरसाहेबांचें कमिशन नेमलें गेलें आहे, व टर्कीशीं तहाच्या अटींची वाटाघाट चालू असून टर्कीला सर्वस्वी प्रतिकूल असा निकाल होणार नाहीं, असें कित्येकांस वाटत आहे. इजिप्तमधील राष्ट्रीय पक्षाचे प्रतिनिधि इंग्लंडांत येतजात असून त्यांची चळवळ सुरू आहे. ता. १ आक्टोबर रोजीं फ्लीटस्ट्रीमध्यें ' ईस्ट—वेस्ट—सर्कलच्या विद्यमानें खासगी सभा भरली होती. इजिप्तमधील एक पुढारी मि. एशन अलबकर यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं खिस्ती राष्ट्राप्रमाणें मुसलमानी व इतर धर्मांच्या राष्ट्रांनाहि स्वयंनिर्णयाचें तत्व लागू व्हावें असें प्रतिपादिलें. हिंदी गृहस्थांपैकीं दिवाण माधवराव व डॉ. वेलकर यांस निमंत्रणें आलीं होतीं. त्यांनीं या प्रतिपादनास दुजोरा दिला. डॉ. वेलकर हे मुंबईच्या कांहीं मजूरसंघांतर्फे प्रतिनिधि म्हणून आलेले असून त्यांनीं येथील ट्रेड युनियन्स वर्कर्सवेलफेअर लीग वगैरे संस्थांच्या मंडळींशीं ओळखी करण्याचें काम सुरू केलें आहे. सत्यमूर्ति हेहि मजूरपक्षापुढें ट्रेड युनियन्सच्या दृष्टीनें व्याख्यानें देण्याचें काम करीत आहेत. राष्ट्रीय सभेचें शिष्टमंडळ विलायतेस आलें ते केवळ बिलासंबंधीं चळवळ करण्यास आलेलें असून, मजूरपक्षाच्या चळवळीच्या निरनिराळ्या अंगांशीं संलग्न असलेल्या निरनिराळ्या तत्वांशीं आपला संबंध कसा रहावा हें राष्ट्रीय सभा ठरवीपर्यंत शिष्टमंडळास 'शिष्टमंडळ' या नात्यानें कांहीं विशेष करतां येत नाहीं. तथापि ज्याला जिकडून अनुकूल दिसेल तिकडून हिंदुस्थानासंबंधीं इकडील लोकांस

माहिती देण्याचें काम जो तो शक्य तितकें करीत आहे येवढी गोष्ट खरी. डॉ. साठये गेल्या आठवड्यांत येथें येऊन दाखल झाले असून ते ना. पटेल यांस ऑफिसच्या कामीं मदत करीत आहेत.

## पत्र नं. १८

### ( ता. १६ आक्टोबर १९१९ )

हल्लीं दोन आठवडे इकडून जाणाऱ्या टपालाची चाळवाचाळव झाली आहे. पहिल्या खेपेस टपाल एक दिवस आधींच निघून गेलें. दुसऱ्या खेपेस बुधवारीं टपाल जाणार असें बुधवारीं सकाळीं जाहीर झालें म्हणून पत्र लिहितां आलें नाहीं. बरें ही चाळवाचाळव संभाळण्याकरितां एकदोन दिवस आधीं पत्र लिहावें तर आठवड्यांतील मजकूर घालावयाचा राहतो. तथापि, आतां वेळ सांपडेल तेव्हां पत्र लिहून टाकावें, जाईल तेव्हां जाईल व मजकूर उरला किंवा शिळा झाला तरी होवो असा विचार केला आहे. ही भानगडहि आतां लवकर संपेल. कारण सर्व डेप्युटेशनच्या मंडळीला लवकरच हिंदुस्थानास परत जाण्याला बोटीचे परवाने देण्यांत येणार अशी बातमी आहे, व ती खरी ठरल्यास ‘ विलायतचीं बातमीपत्रें ’ लिहावयाचें माझें काम संपेल.

आगगाड्यांचा संप ता. २७ सप्टेंबरला सुरू झाला व तो ता. ५ आक्टोबरला संपला. आठच दिवस संप टिकला. पण तेवढ्यामध्यें विलायतेंत आकाशपाताळ एक झालें. ज्या अशुभचिंतकांना इंग्लंडांत यादवी ऊर्फ ‘ सिव्हिल वॉर• ’ होण्याचे डोहाळे लागले आहेत, त्यांना अकालीं प्रसूतिवेदना सुरू झाल्या. पाहावयाला गेलों तर भांडण अडक्याचें पण आंतून असंतोषाचें रक्त कुजून गळूं झालें असलें म्हणजे अडक्याच्या भांडणानेंच त्याला तोंड फुटतें. यादवी व्हावयाचीच असती तर उभयपक्षीं तयारी पुरी होती. आगगाड्यांच्या लोकांपुरता संप राहता तर सरकारनें तो एक नाहीं तर दोन आठवड्यांत खास वठणीवर आणला असता. कारण पांचसहा दिवसांतच सरकारानें इतर लोक लावून जवळ जवळ

निम्या आगगाड्या सुरू केल्या होत्या. पण रेल्वेच्या लोकांमागोमाग ट्रॅम बस, टॅक्सी, कॅब यांचें नोकर, त्यांच्या सहानुभूतीनें खाणवाले मजूर, त्यांच्याकरितां नदी कालवे या जलमार्गावरचे वाहतुकवाले, त्यांच्या मदतीला ट्रेड युनियन्समधील इतर धंदेवाले अशा परंपरेनें सर्व व्यवहार थांबण्याचा संभव होता. हें झाल्यावर, सर्व सरकारी कारखाने बंद पडून व लोकांची उपासमार होऊन प्रत्यक्ष युद्ध सुरू होण्यास कितीसा विलंब लागणार ? सरकारानें तर सैन्य आणवून व मशीनगन्स रोखून युद्धाची तयारीच केली होती. महायुद्ध नुकतेंच होऊन गेल्यामुळें सरकाराजवळ लढाऊ सरंजाम तयार होता. सर्व देशभर मेयर माजिस्ट्रेट लोकांस दंगेधोपे मोडण्याकरितां तयारी करण्याच्या सूचनेचे जाहिरनामेहि लागले होते. पण रेलवे मजुरांच्या पलीकडे संप गेला नाहीं म्हणूनच यादवी वांचली.

संपाच्या पांचव्या दिवशीं संपवाले हताश होऊन त्यांनीं इतर धंदेवाल्यांना मदतीचा अर्ज केला. पण मजूरपक्षापैकीं रेलवेशीं संबंध नसणाऱ्या लोकांनीं कसून मध्यस्थी केली व प्रधानमंडळानें बाह्यतः जरब दाखवून मागितलेल्या सवलती देण्याचें हळूहळू कबूल केलें यामुळें युद्ध टळलें. संप मोडला तो मध्यस्थांच्या चातुर्यानें असेंच सरकारपक्षाचींहि पत्रें म्हणालीं; सरकारच्या जोरानें मोडला असें त्यांनाहि म्हणतां आलें नाहीं. संप मोडला हा मजूरपक्षाचा विजय असें लोकपक्षाचीं पत्रें ह्मणूं लागलीं; आणि हें म्हणणें मात्र खरें होतें. कारण किमानपक्षाची म्हणून सरकार जी चाळीस शिलिंगांची मजुरी म्हणत होतें ती एकावन्न शिलिंगांपर्यंत वाढली व बाजारभाव कमी झाल्यास दिसेंबरअखेर मजुरीचे दर कमी करूं असें सरकार म्हणत होतें, ती मुदत पुढील सप्टेंबरपर्यंत वाढली. संप मोडण्याचे सरकारचे हिंदुस्थानांतले व येथील मार्ग यांतलें अंतर पाहिलें म्हणजे आश्चर्य वाटतें. संपवाल्यांचे पुढारी व मंत्रिमंडळ बरोबरीच्या नात्यानें एकत्र बसून वाटाघाट करीत होतें. हिंदुस्थानांत संपवाल्यांचा पुढारी बंडखोर मानला जातो ! वॉशिंगटन येथें भरणाऱ्या मजूर–परिषदेला इंग्लंडांतील संयुक्त मजूरपक्षानें आपला प्रतिनिधी आपण निवडून पाठविला आहे. हिंदुस्थानांत मजूरवर्ग संघटित नाहीं यामुळें अजून सरकार ह्मणेल तोच मजूर पक्षाचा प्रतिनिधि ठरतो ! सरकारचें ह्मणणें तर सरकार सांगणारच; पण लोकांचें

म्हणणेंहि सरकारच सांगणार ! प्रजेला आपल्या हातानें भरविण्याचा सरकारमाउलीला कंटाळा येणें शक्य नाहीं. भरविणाऱ्या हाताला मूल चावूं लागलें म्हणजे भरविण्याचा चाळा संपला तर संपेल !

सिलेक्ट कमिटीचें काम ता. ६ आक्टोबर रोजीं फिरून सुरूं झालें. सोमवारीं सर थॉमस होल्डरनेस यांची साक्ष झाली. सुधारणा करण्याची आतां वेळ आली आहे; यापुढें लोकांच्या हातीं कांहीं तरी खेळणें देऊन भागावयाचें नाहीं; लोकप्रतिनिधींना वाटेल तर जबाबदार धरा, पण खरे अधिकार द्या; हिंदुस्थानाइतकेहि शहाणे मतदार नाहींत, अशा म्हणजे ग्रीससारख्या देशांत प्रातिनिधिक संस्था यशस्वी झाल्या आहेत मग हिंदुस्थानांतच त्या कां होऊं नयेत ? हिंदी रयत आपल्या पायापुरतें पाहणारी आज असली तरी तिला चांगलेंवाईट जाणण्याचें शहाणपण आहे वगैरे प्रगमनशील अशीं मतें सर थॉमस यांनीं प्रतिपादलीं. लॉर्ड सिडनहॅम यांनीं त्यांना छेडण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्याला त्यांनीं दाद दिली नाहीं. द्विदळपद्धति त्यांतल्या त्यांत बरी आहे असें म्हणून त्यांनीं मॅंटेग्यूसाहेबांना पाठिंबा दिला; आणि वरिष्ठ सरकारामध्यें आज ढवळाढवळ करूं नये हेंहि त्यांनीं सांगितलेंच. शिक्षणाचें सर्व खातें लोकांच्या स्वाधीन करावें त्यामुळें शिक्षण सुधारेल, सरकारापेक्षां लोक तें काम अधिक हौसेनें करतील असें मात्र त्यांनीं सांगितलें.

मंगळवारीं सर मायकेल ओडवायर यांची साक्ष झाली. या रुधिरप्रिय जंगबहादुरांची साक्ष होणार होणार म्हणून बरेच दिवस गाजत होती ती अखेर झाली. सर मायकेल यांची साक्ष कशा प्रकारची झाली असेल हें मी सांगण्याचें कारण नाहीं. त्यांचीं मतें पूर्वीं हिंदुस्थानसरकारच्या खलित्याबरोबर प्रसिद्ध झालींच आहेत. त्यांनीं कमिटीच्या लेखी प्रश्नांस त्या मतांच्या अनुरोधानें उत्तरें दिलीं. त्यानंतर त्यांना आणखी कांहीं सांगावयाचें आहे काय ? असा ठराविक प्रश्न करण्यांत आला. त्याला तोंडीं उत्तर म्हणून त्यांनीं एक भलें लांबलचक रूपक रेखाटलें. राज्यकारभार ही एक खेती आहे व प्रजाजन हे शेतकरी आहेत. या शेतकऱ्यांची शेती फलप्रद होण्यास नेटिव्ह व युरोपियन अशा दोन पाटांनीं पाणी मिळत असून हे दोनहि पाट एकत्र करून पाणी दिलें तरच जमीन ओली राहील; भाहीं

ठरावाचे मुख्य विषय रशियांतून इंग्रज सैन्य परत आणणें व कोळशांच्या खाणी सरकारी करणें हे होते. लान्सबरी, हॉजेस, विल्यम्स, मिसेस स्नोडन, राम्से मॅकडोनाल्ड, मिसेस बेझंट, वगैरे वक्त्यांचीं भाषणें झालीं. इंग्लंडांत जाति नाहींत तरी पण वरिष्ठ वर्गाबद्दल कनिष्ठ वर्गाच्या मनांत किती द्वेष उत्पन्न झाला आहे हें पदोपदीं भाषणांतून दिसून येत होतें. मि. विल्यम्स यांनीं तर सरकारास उघड आव्हान करून असें बजावलें कीं, रेल्वेचा संप संपला येवढ्यावर जाऊं नका, संपाच्या भीतीनें सरकार शरण येतें ही गोष्ट आतां कळून चुकली आहे. एका वर्गानें संप केला कीं त्यास दुसरे अनेक वर्ग सहानुभूतीनें येऊन मिळतात ही गोष्ट निश्चित असून मजूर पक्ष क्रमाक्रमानें आपल्या सर्व मागण्या या संपाचें पिस्तूल सरकारच्या माथ्यावर रोखून पदरांत पाडून घेणार! सारांश क्लासवॉर—यादवी—च्या गोष्टी सभांतून लोक खुशाल बोलूं लागले आहेत. मजूर—पक्षाचें हें संमेलन पाहण्यास काँग्रेस डेप्युटेशनच्या लोकांस निमंत्रण करण्यांत आलें होतें. हें संमेलन पाहत असतां व भाषणें ऐकत असतां उदयोन्मुख अशा ब्रिटिश जनतेचा उत्साह, तेज व आत्मप्रत्यय यांचा परिणाम प्रेक्षकांच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं.

राष्ट्रीय सभेतर्फेच्या व्याख्यानांस मध्यें एक आठवडा सुटी होती; तीं व्याख्यानें आतां फिरून सुरू झालीं. बाबू पाल व इमाम हे व्याख्यानाकरितां बाहेरगांवीं गेले असून मीं स्वतः, मि. हॉर्निमन व मि. आयंगार असें उद्यांपासून परगांवीं व्याख्यानाकरितां जाणार आहों. माझीं व्याख्यानें बर्मिंगहॅम, ब्रायटन, टॉटन वगैरे ठिकाणीं व्हावयाचीं आहेत. गेल्या सोमवारीं मी व मिस नॉरमॅटन, इंडियापत्राचा सहकारी संपादक, क्लॅपहॅम येथें व्याख्यानास गेलों होतों. समाज चांगला असून व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरें बरींच झालीं. सभा सुमारें दोन तास चालू होती. मिस नॉरमॅटन या बाईनीं लंडन युनिव्हर्सिटींत इतिहास या विषयांत श्रेष्ठ प्रतीचा मान मिळविला असून ग्लासगो युनिव्हर्सिटींत त्यांनीं प्रोफेसरचें काम केलें आहे. इंग्रज स्त्रियांना मतदारीचा हक्क मिळविण्याच्या चळवळींत त्यांनीं भाग घेतलेला होता. इंडियापत्रास येऊन मिळण्यापूर्वी स्त्रीनागरिकसंघाच्या त्या चिटणीस होत्या. बॅरिस्टरीच्या परीक्षेचा त्यांचा अभ्यास झालेला असून

डॉ० मेथा. पटेल. खापर्डे. टिळक. बिपिनचंद्रपाल. केळकर



[ पार्लमेंटच्या एका दाराजवळ शिष्टमंडळ उभें आहे ]

आपणास न्यायकोर्टांतून वकिली करण्याचा हक्क मिळावा म्हणून त्या हल्लीं हाउस ऑफ लॉर्डसपुढें मांडत आहेत व लॉर्ड रॉबर्ट सेसिलसारख्या गृहस्थांनीं त्यांचा पक्ष उचलून धरला आहे. त्यांची भाषण करण्याची शैली थेट वकिली बाण्याची असून त्यांना 'आधुनिक पोर्शिया' असें लोकांनीं नांव दिलें आहे. मिसेस बेझंट यांच्या अगदीं तोडीचें त्यांचें वक्तृत्व नसलें तरी बेझंटबाईपेक्षांहि विषयप्रतिपादनाची त्यांची शैली अधिक चांगली आहे.

मिसेस बेझंट यांनीं नवें पत्र काढतांच त्यांत काँग्रेसच्या डेप्युटेशनवर टीका करण्यास सुरुवात केली. अर्थात् इंडियापत्रानें त्यांना जाब दिला. बाई राष्ट्रीयसभेला यंदा हजर राहतील असा रंग दिसत नाहीं. त्या बहुधा यापुढें येथेंच राहतील असें वाटतें. राष्ट्रीय सभेला त्या अंतरल्या तरी येथें, आपलें वर्चस्व राहील अशी आपणापुरती सोय करून घेऊन का होईना, पण हिंदुस्थानासंबंधीं त्या चळवळ करीत राहतील असें वाटतें. त्यांची कारवाई चंचलपणाची आहे; पण हिंदुस्थानासंबंधीं भाषणें करितांना लोकपक्षाचीं मतें प्रतिपादन करण्यास त्या सहसा माघार घेत नाहींत येवढी गोष्ट त्यांतल्या त्यांत बरी आहे. येत्या २५ व्या तारखेस आलबर्ट हॉलमध्यें हिंदुस्थानास होमरूल मिळावा अशी मागणी करण्याकरितां मजूरपक्षातर्फें बडें संमेलन व्हावयाचें आहे त्या प्रसंगीं लो. टिळक व मिसेस बेझंट भाषणें करणार आहेत.

जॉइंट कमिटीचें काम बहुतेक संपलें आणि रिपोर्टहि पुरा होऊन बिल लवकरच फिरून पार्लमेंटपुढें येईल. तें जेव्हां पुढें येईल तेव्हां त्यांत राष्ट्रीय सभेतर्फें कांहीं प्रतिनिधि राहणें जरूर आहे. म्हणून ना. पटेल, व ना. खापर्डे हे आणखी कांहीं दिवस मागें राहतील व इतर मंडळी राष्ट्रीय सभेस हजर राहण्याकरितां लवकरच निघतील असें वाटतें.

## पत्र नं. १९

### ( ता. २३ आक्टोबर १९१९ )

या आठवड्यांत सिलेक्ट कमिटीचें साक्षी घेण्याचें काम संपून रिपोर्टाचे वादविवादास खासगी रीतीनें सुरुवात झाली आहे. मूल जन्मण्या-

पूर्वी त्याला नांव देण्यांत अर्थ नाहीं. तथापि सर्वांना आपापल्या दृष्टीनें कोणत्याहि भावी गोष्टीचा कयास करण्याची मोकळीक असते व त्याला अनुसरूनच मीहि आपला कयास खालीलप्रमाणें लिहीत आहे. बिलांतील स्थूल मुद्दे केसरीच्या वाचकांस माहीतच आहेत म्हणून हा कयास थोडक्यांत देतों. बिलाला नांव काय असावें हा पहिला प्रश्न. त्याचें उत्तर बहुधा असेंच ठरणार कीं, बिलाचा सरनामा २० आगष्टच्या जाहीरनाम्यास धरून आहे तेव्हां जबाबदारीचें स्वराज्य हळूहळू देण्याचें बिल असेंच त्याचें नांव रहावें. 'हळूहळू' याचा अर्थ काय? तर हळूहळू हाच! कॉंग्रेसनें मागितल्याप्रमाणें संपूर्ण स्वराज्य अमुक इतक्या मुदतींत देण्याचें कलम त्यांत घेतलें जाणार नाहीं. उलट पार्लमेंटरी कमिटीकडून चौकशी होऊन अधिकार देण्याची मुदत पांच दहा वर्षांपेक्षां वाढेल. नागरिकत्वाच्या हक्काचा उल्लेख बिलांत असावा ही सूचना मान्य होणार नाहीं. प्रांतानिहाय मागितलेलें संपूर्ण स्वराज्य मिळणार नाहीं. द्विदळपद्धति मान्य होईल पण तिचा संपर्क वरिष्ठसरकारास लागू दिला जाणार नाहीं. फार तर वरिष्ठ सरकारच्या कार्यकारी कौन्सिलांत हल्लीं एक हिंदी सभासद असतो ती संख्या वाढून दोन होईल. प्रांतांनिहाय खातीं तोडून देण्याच्या कामीं किंचित् सढळपणा दाखविला जाईल. पण याचा उल्लेख बिलांत होणार नाहीं. स्त्रियांना मतदारीचा हक्क मिळणार नाहीं. जातवार मतदार संघाचा उल्लेख बिलांत होईल. माझें हें भविष्य कुडबुड्या जोशाच्या भविष्यासारखेंच आहे. पण बिल मंजूर करण्याचा अधिकार पार्लमेंटच्या हातीं असला तरी भविष्य करण्याचा हक्क सर्वांप्रमाणें मलाहि आहे तो मी कां गमावीन?

उन्हाळ्याच्या सुट्टीमुळें बंद झालेल्या पार्लमेंटचीं कवाडें फिरून आज उघडलीं गेलीं. सुट्टींत घडलेल्या पोटनिवडणुकींत प्रधानपक्षाचीच प्रायः सरशी झाली असून प्रधानमंत्री अद्यापि जोरावर आहेत; लॉइड जॉर्ज यांच्या तर्फेचें लिहिणारें आज एकहि वर्तमानपत्र नाहीं. व त्यांच्या समर्थनपर असें भाषण कोठेंहि कानावर पडत नाहीं. पण पार्लमेंटांत त्यांचा पराभव मात्र कोणी करूं शकत नाहीं. लॉइड जॉर्ज आज कॉन्सरव्हेटिव्ह पक्षाचा आश्रय करून राज्य चालवीत आहेत. लिबरल पक्ष नामशेष झाला. या

पक्षाचे म्हणविणारे व स्वतंत्र बाण्याचे असे पार्लमेंटांत सुमारे पंचवीस सभासद आहेत. त्यांचे जुने पुढारी मि. ॲस्क्वीथ हे अस्तंगत झाल्यासारखे असून पार्लमेंटबाहेर इकडे तिकडे कोठें तरी एखादें भाषण करण्यापलीकडे त्यांची चळवळ उरलेली नाहीं. परवां मॅनशन हाऊसमध्यें लीग ऑफ नेशन्सच्या सभेंत त्यांचें भाषण मीं ऐकलें. ते आतां पिकलें पान झाले आहेत व ते एकटे पुढें मागें निवडून आले तरी त्यांना सामनेवाले म्हणूनच पार्लमेंटांत बसावें लागेल. त्यांना प्रधानपद मिळण्याइतकें बहुमत त्यांच्या बाजूला राहणार नाहीं. राहिला तिसरा मजूरपक्ष हा जोरावर असून पुढील निवडणुकींत त्याला अधिक जोर येईल. पण खरें म्हटलें तर या पक्षाचा जोर पार्लमेंटांतील संख्येपेक्षां किंवा कर्तबगारीपेक्षां बाहेरच्या कर्तबगारीवर म्हणजे संघाच्या दहशतीवरच अधिक आहे. या पक्षाला देशांत मतदारसंघ मोठा आहे. पण भांडवलवाल्यांचा वचक आणि स्वतः मतदारांचें अज्ञान यामुळें आणि पार्लमेंटरी सभासदांची वांटणी असावी तशी नसल्यामुळें या मतदार संघाचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं. म्हटलें तर मजूरपक्षाचे तीनशें सभासद या मतदारसंघाच्या जोरावर निवडून यावे; पण आज अवघे साठसत्तरच आहेत. मजूरपक्षाच्या पुढाऱ्यांना अद्यापि मुत्सद्दीगिरीचा अनुभव नाहीं. ते प्रधानमंडळांत शिरले तर संस्थानच्या गादीवर बसलेल्या दत्तक मधुकरी मुलाप्रमाणें वावरतील असें पुष्कळ म्हणतात. तथापि आज नाहीं तर उद्यां ते प्रधानमंडळ सजविणार यांत शंका नाहीं.


गेल्या पंधरवड्यापूर्वीं खापर्डे, पाल, सरोजिनी नायडू वगैरे मंडळी ग्लासगो, न्यूकासल वगैरे ठिकाणीं व्याख्यानें देऊन आली. नंतर मध्यें एक आठवडा सुना गेला. फिरून गेल्या आठवड्यांत व्याख्यानांस सुरवात झाली. पाल मँचेस्टरच्या भागाकडे पांचचार व्याख्यानें देऊन आले. हसनइमाम हेहि दुसरीकडे गेले होते. मी, हॉर्निमन, रंगस्वामी अय्यर असे तिघे पश्चिम भागांत व्याख्यानें देऊन आलों. बरोबर मुंबईच्या मजूरसंघातर्फेचे प्रतिनिधी म्हणून डॉ. वेलकर हे आले होते. १७ रोजीं बर्मिंगहॅम येथील टेंपरन्सहॉलमध्यें आम्हां सर्वांचीं भाषणें झालीं. दुसरे दिवशीं हॉर्निमन व अय्यंगार हे कार्डिफ येथें गेले व ता. १९ रोजीं त्यांचें तेथें

मजूरपक्षाच्या विद्यमानें व्याख्यान झालें. मी व डॉ० वेलकर ता० १८ रोजीं बेस्टन सुपरमेर येथें गेलों. सकाळीं नऊ वाजतां तेथील ॲडल्ट स्कूलच्या सभागृहांत माझें व डॉ० वेलकर यांचें व्याख्यान झालें. नंतर तेथील मंडळींशीं दोन तास खासगी संभाषण झाल्यावर मि० ओव्हर नामक गृहस्थांनीं आम्हांस फलाहार दिला. हे गृहस्थ टॉलस्टॉय यांचे अनुयायी असून युद्धाच्या वेळीं हातांत हत्यार न धरण्याच्या शपथेबद्दल दोन वर्षें तुरुंगांत होते. त्याच दिवशीं आम्ही टॉनटन येथें गेलों व रात्रीं आठ वाजतां लाइसियम नाटकगृहांत माझें व्याख्यान झालें. डॉ० वेलकर हेहि बोलले. सभेस श्रोतृसमुदाय भरपूर होता. टॉनटन हें मजुरपक्षाचें एक आगर असून मंडळी उत्साही आहेत. सभेंत स्थानिक वक्त्यांचींहि भाषणें झालीं. ता. २० रोजीं आम्ही ब्रिस्टल् येथें गेलों. तेथें हॉर्निमन व आय्यंगार हे कार्डिफ येथून आम्हांस येऊन मिळाले. रात्रीं स्थानिक सभागृहांत सर्वांचीं भाषणें झालीं.

इकडील व्याख्यानांचा साधारण अनुभव असा आहे कीं, खटपट झाली असतां कोठेंहि सभा होण्यास अडचण पडत नाहीं. श्रोतृसमाज किती मिळेल हें मात्र निश्चित सांगतां येणें कठीण असतें. कारण सभा कोण भरवितो यांवर तें बरेंचसें अवलंबून असतें. प्रायः प्रत्येक शहरीं इंडिपेंडंट लेबरपार्टी, ॲडल्ट स्कूल, चर्च, सोसायटी वगैरे दोन तीन संस्था असतात व त्यांपैकीं एकाद्या संस्थेच्या विद्यमानें सभा भरूं शकते. शिवाय या संस्थेच्या आठवड्याच्या, पंधरवड्याच्या ठराविक सभा असतातच. त्यांतली एखादी सभाच आपणास मिळाली तर श्रोतृसमाज विशेष भरपूर मिळतो. प्रत्येक शहरीं स्थानिक वर्तमानपत्र असतेंच व जाहिरात आगाऊ झालेली असल्यास त्या पत्राचा रिपोर्टर येऊन थोडा तरी रिपोर्ट देतो. सभेस येणारे लोक शेंकडा नव्वद सहानुभूतिपूर्ण असतात; व व्याख्यानानंतर विचारलेल्या प्रश्नांत विरोधापेक्षां जिज्ञासाच अधिक असते. विरोध करणारा एखादा भेटतोहि. परंतु प्रश्न विचारणारांपेक्षां उत्तर देणाराला विषयाचें ज्ञान अधिक असल्यामुळें तो सहसा आपली छाप पाडल्याशिवाय रहात नाहीं.

तात्पर्य, एक बोलका व एक माहितगार असे दोन हिंदी वक्ते व्याख्यानें देण्याच्या निश्चयानें बाहेर पडतील तर त्यांना सर्व इंग्लंडभर हिंडण्यास एक वर्षहि पुरणार नाहीं. पण विलायतेंत जाहिरात, प्रवास व जागाभाडें, हॉटेल ही फार मोठ्या खर्चाचीं तोंडें आहेत. शिवाय कोठेंहि व्याख्यानें यशस्वी होऊन ग्रामसमाज अगदीं सोळा आणे अनुकूल झाला तरी पार्लमेंटरी निवडणुकीच्या वेळीं हिंदुस्थानच्या मुद्द्यावर एकहि निवडणूक होण्याची अद्यापि वेळ आली नाहीं; तथापि विलायत हें राजकीय चळवळीचें मुख्य क्षेत्र पडल्यामुळें येथें चळवळ चालू ठेवल्याशिवाय गत्यंतर नाहीं, मात्र विलायतेंत पैशाची किंमत हिंदुस्थानापेक्षां आठदहापट कमी असल्यामुळें हिंदुस्थानांत ज्या कामास एक हजार रुपये पुरतील त्यास येथें दहा हजार लागणार या अदमासानें खर्चाची तरतूद ली पाहिजे. पण या विषयाचा सविस्तर ऊहापोह मी करीत बसत नाहीं. यंदांच्या राष्ट्रीय सभेपुढें हा चर्चेचा एक मुख्य विषयच बहुधा होणार आहे.

असो, ता. ३० आक्टोबर रोजीं इजिप्त नामक बोटीनें हिंदुस्थानास परत जाण्यास आम्हांस तिकिटें मिळालीं आहेत; व त्या दिवशीं आम्ही विलायतेस रामराम ठोकणार. येथें येऊन उद्यां पांच महिने होतात. हे पांच महिने येथील कामाधामामुळें बरेच लवकर गेले. मला त्यांतल्या त्यांत केसरीच्या वाचकांच्या दृष्टीनें तिकडे कळविण्यासारखी माहिती वाटली ती कळवीत होतों. पण केवळ पत्रांच्या रूपानें एका देशाची दुसऱ्या देशास माहिती किती देऊं शकणार ? तें काम वर्षानुवर्षं चाललें तरी संपावयाचें नाहीं !



हॉउस ऑफ कॉमन्सच्या टेम्सनदीला लागून असलेल्या गच्चीवर मजूरपक्षासमवेत घेतलेला शिष्टमंडळीचा फोटो.

## परिशिष्ट नं. १

# * विलायतेच्या यात्रेची तयारी.

### ( विनोदी कविता )

[ आगबोटीवरील रिकामपणाची कामगिरी ]

ता० ७ ते १० नोव्हेंबर १९१९

" तुम्हा जाणें विलायतेला । तरी लागा तयारीला ।
शस्त्रांवीण शिकारीला । वीर तरी केविं जाय ? ॥ १ ॥
सहा हजार मैल दूरी । जावें लागे सागरांतरीं ।
देव तारी त्या कोण मारी । परी सिद्धता असावी ॥ २ ॥
मरण न तरी दुखणें-बाणें । त्याहीसाठीं उपाय करणें ।
पश्चात्तापाची वेळ न येणें । या नांव दूरदार्शत्व ॥ ३ ॥
पहिलटकरणीस सुईण । नवख्या प्रवाशा मित्र सुजाण ।
पूर्वानुभव विशेष गुण । ऐसा कोणी बोलवा. " ॥ ४ ॥
मग मेळविले कोण कोण । आप्त प्राज्ञ विचक्षण ।
प्रवाशा उपयोग म्हणून । देतों वर्णन यथामति ॥ ५ ॥

* * *

आले मिस्तर फॅशनेबल । त्यांजकरितां मांडलें टेबल ।
कारण विलायतेंत सकळ । खातांपितां बोलताती ॥ ६ ॥
म्हणती मिस्तर फॅशनेबल । खर्च करावा लागेल सढळ ।
जरी होईल थोडा पाल्हाळ । यादी करा वस्तूंची ॥ ७ ॥
पांच तऱ्हेचे कोट बेतणें । तितकींच हवीं पाटलोणें ।
वेस्टकोट जाकिटांचें लेणें । त्यांत स्वयें समाविष्ट ॥ ८ ॥
कापड असावें बहुत उंची । ती काय तंबाखूची चंची ।
म्हणोन त्यांत सदभिरुची । न मानोनी चालेल ? ॥ ९ ॥

---

* पुणें येथें मे १९३२ मध्यें भरलेल्या 'द्वितीय कविसंमेलनांत' वाचून दाखविलेली कविता.

कापड असावें भरदार । कापड असावें ऊबदार ।
कापड असावें मजेदार । परी सर्वही लोकरीचें ॥ १० ॥
विलायतेंत कापूस जात । परी त्या तेथ कोणि न पुसत
कापशी वस्त्रें विणतात । परी तुम्हांकारणें ॥ ११ ॥
'पोझिशन' राखणें राहो । परंतु तेथें थंडी कोण हो ।
अब्रूपरी प्राणाचा लाहो । तरी कापड लोकरी ॥ १२ ॥
कापड होईल सहज पसंत । परी कोणता शिंपी बेतीत
सर्व मर्म आहे त्यांत । म्हणुनि चिकित्सा करणें लागे ॥ १३ ॥
एक नूर अदमी दस नूर कपडा । हाच सुधारणेचा निवाडा
म्हणोन चतुर शिलाई निवडा । त्यांतूनही इंग्रज ॥ १४ ॥
ज्याचें काम त्यानें करावें । नेटिव्हांनीं दुरून पहावें ।
सूट कटाचें पारखावें । नाणें इंग्रजांनीं इंग्लंडीं ॥ १५ ॥
'सूटा'ची ही मोठी कटकट । परी काय उपयोग येवोनि वीट
विलायती सफरीचा घाट । घातला तरी सोसावें ॥ १६ ॥
पहिला कपडा दुसरी हजामत । दोघांचेंही तेंच महत्त्व ।
सुधारणेचें सर्वस्व सत्त्व । यांताचि असे सांठविलें ॥ १७ ॥
लोमशत्रुत्व अंगीं आणा । धरा पुरा हजामाचा बाणा ।
सर्व लपवाव्या खाणाखुणा । चेहऱ्यावरी केसाच्या ॥ १८ ॥
सक्षौर श्मश्रू अभिमत । सुधारणावाद्यांचें हें मत ।
अंगिकाराल तरीच हित । होईल कांहीं इंग्लंडीं ॥ १९ ॥
प्रतिप्रभातीं दिसावा चेहरा । कीं हा बाळ मातेच्या उदरा
सोडुनि आल्या क्षणहि पुरा । झाला असेल नसेल ॥ २० ॥
चेहरा असावा तुळतुळीत । कीं दुसऱ्यानें पाहतां त्यांत
आधुलेंच मुख प्रतिबिंबित । वाटे त्यास दिसावें ॥ २१ ॥
त्यानंतर बोलणें चालणें । हें तो सांगोनि कवणा येणें ।
शुद्ध परमेश्वराचें देणें । परी यत्न कांहीं करावा ॥ २२ ॥
इंग्रजी भाषा ओष्ठदंत । यांतुनि पुरी बाहेर न पडत ।
र वर्णादी वर्ज्य होत । अन्य व्यंजनें कठोर ॥ २३ ॥

कांहीं येतें जेथल्या तेथें । परी सांगितल्या वेळीं स्मरतें ।
निश्चयें गेल्या युक्त पंथें । यशःसिद्धी होईल ॥ २४ ॥
आतां वस्तु कोणत्या उरल्या । त्या पाहिजे सांगितल्या
फॅशनेबलां भल्या भल्या । वेळीं विसर पडतसे ॥ २५ ॥
बूट पाहिजे विलायती । पेटंट चामड्याचीच ख्याती ।
परि रोगणें तुळतुळती । तेही कांहीं घ्या सवें ॥ २६ ॥
बूट लेसेची ब्रह्मगांठ । दिसे गोंडस बसे निपट ।
शिका ती करूनी खटपट । सर्व विद्या येणें हवी ॥ २७ ॥
पायमोजे लोकरी रेशमी । वरी नक्षीची काडी नामी ।
पायीं घालतां न व्हां श्रमी । तरी इंग्रजी रीत शिका ॥ २८ ॥
पाटलोणीचीं 'ब्रेसें' हवीं । तींच मुशाफरांचीं जानवीं ।
दोन्हीं एकदम उजवीं डावीं । खांद्यावरुनी घालताती ॥ २९ ॥
शर्टबटणें घ्यावीं बरीं । विविधरंगी विविधाकारी ।
हातरुमाल परोपरी । किनारदार तेविं साधे ॥ ३० ॥
सांगतां राहिली एक गोष्ट । परंतु तीच सर्वांत श्रेष्ठ ।
शिकण्या थोडे पडतील कष्ट । परि अवश्य शिकावी ॥ ३१ ॥
स्त्रीस जैसें मंगळसूत्र । पूजासाहित्यीं अभिषेकपात्र ।
नाट्यप्रयोगासी रात्र । तेविं पोषाखा नेकटाय ॥ ३२ ॥
पाहतां वीतभर चिंधोटी । परंतु तियेची प्रतिष्ठा मोठी
न वापराल ही गळोटी । तरी म्हणतील रानवट ॥ ३३ ॥
खुळे वेडे नंगे फकीर । ख्रिस्ती धर्माधिकारी थोर ।
नेकटाय-माफीचा वर । केवळ यांसच दीधला ॥ ३४ ॥
गंगे जातां गंगादास । तमसा-तीरीं आंग्लवेष ।
जो असेल अभिमत विशेष । तोच अवश्य आदरावा ॥ ३५ ॥
गळबंदावीण शर्टबटण । मानिला असे निषिद्धदर्शन ।
जेविं पदरावीण स्तन । पतिव्रता कुलवधूचा ॥ ३६ ॥
आतां केशमंडन-विचार । थोडक्यांत सांगतों साचार
प्रथम करणें संहार । शेंडी नामक बटीचा ॥ ३७ ॥
असेल ती हिंदुत्वाची खूण । परि जातां विलायतेस आपण

तेथें मस्तकास भूषण । वपित केशकलापाचें ॥ ३८ ॥
गवती मैदान कापलें । तेवीं मस्तक दिसावें भलें ।
मध्यें भांगें दुभंगलें । तरी त्या गुण विशेष ॥ ३९ ॥
केशविधान परोपरी । करावे रुचिपरत्वें तरी ।
एक शेंडी आणि 'भादरीं' । यावीण कांहीं चालेल ॥ ४० ॥
ऋषीशाही बोकडशाही । नीग्रोशाही टक्कलशाही ।
अन्य प्रकार आणखी कांहीं । परी होईल विस्तार ॥ ४१ ॥
अक्षौर श्मश्रू रक्षणें तरी । हवी आधिंपासोनि तयारी
कारण दाढी ती बिचारी । आयत्या वेळीं न उगवे ॥ ४२ ॥
दाढीनें फुकें साधुत्त्व । मिळतें तरुणास प्रौढत्त्व ।
वयाआधीं वयोगुण प्राप्त । व्हावा तरी दाढी ठेवा ॥ ४३ ॥
परंतु दाढीस अंगयष्टि । लागते तशीच बळकट मोठी
काडी-जवाना ऐसी खोटी । उठाठेव शोभेना ॥ ४४ ॥
झुरळा—सिंहाची आयाळ । भातेणासि वटशाखाजाळ
गुप्तपोलिसा शब्द पाल्हाळ । तेविं रोडक्यास दाढी ॥ ४५ ॥
कंगवा फणी हस्तिदंती । साबण सुगंधी सांगाती ।
घड्याळ साखळी रबरें फिती । लेखन साहित्य सर्वही ॥ ४६ ॥
कातडी पेट्या कापडी पेट्या । असाव्या कांही लहानमोठ्या
हातीं धरण्याच्याही काठ्या । शोभिवंत असाव्या ॥ ४७ ॥
सोनेरी सिगार सुंदर केस । सिगार-पेट्या दहावीस ।
लागती आपणा ओढण्यापारस । दुसऱ्यास अधिक द्यावया ॥४८॥
विडी ही न बिडी, ती समिध । क्षणांत होमाग्नि होतो सिद्ध
तत्साक्षिक मैत्री प्रसिद्ध । करितां होते कायमची ॥ ४९ ॥
नसेल ओढण्याची चाड । तरी सवईची करावी वाढ
भल्याभल्यांची मैत्री गाढ । पाडुनि देते ही वल्ली ॥ ५० ॥
जरी असती डोळे बरवे । तरी सांगातीं चष्मे हवे ।
बिन नंबरी भिंगाचे घ्यावे । चष्मा वाढवी सौंदर्य ॥ ५१ ॥
कांही असावे आणिक रंगी । लांकडी झापडीं दोहों भागीं
घालितां वाटे लोकांलागीं । क्षणैक घोडा टांग्याचा ॥ ५२ ॥

रंगी चष्मा डोळां चढे । पाहतां येतें लोकांकडे ।
ते न मात्र उलट बापुडे । आपणासी न्याहाळूं शकती ॥ ५३ ॥
मिळाल्यास घ्यावी दुर्बिण । बायनॉक्यूलर दूरदर्शन ।
पुढें दिसणार तरी आधीं क्षण । पाहिल्याविना केवीं होय ॥ ५४ ॥
क्षणोक्षणीं भिंग लावावें । तेंचि तेंचि देखावे पहावे ।
परी इतरांस भासों द्यावें । मार्मिक नजरबाज हा ॥ ५५ ॥

* * *

असो. फॅशनेबल उठले । शेकहँड शिकवोनि गेले ।
नंतर समाचारा आले । दुसरे मित्र खाद्यगुरू ॥ ५६ ॥
तेच होवोनि म्हणती सत्वर । इतर सर्व राहो विचार
परी आधीं भोजनाचार । तुम्हां शिकला पाहिजे ॥ ५७ ॥
वनस्पत्याहाराची प्रौढी । मिरवा हिंदुस्थानांत बापुडी
परी मांसाहारीं उडी । घातली पाहिजे परदेशीं ॥ ५८ ॥
चार-पंचमांश जग । मांसाहारीच आहे मग ।
व्यर्थ शुद्धाहाराची रग । जिरली पाहिजे सुविचारें ॥ ५९ ॥
पापपुण्य कोणी पाहिलें । केवळ शरीर रक्षण पहिलें
सर्व धर्माधिष्ठान भलें । शरीर असें मानिती ॥ ६० ॥
'जीव जीवाचें जीवन' । हें तों प्रसिद्ध मनुवचन ।
त्यातें अवमानितां जाण । धर्मव्यवहार उल्लंघती ॥ ६१ ॥
मांसाहारीं न मुळीं पाप । दोरीस म्हणूं नये साप ।
सर्व योजना आपोआप । परस्पर झाली असे ॥ ६२ ॥
खाटिकें स्वगृहीं मारिला । बबर्जीनें शिजवियला ।
आपण फक्त मुखीं घातला । यांत कैचें पापाचरण ॥ ६३ ॥
हिंसा म्हणावें कशाला । हेंच न कळे मुळि आम्हाला
ब्रह्मदेवाचा बाप बोलला । ' हिंसित पूर्वीच मृत असती ' ॥६४॥
कांटा म्हणजेच त्रिशूल । सुरीचें ' नंदक ' खड्ग मूळ
चमचा ' यज्ञस्रुच् ' चि केवळ । सकल खाद्य पवित्र करी ॥६५॥
कढीभाताचें खूळ पुरे । हंसतील इंग्रजांचीं पोरें ।
शरीरप्रकृतीसही बरें । म्हणोनि मांस-स्वीकारा ॥ ६६ ॥

खावीं उकड–अंडीं सकाळीं । दुपारीं कुक्कुटबाळें कोंवळीं
मातापितर संध्याकाळीं । वंशक्षय एका दिवशीं ! ॥ ६७ ॥
येणें मागें उरत न कोणी । दुःख करावया लागोनी ।
बोलती सर्व तत्त्वज्ञानी । मृत न दुःखी, उरला तो ॥ ६८ ॥
गोमांसासारखें खाद्य नाहीं । पोषक जगतीं दुसरें कांहीं
विहित–निषिद्धाची ग्वाही । परदेशीं ईश्वरीं सोंपवावी ॥ ६९ ॥
कोणाची जीभ कोणाची शेपटी । एकाचें काळीज दुसऱ्याची ओटी ।
विविध रुचिर खाद्यवटी । मांसाहारीं लाभतसे ॥ ७० ॥
परदेशगमन नव्हे तो थट्टा । वरतीं पडे कामाचा रट्टा ।
म्हणोनी तुम्ही तुमचा कोठा । पुष्टसमृद्ध ठेवावा ॥ ७१ ॥
अन्न खावोनि बनविणें मांस । यासि जठरा पडत आयास
भक्ष्य भक्षक दोन्ही समरस । त्वरित होती मांसाहारीं ॥ ७२ ॥

* * *

असो, यावरी आले सभ्य । तदुपदेश लाभ अलभ्य ।
कारण आम्ही जन्मादारभ्य । देशी सभ्यताच जाणों ॥ ७३ ॥
मिस्तर सभ्य मग म्हणती । इंग्रजांची सभ्यतेची ख्याती
म्हणोन शब्दाची व्याख्या व्यासी । जाणून ठेविली असावी ॥७४॥
सभ्यपणांत हिंदी लोक । प्रमुख ऐसा आहेच लौकिक ।
परंतु स्थलपरत्वें फरक । सर्व गोष्टींत पडत असे ॥ ७५ ॥
शिंक येतां शिंको नये । ढेंकर येतां देऊं नये ।
खाकरवसा काढों नये । या नांव असे सभ्यता ॥ ७६ ॥
प्राणापान तेविं उदान । सर्व वायूंचें वशीकरण ।
प्राणायाम सभ्यताकारण । सहज परत्वें होत असे ॥ ७७ ॥
दांतावरतीं कीट वाढलें । तोंडीं शिरोन कोणी पाहिलें ।
परी चेहऱ्यास साबण लाविलें । या म्हणताती सभ्यता ॥ ७८ ॥
थुंकी भरली जरी तोंडांत । तरी धरोनि हातरुमालांत ।
खुशाल घालावी खिशांत । आपुला माल आपण धनी ॥ ७९ ॥
हंसणें लोटलें पोटांत । तरी न आणावें ओंठांत ।
जेविं दारिद्र्याचे मनोरथ । तेविं गूढचि जिरवावें ॥ ८० ॥

गालावरची सुरकुती । तोच हास्याची परिमिती ।
अतिक्रमणाची वाटतां भीती । तोंडा रुमाल लावावा ॥ ८१ ॥
अनोळख्याशीं बोलूं नये । जरी कोणाचा प्राण जाये ।
उद्दामपण मिथ्या विनयें । झांकोन सर्व काढावें ॥ ८२ ॥
कोणाकडे डोळे भरून । पाहतां सभ्यतेचा खून ।
होतसे म्हणुनी नेत्रकोण । केवळ त्याकडे फिरवावा ॥ ८३ ॥
आभारप्रदर्शन खिशांत । भरोनि घ्यावें दिवसरात ।
त्या इतुका इतर न होत । नित्य खर्च कशाचाही ॥ ८४ ॥
थँक्यू–क्यू–क्यू होतां होतां । शेवटीं यू ऊ उरलें हातां
परी कृतज्ञतेची ओळखतां । भाषा सर्वा येत असे ॥ ८५ ॥
काडी उचलोन दिली वरी । 'उपकार पर्वत झाले' तरी
ऐसें उद्गारावें सत्वरीं । मनांत शिव्या जरी दिल्या ॥ ८६ ॥
अपराध करितां कांहीं आपण । म्हणावे 'झालों दुःखपूर्ण'
मनांत शाप शिव्या जाण । दिल्या तरी चालताती ॥ ८७ ॥
थँक्यू शब्दें उपकार सपला । आतां काय देणें तुझ्या बापाला ।
ऐसाच त्याचा अर्थ झाला । हें तों जग जाणतसे ॥ ८८ ॥
तैसेंच मागा सवंग माफी । अपकाराची साफसुफी ।
आपोआप होते फुकी । मग अपराधा काय तोटा ? ॥ ८९ ॥
नमस्कार मस्तकें करावया । कटिपर्यंत देह लववावा ।
कंबर मोडल्याचा देखावा । केल्या सभ्यते रंग चढे ॥ ९० ॥
दुसऱ्या प्रथम वाट द्यावी । आपण थोडी सबूर करावी
पुढें मार्गु याची राखावी । आठवण निरंतर ॥ ९१ ॥
स्त्रियांस सर्वश्रेष्ठ मान । त्या येतां द्या उत्थापन ।
ना तरी तुम्ही देहभान । विसरलां ऐसें म्हणतील ॥ ९२ ॥
जेथें नारींची पूजा करिती । देवता तेथें आनंदें रमती
हेंच स्मरोनि सर्व रीतीं । आचरती लोक इंग्लंडीं ॥ ९३ ॥
स्त्री पुरुष एकत्र दिसतां । शंकाकुशंका मनीं न घेतां
आदरावीं सम उभयतां । मग ते असोत कोणीही ॥ ९४ ॥

स्त्रीची वस्तू पडतां खालीं । एकदमचि मारोनि उसळी
परक्यानेंही हातीं दिली । तरीच त्यास सभ्य म्हणती ॥ ९५ ॥
मिथ्या विनय असे घातक । परस्त्रियांसी वागतां देख
धीटपणानें हंसतमुख । आपण सदा असावें ॥ ९६ ॥
सुंदरगात्री सुंदरवदना । ही कोण असे आपली ललना
गौरवपूर्ण उत्तान प्रश्ना । करणें हीच सभ्य रीती ॥ ९७ ॥
परिचित स्त्रीस आपला हात । खुशाल द्यावा इतरां देखत
ती ' शिल्हलरी ' ' गलांट्री ' होत । इतर अर्थ कांहीं नसे ॥ ९८ ॥
हे शिष्टाचार दिसती विपरीत । परंतु ही त्या देशाची रीत
तियेचें शिक्षण घ्यावें येथ । मग परदेशीं पाय घाला ॥ ९९ ॥

* * *

असो. यापरी अनेक लोक । उपदेशूनि गेले देख ।
नवख्या प्रवाशाचें मुख । वाळोनि गेलें सत्वरीं ॥१००॥
जलसागर उत्तीर्ण होणें । हें तों सुलभ आगबोटीनें ।
परी आचार सागर ओलांडणें । कवणें उपायें होणार ? ॥१०१॥
ज्या न स्वदेशींच रीत भात । त्याची परदेशीं काय बात
असो, तरी आतां जाणें प्राप्त । म्हणोनि गेलें पाहिजे ॥१०२॥
तज्ज्ञ मित्र गेल्यामागुती । आले ' देशी ' मित्र सोबती
तैसेंचि आप्तइष्टांप्रती । भेटण्या जाणें प्राप्त झालें ॥१०३॥
त्या सर्वांही केला उपदेश । प्रकृति संभाळण्याचा विशेष
साधनसामुग्रीचा आदेश । कोणाचाही अवमानवेना ॥१०४॥
खाद्य आवडे यांस काय । याचा मानसीं निश्चय ।
करोनि प्रत्येकीं पाथेय । निरनिराळें बांधियलें ॥१०५॥
कोणी केले लाडू डिंकाचे । उपयोगी जे प्रवासाचे ।
म्हणति टिकाऊ हेंच साचें । इतर नासोनी जाईल ॥१०६॥
कोणी आलेपाक बनविला । कोणी नारळ दिधला ओला
कोणी वाळल्या खोबऱ्याच्या भकला । आणोनि देति तांतडीनें॥१०७॥
कोणी म्हणती लोणचें न्यावें । पापड पोहे म्हणती न्यावे
खिसमिस खारका अवश्य हवें । ऐसें सुज्ञ कोणी म्हणती ॥१०८॥

मुख्य ते भूईमूग राहिले । त्याविण इतर कांहीं न भलें
तैसेचि फोडोनि गुळाचे भेले । मोठा खडा घ्या म्हणती ॥१०९॥

होतां होतां माजली गर्दी । पडशी यानेंच भरली अर्धी
इतक्यांत आंत आली वर्दी । वैद्यराज आल्याची ॥ ११० ॥

त्याहीं पाहिला खाद्यसंभार । आणि मनाशीं केला विचार
जुळविला रोगांचा बाजार । परि औषध कांहीं दिसेना ॥ १११ ॥

तेव्हां म्हणती वैद्यराज । तुम्हा परदेशीं कामकाज ।
परी आरोग्याचा इलाज । घेतल्याविण जाऊं नये ॥ ११२ ॥

देशी प्रकृतीस औषधें देशी । परदेशी मानवतील कैशीं
म्हणोन कांहीं देईन खाशीं । घ्या तीं तुमच्या संग्रहीं ॥ ११३ ॥

पनवेलचे ते पुराणिक । किंवा झंडूभटजी नामक ।
वैद्यवर्यांचीं दुकानें संमुख । औषधास हो काय तोटा ॥ ११४ ॥

हवे ते देशी रोग जुने । किंवा नवे इंग्रजी नमुने ।
सर्व संहार आपुल्या गुणें । करितील आमुचीं औषधें ॥ ११५ ॥

त्यांतूनही नित्यानित्य । विवेक करावा अगत्य ।
मूर्धाभिषिक्त असती सत्य । त्याचि औषधी आधीं घ्या ॥ ११६ ॥

अवरोध हेंच असतें जाण । प्रायः सर्व विकारकारण
म्हणून पाहिलें त्रिफळाचूर्ण । कुपी भरोनि घ्या जवळीं ॥ ११७ ॥

हिरडा बेहडा आंवळकाठी । जो नित्य घाली निज पोटीं
तया जगजेठी उठाउठी । शौचास साफ करवील ॥ ११८ ॥

तैसी मात्रा सूतशेखर । सर्व प्रवाशांचा आधार ।
वातपित्तांचा संहार । सदा निश्चयें करित असे ॥ ११९ ॥

खाद्य औषधें झालीं तरी । राहिली कुटलेली सुपारी
तिची आठवण नित्य दुपारीं । झाल्यावीण केविं राहे ? ॥ १२० ॥

इतक्यांत आले उपाध्ये भट । त्यांना लागलीसे चुटपुट
म्हणती ब्राह्मण्यरक्षणाची वाट । काय केली तें सांगा ॥ १२१ ॥

प्रायश्चित्ताचो विचार । सावकाश करूं आल्यावर ।
परी अवश्य न्यावें बरोबर । यज्ञोपवीत मंतरोनी ॥ १२२ ॥

पवित्र सूत्राची ब्रह्मगांठ । सर्व पातकांचा नायनाट ।
करिते म्हणोनी खटपट । माझी सर्व चाललीसे ॥ १२३ ॥
मग भिक्षुकांचे अड्डयावर । मी गर्वानें करीन जाहीर
आमचे यजमान धर्मावतार । जानवें विलायतेसि नेलें ! ॥ १२४ ॥
प्रवासीं मनुष्य काय करितो । तें कोण कोणास विचारितो
अभिनिवेश तयारींत दिसतो । तेवढा आम्हा ग्राह्य पुरे ॥ १२५ ॥
असो. ऐसी सर्व तयारी । करोनि गांठली मुंबानगरी
देवोनि घेवोनि परोपरी । आशिर्वाद लहानथोरां ॥ १२६ ॥
सन एकोणीस एकोणिशींशें । एप्रिलाच्या उपान्त्य दिवशीं
'मनोरा' आगबोट खाशी । आम्हां घेवोनी निघाली ॥ १२७ ॥

## परिशिष्ट नं. २

# सरकारच्या लहरीपणाचा मासला

( केळकरांनी कोलंबोहून लिहिलेलें पत्र )

' मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यद्विचिंतयेत् ' या म्हणीचा अनुभव पावलोपावलीं मनुष्याला येत असतोच. पण स्वराज्यसंघाच्या शिष्ट मंडळाला तिचा काल जो अनुभव आला तो मात्र आश्चर्यानें थक्क करून सोडणारा होता. आज सकाळीं मी लिहीत बसलों आहें या वेळीं, टिळकप्रभृति डेप्युटेशनची मंडळी कोलंबोच्या बंदरांत जाऊन आगबोटींत बसण्याच्या धांदलींत असावयाची. पण दैवाची लीला अशी कीं, याच वेळीं विलायतेस जाण्याची तयारी न करितां त्यांनीं परत हिंदुस्थानाकडे जाण्याच्या तयारीस लागावें! ही बातमी वाचून केसरीचे हजारों वाचक डोळे चोळचोळून आपण स्वप्नांत आहों कीं जागे आहों असा विचार करूं लागतील; पण सरकारनें लोकांना अशा रीतीनें आश्चर्यचकित करून सोडण्यासारखे खेळ आजवर अनेक केले त्यांतलाच हाहि एक आहे; व आणखी असे किती खेळ आपणा लोकांस पहावयाचे आहेत न कळे !

असो; विलायतेस हिंदी स्वराज्यसंघामार्फत शिष्टमंडळ पाठविण्याचा बेत नक्की करून त्याची साधनसामुग्री जुळविण्यास प्रारंभ झाल्यापासूनची हकीकत केसरींतून वेळोवेळीं प्रसिद्ध झालीच आहे. मुंबईहून निघणाऱ्या एखाद्या आगबोटींत जागा मिळाली तर पहावी अशा हेतुनें केलेले सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यावर, कोलंबो येथें येऊन आगबोटीवर बसण्याचा बेत करावा लागला; व त्याप्रमाणें मुंबईहून सामानासुमानाची सर्व तयारी करून आम्ही सर्व मंडळी ता. २७ रोजीं निघालों. वाटेंत विजापूर येथील मंडळीकडून लो. टिळक यांस फार दिवसांचें निमंत्रण होतें म्हणून तेथें अर्धा दिवस मुक्काम करून मद्रासेस ता. ३० रोजीं येऊन पोंचलों. मद्रासेस एक दिवस विश्रांति हवीच होती. शिवाय मिसेस बेझंट यांनीं अड्यार येथें वाटेंत उतरण्याचें टिळकांकडून पुण्यास अभिवचन घेतलें होतें.

यामुळें मद्रासेस दीड दिवस मुक्काम पडला. या मुक्कामांत मद्रास शहरांतील सर्व जातींच्या व सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांकडून टिळकांचा सन्मान उत्तमप्रकारें करण्यांत आला व डेप्युटेशनला अतिशय प्रेमपूर्वक निरोप देण्यांत आला. मद्रास इलाख्यांतील पुढारी व सुशिक्षित लोकांचें मत टिळकांसंबंधानें व डेप्युटेशनच्या कामासंबंधानें काय आहे, हें मद्रास येथील प्रचंड जाहीर सभेंत मद्रासेंतील सर्व प्रमुख राजकीय व इतर सार्वजानिक संस्थांनीं मिळून जें संयुक्त मानपत्र दिलें, आणि विशेषतः सर सुब्रह्मण्य अय्यर यांनीं जें भाषण केलें, त्यावरून कळून येण्यासारखें आहेच. मद्रासेहून निघाल्यावर पुढें कोलंबोपर्यंत वाटेंत कोठेंहि मुक्काम करावयाचा नाहीं असें ठरलें होतें. तथापि वाटेंतील लहानमोठ्या अनेक स्टेशनांवरून टिळकांचा अतिशय थाटानें सत्कार करण्यांत आला. तंजावर, त्रिचनापल्ली, मदुरा वगैरे ठिकाणीं जो थाट व उत्साह, आणि समारंभांत जो व्यवस्थितपणा, दिसून आला तो अपूर्व होता. लहानसान स्टेशनांवर गाडी उभी रहात नाहीं; तथापि गांवोगांवच्या लोकांनीं रात्रीं दोन दोन तीन-तीन वाजतां, टिळकांना पहाण्याची संधि मिळणें शक्य नसतां, किंवा आपला आवाज त्यांच्या झोंपेंत त्यांच्या कानीं जाण्याचीहि आशा नसतां, स्टेशनावरील प्लॅटफॉर्मवरूनच काय पण रस्त्याच्या बाजूलाहि उभे राहून, 'टिळक-महाराजकी जय' अशी आरोळी मारून त्यांचा सत्कार करण्याची आपली हौस कशी तरी फेडून घेतली.

कोलंबो येथेंहि हिंदी व सिंहली मंडळींनीं टिळकांचें व डेप्युटेशनचें थाटानें स्वागत केलें. टिळक व पाल या दोघांचीं दोन व्याख्यानें झालीं. पहिल्या व्याख्यानास सर अरुणाचलं, सीलोन येथील पहिल्या प्रतीचे नागरिक, व दुसऱ्या व्याख्यानास मि. डिमेल सी. बी. ई., कोलंबो येथील एक पुढारी, हे अध्यक्ष होते. उपवनोपहारप्रसंगीं कोलंबो येथील कमींत कमी दीड हजार प्रमुख स्त्रीपुरुष हजर होते. टिळकांच्या व पालबाबूंच्या व्याख्यानांस सुमारें दीड-दोन हजार रुपये जमले ते तेथील माजी लोकप्रिय गव्हर्नर सर अँडरसन यांच्या स्मारकास देण्यांत आले. डेप्युटेशनकरितां मंडळींनीं स्वतंत्र फंड काढण्यास सुरुवात केली असून पांचपांचशेंचे कांहीं आंकडे पडले आहेत.

ता. २ व ३ हे दिवस डेप्युटेशनच्या मंडळीस व त्यांचा सत्कार करणाऱ्या कोलंबो येथील नागरिकांस मोठ्या गर्दीचे गेले. मुंबईस सामानसुमान बरेंच खरेदी झालें होतें; तथापि कांहीं खरेदी व्हावयाचें राहिलेंच होतें तें होऊन बांधाबांध जोरानें सुरू झाली. इतक्यांत ता. ३ रोजीं विलायतच्या सफरीची अनपेक्षित रीतीनें डळमळ होण्याची सुरुवात झाली. पी. अँड ओ. ची आगबोट मिळत नाहीं असें पंधरा दिवस पाहून आम्ही प्रथम बी बीलाइनर कंपनीच्या लँकेशायर नामक बोटीनें कोलंबोहून जाण्याचें ठरविलें. पण ता. ३ ला या बोटीनें जाण्याच्या ऐवजीं ता. ५ रोजीं जपानी कंपनीच्या इयोमारू नामक बोटीनें गेल्यास मंडळींची सोय प्रवासाच्या दृष्टीनें अधिक होईल, असें मुंबईस एका तज्ज्ञ व अनुभविक गृहस्थानें फारच आग्रहानें सांगितल्यावरून जपानी बोटीनें जाण्याचें आम्हीं मुक्रर केलें होतें. कोलंबोस ही जपानी बोट ता. ५ रोजीं यावयाची असा अदमास होता. त्याप्रमाणें आम्ही व आमचे एजंट थॉमस कुक कंपनीचे लोक बोटीची वाट पहात होतों. ता. ३ रोजीं सायंकाळीं मी येथील कलोनियल सेक्रेटरीकडे पासपोर्ट मंजुरीकरितां गेलों. आम्हास मुंबईस पासपोर्ट मिळाले होते व ते सर्व हिंदुस्थानांत चालले असते. पण सीलोन ही क्राऊन कॉलनी. येथील सरकार वेगळें असल्यानें आमच्या पासपोर्टावर येथील सरकारचा मंजुरीचा स्वतंत्र शेरा हवा होता, व तो सदर सेक्रेटरींनीं तावडतोब करूनहि दिला. पासपोर्ट घेऊन मी तसाच थॉमस कुक कंपनीकडे गेलों व तिकिटें काढलीं काय म्हणून विचारलें तों त्यांनीं सांगितलें कीं, 'तुमची जपानी बोट येत आहे कुठें ! ती उद्यां कोलंबोस यावयाची होती खरी; पण आतां पहातों तों नुकतेंच तिनें जपान सोडलें असून ता. २३ पर्यंत ती कोलंबोस येत नाहीं !' हें ऐकून मला काय वाटलें असेल ! आणखी २० दिवस कोलंबोस असाच पाहुणचार खात पडून राहण्याची कल्पना दुःसह होती. पाहुणचार फार गोड होता. येथील मंडळींच्या सहवासांत महिनेच्या महिने घालविले तरी कंटाळा येणें शक्य नव्हतें. पण २० दिवस व्यर्थ कसे घालवावयाचे ! विलायतचें कामहि पुढें ढकललें जाणार ! आधींच बोटीवर ४५ दिवस लागणार; त्यांत या २० दिवसांची आणखी भर ! पण जपानी बोटीवरून जाण्याचें ठरण्यापूर्वी ज्या

लँकेशायर बोटीवरून जाण्याचें आम्ही प्रथम मुंबईस ठरविलें होतें तिची आठवण मला होती. ती याच सुमारास कोलंबोस येणार होती. अर्थात् ‘ इयोमारू ’ मिळत नाहीं तर ‘ लँकेशायर ’ कां होईना! तिच्यावर जागा मिळवून द्या म्हणजे झालें असें मी थॉमस कुकच्या एजंटांस सांगितलें, व त्यांनीं ताबडतोब टेलिफोन करून माहिती मिळवून “ होय, सात जागा तुम्हास दिल्या आहेत ” असें उत्तर आम्हांस जागच्या जागीं मिळवून दिलें ! यामुळें एका पांच मिनिटांचे आंत विलायतेस जाण्याच्या निराशेचें दुःख व फिरून निराशेच्या जागीं आशा उत्पन्न झाल्याचे सुख मला अनुभवावयास सांपडलें ! व ज्या लँकेशायर बोटीचा आम्ही जाणूनबुजून पूर्वी अव्हेर केला तिनेंच आम्हास आयत्या वेळीं हात द्यावा हा योगायोग विलक्षण खरा असें म्हणून मी घरीं परतलों. दैवलीलेच्या या लहानशा धक्कयानें आमची प्रवासाची हुरूप फिरून ताजी झाली; व सामानासुमानाची उरली सुरली तयारी पुरी करण्यास डेप्युटेशनच्या मंडळींनीं प्रारंभ केला.

ता. ४ रोजीं सकाळीं पालबाबूंचें व्याख्यान झालें. दोनप्रहरीं जेवणानंतर येथील हिंदी मित्रमंडळीच्या आग्रहावरून फोटो घेण्याचें काम सुरू होऊन डेप्युटेशनचा फोटो काढून झाला. सामानसुमान पुरें बांधलें जाऊन त्यावर बोटींची तिकिटें डकविण्यास सुरवात झाली. लँकेशायर बोट दोन तासांनीं बंदरांत येणार अशी बातमी आली. टिळकांनीं अखेरच्या जरूरीच्या चिठ्यायपाट्यांवर सह्या करून दिल्या. दारांत गाड्या व मोटारी उभ्या होत्या. त्यांत बसून आतां फक्त उपवनोपहारसमारंभास जावयाचें व परत येतांच तसेंच थॉमस कुकच्या मनुष्याचे स्वाधीन सामान करावयाचें इतकेंच काय तें काम उरलें. इतक्यांत पालबाबूंच्या पासपोर्टवर मंजुरीचा शेरा घेण्याचा उरला होता त्याकरितां रा. गोखले हे कलोनियल सेक्रेटरीच्या ऑफिसांत गेले होते ते बातमी घेऊन धांवत सांगत आले कीं, “ पालबाबूंचा पासपोर्ट सेक्रेटरीनीं ठेऊन घेतला. तो तर ते परत देत नाहींतच. पण बाकी सर्वांचे पासपोर्टहि रद्द करण्याचा हुकूम तारेनें आलेला असून काल मंजूर करून दिलेले सर्व पासपोर्टहि परत आणून स्वाधीन करा असें सेक्रेटरी म्हणतात ! ” प्रथम याचा अर्थच आम्हांस कळेना. तेव्हां टिळक प्रभृति आम्ही सर्व मंडळी ताबडतोब सेक्रेटरीच्या भेटीस गेलों. त्यांनीं

सांगितलें कीं 'दिल्लीहून एक व मद्रासेहून एक अशा दोन सरकारी हुकमाच्या तारा नुकत्याच आल्या असून त्याअन्वयें तुम्हां सर्वांचे पासपोर्ट रद्द करण्यांत आले आहेत. तुम्हांपैकीं टिळक व केळकर यांस मी आतांच पत्रें रवाना करवीत होतों तों तुम्ही सर्वच आलां बरें झालें.' हें ऐकून आमची स्थिति अत्यंत चमत्कारिक झाली. आम्हीं कोणी न जातों तर हीं पत्रें आम्हांस आज सकाळीं म्हणजे बोटीवर जाण्यास निघण्याच्या क्षणीं हातीं पडलीं असतीं. किंबहुना तसेंहि झालें नसतें ! कारण लँकेशायर बोट काल सायंकाळींच कोलंबोस येऊन दाखल झालेली असून आज सकाळीं आठ वाजतांच ती निघणार होती. अर्थात् सामान तर पुढें बोटीवर आधीच गेलें असतें, व पत्रें हातीं पडावयाच्या आधींच आम्ही बोटीच्या धक्यावर जाऊन पोंचणें संभवनीय होतें; पण पत्रांची व आमची चुकामूक झाल्यानें बोट सांपडणें मात्र शक्य नव्हतें. कारण कलोनियल सेक्रेटरींनीं आम्हांस असें सांगितलें कीं, " तुम्हांस पत्रें न पोंचतीं तरी सुद्धां बोटिवर चढतांना तुमचे पासपोर्ट काढून घेऊन तुम्हांस बोटीवर चढण्यास प्रतिबंध करावयाचा असें आमच्या सरकारनें ठरविलें होतें ! "

आतां पुढें काय ? कोलंबो येथील अधिकाऱ्यांचे हातीं कांहींच नव्हतें. आमचे हातीं दिलेल्या पत्रांतील मजकुरावरून पाहतां खुद्द विलायतसरकारच्या हुकमावरून आम्हांस ही बंदी करण्यांत आली आहे असें दिसलें. अर्थात दिल्लीसरकार तरी या बाबतींत काय करूं शकेल हाही प्रश्नच होता.तथापि एक वेळ व्हाईसरायसाहेबांकडे तारांनीं अर्ज करून पहावे असें ठरवून स्वतः टिळक व खापर्डे यांच्या नांवची एकेक व डेप्युटेशनच्या तर्फे माझ्या नांवची एक अशा तीन तारा पाठविण्याचें ठरलें. पण आमच्या तारा तरी कोण पाठवूं देणार ? तारेची खुंटीहि सरकारच्याच हातीं ! त्यांतहि आम्ही परस्वाधीनच ! गेल्या पंधरा दिवसांत 'टिळक व डेप्युशेनची मंडळी कोलंबोस कधींतरी येणार, सोयी काय पाहिजेत वगैरे मजकुराच्या पाठविलेल्या सर्व तारा येथील सेन्सारनें दडपून ठेवल्या होत्या, व आम्ही स्टेशनावर अमक्या दिवशीं येणार ही बातमी आमच्या कोलंबो येथील स्नेहीमंडळीस अखेर पर्यंत प्रत्यक्ष अशी मिळूं दिली नाहीं, हा अनुभव ताजा होताच. तेव्हां टिळकांनीं सेक्रेटरीस विनंति केली कीं, आम्ही व्हॉइसराय

व स्टेटसेक्रेटरी यांच्या तारा लिहून देतों व पैसे देतों, पण तारा तुम्ही पाठवाल तर पोंचतील. तेव्हां सेक्रेटरी म्हणाले कीं, तारा मला पाठवितां येणार नाहींत; पण मी ' सेन्सारला ' सांगून तुमच्या या तारांना प्रतिबंध होऊं नये असें मात्र करतों. अखेर सेक्रेटरीच्या हपिसांतच बसून तारा लिहिल्या व पाठविल्या व तारांच्या उत्तराची वाट पहात मंडळी घरीं येऊन बसली. डेप्युटेशन ता. ५ रोजीं जाणार अशा समजुतीनें बाहेर-गांवाहून तारा व पत्रें येतच होतीं. हिंदुस्थानांतील लोक डेप्युटेशन आग-बोटींत बसून निघाल्याच्या तारेची वाट पहात बसले होते. अशा वेळीं " डेप्युटेशन जावयाचें थांबलें, सरकाराकडून डेप्युटेशनला प्रतिबंध झाला, दिलेले पासपोर्ट परत मागितले, डेप्युटेशनचीं मंडळीं परत हिंदुस्थानाकडे निघणार " अशी तार प्रसिद्ध करण्याची वेळ यावी हा कोण विलक्षण योगायोग ! पण सरकारच्या लहरी व मनस्वी स्वभावानें तो आणला खरा!

व्हाइसरॉयसाहेबांच्या तारेंतच, बंदीचा हुकूम विलायतसरकाराकडून झाल्याचा मजकूर असल्यामुळें, व्हाइसरॉयसाहेबांस केलेल्या तारांचा फारसा उपयोग होण्याची आशा कोणासच फारशी नव्हती. ' आमच्या हातीं या बाबतींत कांहीं नाहीं ' असें मोघम उत्तरच बहुधा व्हाइसरॉय-साहेबांकडून येईल असें वाटून, व हिंदुस्थानाकडे परत फिरावें लागणार असें वाटून, आमच्यापैकीं कांहीं मंडळींनीं सिलोनची जुनी राजधानी कँडी हें शहर पहाण्यास दोनप्रहरीं निघण्याचें ठरविलें; व रा. गोखले हे आदल्या दिवशीं कलोनियल सेक्रेटरीस कबूल केल्याप्रमाणें सर्व पासपोर्ट त्यांच्या स्वा-धीन करण्याकरितां सेक्रेटरीयट हॉलमध्यें गेले. त्यांनीं पासपोर्ट परत केले व त्यावरील मंजुरीचे शेरे खोडले जाणार, इतक्यांत फिरून एक आशेची लाट उठली. व्हाइसरॉयसाहेबांकडून कोलंबोसरकारास अशी तार येऊन धड-कली कीं, "टिळक व डेप्युटेशनची मंडळी यांच्या तारा पोंचल्याप्रमाणें टिळकांना व त्यांच्या बरोबरच्या मंडळीला परवानगी देण्याचा प्रश्न मी विलायतसरकारकडे तारेनें धाडला आहे. दरम्यान तूर्त तुम्ही वाटेल तर असें करावें—'हर्ली' ही बोट केपला—दक्षिण आफ्रिकेच्या दक्षिण टोका-च्या केप ऑफ गुड होपला—केप कॉलोनीला जात आहे तिजवरून टिळक वगैरेंना हवें तर जाऊं द्या. पण ही परवानगी फक्त केपपर्यंतची देतां येईल.

मात्र दरम्यान विलायतसरकारनें जर आपला पूर्वीचा हुकूम फिरविला नाहीं तर त्यांना केपहून परत यावें लागेल. हें त्यांस तुम्ही स्पष्ट बजवावें, व हें त्यांस सर्वस्वी कबूल असेल तर त्यांस बोटीवर जाऊं द्यावें."

वरील प्रकारची माहिती घेऊन रा. गोखले हे घरीं आले तेव्हां सर्व मंडळींच्या आशेस फिरून थोडी धुगधुगी आली. केपपर्यंत जाऊं देतात तर तेथपर्यंत तरी जाऊं, मग पुढें काय होईल तें पाहतां येईल, असें सर्वानुमतें टिळकांनीं ठरविलें, व केपपर्यंत जाण्याच्या परवानगीसंबंधाची मंजुरी फिरून सर्व पासपोर्टवर मांडून घेण्याकरितां रा. करंदीकर मी व गोखले कलोनियल सेक्रेटरीकडे गेलो, पासपोर्टवर केपपर्यंत जाण्याची मंजुरी तर लिहून द्याच, पण शिवाय व्हाइसरॉयसाहेबांस आणखी एक तार आम्ही करीत आहों तीहि कालच्यासारखी तुम्ही आजहि 'सेनसॉर' कडून पुढें जाऊं द्या असें मी त्यांस सांगितलें. येथें हें सांगणें जरूर आहे कीं, व्हाइसरॉयसाहेबांनीं शर्तींची परवानगी दिली असें सकृद्दर्शनीं दिसलें खरें. पण त्यांत केपपर्यंत जाण्याची परवानगी द्या असे शब्द वास्तविक विनाकारण पडले होते व त्या शब्दांमुळेंच ती शर्तींची परवानगीहि फुकट गेली. टिळकांनीं व्हाइसरॉयसाहेबांस केलेल्या तारेंत केपचा उल्लेख मुळींच नव्हता. पण पोलीस व इतर रिपोर्ट सरकाराकडे पूर्वी गेले त्यांत व वर्तमानपत्रांतूनहि आम्ही केप–मार्गानें जाणार असा उल्लेख होता. तोच अर्थात् व्हाइसरॉयसाहेबांच्या लक्षांत राहिलेला असून नुसतें 'जाऊं द्या' असें लिहिण्याच्या ऐवजीं 'केपपर्यंत जाऊं द्या' असें लिहिलें गेलें; पण त्यानें आमचा मात्र केवढा घोटाळा झाला पहा! आम्ही केपकडून गेलों काय किंवा सुएझकडून गेलों काय, आम्हास व सरकारास दोनहि सारखींच होतीं. केपकडून जाणाऱ्या बोटीस वीस दिवसांचा उशीर म्हणूनच सुएझकडून जाणाऱ्या बोटीवर आयत्या वेळीं जागा मिळविली; व व्हाइसरॉयसाहेबांच्या तारेंत केपचा उल्लेख होण्याचें साधारणतः कांहीं कारणहि नव्हतें. कारण त्यांची शर्त मान्य करावयाची म्हटली तरी आम्ही केपला अडकून पडावयाचे ते सुएझला अडकून पडलों असतों. दोनहि प्रवासमार्ग सुरू आहेत, व दोनहि ठिकाणीं आम्हास सरकारला अडकवून ठेवतां येणें शक्य असल्यामळें दोनहि मार्गांची फलश्रुति एकच होती. पण नाहीं. दैवयोग उलटा

व्हावयाचा म्हणजे तो असाच ! व्हाइसरॉय आपणाकडून परवानगी देऊन आमची सोय काढण्याकरितां धाडलेल्या तारेंत सहज ‘ केपमार्गें ’ असे शब्द घालतात; पण आमची आदल्याच दिवशीं बदललेली बोट प्रायः केपमार्गें जाणारी असतांहि या खेपेस ती सुएझमार्गें जावयास निघते !

‘केपपर्यंत’ हे शब्द वास्तविक निरर्थक आहेत; ते सहजासहजीं अर्थवादादाखल चुकून पडले आहेत; आम्हीं व्हाइसरॉयसाहेबांची शर्त मान्य केल्यास आम्ही केपकडून गेलों काय किंवा सुएझकडून गेलों काय, त्यांना दोनहि सारखींच आहेत; म्हणून आपण निवळ शब्दांवर फारसे जाऊं नका; तारेचा खरा, म्हणजे आम्हास परवानगी देण्याचा, व्हाइसरॉयसाहेबांचा खरा हेतु आपण लक्षांत आणा; बोट बंदरांत आहे; सामान धक्यावर आहे; तिकिटें आमच्या हातीं आहेत; थोडासा सारासार विचार चालवून परवानगी देण्याचें तुमच्या हातीं आहे; तेव्हां कृपा करून आम्हास बोटीवर जाण्याची परवानगी द्या; वाटेल तो करारनामा व्हाइसरॉयसाहेबांच्या तारेप्रमाणें आम्ही तुम्हास लिहून देतों ” असें कलोनिअल सेक्रेटरीस मी समजावून सांगितलें. तें त्यांस पटलेंहि. ते म्हणाले—“यापुढें तार जाऊन व्हाइसरॉयसाहेबांकडून आणखी तीन चार तासांत उत्तर येणें शक्य नाहीं. म्हणून मींच आमच्या गव्हर्नरसाहेबांच्या कानावर हा मजकूर टेलिफोननें घालतों व तुम्हास परवानगी देतां आली तर पहातों.” या आश्वासनानें आम्हास खरोखर फिरून आशा उत्पन्न झाली. कारण कलोनिअल सेक्रेटरीकडे तीन–चार वेळां जाण्याचा प्रसंग आला व त्या त्या वेळीं ते आमच्याशीं सभ्यपणानें व भलेपणानें वागले होते. सुमारें तीन वाजतां त्यांचें उत्तर मिळणार होतें !

झालेली हकीकत टिळकांस सांगण्याकरितां आम्ही परत घरीं आलों तों इकडे व्हाइसरॉयसाहेबांकडून टिळकांना पहिल्या तारेस उत्तरादाखल तार येऊन राहिली होती. या तारेंत शर्तीच्या परवानगीचाच मजकूर होता, व ‘केपपर्यंत’ असे शब्दहि होते. जास्त शब्द होते ते मात्र असे कीं, “विलायतसरकारनें डेप्युटेशनला बंदी केली त्याचें कारण बहुधा हेंच असावें कीं, हल्लीं विलायतेंत विचार व उद्योग जो कोणताहि व्हावयाचा तो फक्त युद्ध

जोरानें कसें चालू ठेवावें याघुरताच होणें इष्ट आहे. तथापि तुमचें प्रकरण मी विलायतसरकाराकडे विचाराकरितां पाठवीत आहें. ”

ही तार घेऊन आम्ही फिरून तीन वाजतां सेक्रेटरीसाहेबांकडे गेलों. तों सेक्रेटरीसाहेबांनीं सांगितलें कीं, “टेलिफोन करून गव्हर्नरसाहेबांस विचारलें. पण ‘केपपर्यंत’ असे शब्द आहेत त्या अर्थीं इतर मार्गानें आम्हास परवानगी देतां येत नाहीं ! मात्र आपली तार व्हाइसरॉयसाहेबांकडे पाठविण्याची मी कालच्यासारखी सवलत देतों” असें उत्तर मिळालें. अशा रीतीनें सर्व उपाय खुंटल्यानें व्हाइसरॉयसाहेबांस आणखी एक तार रवाना करून आम्ही निराश होऊन घरीं परत आलों.

या वेळीं ४॥–५ वाजले होते. लँकेशायर बोट बंदरांत उभी असून बरोबर सात वाजतां सुटणार होती. पुढील तास दीड तासांत उत्तर येणार कसें ? आले तरी पासपोर्टवर लेखी मंजुरी लिहिली जावयाची कशी ? आमची उत्कंठा व निराशा पाहून सेक्रेटरींनीं रा. करंदीकर यांस सहानुभूतिपूर्वक असें सांगितलें कीं,तुम्हा मंडळीखातर मी आज पांचाचे ऐवजीं सहा वाजेपर्यंत ह्पिसांत रहातों व उत्तर अनुकूल आल्यास एका क्षणांत मंजुरी लिहून देऊन मोकळे करतों. बरें, हें झालें तरी आमची सर्व मंडळी व सामान पडलें दोन मैलांवर तें आयत्या वेळीं बोटीवर कसें चढणार ? याकरितां पन्नास रुपये खर्चून आम्ही थॉमस कुक कंपनीकडून एका स्पेशल लॉंचवर (पडाव) धक्क्यावरील आमचें इतर सामान चढवून खलाशी तयार राहण्याची व्यवस्थाहि करविली, व अगदीं अखेरपर्यंत तारेची वाट पाहिली. पण तार आली नाहीं ! रात्रीं बोट ठरल्याप्रमाणें बंदरांतून निघून गेली. आम्ही मात्र हताश होऊन घरीं परत आलों.

आज व्हाइसरॉयसाहेबांकडे टिळकांनीं सविस्तर हकीकतीची आणखी तार पाठविली असून “ बशर्त का होईना, पण वाटेल त्या बोटीनें व वाटेल त्या मार्गानें जाण्याची सर्व साधारण अशी परवानगी द्या ” अशी तारेंत विनंति केलेली आहे. झालेली सर्व हकीकत वर्तमानपत्रांकडे त्रोटक रीतीनें तारेनें कळविली आहेच; पण सेनसॉर कोणती तार पाठवितात व

कोणती अडकवून ठेवतात कोणी सांगावें ? याकरितां ही कच्ची हकीकत केसरींतून प्रसिद्ध होऊन सर्व मित्रमंडळींस कळावी याकरितां पाठवीत आहें. पुढें हकीकत घडेल तीहि अशीच कळवीन.

कोलंबो, मांटेग्यु-हाऊस.
ता. ६ एप्रिल १९१८.
न. चिं. केळकर.

## परिशिष्ट नं० ३

# 'लोकसंग्रह' व श्री. केळकर यांची खास मुलाखत

लोकसंग्रहाच्या प्रतिनिधीनें ता. २९-११-१९ रोजीं रा. रा. न. चिं. केळकर यांची मुलाखत घेतली. त्या मुलाखतींत घाईत पण थोड्या वेळांत झालेलीं प्रश्नोत्तरें पुढें दिलीं आहेत.

प्रश्नः—आपण विलायतेंत पांच महिने घालवले व तेथील राजकीय स्थितीविषयीं आपणाला प्रत्यक्ष गोष्टी पहावयास मिळाल्या, त्यावरून तिकडील चळवळीसंबंधानें आपलें मत काय झालें ?

उत्तरः—या प्रश्नाचें उत्तर देण्याला म्हटलें तर एकादा ग्रंथ लिहूनही पुरणार नाहीं. व म्हटलें तर तें दोन शब्दांतहि देतां येईल. विलायतेंतील चळवळ अवश्य हवी एवढेंच नव्हे तर ती यशस्वी झालीच पाहिजे यांत शंका नाहीं. विलायतेंतील चळवळ हा निराशेचा मामला नाहीं ! पण तिजवर आशा कितपत ठेवावी हें दोन गोष्टींवर अवलंबून राहील. खुद्द विलायतेंत ज्या प्रमाणानें चळवळ होईल त्या प्रमाणानें तिकडे प्रत्यक्ष फळ मिळेल हें तर उघडच आहे. पण तिकडील चळवळीलाहि यश येण्याला खुद्द विलायतेंत हिंदुस्थानांतील चळवळ नऊदशांश आधारभूत आहे हें मात्र विसरतां येत नाहीं.

प्रश्नः—म्हणजे वरील प्रश्नाचें उत्तर एकेरी नाहीं, असेंच म्हणण्याचा आपला अर्थ दिसतो.

उत्तरः—अगदीं बरोबर ! एकेरी उत्तर पुष्कळांना प्रिय वाटतें ! पण दुर्दैवानें त्यावर निर्वाह मात्र होऊं शकत नाहीं. एकाच गोष्टीचें फाजील स्तोम माजविणें व माजावें म्हणून त्याच्या प्रतियोगी गोष्ट त्याज्य ठरविणें ही फार मोठी चूक होते.

## सर्व रोगांवर एकच औषध

देणाऱ्या डॉक्टरासारखें हें धोरण हास्यास्पद ठरतें. चळवळ नुसती विलायतेंत किंवा नुसती हिंदुस्थानांत हवी या प्रश्नाला एकेरी किंवा व्यवच्छेदक उत्तर नाहीं. दोन्ही एकसारख्या चालू पाहिजेत व समोरासमोरील दोन आरशांमध्यें उभ्या राहिलेल्या माणसाप्रमाणें हिंदुस्थानाला दोन्ही चळवळीवर एकच वेळीं आपल्या राजकीय देहाचें स्वास्थ्य व सौष्ठव एकाच क्षणीं पहातां व संभाळतां आलें पाहिजे.

प्रश्नः—पण त्यांतल्या त्यांत कमी अधिक महत्त्व तारतम्य भावानें तरी आपण दोन्ही चळवळींस वांटून देऊं शकाल कीं नाहीं ?

उत्तरः—हेंहि जरा कठीणच आहे. पण या दोहोंतील संबंधास तारतम्यभाव हें नांव देण्यापेक्षां

## अन्योन्यावलंबी भाव

असें नांव मी देईन. हिंदुस्थानांत चळवळ नसेल व लोकांच्या आकांक्षा प्रदीप्त होऊन मागण्या ठरल्या नसतील तर कोणी केवढाहि बडा हिंदी मुत्सद्दी अगर वक्ता विलायतेंत जाऊन चळवळ करूं म्हणेल तर ती होणार नाहीं. कोणाही वक्तयाला पाठबळ किती आहे याकडे तिकडील लोक विशेष पहातात; कारण तिकडे लोकसत्तेचा मनु सुरू आहे. बरें याच्या उलट विलायतेंत थोड्या श्रमानें केलेली चळवळ एकदम पुष्कळ फलदायी होण्याचाहि संभव असतो. तात्पर्य, या बाबतीत सामान्य सिद्धांत एवढाच घालतां येईल कीं, येथील व विलायतेंतील चळवळ ही एकाच शरिराचे दोन डोळे आहेत असें मानून कोणत्याहि वस्तूकडे दोन डोळ्यांनीं मिळून जसें आपण पहातों तसें पाहिलें पाहिजे.

प्रश्नः—विलायतेंतील अधिकारी व पार्लमेंटांतील राजकीय पक्ष यांचें हिंदुस्थानसंबंधानें पुढील धोरण कसें काय रहाण्याचा संभव आहे ?

उत्तरः—याचें थोडक्यांत मी असें उत्तर देईन.विलायतेंतील हिंदुस्थानचे मुख्य अधिकारी म्हणजे स्टेट सेक्रेटरी व त्यांचें कौन्सिल; पैकीं कौन्सिलची सभा अखेर कमी होईल; पण दरम्यान दिवसें दिवस हिंदी लोकांचा त्यांत अधिकाधिक समावेश होऊन आमच्या उपयोगाच्या दृष्टीनें त्याचें महत्त्व

वाढेल. कौन्सिलची सत्ता कमी झाल्यानें स्टेट सेक्रेटरी यांची सत्ता वाढली असें सकृद्दर्शनीं दिसेल. पण दिवसानुदिवस प्रातिगातिक मताचे स्टेट सेक्रेटरी नेमले जाण्यापेक्षां प्रागतिक मताचे स्टेट सेक्रेटरी नेमले जाण्याचा अधिक संभव आहे. प्रागतिक मताचा स्टेट सेक्रेटरी व त्याचें हिंदी कौन्सिलरांशीं साहचर्य या दोहोंमुळें हिंदी राजकीय सुधारणांचा प्रश्न विलायतेंत सरकारी रीतीनें तरी यापुढें निरंतर जागृत राहील असें मला वाटतें. दुसरे पक्षीं आज पार्लमेंटांत मजूरपक्षाला बहुमत नसलें तरी तो

## सरकाराशीं झुंजणारा प्रधान मल्ल आहे.

त्याची वाढही तरुण मनुष्याप्रमाणें सुरू आहे व जुन्या पक्षाची वाढ वृद्ध मनुष्याच्या शरिराप्रमाणें खुंटलेली आहे; एयढेंच नव्हे तर त्याची शक्ति क्षीण होत चालली आहे. अर्थात् पुढें मागें मजूरपक्षाचें प्रधान मंडळ अधिकारारूढ झालेंच पाहिजे यांत शंका नाहीं. शिवाय मजूरपक्षानें हिंदुस्थानच्या कार्यासंबंधानें जितकी सहानुभूती दाखवली आहे तितकी दुसऱ्या कोणत्याहि पक्षानें आजपर्यंत उघड दाखविली नव्हती. मजूरपक्ष झाला तरी आज जितकें बोलतो तितकें सर्व तावडतोब करीलच असें मी म्हणत नाहीं, पण दुसऱ्या कोणत्याहि पक्षापेक्षां या पक्षाच्या हातीं सत्ता आल्यानें आम्हाला स्वराज्याचे अधिकार अधिक लवकर मिळतील एवढें खास म्हणतां येईल. आतां

## मजूरपक्षाच्या मदतीचें औषध

घेतांना कांहीं विशिष्ट अनुपान व पथ्य सांभाळावें लागणार आहे. पण तो विषय विस्तृत व गहन असल्यामुळें मी त्याविषयीं तूर्त कांहीं सांगत नाहीं. खुणेचा शब्द म्हणून सांगतों तो हाच कीं, हिंदी लोकांना राज्य-कारभारांत अधिक सत्ता दिली तर तिचा फायदा अखिल जनतेला मिळेल किंवा तें गांठोडें मध्येंच कोणी तरी दडपून बसेल अशी शंका मजूरपक्षा-च्या कांहीं जाणत्या लोकांनीं घेतलेली; आढळली व ही त्यांची शंका प्रामा-णिकपणाची असल्यामुळें तिला प्रांजलपणाचें उत्तर देऊनच तिचें समा-धान करण्याचा प्रयत्न हिंदी पुढाऱ्यांकडून झाला पाहिजे.

प्रश्नः—विलायतेंत पुढें चळवळ चालविण्याची व्यवस्था काय झाली आहे?

उत्तरः—याविषयीं लो. टिळक यांनीं पुष्कळ विचारपूर्वक मत्‍त्व योजना मनाशीं ठरविली असून. येथील खाजगी व जाहीर सभांतून त्यांनीं त्यासंबंधीं दिग्दर्शन केलेंच आहे, व ही योजना राष्ट्रीय सभेपुढें ते मांडणार आहेत व सर्व प्रांतांतील पुढाऱ्यांकडून त्यास पाठिंबा मिळेल अशी आशाहि आहे. तूर्त सिद्ध झालेल्या गोष्टींपैकीं म्हणून एक गोष्ट मात्र मी सांगतों ती ही कीं, विलायतेंतील ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी ही आतां सर्वस्वीं राष्ट्रीय सभेच्या मताची झाल्यामुळें, तेथील चळवळीला लागणारीं साधनें आज तयार आहेत. कमिटीचे चेअरमन डॉ. क्लार्क हे पूर्ण लोकसत्तावादी आहेत. कमिटीचे नवे सेक्रेटरी मि. ब्लिझर्ड हे मजूरपक्षांतील चळवळ्या लोकांपैकीं एक असून

## फेबीयन

सोसायटीशीं त्यांचा विशेष संबंध आहे. एक महिन्यापूर्वीं झालेल्या म्युनिसिपल निवडणुकींत त्यांना आपल्या भागांत सर्वांत अधिक मतें मिळालीं व पुढील पार्लमेंटरी निवडणुकींत ते बहुधा निवडूनहि येतील. त्याचप्रमाणें

### इंडिया पत्राची व्यवस्था

तूर्त समाधानकारक झाली आहे. कारण एका मनुष्याला पुरणारें तें काम असून त्या कामाला लागणारी शिक्षणविषयक व राजकीय परिज्ञानविषयक जी लायकी हवी ती हल्लींच्या संपादक मिस् नॉरमॅटन यांना आहे. मॉडर्न रिव्ह्यूंतील लेखांत सेंट निहालसिंग यांनीं या बाईचें वर्णन progressive and able या शब्दांनीं केलेलें आहे व तें खरें आहे. ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीच्या घटनेंत ठरल्याप्रमाणें पसंत केलेला एकादा पुढारी विलायतेस गेल्यास स्थानिक हिंदी ज्ञानाचा फायदा इंडियापत्राच्या धोरणास अधिक होईल. गेल्या महिन्यांत राष्ट्रीय सभेच्या डेप्युटेशनतर्फे जीं व्याख्यानें झालीं त्यांची व्यवस्था कमिटीचे नवे सेक्रेटरी मि. ब्लिझर्ड यांनीच केलेली होती व हिंदी पुढारी कमिटीच्या मदतीस गेल्यास व पैशाचा पुरवठा झाल्यास व्याख्यानांचें वगैरे काम पुष्कळच फैलावण्यासारखें आहे.

प्रश्नः——तिकडील चळवळीच्या खर्चाचा अंदाज व स्वरूप काय आहे?

उत्तरः——याची त्रोटक माहिती डेप्युटेशनच्या रिपोर्टांत आहे. लो. टिळकांनीं केलेल्या अंदाजाप्रमाणें एक ब्रिटिश काँग्रेस कमिटी शिवाय तीन हिंदी प्रतिनिधी विलायतेंत पुढील पांच वर्षेपर्यंत निरंतर रहावे; पैकीं एक चांगला लेखक, एक चांगला वक्ता व एक दुहजबी मनुष्य असावा. या तिघांचा तेथील रहाण्याचा, प्रवासाचा, व्याख्यानांचा व छपाईचा वगैरे मिळून सालीना सुमारें ६० हजार रु. खर्च येईल. या सर्व प्रश्नांच्या विचाराकरतां राष्ट्रीय सभा एकादी लहानशी पोटकमिटी नेमून चर्चा करीलच; मात्र माणसें नेमणें तीं शक्य तितकीं निरनिराळ्या प्रांतांची पण एक मताची असावीं हें इष्ट आहे.

प्रश्नः——सार्वजनिक दृष्टीनें उपयुक्त असें कांहीं तिकडील विशिष्ट अनुभव व माहिती आपण थोडीशी सांगितल्यास ती वाचकांस उपयोगी पडेल असें वाटतें.

उत्तरः——विलायतेंत घालविलेल्या दीडशें दिवसांपैकीं अप्रस्तुत वाचन व निरीक्षण यांजकडे देण्याला मिळालेला वेळ फारसा असणें शक्य नाहीं. तथापि जें कांहीं सांगण्यासारखें आहे तेंहि उभ्या उभीं तोंडीं सांगतां येण्यासारखें नाहीं. सांगण्यासारख्या ज्या गोष्टी ओघानें पाहिल्या, वाचल्या व ऐकल्या त्यांची माहिती यापुढें प्रसंगाप्रसंगानें, किंवा सवड झाल्यास एखाद्या लहानशा पुस्तकाच्या रूपानें मित्रमंडळीस देण्याचा माझा विचार आहे; घडेल तें खरें !

ग्रंथालय
२१(५)
सभासद